शब्द


# रुची

४९

मार्च २०२५ । मूल्य १० रु. । पृष्ठे ७६





## ‘जन्मशताब्दी स्मृतिजागर’ क्षणचित्रे


कुमार केतकर


डॉ. सुजाता जाधव


डॉ. लतिका भानुशाली


रामदास भटकळ


अभिजित गाडगीळ


सुदेश हिंगलासूपरकर



पोपटी चौकट अभिवाचन – अभिजित खांडकेकर आणि गौतमी देशपांडे


आजी – वाचन – चंद्रकांत काळे


चक्र (नाटक) – पूर्वा पवार, मोहित वैद्य


रागिणी पुंडलीक यांच्या आत्मचरित्रातील उतारा वाचताना मोनिका गजेंद्रगडकर



‘विद्याधर पुंडलीक – व्यक्तित्व आणि साहित्य’ पुस्तिकेचे प्रकाशन

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

शब्द रुची ४९

मार्च २०२५, वर्ष बारावे
अंक अकरावा, मूल्य १० रु.

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**

कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**

अभ्यागत संपादक : **आल्हाद गोडबोले**

मुखपृष्ठ : **प्रदीप म्हापसेकर**

कार्यालयीन संपर्क

**ग्रंथाली संगणक विभाग**

**shabdruchee24@gmail.com**

**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**

**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल, सौमित्र शिंदे**

**वेबसाइट डिझाइन व डिजिटल एडिटिंग – समीर कदम**

संपर्क
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को-ऑप. हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर, मनोरमा नगरकर मार्ग, माहीम (प.), मुंबई ४०००१६
फोन : २४२१६०५० **(वेळ : दुपारी १ ते ६.३०)**

अंकासाठी लेख व प्रतिक्रिया खालील मेलवर पाठवावी.
**shabdruchee24@gmail.com**

ऑफिस वेळ : दुपारी १ ते सायं. ७
संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी

अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.

## अनुक्रम

**सुदेश हिंगलासपूरकर / ४**
मनोगत

**आल्हाद गोडबोले / ९**
कधी बहर, कधी शिशिर, परंतु...

**नीता बोकील / १४**
**संसार एके संसारे**

**संतोष शेणई / २२**
मराठी प्रकाशनातील घराणी

**विनोद शिरसाठ / २७**
पुस्तक प्रकाशनाचे 'साधना' मॉडेल

**रोहन चंपानेरकर / ३४**
वारशाची वाटचाल वेगळ्या वाटेवरून.....

**मिलिंद परांजपे / ३९**
मुलांसाठी पुस्तके... करू आनंदे!

**अशोक नारायण मुळे / ४४**
चार आण्याचा प्रकाशक, एक रुपयाचा प्रकाशक झालो.....

**राम जगताप / ५१**
तत्पूर्वीचा मृत्युलेख

**डॉ. अंजली पटवर्धन-कुलकर्णी / ५५**
शैक्षणिक प्रक्रियेतील कुटुंबाचे योगदान

**संजीवनी खेर / ५९**
मन्नू भंडारी : एक निडर लेखणी

**मेधा आलकरी / ६२**
साहित्याग्रणींच्या साहित्याचा हृद्य जागर

वृत्तांत / ६५ ते ६९

**डॉ. निर्मोही फडके, चांगदेव काळे / ७० ते ७४**
ग्रंथपरिचय / ग्रंथपाने

# मनोगत...

**सुदेश हिंगलासपूरकर**

प्रिय वाचकहो, नमस्कार.

'ग्रंथाली'चा सुवर्णमहोत्सवी वाचकदिन २५ डिसेंबर २०२४ रोजी ठाणे येथे तीन दिवस भव्य प्रमाणावर साजरा झाला. या सुवर्णमहोत्सवी वर्षाची सुरुवात ४ एप्रिल २०२४ रोजी एनसीपीएमध्ये 'गंधर्वांचे देणे' हे पुस्तक प्रकाशित करून झाली. यानंतर वर्षभरात विविध उपक्रम व कार्यक्रम सादर केले. यातील महत्त्वाचा एक उपक्रम म्हणजे 'विज्ञानधारा एकांकिका स्पर्धा'. ग्रंथाली २०२३ पासून दरवर्षी २८ फेब्रुवारी या विज्ञानदिनी विज्ञान एकांकिका स्पर्धा आयोजित करते. यावर्षी ५०० शाळांना विज्ञान एकांकिकांचे संच वाटण्यात आले होते. त्यातून महाराष्ट्रातील ७ ठिकाणी प्राथमिक फेऱ्या घेऊन तेथील विजेत्यांना मुंबईत बोलावून २८ फेब्रुवारी २०२५ रोजी अंतिम फेरी घेण्यात आली.

ग्रंथालीची दोन ट्यूब चॅनेल असून त्यावरून प्रसारित होणाऱ्या कार्यक्रमांपैकी दोन कार्यक्रमांचे ५० भाग पूर्ण झाले आहेत. 'ग्लोबल साहित्यसफर' व 'ग्लोबल लेखिका' या ग्लोकल लेखिकाच्या ५०व्या भागानिमित्त २५ जानेवारी २०२५ रोजी एका विदेशी लेखिकेची मुलाखत, संजीवनी खेर यांची मुलाखत, परिसंवाद, 'ग्लोकल लेखिका' या पुस्तकाचे प्रकाशन असा कार्यक्रम एनसीपीएम ध्ये घेण्यात आला. एप्रिल २०२५मध्ये 'ग्लोबल साहित्यसफर'चाही अशा स्वरूपाचा कार्यक्रम घेण्यात येणार आहे व त्याचेही पुस्तक प्रकाशित होईल.

ग्रंथाली गेल्या वर्षभरात के.ज. पुरोहित, जयवंत दळवी, गंगाधर गाडगीळ, विद्याधर पुंडलीक यांच्या जन्मशताब्दीच्या कार्यक्रमांचे आयोजन केले. त्यानिमित्ताने त्यांच्या व्यक्तित्व आणि साहित्यावर पुस्तिकांचे प्रकाशन केले.

सुवर्णमहोत्सवाची सांगता पुणे इथे बालगंधर्व रंगमंदिरात ४ एप्रिल २०२५ रोजी, सायंकाळी ४ वाजता होणार आहे. कार्यक्रमाचे स्वरूप अश्विनी भिडे-देशपांडे, भुवनेश कोमकली यांची सांगीतिक मैफली असे आहे. ५ व ६ एप्रिल रोजी ज्योत्स्ना भोळे सभागृह, टिळक रोड, पुणे येथे जयवंत दळवी, गंगाधर गाडगीळ आणि विद्याधर पुंडलीक यांच्या जन्मशताब्दीचा कार्यक्रम सादर केला जाईल.

ग्रंथाली' सुरू झाल्यापासून पुस्तक प्रकाशन, कार्यक्रम व उपक्रमांसोबत 'ग्रंथाली', 'रुची', 'शब्द रुची' असे दरमहा अंक प्रसिद्ध केले. यातले काही विशेषांक व दिवाळी अंक होते. ३० मार्च २०२५चा 'शब्द रुची' मासिकाचा शेवटचा छापील अंक असणार आहे. यानंतर दरमहा छापील अंक निघणार नाही.

एप्रिल २०२५ नंतर 'ग्रंथाली' दर तीन महिन्यांनी डिजिटल स्वरूपातील ऑडिओ व व्हिडिओ असलेला अंक प्रसिद्ध करेल. फक्त दिवाळी अंक छापील असेल. 'ग्रंथाली'कडे जे रसिक वाचक त्रैमासिकासाठी नोंदणी करतील त्यांना डिजिटल अंक ई-मेलद्वारे पाठवला जाईल. त्यासाठीचा ई-मेल **shabdrucheedigital@gmail.com** हा आहे. यावरून फक्त 'शब्द रुची' मासिकाचा डिजिटल अंक पाठवण्यात येईल. पत्रव्यवहारासाठी हा ई-मेल नाही आहे. दिवाळी अंक रसिक वाचकांना ४० टक्के सवलतीत मिळेल.

'ग्रंथाली'कडे स्वीकृत ५० हस्तलिखिते छपाईच्या प्रक्रियेत आहेत. ही पुस्तके जून २०२५ पर्यंत प्रसिद्ध होतील. 'ग्रंथाली' १ एप्रिल २०२५ ते ३१ ऑगस्ट २०२५ दरम्यानच्या काळात कुठलेही हस्तलिखित स्वीकारणार नाही. त्यानंतर हस्तलिखिते स्वीकारली जातील. त्यातील

२५ हस्तलिखितांची पुस्तके पुढील वर्षभरात प्रसिद्ध करेल. 'ग्रंथाली मुद्रण सुविधा केंद्रा'अंतर्गत २५ पुस्तके 'ग्रंथाली' प्रकाशित करेल. या दोन्ही प्रकाशनांच्या व्यवस्था 'ग्रंथाली'च्या विश्वस्त या नात्याने डॉ. लतिका भानुशाली, डॉ. मृण्मयी भजक बघणार आहेत. दिवाळी अंकानंतर 'ग्रंथाली' म्हणून प्रकाशित होणारी २५ पुस्तके ३० मार्च २०२६ पर्यंत प्रसिद्ध केली जातील. ग्रंथाली मुद्रण सुविधा केंद्रामार्फत प्रसिद्ध होणारी २५ पुस्तके ३० मार्च २०२६ पर्यंत प्रसिद्ध होतील.

पुस्तक प्रकाशित करायचे झाल्यास लेखकाने स्वतः खर्च करून पुस्तकप्रकाशनाचा कार्यक्रम करायचा आहे.

'ग्रंथाली'ने 'डूब' हे पुस्तक प्रसिद्ध करून पुस्तक प्रकाशन सुरू केले. 'ग्रंथाली' म्हणून आजपर्यंत १४०० पुस्तके, ग्रंथाली–ज्ञानयज्ञात १०० पुस्तके, ग्रंथाली मुद्रण सुविधा केंद्र – १६० पुस्तके, 'ग्रंथघर'ची १० पुस्तके, अशी एकूण १,७०० पुस्तके प्रसिद्ध केली आहेत. यातील प्रारंभीची पुस्तके हाती कंपोझ करून प्रसिद्ध केली होती. नंतरच्या काळातील पुस्तके ही कम्प्युटरच्या माध्यमातून कंपोझ करून प्रसिद्ध केली होती. यातील काही पुस्तके लेखकांनी पुढे दुसऱ्या प्रकाशकाकडून प्रसिद्ध केली आहेत, तर काहींनी स्वतःच प्रकाशित केली आहेत. काहींना 'ग्रंथाली'ने लेखकांना प्रसिद्ध करण्यासाठी हक्क दिले आहेत. 'ग्रंथाली' आपल्याकडे आता या १,७०० पुस्तकांपैकी ७७५ पुस्तकांचा डाटा ठेवणार आहे. जुन्या पुस्तकांपैकी निवडक ५० पुस्तकांचा डाटा ग्रंथालीकडे असेल.

अशाच प्रकारे 'ग्रंथाली'कडे विविध उपक्रम व कार्यक्रमांचा डाटा आहे. त्याचेही क्लासिफिकेशन करून आपल्या संकेतस्थळावर ठेवणार आहे.

'ग्रंथाली'ची दोन यूट्यूब चॅनेल आहेत – (ग्रंथाली वॉच आणि ग्रंथाली प्रतिभांगण) ही सर्व रसिक वाचकांना सबस्क्राइब करून विनामूल्य पाहता येतात.

'ग्रंथाली' दरवर्षी पुढील उपक्रम राबवणार आहे– (१) वाचकदिन, (२) अरुण साधू स्मृती पुरस्कार, (३) बलुतं पुरस्कार, (४) विज्ञानधारा शाळा उपक्रम, (५) विज्ञान एकांकिका स्पर्धा, (६) याव्यतिरिक्त दोन यूट्यूब चॅनेलवर दरमहा सात कार्यक्रम प्रसारित केले जातील. (७) दिवाळी अंक संच योजना आणि दिवाळी संध्या – मोठ्यांसाठी व बालवाचकांसाठी (८) दरवर्षी साहित्य व कला क्षेत्रातील दोन जणांचा जन्मशताब्दी उत्सव. (९) इतर संस्थांच्या सहभागाने उपक्रम राबवणे.

अशा प्रकारे 'ग्रंथाली' सुवर्णमहोत्सव ते हीरकमहोत्सव असा १० वर्षांचा आपला कार्यक्रम आखत आहे. तो जाहीर होताच सर्वांना कळवला जाईल.

●

# संपादकीय...

**आल्हाद गोडबोले**

**सा**तारा जिल्ह्यात रहिमतपूरजवळ औंध नावाचे, एकेकाळच्या संस्थानाचे, गाव आहे. एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकात तिथे पंतप्रतिनिधी घराण्यातील आठ राजे होऊन गेले. या छोट्याशा संस्थानाचा अखेरचा राजा भवानराव पंतप्रतिनिधी. भवानराव साहित्यप्रेमी, कलाप्रेमी होते आणि कलांचे आश्रयदाते होते. १९३५ मध्ये इंदूर येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. तसेच, राजा रविवर्मा, एम. व्ही धुरंदर, माधवराव सातवळेकर, हेन्री मूर अशा अनेक कलावंतांचे ते आश्रयदाते होते. त्यामुळे त्यांची कला औंधच्या सावलीत फुलत, बहरत गेली. भवानराव यांनी आपल्या कारकिर्दीत केलेल्या अनेक उत्तमोत्तम, अमूल्य अशा कलात्मक वस्तूंचा संग्रह यमाईमंदिराच्या टेकडीवर एका वास्तूत मागे ठेवलेला आहे. एका छोट्या संस्थानाचा राजा भारत स्वतंत्र होण्यापूर्वी नऊ वर्षे आधीच, गांधीजींच्या सल्ल्यानुसार ग्रामस्वराज्याची संकल्पना अमलात आणून या संग्रहालयासह सारे काही प्रजेच्या हाती सोपवून, रयतेच्या राज्याचे मॉडेलही कसे उभे करू शकतो, याचे आदर्श उदाहरण म्हणजे औंध संस्थान.

साहित्य ही एक मूलभूत कला आहे आणि कोणत्याही कलेचे जतन व विकास राजाश्रयावर आणि लोकाश्रयावर होत असते, असे विधान एका चर्चेत केले, तेव्हा लोकशाहीत राजाश्रय कोणत्या स्वरूपात असू शकतो, असा प्रश्न एका मित्राने उपस्थित केला, तेव्हा आठवला तो औंधचा राजा. लोकशाहीत राजाची जागा लोकनियुक्त प्रतिनिधींच्या सरकारने घेतलेली आहे. परंतु गेल्या ६५ वर्षांत यातल्या एकातरी सरकारने औंधच्या राजाचे अनुकरण केले आहे का? साहित्यिकांना लाखालाखाची दक्षिणा, खडूफळा, चित्रपट निर्मितीसाठी अनुदान अशा सरकारी उपक्रमांना लोकशाहीतील राजाश्रय का म्हणू नये, असाही एक मुद्दा त्या चर्चेत आला होता. वास्तविक भ्रष्टाचाराला राजाश्रय देणाऱ्या अनेक

उपक्रमांचे, मराठी माणूस म्हणून, आपण सारे साक्षीदार आहोत. त्यामुळे त्याबद्दल न बोललेले बरे.

आज औंध संस्थान नाही, तिथला राजा नाही, मात्र त्या दिवसांची आठवण मनात आहे. अशा अनेक संस्थानिकांनी देणग्या दिल्यामुळे आजही टिकून राहिलेली संग्रहालये, ग्रंथालये कलाप्रेमींची, रसिकांची, वाचकांची बौद्धिक भूक भागवत आहेत. गेल्या पन्नाससाठ वर्षांत महाराष्ट्रात अशी किती संग्रहालये, ग्रंथालये, नाट्यगृहे, कलादालने उभी राहिली या प्रश्नातच लोकशाहीतील राजाश्रयाचे उत्तर सापडावे.

पन्नासेक वर्षांपूर्वी दक्षिण मुंबई भागात पदपथांवरून चालताना जागोजागी थबकायला व्हायचे. त्याचे कारण तिथेच कडेला हारीने मांडलेली पुस्तके. ती भले जुनी असली तरी त्यात आपल्या आवडीचे काही ना काहीतरी मिळत असे. मुखपृष्ठ पाहून, आतली पानेही चाळता यायची आणि छापील किमतीपेक्षा साधारण निम्म्या वगैरे किमतीत काही ना काही हवेहवेसे पदरात पडण्याची ती सोयच होती. कामावरून परतताना या रस्त्याकडेच्या ज्ञानटपऱ्यांशी दहा-वीस मिनिटे थांबून आपल्या आवडीचे एखादेतरी पुस्तक खरेदी करून घरी परतण्याची सवय अनेकांच्या अंगवळणी पडलेली असे. अर्थात मुंबईसह पुणे, नाशिकसारख्या शहरांमध्ये अशी जुन्या पुस्तकांची दुकाने होतीच, तरी फूटपाथवरच्या या अक्षरओहोळांची खुमारी काही वेगळीच. सामान्य माणसाला बुद्धीने श्रीमंत करण्याची ही खास परंपरा लोकशाहीत राजे झालेल्यांनीच बंद केली.कागदावरच्या एका फटकाऱ्याने ही 'अतिक्रमणे' हटवली गेली. महाराष्ट्रातील बौद्धिक दारिद्र्य मात्र तेव्हापासून आजतागायत रस्तोरस्ती ओसंडून वाहात राहिले आहे.

मला आणखी एक उदाहरण आठवले. वडील रेल्वेत असल्यामुळे आमचे शालेय शिक्षण कधी सोलापूर, ढोकी, पुणे, तर कधी दिघंची वा पंढरपूर अशा ठिकाणी आजोळी, नातेवाईकांकडे राहून करावे लागले. वर्षातून दोनदा सुट्टीसाठी रेल्वेने जातायेताना कोणत्या ना कोणत्या जंक्शनवर गाडी बदलण्यासाठी थांबावे लागायचे. तिथे वेळ घालवण्याचे एक हुकमी ठिकाण असायचे, ते म्हणजे ए.एच. व्हीलर बुक स्टॉल. भारतभरात शेकडो रेल्वे स्टेशनांवर व्हीलरची बुक स्टॉल्स वर्षानुवर्षे होती. कोण हा व्हीलर, त्याला रेल्वे स्टेशनवरच पुस्तकांची दुकाने घालावे, असे का वाटले, हा साराच इतिहास रंजक आणि वेगळा आहे. मात्र चॉकलेटी रंगाचे पॉलिश असलेल्या, बहुतांशी सागवानी लाकडी बनावटीच्या या स्टॉलवर अगदी इंद्रजाल कॉमिक्स किंवा चांदोबा, एखादी रहस्यकथा किंवा ऐतिहासिक कादंबरी अशी काहीतरी खरेदी केल्याशिवाय तिथून पाय निघत नसे. एकविसाव्या शतकात संपूर्ण देशभरात लक्षावधी स्टेशनांपैकी एकाही स्टेशनात असे पुस्तकांचे दुकान आज दिसणारही नाही. लोकशाहीतील राजाचा आश्रय असता तर आज स्टेशनवर मॅक्डोनाल्ड आणि फास्ट फूड स्टॉलच्या बरोबरीने एखादा तरी व्हीलरचा स्टॉल दिसला असता ना?

आपल्याकडे प्रत्येक शहरात, नगरात बागा, उद्याने आहेत. पर्यावरणाची लाज म्हणून का होईना, अशी सार्वजनिक ठिकाणे लोकशाहीतील राजांना ठेवावी लागलेली आहेत. परंतु मी जर्मनीत पाहिलेल्या बुक पार्कसारखे पुस्तकांचे दालन अथवा सुस्थितीतील वाचनालय एकाही उद्यानात मला तरी दिसलेले नाही. कधीतरी, कुठेतरी जाळीबंद पिंजऱ्याबाहेर वाचनालयाची पाटी असते. मात्र तो वरून कीर्तन आतून तमाशा असाच प्रकार असतो.

पदपथांवर अतिक्रमण करून उभे राहिलेले अमुक-तमुक अशा पाट्या लावलेली सार्वजनिक वाचनालये म्हणजे तर गावगप्पा चघळण्यासाठी बांधलेले कट्टे असतात आणि तिथे कागदाचा वापर मावा आणण्यापुरताच होत असतो.

साहित्यनिर्मितीची, पुस्तकाची कदर लोकशाहीतील राजांना असती तर अमृतमहोत्सव साजरा करणाऱ्या भारतात बौद्धिक रद्दीची केंद्रेही ठेकेदारांनी टेबलाखालून दहा-दहा टक्के कमिशन चारून अमृताच्या भावाने खरेदी केली असती. आता हा व्यवहारही सॉफ्ट कॉपीसारखा अदृश्य पडद्यांवर चालतो, म्हणा!

असो. कालाय तस्मै नमः।

alhadgodbole@gmail.com

# कधी बहर, कधी शिशिर, परंतु...



**आल्हाद गोडबोले**

*साहित्य किंवा वाङ्मय हा मूलभूत कलेचा प्रकार आहे हे मान्य करून कला ही सार्वकालिक असते, ती काळाच्या ओघात बदलत राहिली तरी शाश्वत असते, हे गृहीत धरायला हवे. ती टिकवून ठेवण्याची, वृद्धिंगत करण्याची जबाबदारी निव्वळ सत्ताधाऱ्यांची किंवा रसिकांची नव्हे, तर त्यांच्यातील दुव्याची भूमिका घेणाऱ्यांवरही असते. कोणत्याही कलेला यासाठी पूर्वी राजाश्रयाचा आधार लागायचा. तसेच इतिहासात लोकाश्रयावरही कला टिकून राहिलेल्या, विकसित झालेल्या दिसतात. तशीच साहित्याचे अक्षरत्व टिकविण्याची जबाबदारी आता प्रकाशन संस्थांवर आहे.*

**मौ**ज, पॉप्युलर, मॅजेस्टिक, कॉन्टिनेन्टल, राजहंस, देशमुख आणि कंपनी, मेहता अशा अनेक प्रकाशन संस्था मराठीत दमदार वाटचाल करीत असताना ग्रंथाली नावाचे नवे रोप दिनकर गांगल यांनी पन्नास वर्षांपूर्वी अशोक जैन, कुमार केतकर, अरुण साधू यांच्या सहकार्याने मराठीच्या प्रांगणात लावले. 'ग्रंथाली वाचक चळवळी'चे स्वरूप सुरुवातीला वाचनसंस्कृती वाढविण्यासाठी ग्रंथप्रसारावर भर देणारे होते. त्या प्रयत्नात पंचवीस रुपयांत तीनऐवजी चार पुस्तके वाचकांना देण्याचा प्रयोग म्हणून दुर्गा भागवतलिखित 'डूब' हे पुस्तक ग्रंथालीने प्रथम कऱ्हाडच्या साहित्य संमेलनात प्रकाशित केले. हा ग्रंथालीचा मराठी प्रकाशन व्यवसायातील श्रीगणेशा ठरला. पुढे काही दिवसांत प्रकाशित झालेल्या पुस्तकांमुळे ग्रंथालीची वेगळी वाटचाल ठळकपणाने उमटत गेली.

अरुण साधू यांच्या १९७२ मध्ये प्रकाशित झालेल्या 'मुंबई दिनांक'मुळे आणि पुढे चार वर्षांनी ग्रंथालीने प्रकाशित केलेल्या 'सिंहासन' कादंबरीमुळे मराठीत राजकीय कादंबरीचा पाया रचला गेला आणि दगडू मारुती ऊर्फ दया पवार यांचं 'बलुतं' हे आत्मकथन तर दलित आत्मपर साहित्याची नांदीच ठरलं. तोपर्यंत दबलेल्या दलितांचा हुंकार 'उपरा'पासून 'कोल्हाट्याचं पोर' आणि 'आमचा बाप आन् आम्ही'पर्यंत डझनावारी आत्मकथनांच्या स्वरुपात ग्रंथालीच्याच अक्षरपीठावरून मोकळेपणाने व्यक्त होत गेला. अशीच एक वेगळी ओळख ग्रंथालीला मिळाली ती छाया दातारलिखित 'स्त्री-पुरुष' पुस्तकाने. १९७५ या वर्षाने स्त्रीमुक्तीबरोबरच ग्रंथालीच्या वाचक चळवळीचाही जणू पाया घातला गेला. यापुढचे दशक महिलांना, दलितांना, उपेक्षितांना लिहिते-बोलते करणारे ठरले. त्यात ग्रंथालीची भूमिका साहजिकच आघाडीची राहिली.

मराठीतील साहित्यव्यवहार अत्यंत चोखंदळपणाने, निवडक स्वरूपात, प्रकाशित करणाऱ्या संस्था नाव कमावून व्यवसाय करीत असताना ज्यांना नाव नाही, चेहरा नाही, लेखक म्हणून मान्यता नाही अशा उपेक्षित, ग्रामीण भागातील, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील नवोदित तरुणांना पुस्तकाच्या रूपात उजेडात आणण्याचे काम ग्रंथालीने सुरुवातीपासून, व्यावसायिकता बाजूला ठेवून केले. ग्रंथालीने प्रकाशित केलेल्या पहिल्या शंभरपैकी ऐंशी पुस्तके ही त्या-त्या लेखकाची पहिली साहित्यकृती होती, हा एकच दाखला त्याचे वेगळेपण दाखवण्यास पुरेसा आहे.


आता पन्नास वर्षांची होत असलेल्या ग्रंथालीची वेगळी वाटचाल हा एका स्वतंत्र पुस्तकाचाच विषय आहे. तसा एक


प्रयत्न पंधरा वर्षांपूर्वी, दिनकर गांगल यांच्या एकाहत्तरीनिमित्ताने 'गांगल ७०, ग्रंथाली ३५' या शीर्षकाच्या पुस्तकात केला होता. पण 'ग्रंथाली ३५'नंतरच्या पंधरा वर्षांत प्रकाशन व्यवसायाच्या पुलाखालूनही बरेच पाणी वाहून गेले आहे. म्हणून सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्ताने ग्रंथाली वाचक चळवळीमार्फत प्रसिद्ध होणाऱ्या 'शब्द रुची' या नियतकालिकात मराठीतील प्रकाशन व्यवसायाचा वेध विशेषांकाच्या रूपात घ्यावा, असे सुदेश हिंगलासपूरकर यांनी सुचविले. त्यादृष्टीने विषय, लेखक यांची आखणी करीत असताना एक मे १९६० रोजी मराठी माणसांचे, मराठी माणसांसाठी, मराठी माणसांनी चालवलेले महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यानंतरचा काळ डोळ्यांपुढे ठेवण्यात आला. त्यातही ग्रंथालीच्या समकालीन मराठी प्रकाशन व्यवहारावर भर देण्यात आला. अर्थात प्रकाशन हा एवढा मोठा विषय एखाद्या विशेषांकात घेणे म्हणजे घागरीत सागर भरण्याचा अट्टहास ठरला असता.


अंकाची तयारी चालू असताना माझी मैत्रीण सुजाता शेणई हिच्याबरोबर अगदी सहज प्राथमिक स्वरूपात झालेल्या चर्चेत तिने 'गेल्या पन्नास वर्षांत मराठीत स्त्रीलिखित समीक्षेचा फारसा गंभीरपणे वेध घेतला गेलेला नाही' असे विधान केले. त्यावर चर्चा करताना मराठीतील महिला प्रकाशक, संपादक, महिलांनी चालवलेली नियतकालिके यांचाही आढावा घ्यावा असे मनात आले. तसा एक स्वतंत्र विभागच करण्यात आला. प्रसिद्ध साहित्यिक विदुषी तारा भवाळकर यांच्या अध्यक्षतेखाली मागील महिन्यात राजधानी दिल्लीत साजऱ्या झालेल्या ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे निमित्त साधून हा विभाग शब्द रुचीच्या फेब्रुवारीच्या अंकात प्रसिद्ध करण्यात आला. याखेरीज ग्रंथालीच्या समकालीन प्रकाशनाचा एक वेगळा आढावा घेणारा विभाग, विशेषांकाचा उत्तरार्ध म्हणावा अशा या अंकात घेण्यात येत आहे.

नीता मिलिंद बोकील यांचा या अंकातील लेख म्हणजे या दोन अंकांमधील कडी अथवा दुवा आहे. मिलिंद बोकील हे मराठीत गेल्या पन्नास वर्षांत सातत्याने कसदार लिखाण करीत आलेल्या लेखकांचे प्रतिनिधित्वच करतात. त्यांच्या लेखनाची काही महिन्यांपूर्वी पुण्यात एका कार्यशाळेत चौफेर चिकित्सा करण्यात आली होती. पण बोकीलांच्या साहित्यप्रेरणेचा जरा 'आतून' वेध घेण्याच्या अंत:स्थ हेतूने नीतावहिनींकडून घेतलेला लेख या अंकात प्रसिद्ध करीत आहोत. सहजीवनातील सामंजस्य साहित्यातही प्रतिबिंबित होत असते, या समजाला पुष्टी देणारे असे हे कथन या अंकाचे वेगळेपण ठरावे. असो.

शेती असो, उद्योग असो, अगदी राजकारण, प्रकाशन किंवा कोणती संस्था असो... घरातला, कुटुंबातला, परंपरेने चालत आलेला अथवा एखाद्या कर्तबगार व्यक्तीने नव्याने सुरू केलेला व्यवसाय किंवा सेवा साधारण वीस वर्षांनंतर पुढची तरुण पिढी चालवायला घेते, ती तो एक पाऊल पुढे नेऊन वीसेक वर्षांनी तिसऱ्या पिढीच्या हाती सोपवते, तेव्हा साधारण अर्धशतकाचा टप्पा गाठलेला असतो. दिनकर गांगल आणि सुदेश हिंगलासपूरकर या दोन पिढ्यांनी ग्रंथालीचा गाडा पन्नासाव्या वर्षापर्यंत यशस्वीपणे आणला. ग्रंथालीच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त मराठी प्रकाशन क्षेत्रातील अशी दोन-तीन पिढ्या स्थिरावलेली, नाव कमावलेली घराणी आवर्जून विचारात घेण्यासारखी वाटली. अर्थात तोही एका पुस्तकाचा ऐवज ठरेल एवढा मोठा विषय आहे. संतोष शेणई यांनी एका स्वतंत्र छोटेखानी लेखात त्याचा धावता आढावा घेतला आहे. दोनतीन पिढ्या यशस्वीपणे चालत राहिलेल्या अशा प्रकाशन संस्थांचा इतिहास चाळताना एक वैशिष्ट्य लक्षात आले, ते असे की, व्यवसाय म्हटल्यानंतर स्पर्धा असली तरी बहुतेक मोठ्या प्रकाशन व्यवसायांमध्ये, व्यावसायिकांमध्ये सौहार्दाचे, निकोप स्पर्धेचे वातावरण वर्षानुवर्षे राहिले होते.



प्रस्थापित प्रकाशन व्यवस्थेच्या विरोधात उभ्या राहिलेल्या ग्रंथालीने मौज प्रकाशनाला सर्वात मोठी ओळख मिळवून देणाऱ्या श्री.पु. भागवत यांच्या वाङ्मयीन कार्याचा वेध घेतलेला ग्रंथ तसेच 'पॉप्युलरचे अंतरंग', राजहंस प्रकाशनाने प्रसिद्ध केलेला 'वाङ्मयीन युगान्तर आणि श्री.पु.' ग्रंथ, रामदास भटकळ यांना भावलेल्या सानथोर व्यक्तींची, 'जिगसॉ' आणि 'जिव्हाळा' यासारख्या पुस्तकांच्या रूपात, प्रसिद्ध केलेली व्यक्तिचित्रणे... अशी अनेक उदाहरणे ही मागील अर्धशतकातील प्रकाशन व्यावसायिकांमधील आत्मीयतेची, गुणग्राहकतेची द्योतकच आहेत. उद्याचा ग्रंथव्यवहार कसा असेल, माहीत नाही, पण साहित्य व्यवहारातील या भावबंधाला ग्रहण लागू नये!

ग्रंथाली प्रकाशन व्यवसायात उतरली तो काळ सत्यकथा आणि माणूससारख्या विलक्षण लोकप्रिय, वाचकप्रिय नियतकालिकांचा होता. मात्र भारतात खुल्या अर्थव्यवस्थेचे वारे येण्यापूर्वीच त्यांना ओहोटी लागून एकापाठोपाठ एक नियतकालिके बंद होत गेली. तरीही गुणवत्तेवर आणि वाचकांच्या पाठिंब्यावर अंतर्नाद मासिकाचा प्रयोग भानू काळे यांनी करुन पाहिला. तो दुर्दैवाने व्यावहारिक पातळीवर दीर्घकाळ टिकू शकला नाही. तसे नियतकालिक आता अस्तित्वातही नाही. पॉप्युलरचे प्रिय रसिक, मॅजेस्टिकचे ललित, राजहंसचे ग्रंथवेध, रोहनचे साहित्य मैफल आणि ग्रंथालीचे शब्द रुची ही नियतकालिके होम मॅगझिन्स आहेत आणि त्याच त्यांच्या मर्यादाही आहेत. तरीही ते प्रवाहाविरुद्ध पोहत राहिले आहेत. मुद्दा हा की, जिज्ञासू वाचकाची भूक भागण्यासाठी जशा नियतकालिकांची आवश्यकता असते, तशी आज राहिलेली नाहीत. ती उणीव भरून काढण्याचा एक प्रयत्न अक्षरनामासारख्या पोर्टलमध्ये दिसत होता. असा शोध वा प्रयोग यापुढेही होत राहतील. पण ब्लॉग्ज, वेब पोर्टल, पॉडकास्ट, ऑडिओ बुक्स, किंवा सोशल मिडियाचे कोणतेही अवतार नियतकालिकांची उणीव भरून काढू शकतील का? आता या शतकाची पहिली पंचविशी ओलांडत असताना तरी हा प्रश्न अनुत्तरित राहिला आहे.

साहित्य किंवा अक्षर वाङ्मय प्रकाशात आणते ते प्रकाशन, ही प्रकाशनाची साधी सोपी व्याख्या. प्रकाशन हा एक व्यवसाय आहेच, पण मुळात साहित्य किंवा वाङ्मय हा मूलभूत कलेचा प्रकार आहे हे मान्य करून कला ही सार्वकालिक असते, ती काळाच्या ओघात बदलत राहिली तरी शाश्वत असते, हे गृहीत धरायला हवे. ती टिकवून ठेवण्याची, वृद्धिंगत करण्याची जबाबदारी निव्वळ सत्ताधाऱ्यांची किंवा रसिकांची नव्हे, तर त्यांच्यातील दुव्याची भूमिका घेणाऱ्यांवरही असते. कोणत्याही कलेला यासाठी पूर्वी राजाश्रयाचा आधार लागायचा. तसेच इतिहासात लोकाश्रयावरही कला टिकून राहिलेल्या, विकसित झालेल्या दिसतात. तशीच साहित्याचे अक्षरत्व टिकविण्याची जबाबदारी आता प्रकाशन संस्थांवर आहे. त्यादृष्टीने प्रकाशन संस्था हा एक व्यवसाय असला तरी निव्वळ धंदा नव्हे, हे मुळात मान्य करायला हवे. यात समाजहित आणि व्यावसायिक नीतिमत्ता यांचे भान राखून यश मिळवता येते, नाव कमावता येते, तसेच धनवानही होता येते. तशी अनेक उदाहरणे दाखवता येतील. अर्थात साहित्याचा कोणता प्रकार निवडून प्रकाशन संस्था आपली पुस्तके बाजारात आणतात यावर ते बरेचसे अवलंबून असते. त्यातून त्या-त्या प्रकाशनाला चेहरामोहरा मिळत असतो, त्यांचा ब्रॅण्ड ठरत असतो.

एखादे प्रकाशन चरित्रे आणि आत्मचरित्रे यासाठीच मशहूर असते. आम्ही कवितासंग्रह छापत नाही, अशी एखाद्या प्रकाशन संस्थेची भूमिकाच असते. कथा, कादंबरी किंवा ललित साहित्य हाच एकेका प्रकाशन संस्थेचा यूएसपी असू शकतो. निव्वळ शब्दकोश किंवा शैक्षणिक पुस्तकेच प्रसिद्ध करणाऱ्या प्रकाशन संस्थाही आहेत. फार कशाला फक्त कोश, धार्मिक, गूढ तत्त्वचिंतनपर किंवा पाककला, चित्रकला, वास्तू आणि मंदिरे, निसर्ग, वन्य जीवन अशा एखाद्याच, विशिष्ट प्रकारच्या साहित्याचे प्रकाशन करणाऱ्या संस्थाही आहेत. समष्टीचे सर्व









व्यवहार अव्याहत चालू राहण्यासाठी त्यांचा उपयोग निश्चित होत असतो. त्यांची निर्मिती वर्तमानाची नोंद करीत इतिहास घडवत असते आणि भविष्याचा वेधही घेते.

मुद्दा हा की, प्रकाशन हा व्यवसाय असला तरी प्रकाशन संस्थेचा चालक हे सामाजिक भान बाळगून असतो. किंबहुना असला पाहिजे. शेकडो वर्षांची परंपरा असलेल्या आणि अभिजात दर्जा मिळालेल्या मराठी भाषेत, मुद्रित स्वरूपात, गेल्या शे-दोनशे वर्षांत जी-जी पुस्तके प्रकाशित झालेली आहेत आणि जी आजही संदर्भमूल्य बाळगून आहेत, त्यावर नजर टाकली तर प्रकाशन संस्थांची जबाबदारी केवढी मोठी असते हे लक्षात येईल.

ग्रंथालीबरोबरच गेल्या ५० वर्षांत प्रकाशन क्षेत्रात समांतर वाटचाल करीत आलेले समकालीन प्रकाशक विचारात घेतले तर अशा अनेक प्रकाशन संस्था दिसतील. पण त्यापैकी चार तरी प्रकाशन संस्थांच्या वाटचालीची नोंद या अंकात घ्यावी, असे ठरले. त्यांची निवड चर्वितचर्वणातून केली गेली. ती अर्थात प्रातिनिधिकच आहे.


साधना, ज्योत्स्ना, डिंपल आणि रोहन या चार प्रकाशन संस्थांची वाटचाल नेमकी ५० वर्षांची नसली तरी ग्रंथालीच्या समकालीन आहे आणि त्यातही त्यांचे वेगळेपण आहे. उदाहरणार्थ, साने गुरुजींच्या पुढाकाराने पाऊणशे वर्षांपूर्वी साप्ताहिकाच्या माध्यमातून सुरू झालेले साधना प्रकाशन ही पहिली पन्नास वर्षे निव्वळ समाजवादी विचारसरणीचा पुरस्कार करणारी, मर्यादित वाचक असलेली आणि काळाच्या ओघात निरुद्देश, निरर्थक ठरणारी संस्था होती. पण याच प्रकाशनाने, काळानुसार बदल स्वीकारून गेल्या दोन दशकांत केलेली 'अक्षर साधना' उल्लेखनीय मानण्यासारखी आहे! विनोद शिरसाठ यांनी ती स्वत:च्या शब्दांत चितारली असून वाचकांनाही नवी दृष्टी देणारी आहे.


गेल्या दोन दशकांत इलेक्ट्रॉनिक उपकरणे आणि मोबाइल यासाठी हट्ट धरणाऱ्या मुलांपुढे हतबल झालेले पालक पुस्तकांच्या दुकानाकडे फिरकेनासे होत असताना, निव्वळ लहान मुलांच्या आवडीची पुस्तके प्रकाशित करणाऱ्या ज्योत्स्ना प्रकाशनाची जिद्दी वाटचालही अशीच कौतुकास्पद आहे. एका छोट्याशा शब्दांत मावलेली, पण उच्चारायला अवघड अशी जोडाक्षरे असलेली ही ज्योत्स्ना... जेमतेम कानामात्रांची ओळख होत असलेल्या बालकांना आणि कुमारांना मात्र त्यांच्याच भाषेत संवाद साधणारी, सोपी, हवीहवीशी पुस्तके प्रकाशित करीत त्यांची अभिरुची जोपासत राहिली आहे.

वाचकांची बदलती रुची, इंग्लिश माध्यमांचे आक्रमण, मराठीबद्दलचा न्यूनगंड, पालकांची शरणागत अवस्था आणि अनास्था, व्यावसायिक स्पर्धा अशी अनेक आव्हाने असूनही बदलत्या काळानुसार प्रकाशनाला वेगळी दिशा देण्याचे भान राखत रोहन आणि डिंपल या प्रकाशन संस्था करीत असलेली धडपड उल्लेखनीय मानायला हवी.

वडिलांकडून वारशाच्या रूपात आलेले प्रकाशन रोहन चंपानेरकर याने या दशकात ज्या उंचीवर नेले आहे, ते लक्षात घेता, त्याची भावी वाटचाल मराठी प्रकाशन व्यवसायालाही प्रेरक ठरेल, अशी अपेक्षा आहे.

मुंबईतील डिंपल प्रकाशनाचे अशोक मुळे हे ग्रंथालीचे सर्वार्थाने सहप्रवासी. सुरेश चिखले हे त्यांचे तरुण वयातील मित्र. पोलिस चाळीतील जीवनावर चिखले यांनी लिहिलेली पहिली कादंबरी २६ जानेवारी १९७५ रोजी 'गमभन' या नावाने प्रकाशित करून मुळे यांनी डिंपल प्रकाशनाचा 'गमभन' गिरवायला सुरुवात केली. आज त्याचा खरोखरीच पन्नास वर्षांचा वटवृक्ष झाला आहे. जिद्द असेल आणि प्रयत्न केले तर, स्वतःची नोकरी सांभाळून पत्नीच्या नावाने केलेला प्रकाशन व्यवसाय किती यशस्वी करता येतो, याचे डिंपल हे आदर्श






उदाहरण आहे.

मराठीला काही भवितव्यच नाही, प्रकाशन हा तर घाट्यातलाच व्यवसाय, मराठी पुस्तके लवकरच इतिहासजमा होतील असा बदसूर गेली अनेक वर्षे आळवला जातो आहे. पण काळाच्या ओघात लाटा येतात आणि ओसरतात. तसाच हा एक बॅड पॅच समजून काही प्रकाशन संस्था पाय रोवून उभ्या राहतात, मराठी वाचकांच्या पाठिंब्यावर नवनवीन प्रयोग यशस्वी करून दाखवतात आणि महापुराच्या रेट्यात मोठमोठी झाडे उन्मळून पडली तरी लव्हाळी टिकून राहतात, असा दिलासा देतात.







एकविसावे शतक म्हणजे मुद्रण व्यवसायाच्या ओहोटीचा काळ, असे म्हटले जाते. पण वेगळ्या अर्थाने पाहिले तर १९७५ ते २०२५ हा काळ मुद्रण व्यवसायाच्या भरतीचा होता आणि ओहोटीचाही आहे. सागराला जशी दिवसातून दोनदा भरती आणि दोनदा ओहोटी येते, तसेच या अर्धशतकामध्ये वेगवेगळ्या स्वरूपाच्या प्रकाशनांना भरती आणि ओहोटीच्या अनुभवांना सामोरे जावे लागले आहे.

एकविसाव्या शतकात इंटरनेटपासून सोशल मीडियापर्यंत आलेल्या महापुराचा तडाखा मुद्रित माध्यमांना बसतो आहे, हे नाकारता येत नाही. तरीही आणखी पाच-पन्नास वर्षांनी जगात कुठेही कागदावर छापलेले ग्रंथ, वृत्तपत्रे, नियतकालिके, कोश इत्यादी अस्तित्वातच नसतील हा विचार मात्र अजूनही पटत नाही. त्यामुळे हीच परिस्थिती कायम असेल असे न मानता प्रकाशनाच्या व्यवसायाला यातून कसे तरून जाता येईल, त्याचा नवा अवतार कसा घडवता येईल, याचा विचार प्रकाशकांनी आणि या क्षेत्रातील तज्ज्ञांनी करायला हवा.

विचारशक्ती लाभलेल्या माणसाला ऐकण्याची, बोलण्याची, लिहिण्याची भूक असते, तशीच त्याला वाचण्याचीही भूक असते. शतकानुशतके वेगवेगळ्या स्वरूपात, चित्रलिपीपासून संगणकावरील पडद्यापर्यंतच्या माध्यमात, लिहिल्या गेलेल्या, अक्षरांचे वाचन माणूस करीत आला आहे. पाषाणांवर, तांब्याच्या पत्र्यांवर, भूर्जपत्रांवर अक्षरे कोरत आलेला माणूस गेली दोनेकशे वर्षे कागदावर विचार व्यक्त करीत आला आणि आता संगणकावर, मोबाईलवरच लिहितो आहे. याचा अर्थ विचार करून व्यक्त होण्याचे त्याचे माध्यम बदलले आहे. विचार करण्याची, सांगण्याची, ऐकण्याची मूळ वृत्ती कायमच आहे. ती लक्षात घेऊन त्याला कशा स्वरूपात वाचनाकडे आकृष्ट करता येईल आणि प्रकाशन व्यवसायाला नवे वळण देता येईल, हा कळीचा मुद्दा आहे. त्यादृष्टीने प्रकाशन व्यवसाय यापुढील काळात कोणत्या स्वरूपात असेल, हे आत्ता नेमके सांगता येत नसले तरी त्याची चाचपणी वेगवेगळ्या स्तरांवर होत आहे. स्टोरीटेल, ब्लॉग, वेब पोर्टल, ई-पेपर, किंडल वगैरे त्याचीच उदाहरणे आहेत. हे प्रयोग किती यशस्वी होतील हेही आत्ता ठामपणे सांगता येत नाही. परंतु या मंथनातून प्रकाशन व्यवसायाला उद्या नवा शाश्वत मार्ग सापडेल, या आशेवरच पुढच्या प्रवासाला सामोरे जायला हवे.

प्रकाशन आणि पत्रकारिता या दोन्ही क्षेत्रांचा अनुभव असलेल्या राम जगताप आणि भाग्यश्री यांनी अक्षरनामा या नावाने दहा वर्षांपूर्वी सुरू केलेल्या वेब फीचर पोर्टलचा प्रयोग या दृष्टीने पाहण्यासारखा आणि शिकण्यासारखा आहे. हा अनुभव या अंकात म्हणूनच आवर्जून प्रसिद्ध केला आहे. त्यात निराशेचा सूर असला तरीही 'पुढच्यास ठेच, मागील शहाणा' या म्हणीनुसार याचा नवा अवतार यशस्वी स्वरूपात कसा आणता येईल, हा विचार व्हायला हवा.

'महापुरे झाडे जाती तेथे लव्हाळे वाचती' अशी मराठीत एक म्हण आहे. भरती-ओहोटीचा सामना कराव्या लागणाऱ्या व्यवसायातही प्रसंगानुरूप थोडे नमते घेऊन एखादी लाट डोक्यावरून जाऊ द्यावी लागते आणि प्रवाहाचा जोर ओसरल्यावर योग्य वेळी पुन्हा लाटेखालून मान वर काढण्याचे, पुन्हा मान उंचावण्याचे भान ठेवावे लागते. प्रकाशन व्यावसायिक आज याच वळणावर उभे आहेत.

**- आल्हाद गोडबोले**
भ्रमणध्वनी : ९५९४५४४८८८
alhadgodbole@gmail.com

# संसार एके संसारे



**नीता बोकील**

*मिलिंदने माझ्या आयुष्यात स्थैर्य, धैर्य आणि संपन्नता आणली. एक रसिक, हळुवार, प्रेमळ सहचर बनून अबोलपणे आपली भूमिका निभावली. आमच्या सहजीवनात परीक्षेचे, ताणतणावाचे क्षण आलेच नाहीत असे नाही, पण त्या सर्वांमध्ये आम्ही एकमेकांना अखंड साथ दिली आणि त्यातून सुखरूप बाहेर पडलो. आमच्यातील गाढ प्रेम व विश्वास कधी ढळू दिला नाही. अवाजवी अपेक्षा न ठेवता, आहे त्या परिस्थितीचा स्वीकार करून सतत पुढे जाण्याचा ध्यास घेतला. त्यामुळे एक खुले, समंजस असे आयुष्य आमच्या वाट्याला आले.*

**गोष्ट** १९८७ची आहे. महिना बहुधा फेब्रुवारी असावा. मी नेहमीप्रमाणे पुणे विद्यापीठाच्या जयकर ग्रंथालयात अभ्यास करत बसले होते. जयकर ग्रंथालयाचा मोठा रिडिंग हॉल आहे आणि त्याला दोन्ही बाजूंनी गॅलऱ्या आहेत. ह्या गॅलऱ्यांमध्येही आडवे खण करून बसायची व्यवस्था केलेली आहे. मी माझ्या टेबलापाशी एकटीच बसले होते. मैत्रिणी अजून यायच्या होत्या. शेजारच्या खुर्च्या रिकाम्या होत्या.

तोच कोणी तरी टेबलावर टक... टक... केले.

मी मान वर उचलली.

''तुम्ही विद्या ढुबे का?'' डोक्यावर केसांचं टोपलं असलेला एक चष्मिस मुलगा मला विचारत होता.

मी 'नाही' म्हणून मान हलवली.

''मग सविता, संज्योत की माला?''

मी निक्षून 'नाही' असे म्हणाले.

त्यावर तो मुलगा गालातल्या गालात हसला आणि म्हणाला, ''म्हणजे तुम्ही नीता संसारे, हो ना?''

मी चकित झाले व हसून मान डोलावली.

त्यावर तो म्हणाला, ''माझं नाव मिलिंद बोकील. इथे समाजशास्त्र विभागात पीएच.डी. करतोय. तुम्हाला नेहमी पाहतो. तुमची ओळख करून घ्यावीशी वाटली, म्हणून विचारले.''

मग मला बाय करून तो त्याच्या जागेवर बसायला गेला.

ही आमची पहिली ओळख!

(एवढी नावे कशी लक्षात ठेवली हे नंतर त्याला विचारल्यावर तो म्हणाला की, तुमच्या वर्गात एकूण १२ मुली आहेत हे शोकेसमध्ये लावलेल्या यादीवरून कळले होते. त्यातील अमराठी मुलींची नावे बाजूला केली. मग त्यातून जी राहिली ती लक्षात ठेवली. मी मनोमन त्याच्या चतुराईला सलाम केला).

एकदा ओळख झाल्यावर तो मुलगा मग वारंवार समोर दिसायला लागला. माझ्या लक्षात आले की, ते तसे अभावितपणे होत नव्हते. तो ठरवूनच माझ्या नजरेसमोर येत होता. त्याने आपली बसायची जागासुद्धा पलीकडच्या गॅलरीत अशी निवडली होती की तिथून माझ्याकडे बरोबर बघता यावे. मी त्यावेळी एम.ए.च्या पहिल्या वर्षाला होते. विद्यापीठामध्ये डॉ. आंबेडकर भवनामध्ये समाजशास्त्र विभाग तळमजल्यावर आहे तर आमचा राज्यशास्त्र विभाग पहिल्या मजल्यावर. मिलिंद नंतर आमच्या मजल्यावरही दिसायला लागला. आमचे शिक्षक डॉ. राजेंद्र व्होरा हे बहुधा त्याच्या ओळखीचे असावेत. त्या निमित्ताने तो तिथे चकरा मारायला लागला. त्याला काही ना काही निमित्त काढून बोलायचे असे, पण प्रत्येक वेळी ते तसे

मिळेच असे नाही. नुसते 'हाय, हॅलो' असे होई.

माझे माहेर चिंचवडचे. वडील पदमजी पेपर मिलमध्ये कामाला होते. आम्ही पेपर मिलच्या कॉलनीमध्ये राहात होतो. मी रोज बसने ये-जा करायचे. मात्र मी विद्यापीठाच्या मुख्य दरवाजाने यायचे नाही. जयकर ग्रंथालयाच्या मागच्या बाजूने जे लहानसे फाटक होते ते बस-स्टॉपपासून जवळ होते. त्यामुळे बसमधून उतरले की मी त्या वाटेने यायची. मिलिंद बहुधा माझ्या जाण्यायेण्याच्या वाटेवर लक्ष ठेवून असायचा, पण मी लायब्ररीतून बाहेर पडले की कुठे गायब व्हायची ते त्याला कळत नसे. काही दिवसांनी त्याने ते शोधून काढले. एक दिवस मी घरी निघालेली असताना तो आपल्या लुनाशी खटपट करत त्या वाटेवर बसलेला दिसला.

''काय झालं?'' आता तो वाटेतच असल्याने मी विचारलं.

''लुना बंद पडली आहे.'' तो म्हणाला. ''जरा किक मारता का?''

मी दुसऱ्या बाजूने किक मारली. लुना लगेच चालू झाली.

''बघा, तुमचा हात लागला आणि चालू झाली.'' तो म्हणाला.

मी काही बोलले नाही. सरळ पुढे चालू लागले.

माझ्या लक्षात आलं होतं की हा मुलगा आपल्या प्रेमात पडला आहे आणि म्हणून तो हे सगळे करतोय. पण मी साध्या, बाळबोध मध्यमवर्गीय घरातून आलेले होते. आमच्या वैश्यवाणी समाजात मुली फार शिकत नव्हत्या. मी मॉडर्न कॉलेजमधून बी.ए. झाले होते. तिथले माझे शिक्षक प्रा. यशवंत सुमंत यांनी उत्तेजन दिल्यामुळे एम.ए. करायला घेतले होते. आम्ही चौघी बहिणी. आईवडील कष्ट करून आपल्याला शिकवत आहेत याची जाणीव होती. मुलांशी बोलायचीही हिंमत व्हायची नाही. प्रेम-बिम असल्या गोष्टी तर माझ्या कल्पनेबाहेर होत्या.

नंतर एकदा असं झालं की विद्यापीठात वार्षिक संशोधन-कार्यक्रम होता. त्यात सगळे रिसर्च स्कॉलर आपापले पेपर सादर करायचे. ती एक प्रकारे स्पर्धाच असायची. व्होरा सरांनी सांगितल्याप्रमाणे आम्ही सगळ्या मैत्रिणी ते ऐकायला गेलो. एकेका वर्गात ते सादरीकरण व्हायचे. मला आधी कल्पना नव्हती, पण समोर चक्क हाच आला. तो त्यावेळी कोणत्या विषयावर बोलला ते मला आता आठवत नाही, बहुधा ग्रामीण विकास किंवा जलसिंचन असाच काही तरी विषय असावा. आधी माहीत नसल्यामुळे आम्ही पुढेच बसलो होतो, पण मला भयंकर अवघडल्यासारखे झाले. मी मान खाली घालून नुसती ऐकत राहिले. मान वर केली की त्याच्याकडे बघायला लागायचे. त्याचे सादरीकरण उत्तम झाले. त्याला बहुधा त्या स्पर्धेत बक्षीसही मिळाले.

असे दिवस जात होते. मग परीक्षा आल्या. मे महिन्यातले दिवस. मी जयकर ग्रंथालयात बसून अभ्यास करायचे. एक दिवस तो असाच माझ्यापाशी आला. पलीकडच्या खुर्चीत बसून बोलायला लागला. माझ्या लक्षात आले की ह्याला आता थांबवले नाही तर हे प्रकरण पुढे वाढत जाणार.

''तुम्ही माझ्यात कशासाठी इंटरेस्ट घेताय?'' मी म्हणाले. ''मला नाही तुमच्यात इंटरेस्ट!''

''तू मला आवडतेस.'' तो म्हणाला.


''पण माझं लग्न ठरलंय.'' मी म्हणाले. ''तो सौदी अरेबियाला असतो.''


त्यावर त्याचा चेहरा एकदम पडला. त्याला मी असं काही सांगेल ह्याची कल्पनाच नव्हती.


''सॉरी, मला माहीत नव्हतं.'' तो लगेच उठत म्हणाला. ''ऑल द बेस्ट.''


मला त्यावेळी माहीत नव्हते, नंतर कळले की, दोनच दिवसांनी त्याला अमेरिकेला जायचे होते. रोटरी क्लबच्या 'ग्रुप स्टडी एक्सचेंज' कार्यक्रमात त्याची निवड झाली होती आणि दीड महिना तो अमेरिकेत जाणार होता. पण त्यावेळी मला हे काहीच माहीत नव्हते. मी माझ्यामध्येच गर्क होते आणि मुख्य म्हणजे त्याला टाळायचे एवढाच माझा उद्देश होता.

काही दिवसांनी पहिल्या वर्षाची दुसरी टर्म संपली. सुट्ट्या लागल्या. त्या सुट्ट्यांमध्ये आमच्या घरी माझ्या लग्नाची गडबड





सुरू झाली. नातेवाईकांकडून आमच्या समाजातली काही स्थळे पुढे आली होती. कांदेपोह्याचे एक-दोन कार्यक्रम पार पडले. मुलगी पसंत पडली, पण नोकरी करत नाही, या कारणास्तव मी नाकारले गेले. मला जोरात चपराक बसली. पहिल्यांदाच नाकारले जाण्याचे दुःख जाणवले.

जुलै महिन्यात दुसऱ्या वर्षाची पहिली टर्म सुरू झाली. मी डिपार्टमेंटला येऊ लागले. आता माझे डोळे त्याचा शोध घेऊ लागले. पूर्वी तो स्वत:हून समोर यायचा म्हणून दिसायचा. आता मात्र तसे होत नव्हते. शिवाय मी लग्न ठरलेले आहे असे सांगितल्याने त्याला माझ्याशी बोलण्यात काही रस राहिला नसणार हे उघडच होते. माझ्याबरोबर सविता धर्माधिकारी नावाची माझी मैत्रीण असायची. तिला हे सगळे माहीत होते, कारण काही काही गोष्टी तिच्यासमोरच घडल्या होत्या. ती पुण्यातल्या पुरोगामी कुटुंबात वाढलेली. खूप हुशार (नंतर ती आय.पी.एस. झाली. सध्या युनायटेड नेशन्सच्या सेवेत आहे). तिने मला पुष्कळ समजावून सांगितले. ही गोष्ट तिने व्होरा सरांच्याही कानावर घातली. माझ्या मनातली भीती घालवायला तिच्या सांगण्याचा पुष्कळ उपयोग झाला. ती मला म्हणायची की, आपण कुणावर प्रेम करतो त्याहीपेक्षा आपल्यावर कोणी तरी प्रेम करतो त्याचे मोल जास्त आहे. तिने धीर दिल्यामुळे माझे मन आता मोकळे होत होते, पण तो मात्र नजरेस पडत नव्हता.

शेवटी एकदा तो मला जयकर ग्रंथालयात दिसला. मी धीर करून त्याच्याजवळ गेले.

''हॅलो.'' मी म्हणाले. ''कशी झाली अमेरिका ट्रिप?''

''चांगली झाली.'' तो शांतपणे म्हणाला. पण पुढे काही बोलला नाही.

मी काही वेळ घुटमळले. मग त्याला म्हणाले की, ''मला तुझ्याशी बोलायचे आहे.''

''काय?''

''सांगते, कुठे तरी बसू या.''

तो म्हणाला माझ्या 'कॅरल'मध्ये जाऊ. त्या वेळी पीएच.डी. करणाऱ्या संशोधकांना जयकर ग्रंथालयाच्या दुसऱ्या बाजूच्या पहिल्या मजल्यावर स्वतंत्र खोल्या म्हणजे 'कॅरल' मिळत. एका वेळी दोन स्कॉलर त्यात बसत. आम्ही तिथे जाऊन बसलो.


''मी तुझ्याशी खोटं बोलले.'' मी धडधडत्या छातीने म्हणाले. ''माझं लग्नबिग्न काही ठरलेलं नाही. तुला टाळण्यासाठी मी तसं म्हणाले.''


''काय? खोटं बोललीस?'' तो उसळून म्हणाला. ''तुला कल्पना तरी आहे का की तू काय केलंस ते? माझी सगळी अमेरिका ट्रिप भकास झाली. हताश आणि निराश अवस्थेत राहिलो मी.''


त्याला काय म्हणायचं होतं ते माझ्या लक्षात आलं. त्याचा मी प्रेमभंग केला होता आणि तशा अवस्थेत तो परदेशात आनंद कसा घेणार?


''सॉरी. सॉरी. सॉरी.'' मी एवढंच म्हणत राहिले.

त्यानंतर आमच्या भेटीगाठी नियमित होत राहिल्या. मला त्याच्याबद्दल एकेक माहिती समजत गेली. तो मूळचा डोंबिवलीचा होता. त्याने आधी इलेक्ट्रॉनिक इंजिनीयरिंगचे शिक्षण घेतले होते आणि काही काळ मुंबईत नोकरीही केली होती. पण नंतर तो जयप्रकाश नारायण यांच्या चळवळीने भारून गेला होता आणि ती नोकरी सोडून आदिवासी भागात गेला होता. तिथे असताना त्याने बाहेरून बी.ए. आणि एम.ए. केलं होतं. आदिवासी भागात असताना त्याची डॉ. कमल रणदिवे ह्या ख्यातनाम शास्त्रज्ञांशी ओळख झाली होती आणि त्यांच्या उत्तेजनाने तो पीएच.डी. करायला पुण्याला आला होता. रणदिवेबाईंनी त्याची भेट कुलगुरू प्रा. वि. ग. भिडे यांच्याशी घालून दिली होती. मिलिंदने मला नंतर सांगितले त्या प्रमाणे कुलगुरूंनी अतिशय आस्थापूर्वक त्याला काय करायचे आहे याची चौकशी केली. त्याला महाराष्ट्राच्या पाणीप्रश्नावर काम करायचे आहे हे ऐकल्यावर आणि त्याने पूर्वी काय अनुभव घेतला आहे ते कळल्यावर त्यांनी समाजशास्त्र विभागात प्रा. वाळूंजकर यांच्याकडे त्याला पाठवले. त्यावेळी पुणे







विद्यापीठात पीएच.डी. करण्यापूर्वी एम. फिल. करणे आवश्यक असायचे. पण त्याने पूर्वी केलेल्या कामापोटी विद्यापीठाने ती अट शिथिल केली होती आणि त्याला दोन रिसर्च पेपर्स लिहायला सांगून प्रवेश दिला होता. तो 'डेव्हलपमेंट सपोर्ट टीम' नावाच्या संस्थेत पार्ट-टाइम नोकरी करत होता आणि ती सांभाळून पीएच.डी.चा अभ्यास करत होता. आधी तो त्याच्या मामांच्या जागेत राहात होता पण नंतर त्याला औंध भागात ओळखीने एक जागा मिळाली होती. तिथे तो हाताने जेवण करून खायचा.


तो अमेरिकेत गेला होता तेव्हा खरे तर त्याला तिथे वेगळी संधी मिळत होती. पूर्वी भारतात येऊन मित्र झालेले राज्यशास्त्राचे एक ज्येष्ठ संशोधक प्रा. हॅरी ब्लेअर त्याला कॉर्नेल विद्यापीठात प्रवेश मिळावा म्हणून प्रयत्नशील होते. अमेरिकेतल्या त्या मुक्कामात तो कॉर्नेलला जाऊन तिथल्या प्राध्यापकांना भेटलाही होता, पण प्रत्यक्ष प्रवेशाची चर्चा निघाली तेव्हा त्याने नाही म्हटले होते. त्याचे खरे कारण अर्थातच वेगळे होते - तो पुणे विद्यापीठात माझ्या प्रेमात पडला होता. त्याने नंतर मला दुसरीही एक गोष्ट सांगितली. त्यांचा दौरा कनेक्टिकट आणि मॅसॅच्युएसेटस् ह्या राज्यांमध्ये होता. त्यावेळी त्यांना कनेक्टिकट राज्याचे विधीमंडळ बघायला नेले होते. तिथे अमेरिकेतील प्रसिद्ध 'चार्टर ओक' झाडापासून बनवलेली एक खुर्ची ठेवलेली आहे. अशी दंतकथा आहे की, त्या खुर्चीसमोर उभे राहून जर कोणी मनोभावे प्रार्थना केली तर त्याची इच्छा पुरी होते. मिलिंद मला म्हणाला की, मी काही अशा गोष्टींवर विश्वास ठेवणारा नाही पण मनाच्या त्या अवस्थेमध्ये मी अशी प्रार्थना केली होती की, ह्याच मुलीशी माझे लग्न होऊ दे!


यानंतर आमच्या भेटीगाठी वाढल्या. अशा भेटीगाठी व्हायला पुणे विद्यापीठाचा परिसर हा किती आदर्श आहे हे कोणाला सांगायला नको. आम्ही निरनिराळ्या झाडांखाली बसत असू. अनेकदा दुपारच्या कडक उन्हात. पण अशा वेळी ऊन हे चांदण्यासारखेच वाटते. विद्यापीठातले वॉचमन त्यावेळी विद्यार्थ्यांवर फुकट फौजदारी करत. विद्यार्थ्यांना दटावून चहापाण्याला पैसे मिळवायचा त्यांचा प्रयत्न असे. कारण अनेकदा बाहेरची मुलेमुलीही तिथे येत. आम्ही एकदा परीक्षा विभागाच्या बंद दरवाजासमोर बसलो होतो. एक वॉचमन आला. त्याला वाटले आम्ही विद्यापीठातले नाही, बाहेरचे आहोत. तो म्हणायला लागला, आमच्या साहेबांकडे चला. मिलिंद त्याला शांतपणे म्हणाला, तुमच्या साहेबांकडे नको, आपण थेट कुलगुरूंकडेच जाऊ! मग त्याला कळले आम्ही कोण आहोत ते.


मला लहानपणापासूनच शिकवायची आवड होती. मी दहावी-बारावीत असतानाच शाळकरी मुलींच्या शिकवण्या घेत असे आणि त्या करून मग कॉलेजला जायचे. मिलिंदला हे कळल्यावर तो मला म्हणाला की तू शिक्षण क्षेत्रात येणार असशील तर फर्स्ट क्लास किंवा किमान बी-प्लस ग्रेड मिळालीच पाहिजे. मी बी.ए. मराठी माध्यमातून केल्यामुळे इंग्लिश माध्यमातून एम.ए. मला अवघड जात होते. हे जेव्हा त्याच्या लक्षात आले, तेव्हा त्याने माझा अभ्यास घेतला. मला सोपी पुस्तके आणून दिली. नोट्स काढायला शिकवले आणि सतत मला प्रोत्साहन दिले. त्यामुळे तिसऱ्या सेमिस्टरमध्ये मला एकोणसाठ टक्के गुण मिळाले. आधीच्या दोन सेमिस्टर्सपेक्षा जास्त.


ही टर्म संपली तेव्हा १९८८ साली, होळीच्या दोन दिवस आधी, 'माझ्याशी लग्न करशील का?' असे त्याने मला विचारले. आता मी त्याच्या प्रेमात इतकी आकंठ बुडाले होते की 'होकार' हा फक्त उपचाराचाच भाग होता. मग तो म्हणाला की, मी घरी येऊन तुझ्या आईवडलांना विचारतो. मी हो म्हटले. आमच्या घरी येण्यापूर्वी आई-बाबांना त्याची माहिती दिली. त्यांना सांगितले की, 'हा मुलगा पीएच.डी. करतो आहे. त्यामुळे त्याला फुलटाइम जॉब करता येत नाही. तो एका संस्थेत पार्टटाइम जॉब करतो आणि तो एक लेखक आहे.'

सांगितलेल्या दिवशी मिलिंद घरी आला. मी पोहोचायच्या








आधीच तो पोहोचला होता. त्याच्या हसऱ्या आणि सहज स्वभावाने त्याने माझ्या आईवडलांची मने जिंकली. माझ्याशी लग्न करण्याचा मनोदय व्यक्त केला, पण त्याचबरोबर माझे आधी लग्न ठरले नाही ना, नव्हते ना, याची खात्रीही करून घेतली. आई-बाबांनीही लग्नाला होकार दिला. मिलिंद गेल्यावर मी आईला म्हणालेसुद्धा की, 'अगं आई, डॉक्टर, इंजिनिअरची स्थळे येत असताना, ज्याचे उत्पन्न निश्चित नाही अशा मुलाला तुम्ही लगेच होकार कसा दिला?' यावर आई मार्मिकपणे म्हणाली, 'मुलगा प्रामाणिक आणि सच्चा वाटला. त्याच्या डोळ्यात तुझ्याबद्दलचे प्रेम दिसले. अगं, तुझ्यावर प्रेम करणारी व्यक्ती तुला मिळत असेल तर तू सुखी होणारच...पैसा अडका नंतर कमवता येईल...जोडीने कमवा.'

नंतर त्याच्या घरीही त्याने सांगितले. त्याची आई पुण्याला आली असताना तिलाही भेटवले. माझ्या सासूबाईंना असे वाटत होते की मिलिंद बहुधा मुस्लिम किंवा ख्रिश्चन मुलीशी लग्न करेल. त्यामुळे मला पाहताच त्यांना हायसेच वाटले. लगेच लग्न करण्याचा प्रश्न नव्हता. माझे एम.ए. आधी पूर्ण व्हायला हवे होते. त्याचेही पीएच.डी.चे काम पुढे सरकायला हवे होते. एम.ए. झाल्यावर मला एस.एन. डी.टी.च्या एका प्रॉजेक्टमध्ये नोकरी मिळाली. मग ४ डिसेंबर १९८८ रोजी आम्ही विवाहबद्ध झालो. जयप्रकाश नारायण यांच्या 'संपूर्ण क्रांती' चळवळीतून आल्यामुळे लग्न 'नोंदणीपद्धती'नेच आणि मुलीच्या आईवडलांकडून काहीही न घेता करायचे ही त्याची भूमिका अगदी पक्की होती. तो औंधला जिथे राहात होता त्या इमारतीच्या गच्चीतच लग्न सोहळा झाला. त्यानेच घरातून कनेक्शन घेऊन ट्युबलाइट लावल्या होत्या. दोन्हीकडचे मिळून पन्नास-साठजण असतील. त्याचे गाइड प्रा. वाळूंजकर, मानवशास्त्राचे प्रा. रा. के. मुटाटकर, संख्याशास्त्राचे प्रा. अनिल गोरे अशी नामवंत मंडळी होती. रणदिवेबाईही मुद्दाम आल्या होत्या. लग्नाला सगळा मिळून पंधराशे रुपये खर्च आला (रजिस्ट्रारसाहेबांची फी धरून). त्यातील साडेसातशे रुपये त्याने बाबांना आणून दिले. त्यांच्याकडून एक पैसुद्धा घेतली नाही.


लग्नानंतर पुण्यातील गोखलेनगर येथे भाड्याच्या दोन खोल्यांमध्ये आमचा संसार सुरू झाला. मिलिंद पार्टटाइम नोकरी आणि फुलटाइम पीएच.डी. करत होता. मी सुरुवातीला विद्यापीठातील स्पर्धा- परीक्षा विभागात 'रिसर्च असिस्टंट' म्हणून नोकरी स्वीकारली. त्यानंतर एक वर्ष 'नॅशनल डिफेन्स अकॅडमी' म्हणजे 'एनडीए'मध्ये लेक्चरर म्हणून काम केले. आम्ही अडीच वर्षे गोखलेनगरमध्ये होतो. मिलिंदने तीन वर्षात आपली पीएच.डी. पूर्ण केली आणि १९९० साली प्रबंध सादर केला. एक वर्ष आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेत 'चिफ रिसर्च ऑफिसर' म्हणून नोकरीही केली. पुणे विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागात लेक्चररशिपसाठी त्याने इंटरव्ह्यू दिला होता, परंतु 'बोलणे' हे आपले क्षेत्र नाही, तो आपला पिंड नाही, हे त्याला लवकरच उमगल्याने तो विचार त्याने परत कधीही केला नाही.

दरम्यान 'डीएसटी'ने उत्तर कर्नाटकात युनायटेड नेशन्सच्या 'वर्ल्ड फुड प्रोग्रॅम'चा एक प्रकल्प स्वीकारला. मिलिंद दोन वर्षे त्याचा कोऑर्डिनेटर म्हणून काम पाहात होता. बेळगावला ऑफिस होते आणि कर्नाटकात त्याची भ्रमंती व्हायची. आम्हाला १९९१ साली मुलगा झाला. आम्ही भाड्याचेच पण थोडे मोठे घर घेतले. माझे सासूसासरे आता आमच्याकडे राहायला आले. मी निरनिराळ्या कॉलेजांमध्ये शिकवायला सुरुवात केली. कर्नाटकातला प्रकल्प संपल्यावर मिलिंद पुन्हा 'डीएसटी'सोबत काम करू लागला. 'डीएसटी' ही संस्था 'कम्युनिटी एड अब्रॉड-ऑस्ट्रेलिया' (नंतर ऑक्सफॅम-ऑस्ट्रेलिया) या आंतरराष्ट्रीय संस्थेसोबत जोडलेली होती. देशभरातल्या स्वयंसेवी संस्थांना ती आर्थिक मदत करायची तर डीएसटी त्यांना इतर सर्व तऱ्हेचे साहाय्य करायची. मिलिंदने यामध्ये पूर्णवेळ नोकरी घेतली. वेगवेगळ्या स्वयंसेवी संस्थांच्या कामाचे मूल्यमापन करणे, त्यांना निधी मंजूर करून देणे,











त्यांच्या कामाचे 'डॉक्युमेंटेशन' करणे असे त्याच्या कामाचे स्वरूप होते. त्यासाठी भारतभर भ्रमंती हा त्याच्या जॉबचा अविभाज्य भाग होता. प्रवास आणि वेगवेगळ्या जाती-जमातीच्या माणसांना भेटणे ही तर त्याच्या आवडीची गोष्ट. त्यामुळे या कामावर तो खुश होता. ऑक्सफॅम ऑस्ट्रेलियाच्या कामासोबतच त्याच्या लिखाणाला बहर आला. वेगवेगळे प्रांत, वेगवेगळे देश, दोस्त मंडळी यामुळे त्याचे जगणे, वागणे, बोलणे विविधस्पर्शी झाले. त्याने कामासाठी काम असे कधीच केले नाही. त्याची जी आवड होती, तेच त्याचे काम होते. जिथे जिथे गेला तिथे त्याने सखोल निरीक्षण केले. त्या संस्थांतील समस्यांवर उपाय सुचवले. तो कथालेखन तर करत होताच शिवाय ह्या कामामधून 'समुद्रापारचे समाज', 'जनाचे अनुभव पुसता', 'कार्य आणि कार्यकर्ते' अशा समाजभान जागवणाऱ्या लेखनकृती त्याच्या हातून घडल्या. मी कॉलेजांमध्ये नोकरी करत असल्याने माझ्या सुट्टीच्या काळात तो मला आणि मुलाला तो जिथे असे त्या ठिकाणी बोलावून घेई. असा सगळा भारत त्याने आम्हाला फिरवून आणला. एरवी कधीही न दिसणारे आदिवासी भाग, त्यांचे सांस्कृतिक जीवन, तेथील भौगोलिक परिस्थिती आमच्या दोघांच्या निदर्शनास आणून दिली आणि आमच्या जाणिवाही प्रगल्भ केल्या. मुलाला शाळेत घालतानाही मुद्दाम नव्या जाणिवेची आणि मराठी माध्यमाची 'अक्षरनंदन' ही शाळा निवडली.


माझे सासूसासरे आमच्यासोबतच राहात असल्याने आमचे तसे एकत्र कुटुंब होते. मिलिंदचा आईवडलांवर जीव होता, पण तो श्रावणबाळ नव्हता. आपल्या आईकडून आपल्याला लिखाणाचा वारसा मिळाला हे त्याला माहीत होते. आमच्याकडे येणारे-जाणारे खूप. सासूबाईंमुळे नातेवाईकांचाही राबता असायचा. त्यातून मानवी नातेसंबंधांची वीण कशी घट्ट असते ह्याची त्याला जाणीव होती. या नातेसंबंधांचा प्रभाव त्याच्या लेखनातून आपल्याला जाणवतो. त्याच्या भाऊबहिणीवर त्याची माया आहे, पण नात्यात गुरफटून न जाण्याची डोळस समजही त्याच्याकडे आहे. आणि म्हणून आमच्या घरी सर्वजण सुट्टीत आले तरी तो फार कमी वेळ सर्वांसाठी काढायचा. मुख्य वेळ लिखाणात घालवायचा. बोलण्यापेक्षा लिहिते व्हा, असा सर्वांना त्यांचा सल्ला असायचा. आई-वडिलांना जरी तो मानत असला तरी आपल्या मतांच्याबाबत मात्र तो खूप ठाम होता. आमच्या मुलाची मुंज करण्याची जेव्हा वेळ आली तेव्हा त्याने त्याच्या आईवडलांना निक्षून सांगितले की, मी मुलाची मुंज करणार नाही. त्याच्यावर कोणत्याही तऱ्हेचे जातीवाचक संस्कार करणार नाही. त्यामुळे सासूबाई काही काळ आमच्यावर रागावल्या होत्या, पण तो बधला नाही. त्यांच्या भावाच्या मुलाची मुंज मात्र आईंनी हट्टाने पुण्यात केली. त्याला त्याने हरकत घेतली नाही, पण त्यात तो सहभागी झाला नाही (आईवडील गेल्यानंतरही त्याने कोणतेही धार्मिक विधी केले नाहीत). मैत्री आणि माणसांची कदर ही त्याची मुख्य जीवनमूल्ये राहिली. माझी आई आता नुकतीच म्हणजे २०२५ मध्ये गेली. आम्ही सगळ्या बहिणी तिचे करत होतो पण शेवटच्या क्षणी हॉस्पिटलात तिच्यासोबत मिलिंदच होता. 'चिद्गगनाचे भुवनदिवे' हे व्यक्तिचित्रांचे पुस्तक त्याने माझ्या आईवडलांना अर्पण केले आहे.

लेखकाचे घर म्हटले की कसं शांत वातावरण! अशी आपली समजूत... पण आमच्या घरी मात्र असं काही नसते. आमच्या घराला त्याच्या लिखाणाची आणि त्याला आमच्या सर्व प्रकारच्या आवाजाची, गोंगाटाची सवय आहे. त्याला सकाळीच लिहायला आवडते. पूर्वी तो अर्थातच कागदावर लिहायचा, पण आता गेली अनेक वर्षे थेट लॅपटॉपवर. तो लिहीत असताना कामवाल्या मावशी कचरा-फरशी करायला, भांडी घासायला, कपडे धुवायला येतात. भांड्यांचा व नळाचा आवाज, कुकरच्या शिट्ट्या, मिक्सरचा गोंगाट याचीही जोड असते. सोबत घरातल्या लोकांचेही बोलणे. पण मिलिंद कधीही त्याबद्दल एक अक्षरही बोलत नाही. मला आवाजाचा त्रास होतो असे कधीही म्हणत नाही. त्यामुळे आता असे वाटते की








मी त्याच्या लिखाणाचे थोडे कौतुक करायला हवे होते. लेखक म्हणून थोडे लाड करायला हवे होते. आम्ही अगदी ऑर्डीनरी माणसाप्रमाणेच त्याला घरात वागवत होतो. त्याने कधीही दार बंद करून किंवा पहाटे लवकर उठून किंवा रात्रीचे जागून किंवा शांत ठिकाणी बसून किंवा थंड हवेच्या ठिकाणी जाऊन लेखन केले असे मला आठवत नाही. आमच्या दैनंदिन धबडग्यात एका बाजूला शांतपणे त्याचे लेखन चालू असते. यातही मध्येच संदर्भासाठी पुस्तक पाहिले जाते किंवा फोनही होतात. कधी कधी आम्हीही त्याची लेखनातली एकाग्रता लक्षात न घेता अचानक काहीतरी आठवले म्हणून त्याला सांगायला जातो. मुलगा तर शाळा आणि कॉलेजमधून आला की बाबाला किस्सा ऐकवणार आणि बाबा आहे ते शांतपणे ऐकून घेणार असे चित्र आमच्या घरात हमखास असायचे. अगदी स्वयंपाक करताना एखादा जिन्नस आणायचा राहून गेला आणि मी चुकून बोलले तर लगेच लेखन अर्धवट टाकून तो मला ती वस्तू आठवणीने आणून देतो. दळण आणण्याची जबाबदारी पूर्णपणे त्यानेच घेतलेली आहे. त्याची लेखनाची लिंक कधीही तुटत नाही. जिथे थांबतो तिथूनच पुढे तो लिहू शकतो. आणि तेसुद्धा तासन् तास! त्याला लिहायचा कधीही कंटाळा येत नाही. मला ह्याचे नेहमीच अप्रूप वाटत आले आहे.


मिलिंद जसा संवेदनशील लेखक आहे तसंच हाडाचा संशोधकही आहे, याचा प्रत्यय 'गोष्ट मेंढा गावाची' किंवा 'कातकरी : विकास की विस्थापन' अशी पुस्तके वाचताना येतो. मेंढा गावात तो सतत तीन वर्षे जात होता आणि तिथली सहभागी लोकशाही जवळून पाहत होता. मीही त्याच्यासोबत तिथे गेलेली आहे. तो खरा तर आमच्या राज्यशास्त्राचा विषय. त्याच्या या गुंतवणुकीमुळे हे पुस्तक सामाजिक संशोधनातील मैलाचा दगड ठरले आहे. अशीच गोष्ट 'कातकरी' या पुस्तकाच्या बाबतीतही झाली आहे. त्या वाड्यांवरही तो अनेक महिने फिरत होता. इतर पुस्तकेही याचीच उदाहरणे आहेत. माझ्या पीएच.डी. प्रबंधाच्या वेळीही त्याची मला खूप मदत झाली. माझा विषय 'महाराष्ट्राचा राजकीय इतिहास : १९६०-७२' असा होता. तो खरं तर त्याच्याशी संबंधित नव्हता, परंतु त्याला ग्रामीण महाराष्ट्राची माहिती असल्याने त्याची निरीक्षणे मला उपयोगी पडली.


मिलिंदचे ललित लिखाण अतिशय सूक्ष्म, तरल होण्यामागे त्याची सूक्ष्म अवलोकनाची क्षमता दडलेली आहे असे मला वाटते. त्याच्या कथा-कादंबऱ्यातील पात्रे तर आपल्या शेजारी बसून बोलत आहेत असा अनुभव अनेकांनी मलाही सांगितला आहे. त्याचे कामच मुळात विविध प्रकारची माणसे आणि त्यांचे विविध प्रकारचे समूह यांच्याशी संबंधित असल्याने अनेक वयोगटाचे, वेगवेगळ्या भागातले स्त्री-पुरुष त्याच्या सान्निध्यात आले आणि या सर्वांनी त्याचा विचारांचा आणि अनुभवांचा भवताल समृद्ध केला. त्याला त्याच्या प्रतिभेची जोड मिळाल्याने सकस, कसदार लेखन त्याच्या हातून घडले असेल. मात्र सामाजिक कार्याच्या क्षेत्रात असला तरी आपण लेखक असल्याचे भान त्याने कधीही सुटू दिले नाही. लहानपणी त्याचे निबंध वर्गात वाचून दाखवले जात आणि त्या शिक्षिका तेव्हाही त्याला 'तू लेखक होशील' असे म्हणायच्या.

आमच्या घरी मिलिंदमुळे नेहमीच वेगळी आणि वैशिष्ट्यपूर्ण माणसे येत गेली. भालचंद्र नेमाड्यांपासून महेश एलकुंचवारांपर्यंत आणि सानियापासून आशा बगे यांच्यापर्यंत. एरवी लेखक म्हणून तो साहित्यिक घडामोडींपासून अलिप्त असला तरी त्याचा स्नेहपरिवार खूप मोठा आहे. सामाजिक क्षेत्रामध्येसुद्धा. मधुकरराव देवल, विलासराव साळुंखे, जयंतराव पाटील अशांची त्याच्यावर फार माया होती. महाराष्ट्रातील बहुतेक सर्व प्रमुख सामाजिक कार्यकर्ते त्याचे मित्र आहेत. किती नावे इथे घेणार? त्याचा फायदा आई-बाबांबरोबरच मला आणि आमच्या मुलाला झाला. ह्या सर्वांशी चर्चा आणि संवाद करताना आम्हांला खूप आनंद होत असे. त्यांच्या या स्नेहामुळेच आमचे सर्वांचे जीवन कृतार्थ आणि अधिक समृद्ध झाले असे आता वाटते.







मिलिंदची जिज्ञासा अफाट आहे. पीएच.डी. झाल्यावरही तो इंडॉलॉजी, होमिओपॅथी, शिल्पकला, मूर्तिकला, भाषाविज्ञान अशा गोष्टी शिकत राहिला. मानवशास्त्र तर त्याचा कायमचा आवडता विषय. त्याचे गाइड डॉ. वाळूंजकर हे इरावती कर्वे यांचे विद्यार्थी होते. आपण त्यांच्या परंपरेचे पाईक आहोत ह्याचा त्याला फार अभिमान आहे. त्या विषयांचा शोध तो सतत घेत असतो.

मिलिंदच्या भटकंतीच्या प्रेमाचा आम्हाला झालेला फायदा म्हणजे त्याच्याबरोबर आम्हीही केलेला प्रवास. एका दिवाळीत तो मला म्हणाला की, यापुढे तुला दिवाळीची भेट म्हणून दरवर्षी सुट्टीत परदेशवारी करू. मला वाटले तो गमतीत म्हणत असेल, पण त्याने ही कल्पना २०१४पासून प्रत्यक्षात आणली. आम्ही गेली दहा वर्षे अमेरिका, रशिया, ऑस्ट्रेलिया, इजिप्त, जॉर्डन, इंडोनेशिया, कंबोडिया, श्रीलंका, ब्रह्मदेश, व्हिएटनाम इत्यादी देशांना विनासायास भेटी दिल्या. कोणत्याही ट्रॅव्हल कंपनीमार्फत नाही; आपले आपण. यातल्या काहींवरच त्याने लिहिलेले आहे, पण बाकी बराचसा अनुभव आमच्यापाशीच आहे. ह्या सगळ्या प्रवासाच्या नियोजनापासून ते विमानळावर बॅगा उचलण्यापर्यंत सगळी कामे तो स्वत:च करतो. सकाळी उठल्यावर हॉटेलमधल्या किटलीतून पहिला चहा मला देणे हेसुद्धा. मी खरेदीची प्रचंड शौकीन. ह्या वेडाचा त्याला त्रास होतो, पण गरीब नवऱ्याप्रमाणे तो ते सहन करतो. एक गमतीची गोष्ट म्हणजे मी अत्यंत धार्मिक आणि तो अगदी उलट. पण भारतातील बहुतेक सगळी मंदिरे आणि तीर्थक्षेत्रे त्याने पाहिलेली आहेत. अगदी कैलास-मानसरोवरसुद्धा.


लेखकांच्या पत्नींना आपल्या नवऱ्याबद्दल लिहायला सांगितले की, त्या अपार कौतुकाने लिहितात आणि त्या गोष्टीची साहित्य व्यवहारात थट्टा केली जाते हे मला माहीत आहे. पण वस्तुस्थिती जी असते ती राहतेच. मिलिंदने माझ्या आयुष्यात स्थैर्य, धैर्य आणि संपन्नता आणली. एक रसिक, हळुवार, प्रेमळ सहचर बनून अबोलपणे आपली भूमिका निभावली. आमच्या सहजीवनात परीक्षेचे, ताणतणावाचे क्षण आलेच नाहीत असे नाही, पण त्या सर्वांमध्ये आम्ही एकमेकांना अखंड साथ दिली आणि त्यातून सुखरूप बाहेर पडलो. आमच्यातील गाढ प्रेम व विश्वास कधी ढळू दिला नाही. अवाजवी अपेक्षा न ठेवता, आहे त्या परिस्थितीचा स्वीकार करून सतत पुढे जाण्याचा ध्यास घेतला. त्यामुळे एक खुले, समंजस असे आयुष्य आमच्या वाट्याला आले.

आता मुलगा मोठा होऊन मुंबईला राहतो. त्याचे लग्नही झाले आहे. त्यामुळे घरात आम्ही दोघेच असतो. मिलिंद त्याच्या आवडीच्या कामात निमग्न असतो तर मी माझ्या आवडीच्या. जास्त संवादही आमच्यात घडत नाही. त्याची गरजही वाटत नाही. अबोलपणे आमची परस्परपूरक कामे चालू राहतात. हे कसे साध्य झाले किंवा ह्या मागचे सूत्र काय असा प्रश्न जर मिलिंदला विचारला, तर त्याचे उत्तर ठरलेले असते - संसार एके संसारे!

**- नीता बोकील**
neetabokil@gmail.com

॥ग्रंथाली॥

**माझ्या काल-शराचा प्रवास**




**डॉ. संगीता गोडबोले**

**मूल्य ४०० रुपये**
**सवलतीत २५० रुपये**

# मराठी प्रकाशनातील घराणी



संतोष शेणई

*घराणी म्हटले की, विशिष्ट विचारप्रणाली चालत आलेली दिसते. या विशिष्ट विचारांना सौंदर्यपूर्णरित्या व अतिशय प्रभावीपणे प्रकट करू शकणारी शैली यांचा सुरेख मिलाफ झालेला असतो. जशा पिढ्या वाढत जातील तशी ही घराणी ठसत जातात, त्यांची उपघराणी तयार होतात. भारतीय संगीताच्या क्षेत्रात हे ठळकपणे लक्षात येते. मराठी प्रकाशन व्यवसाय शे-सव्वाशे वर्षांचा. त्यामुळे घराणी ठळक होत जावीत इतक्या पिढ्या सरकलेल्या नाहीत. तरीही काही घराणी मराठी प्रकाशन व्यवसायात दिसू लागलेली आहेत, एवढे खरे.*

**मौ**ज, पॉप्युलर, केशव भिकाजी ढवळे, मॅजेस्टिक, ह.वि. मोटे ही मुंबईतील, रा.ज. देशमुख आणि कंपनी, कॉन्टिनेंटल, राजहंस, मेहता पब्लिशिंग हाऊस, चित्रशाळा ही पुणेस्थित आणि सुविचार हे नागपूरचे प्रकाशन यांचा घराणी म्हणून विचार करता येऊ शकतो.

नियतकालिकाच्या जोडीला ग्रंथप्रकाशन ही मराठीतील एक परंपरा आहे. 'मौज'पासून ती दिसते. 'प्रसाद' व 'मेनका' यांचे नियतकालिक व ग्रंथप्रकाशन अजून सुरू आहे. 'हंस' हे आता दिवाळी अंकापुरते नियतकालिक राहिले आहे. त्यांच्या विश्वमोहिनी प्रकाशनाचे कामही थंडावले आहे. नव्वदीनंतरच्या काळात 'पद्मगंधा' व 'शब्दालय' यांची सुरुवात दिवाळी अंकापासून झाली आणि नंतर दोन्ही प्रकाशक ग्रंथप्रकाशनाकडे वळलेले दिसतात.

'समतानंद' अनंत हरि गद्रे यांनी १९ मार्च १९२२ रोजी गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर 'मौज' साप्ताहिकाचा पहिला अंक प्रसिद्ध केला. पुढे 'मौज'च्या भागवत बंधूंनी त्याचा विस्तार केला. श्री.पु. भागवत यांच्या संपादनाने 'मौज'चा दबदबा निर्माण झाला. अनेक महत्त्वाचे लेखक 'मौज', 'सत्यकथा' आणि प्रकाशनाकडे आकर्षित झाले होते. एक काळ असा होता की, प्रत्येक लेखकाला आपले एकतरी पुस्तक 'मौजे'ने काढावे असे वाटत असे. संपादन, मुद्रण या पातळीवर 'मौज'ने काही मानदंड निर्माण केले. श्री. पु. भागवत यांच्याबरोबर व नंतरच्या काळात राम पटवर्धन, श्रीनिवास विनायक कुलकर्णी, मोनिका गजेंद्रगडकर यांनी 'मौज'चा मानदंड सांभाळतानाच स्वतःची वेगळी संपादनकौशल्ये दाखवत संस्था मोठी केली. प्रकाशनाच्या बाबतीत 'मौजे'चे धोरण अतिशय कडक शिस्तीचे होते. लेखकांना त्यांच्या पुस्तकांच्या स्वामित्वधनाचा हिशेब वर्षाअखेरीस जायलाच पाहिजे. त्यानुसार छोट्या मोठ्या कितीही रकमेचा असला तरी धनादेश लेखकाला वेळेत पोचलाच पाहिजे, असा दंडक होता. 'लेखकाविना प्रकाशन व्यवसाय नाही. प्रकाशक म्हणून नाव असले तरी केवळ कोरे कागद वाचक घेणार नाही. त्यामुळे जर आपण कागदाचे, चित्रकाराचे पैसे वेळेवर देतो, तर ज्याच्या कच्च्या मालावर तुमचे उत्पादन चालते, त्या लेखकालाही वेळेवर पैसे दिले पाहिजेत', असे भागवत बंधूंचे सांगणे असे. त्यांचा हा मोठा गुण 'मौजे'चा दबदबा वाढवण्यास कारणीभूत झाला.

'मौजे'च्या घराण्यात तयार झालेले अनंत अंतरकर यांनी 'हंस', 'मोहिनी' व 'नवल' ही मासिके सुरू केली आणि विश्वमोहिनी ही प्रकाशन संस्थाही. अनंतरावांचे हे उपघराणे त्यांचे पुत्र आनंदराव यांनी दीर्घकाळ चालवले. मात्र पुढे तीनही मासिके दिवाळी अंकांपुरती उरली. मासिकांबरोबरच प्रकाशन

संस्थेचेही काम कमी होत गेले. 'मौजे'च्या श्री. पु. भागवतांचा प्रभाव पुढच्या पिढीतील 'राजहंस'चे दिलीपराव माजगावकर व 'पद्मगंधा'चे अरूणराव जाखडे यांच्यावर पडलेला दिसतो.

ग्रंथविक्रेते म्हणून सुरुवात करून पुढे प्रकाशक होण्याचीही मराठीत परंपरा आहे. १९२४ मध्ये गणेश भटकळ यांनी एक स्वतंत्र पुस्तक विक्रेता म्हणून पॉप्युलर बुक डेपोची स्थापना केली होती. केशव भिकाजी ढवळे, मधुकाका कुलकर्णी, केशवराव कोठावळे, दयार्णव कोपर्डेकर, सुधाकर वा. जोशी, अरविंद पाटकर, दत्तात्रय पाष्टे अशी अनेक नावे सांगता येतील. अगदी अलीकडे पपायरस, वॉल्डन यासारखे प्रकाशक झालेले तरूण मुळात ग्रंथविक्रेते आहेत. गणेश भटकळ हे ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस इंडियाचे माजी कर्मचारी होते. त्यांनी ग्रंथविक्रीत चांगला जम बसवला होता. त्यांनी वैद्यकीय अभ्यासक्रमाशी संबंधिक क्रमिक पुस्तकेही प्रकाशित केली होती. पुढे सदानंद आणि रामदास भटकळ यांनी पॉप्युलर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड ही प्रकाशन संस्था स्थापन केली. भटकळ यांनी अनेक प्रयोग केले. ललित पुस्तकांवर त्यांनी भर दिला. १९६० च्या सुमारास पुढे आलेल्या कवींचे संग्रह करून त्यांनी नवकवितेसाठी एक चांगले वातावरण निर्माण केले. परभाषक प्रकाशकांशी सहयोग करूनही त्यांनी काही प्रकल्प मराठीत आणले. पाककलेविषयीच्या पुस्तकांची लाट त्यांनी काही काळ मराठीत आणली. मौजसारखीच पॉप्युलरने कीर्ती कमावली, मात्र मौजसारखा दबदबा पॉप्युलरला निर्माण करता आला नाही.

गिरगाव-मुंबईतील सुशिक्षित वस्तीच्या माधवबागेत पिंपळाच्या पारावर एका अनाहूत विक्रेत्याचे १९००मध्ये आगमन झाले. या पारावरच्या दुकानात मनाचे श्लोक, रामरक्षा अशी छोटी छोटी पुस्तके विक्रीला होती. वाढत्या प्रपंचामुळे कोकणातली सावकारी सोडून आलेल्या केशव भिकाजी, महादेव भिकाजी आणि गणेश भिकाजी ढवळे या तीन बंधूंचे हे दुकान होते. परंपरेने चालत आलेले नित्य पाठात असणारे धार्मिक ग्रंथ प्रकाशित करायला ढवळ्यांनी प्रारंभ केला. त्यांचा खप भरपूर आहे हे लक्षात येताच सावधपणे अशा ग्रंथांचे हक्क विकत घेतले आणि नंतर त्या आवृत्त्यांमध्ये निरनिराळ्या सुधारणा करण्याचा धडाकाच लावला. 'पुस्तक चांगले दिसले पाहिजे. पाहिल्याबरोबर आवडले पाहिजे आणि लगेच विकत घेणे परवडले पाहिजे,' या त्रिसूत्रीवर केशव भिकाजींचा कटाक्ष होता. सोन्याबापू ढवळे यांनी १९४५ मध्ये आधीचे मातब्बर असे कर्नाटक प्रकाशन त्यांच्या छापखान्यासह विकत घेतले आणि आपली संस्था मजबूत केली. यानंतरच्या काळात त्यांनी ललित व इतिहास संदर्भ याविषयीची पुस्तके प्रकाशित केली.

ढवळे प्रकाशनाचा पारंपरिक धार्मिक पुस्तके प्रकाशित करण्याचा वारसा पुढे नेर्लेकर प्रकाशनाने सांभाळला. तर या परंपरेहून थोडी वेगळी वाट प्रसाद व पद्मगंधा यांनी स्वीकारली. म्हणजे अगदी पारंपरिक पुस्तकांऐवजी धर्म व देवताविषयक अभ्यासग्रंथ प्रकाशित करण्याचा मार्ग या दोन प्रकाशकांनी निवडला. त्यातही प्रसादची या मार्गावरची वाटचाल ढवळे प्रकाशनाला अधिक लगतची आहे. ढवळे प्रकाशनात अनुभव घेऊन ल. गो. परांजपे यांनी ज्योत्स्ना प्रकाशन सुरू केले. ढवळे मुलांसाठीही पुस्तके तयार करायचे, तीच वाट परांजपे यांनी स्वीकारली. त्यांची मुले मिलिंद आणि विकास त्याच वाटेने पुढे निघालेले असले तरी पुस्तकांची निवड, संपादन, मांडणी व मुद्रणसौंदर्य याचा विचार करता त्यांच्यावर मौजचा प्रभाव दिसतो.

ढवळेना आपल्या ग्रंथविक्रेत्याच्या भूमिकेचा कधी विसर पडला नव्हता. ढवळे ग्रंथयात्राने अवघा महाराष्ट्र ढवळून काढला होता. ही ग्रंथयात्रा काही कारणाने थांबली, पण त्यातून काही नवे ग्रंथविक्रेते तयार झाले. यापैकी रमेश राठिवडेकर यांचे अक्षरधारा दालन आज छान सुरू आहे.

गिरगावात औदुंबराच्या झाडाखाली केशवराव कोठावळे यांनी १९४२ मध्ये मॅजेस्टिक या नावाने पुस्तकविक्रीला सुरुवात केली. १९४८ मध्ये प्रकाशनाला प्रारंभ झाला तरी मॅजेस्टिक प्रकाशनची स्थापना १९५२ मध्ये झाली. मराठीतील उत्तमोत्तम व मान्यवर साहित्यकारांचे लेखन मॅजेस्टिकने प्रकाशित केले आहे. या प्रकाशनाकडून ग्रंथप्रेमाला वाहिलेले ललित मासिक व दीपावली हे वार्षिक प्रसिद्ध केले जाते. १९८३ पासून पुण्यात व १९८४ पासून मुंबईतील पार्ल्यात सुरू झालेल्या मॅजेस्टिक गप्पा

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई.


केशवराव कोठावळे


अनिल मेहता


दिलीप माजगावकर

अतिशय लोकप्रिय ठरल्या होत्या.

केशवराव गिरगावच्या पदपथावर पुस्तकविक्री करून प्रकाशनाकडे वळले, तर पुण्यात डेक्कन जिमखान्यावरच्या पदपथावर पुस्तकविक्री करणारे सु. वा. जोशी यांनी याच परिसरात प्रकाशक म्हणून स्थान निर्माण केले. अर्थात प्रकाशक म्हणून वाटचाल करताना त्यांनी आपले चुलते 'चित्रशाळे'चे वासुकाका जोशी यांचा आदर्श समोर ठेवला.

ह. वि. मोटे हे खरेतर ज्ञानकोशकार श्री. व्यं. केतकर यांच्या 'स्कूल'मधले. पण केतकर यांनी १९२७ मध्ये लिहिलेल्या 'माझे बारा वर्षाचे काम' हे पुस्तक त्यांनी वाचलेले नसावे, असे वाटते. कारण प्रकाशन व्यवसायाविषयी उपयुक्त असलेल्या या पुस्तकाचा मोट्यांच्या लेखनात कुठेही उल्लेख येत नाही. ते १९३२ ते १९४० या काळात प्रकाशन व्यवसायात होते. या नऊ वर्षात त्यांनी विभावरी शिरूरकरांची महत्त्वाची पुस्तके प्रकाशित केली. विश्राम बेडेकर यांचे 'रणांगण' यासह एकूण तेरा पुस्तके त्यांनी प्रकाशित केली होती. त्यांच्या 'प्रतिभा' या नियतकालिकालाही संदर्भमूल्य आहे. पण यानंतर ते चित्रपटनिर्मितीच्या क्षेत्रात गुंतले. पुन्हा १९५७ ला ते प्रकाशन व्यवसायाकडे वळले. साधारण १९८०पर्यंत ते या व्यवसायात होते. त्यांनी मोजकीच पुस्तके प्रकाशित केली, पण ती महत्त्वाची होती. यात चिंतामणराव कोल्हटकरांचे 'बहुरूपी' हे महत्त्वाचे आत्मचरित्र मोटे यांना मिळाले. हे पुस्तक आपल्याला मिळायला हवे होते असे त्याकाळी श्री. पु. भागवत व रामदास भटकळ या दोघांनाही वाटले होते. पण मोटे यांनी या पुस्तकावर किती मेहनत घेतली आहे, हे भागवतांना माहीत होते. त्यामुळेच 'तुमचे नाव पुन्हा गाजायला आम्हाला हवे आहे' असे भागवतांनी मोटे यांना सांगितले होते. या पुस्तकाशी आपले नाव जोडले जायला हवे ही भटकळांची इच्छा होती, त्यामुळे या पुस्तकाचे वितरण पॉप्युलरने घेतले. त्यानंतर अखेरपर्यंत ही नावे जोडली गेली होती. मोटे यांनी 'विश्रब्ध शारदा' दोन खंडात प्रकाशित केले आहे. हे पुस्तक म्हणजे ग्रंथप्रकाशकाचा सुंदर व वैशिष्ट्यपूर्ण आविष्कार आहे.

जुन्या मौल्यवान ग्रंथांचे पुनर्मुद्रण व्हायला हवे असे ह. वि. मोटे यांना वाटायचे. तो विचार घेऊन ह. अ. भावे यांनी 'वरदा' प्रकाशन चालवले. माजगावकर व जाखडे यांच्यावरही श्री. पु. भागवतांइतकाच ह. वि. मोटे यांचा प्रभाव दिसतो.

श्री. ना. बनहट्टी यांनी नागपूर येथून 'सुविचार' प्रकाशन चालवले. संस्थेच्या नावाइतकेच प्रगल्भ असे प्रकाशन होते. त्याचे विदर्भासह महाराष्ट्रात नाव झाले होते. पुढे ते राजेंद्र बनहट्टी यांनी पुण्यातून चालवले.

'कॉन्टिनेन्टल बुक सर्व्हिस'च्या पाटणकर यांच्याबरोबर भागीदारी करीत अनंतराव कुलकर्णी यांनी १ जून १९३८ रोजी 'कॉन्टिनेंटल प्रकाशन' सुरू केले. दत्त रघुनाथ कवठेकर यांच्या 'नादनिनाद' या कथासंग्रहाने त्यांनी प्रकाशन सुरू केले. त्यांनी काही काळ शालेय क्रमिक पुस्तकेही तयार केली. विद्यापीठ स्तरावर उपयुक्त ठरतील अशीही पुस्तके अनंतरावांनी तयार करवून घेतली होती. एक काळ असा होता की, मुंबई विद्यापीठात सहा पुस्तके अभ्यासक्रमात असतील, तर त्यातील चार कॉन्टिनेंटलची असत. तरीही हे प्रकाशन ओळखले गेले ते ललित साहित्यासाठीच. या संस्थेतून पाटणकर यांनी भागीदारनिवृत्ती घेतली तेव्हा अनंतरावांना संस्थेचे नाव 'शारदा प्रकाशन' ठेवायचे होते. पण त्याकाळात कागदाचे नियंत्रण होते आणि कागदाचा परवाना 'कॉन्टिनेंटल बुक सर्व्हीस'च्या नावे होता. त्यामुळे तेच नाव पुढे चालू ठेवावे लागले. विषयाची विविधता व लेखकांची विपुलता हे या प्रकाशनाचे वैशिष्ट्य राहिले. कॉन्टिनेंटलने कविता, कादंबरी, नाटक, समीक्षा, पर्यटन, भाषाशिक्षण, ललितगद्य, इतिहास, पुराण, धार्मिक, चरित्र, सामाजिक कार्य अशा विविध विषयांवरील पुस्तके प्रकाशित केली. मराठी प्रकाशन व्यवसायात पुढच्या काळात माहितीपर पुस्तकांवर भर दिला गेला, त्याची सुरुवात कॉन्टिनेंटलच्या कृषीतंत्रज्ञान, संगणकशास्त्र या विषयांवरील पुस्तकांपासून आहे. अनंतरावांच्या तिसऱ्या पिढीनेही ही संस्था काही काळ चांगल्या तऱ्हेने चालवली होती, पण सध्या काही कारणाने या संस्थेचे कार्य स्थगित झाले आहे. अनंतरावांची नातसून अमृता कुलकर्णी या सध्या मिहाना प्रकाशनाद्वारे हा वारसा पुढे नेण्याचा प्रयत्न करीत आहेत.


मधुकाका कुलकर्णी हे कॉन्टिनेंटलमध्ये वितरणासाठी रुजू झाले होते. त्यांनी विक्रेता म्हणून चांगली छाप पाडली होती.




मधुकाका कुलकर्णी



श्री. पु. भागवत



रामदास भटकळ




**कॉन्टिनेंटल प्रकाशन**



**रा. ज. देशमुख आणि कं.ची सुरुवात शनिवार पेठेतील या खोलीत झाली.**

त्याचबरोबर पुस्तक प्रकाशनातील बारकावेही शिकून घेत होते. पुढे त्यांनी श्रीविद्या प्रकाशन सुरू केले आणि स्वतःचे स्थानही निर्माण केले. त्यांच्याच तालमीत तयार झालेले त्यांचे चिरंजीव उपेंद्र कुलकर्णी यांनी ही संस्था चांगली सांभाळली होती. मात्र त्यांच्या आकस्मिक निधनानंतर काही काळ संस्थेचे काम बंद पडल्यासारखे झाले होते. काही काळाने मधुकाकांचे जावई या संस्थेत लक्ष घालू लागले. संस्था चालू ठेवण्यात त्यांना यश आले. सध्या उपेंद्र यांच्या स्नुषा संस्था सांभाळत आहेत.

शालेय क्रमिक पुस्तके तयार करण्याची संधी खासगी प्रकाशकांना मिळाली आणि इतर प्रकाशकांप्रमाणेच रा. ज. देशमुख यांनी ती साधली. 'रा. ज. देशमुख आणि कं.' स्थिरस्थावर होण्यास याचा हातभार लागला. संस्था थोडी स्थिर होऊ लागल्यावर देशमुखांनी ललित साहित्याच्या प्रकाशनाकडेही लक्ष वळवले. त्यांना त्यांच्या पत्नी डॉ. सुलोचना यांची चांगली साथ लाभली. सुलोचनाबाईंची जाण व देशमुखांची आक्रमकता यामुळे अल्पावधीतच ही संस्था गाजू लागली. वि. स. खांडेकर यांच्यासारखे थोर साहित्यिक देशमुख कंपनीचा लेखक म्हणून ओळखले गेले. इरावती कर्वे, नरहर कुरुंदकर, रणजित देसाई असे लेखक देशमुखांनी जोडून घेतले. भालचंद्र नेमाडे यांची 'कोसला' ही कादंबरी देशमुखांनी पहिल्यांदा प्रकाशित केले होती. पण पुढे देशमुख त्यांच्या कौटुंबिक न्यायालयीन प्रकरणांमध्ये गुंतत गेले आणि प्रकाशनाकडे दुर्लक्ष झाले. पुस्तकांची वेळेवर पुनर्मुद्रणे होऊ शकली नाहीत. मग वि. वा. शिरवाडकर, पु. ल. देशपांडे, रणजित देसाई, वि. स. खांडेकर या लेखकांची पुस्तके त्यांच्या हातून गेली आणि त्याचा फटका प्रकाशनाला बसला. देशमुखांनंतर सुलोचनाबाईंनी नेटाने संस्था सुरू ठेवली. सुलोचनाबाईनीच १९८८ला संस्था प्रायव्हेट लिमिटेड केली. त्यांचा भाचा रवींद्र गोडबोले हे आपल्या व्यवसायाबरोबरच देशमुख कंपनीतही लक्ष घालू लागले. सुलोचनाबाईंनंतर तर प्रामुख्याने गोडबोलेच काम पाहात होते. मात्र त्यांच्या आकस्मिक निधनानंतर संस्था बंद पडते की काय, अशी स्थिती निर्माण झाली होती. पण गोडबोलेंची कन्या मुक्ता यांनी संस्थेत चैतन्य भरायला सुरुवात केली आहे.

ब्रिटिश राजवटीत पुस्तकांसाठी कागद नियंत्रण कायदा होता, त्या काळात रा. ज. देशमुख यांनी निजामशाहीतील लोहारा येथील आपला आतेभाऊ पंडित अनंत कुलकर्णी यांना 'प्रकाशक बनवले'. पंडितराव त्यावेळी शिकत होते. पण त्यांचा पत्ता वापरून देशमुखांनी कागद नियंत्रण कायद्याला बगल दिली व आपल्या पुस्तकांसाठी कागद मिळवला. गंमत अशी की, पुढे १९४६ ला पंडितराव खरेच प्रकाशक झाले आणि त्यांनी पुण्यातूनच 'कुलकर्णी ग्रंथागार' ही संस्था स्थापन केली.

शिवशाहीर ब. मो. तथा बाबासाहेब पुरंदरे यांनी १९५४मध्ये 'राजहंस प्रकाशन' सुरू केले. मराठेशाहीच्या इतिहासासंबंधीच्या त्यांच्या कादंबऱ्या प्रकाशित करणारी संस्था असेच या प्रकाशन संस्थेचे १९६०पर्यंतचे स्वरूप होते. बाबासाहेबांनी लिहिलेले 'राजा शिवछत्रपती' हे शिवचरित्र १९५८पासून आतापर्यंत लोकप्रिय राहिले आहे. (बाबासाहेबांनी संस्था सोडल्यानंतर म्हणजे १९७० नंतर हे पुस्तक पुरंदरे प्रकाशनाकडून प्रकाशित होत आहे.) या संस्थेत बाबासाहेबांबरोबर पहिल्यापासून श्री. ग. माजगावकर होते. 'श्रीगमा'नी १९६१मध्ये 'माणूस' हे मासिक सुरू केले. या मासिकाला अल्पावधीत वाचकांनी प्रतिसाद दिला व प्रतिष्ठाही. साहजिकच मासिकाचे पाक्षिक व पाक्षिकाचे साप्ताहिक झाले. 'माणूस'ने 'राजहंस'ला वेगळी ओळख मिळाली. त्याचबरोबर साधारण १९६५नंतर 'राजहंस' आधीची वाट सोडून अन्य

विषयांकडे वळलेले दिसते. तरीही 'राजहंस'पेक्षा 'माणूस'ची प्रतिमाच ठळक होती. याच काळात 'श्रीगमां'चे धाकटे बंधू दिलीपराव यांचे संस्थेत आगमन झाले. मुद्रणालय, ग्रंथप्रकाशन, वितरण यांची जबाबदारी दिलीपरावांवर आली. दिलीपरावांवर श्री. पु. भागवत, ह. वि. मोटे यांच्याबरोबर रा. ज. देशमुख यांचा प्रभाव होता. या त्रयीला समोर ठेवून दिलीपरावांनी स्वतःची वाट शोधली आणि प्रकाशन संस्थेला राजहंसी चाल प्राप्त करून दिली. नव्या विषयांचा व ताज्या दमाच्या लेखकांचा शोध, योग्य संपादकीय संस्कार, नेटकी-सुबक मांडणी आणि वितरणाचे नवे मार्ग या बळावर त्यांनी संस्थेचा विस्तार केला. एकेकाळी 'मौज'ने आपले एक तरी पुस्तक प्रकाशित करावे अशी इच्छा लेखक बाळगत, तशाच प्रकारची प्रतिष्ठा 'राजहंस'ने मिळवली आहे.

'राजहंस'ने बाबासाहेबांनी लिहिलेले शिवचरित्र प्रसिद्ध केल्यानंतर त्याच्या प्रसारासाठी सर्वदूर प्रसारक पाठवले. यापैकी राजाभाऊ कुलकर्णी विदर्भ दौऱ्यावर गेले होते. त्यांनी नागपूरला पोहोचल्यावर स्वतःच 'साहित्यप्रसार केंद्र' हे ग्रंथविक्री दालन सुरू केले आणि पुढे ते प्रकाशकही झाले.

अनिल मेहता यांनी कोल्हापूर येथे असतानाच रणजित देसाई यांच्याशी जवळीक साधली होती. वि. स. खांडेकर यांच्या निधनानंतर त्यांच्या कुटुंबीयांशीही त्यांचे चांगले संबंध होते. हे दोन्ही महत्त्वाचे लेखक आपल्याकडे वळवून मेहता पब्लिशिंग हाऊस पुण्यातून सुरू झाले. मेहता या व्यवसायात येण्याआधी मराठीतील अनेक प्रकाशक चांगला व्यवसाय मिळवत होतेच. पण मेहतांनी मराठी प्रकाशन व्यवसायाला अधिक मोठी स्वप्ने पाहायला शिकवले. महत्त्वाचा लेखक बांधून ठेवून त्याची सर्व पुस्तके आपल्या संस्थेतर्फे प्रकाशित करायची हे ह. वि. मोटे यांचे धोरण मौज, पॉप्युलर, देशमुख यांच्यानंतर मेहतांनीच अधिक प्रमाणात पुढे नेले. नव्या लेखकांबरोबरच आधीचे अन्य प्रकाशकांकडचे लेखकही मिळवत त्यांनी मराठी प्रकाशनाला व्यावसायिक स्पर्धा शिकवली. त्यांचे चिरंजीव सुनील यांनी अनुवाद क्षेत्रात जणू काही मक्तेदारीच निर्माण केली. सध्या सुनील यांचे चिरंजीव अखिल हे प्रकाशन व्यवसाय सांभाळत आहेत.

मराठीत ग्रंथव्यवहार आता चांगलाच वाढत आहे. अनेक प्रकाशक पुढे येत आहेत. काही लेखकही स्वतःच प्रकाशक होत आहेत. नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून पुस्तके अधिक सुबक केली जात आहेत. मात्र या प्रत्येकात आधीच्या या निवडक घराण्यांचेच पडसाद ऐकू येत आहेत.

**– संतोष शेणई**
santshenai@gmail.com

**मासिकाच्या मालकीबद्दल निवेदन**

**(रजिस्ट्रार ऑफ न्यूजपेपर्स फॉर्म ४ (नियम ८ अन्वये)**

| | |
|---|---|
| प्रसिद्धीचे ठिकाण | : ग्रंथाली, द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ |
| प्रकाशन काळ | : मासिक |
| मुद्रकाचे नाव | : इंडिया प्रिंटिंग वर्क्स |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ |
| संपादकाचे नाव | : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : ग्रंथाली, द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ |
| मालकाचे / प्रकाशकाचे नाव | : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : ग्रंथाली, द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ |

मी, सुदेश राजाराम हिंगलासपूरकर असे जाहीर करतो, की वरील तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरा आहे.

दि. १/३/२०२५

# पुस्तक प्रकाशनाचे 'साधना' मॉडेल



विनोद शिरसाठ


*साधनाला असलेली अनुकूलता पाहता, साधना प्रकाशनाची कामगिरी अधिक देदीप्यमान व्हायला हवी होती, असे सारखे वाटत राहते. इतर प्रकाशकांना अन्य अनेक प्रकारच्या संधी असतील, तरी साधना प्रकाशनासारखी अनुकूलता नसते हेही खरेच आहे. हा विचार करता, मराठीत आज किमान वीस तरी प्रकाशक असे आहेत, ज्यांनी उपलब्ध चौकटीत व प्राप्त परिस्थितीत छोट्यामोठ्या तडजोडी करीत साधनापेक्षा कितीतरी जास्त व चांगले काम केले आहे. प्रत्येक प्रकाशनासमोर आव्हाने अनेक असतात, पण त्या तुलनेत संधी जास्त असतात अशीच माझी धारणा आहे. ती संधी साधण्यासाठी आव्हाने पेलवण्याची तयारी आहे का, एवढाच काय तो प्रश्न असतो!*

**'सा**धना प्रकाशन' हे 'साधना साप्ताहिका'चे लहान भावंड आहे. ही भावंडे मागील ७५ वर्षांपासून एकत्रच राहत आली आहेत. साधना साप्ताहिकाचा जन्म १५ ऑगस्ट १९४८ रोजी झाला आणि त्यानंतर दोन वर्षांनी साधना प्रकाशनाचा जन्म झाला. ११ जून १९५० रोजी साने गुरुजींचा मृत्यू झाला. त्याआधी वर्षभर गुरुजींनी 'सुंदर पत्रे' ही लेखमाला साप्ताहिकात लिहिली होती. त्या लेखमालेचे पुस्तक ऑक्टोबर १९५० मध्ये आले, तेच खऱ्या अर्थाने साधना प्रकाशनाचे पहिले पुस्तक. गुरुजींनी आपली प्रिय पुतणी, सुधा हिला उद्देशून लिहिलेली ती पत्रे महाराष्ट्रातील कुमारवयीन मुला-मुलींसाठी होती. साहजिकच ते पुस्तक कमालीचे लोकप्रिय ठरले, विद्यापीठांतील काही अभ्यासक्रमांना लावले गेले, शालेय पाठ्यपुस्तकांत त्यातील काही पत्रे समाविष्ट होत राहिली. 'सुंदर पत्रे' नंतर दरवर्षी साधना प्रकाशनाकडून पाच ते दहा पुस्तके येत राहिली. त्यातील साधारणतः निम्मी पुस्तके साप्ताहिकांतील लेखमालांची असायची आणि निम्मी पुस्तके साधनाशी व साने गुरुजींशी संबंधित लेखकांची असायची. अर्थातच, पुस्तकांची निर्मिती व वितरण यासाठी साप्ताहिकाचीच यंत्रणा काम करीत होती. आणि साप्ताहिकाचा संपादकच प्रकाशनाचाही संपादक मानला जात असे. साप्ताहिक छापण्यासाठी त्या वेळी प्रिंटिंग प्रेसची गरज होती, त्यामुळे साधना प्रकाशनाची पुस्तकेही त्याच प्रेसमध्ये छापली जात होती. त्या प्रेसमध्ये छपाईची अनेक कामे अन्य प्रकाशकही घेऊन येत असत, त्यामुळे प्रेसमधून मिळणाऱ्या अतिरिक्त उत्पन्नाचा फायदा साप्ताहिक व प्रकाशन यांचे अर्थकारण जुळवण्यासाठी होत असे. एका अर्थाने साधना प्रिंटिंग प्रेस हे साधना साप्ताहिक व साधना प्रकाशन यांचे तिसरे भावंड होते. पुढील ४० वर्षे तिन्ही भावंडं एकाच घरात खाऊन-पिऊन सुखी अशा पद्धतीने वाटचाल करीत राहिली.

१९५० ते ९० या चार दशकांत साधना प्रकाशनाकडून साधारणतः चारशे पुस्तके प्रकाशित झाली असावीत. त्यात ललित व वैचारिक या दोन्ही प्रकारांतील पुस्तके होती. त्यामध्ये साने गुरुजी, ना. ग. गोरे, एस. एम. जोशी, बाबा आमटे, नरहर कुरुंदकर, हमीद दलवाई, यदुनाथ थत्ते, वसंत बापट, ग. प्र. प्रधान इत्यादींची पुस्तके प्रामुख्याने होती. मालतीबाई बेडेकर, शंकरराव खरात, मधु मंगेश कर्णिक इत्यादी साहित्यिकांच्या कथा-कादंबऱ्याही होत्या. पण पुस्तके प्रकाशित करण्याचे प्रमाण (अन्य प्रकाशकांच्या तुलनेत) कमी होते, मोठ्या प्रमाणात विक्री होणारी पुस्तकेही कमीच होती. वितरण यंत्रणा पुरेशी सक्षम नव्हती. मात्र पुस्तकांचे लेखक, आशय, विषय, निर्मिती यांचा दर्जा निर्विवाद उत्तम होता, किमतीही कमीच ठेवल्या जात होत्या. उदात्त ध्येयवाद हा गाभा असणारी ती पुस्तके असायची. त्यामुळे मराठी प्रकाशन विश्वात साधना प्रकाशनाला एक वेगळे व मानाचे स्थान प्राप्त झाले होते.

पुढे पुढे आर्थिक तोटा वाढत गेल्यामुळे, प्रकाशन क्षेत्रात स्पर्धा

वाढत गेल्यामुळे आणि छपाई तंत्रज्ञानात मोठे बदल होत गेल्यामुळे, १९९० मध्ये साधनाचा प्रिंटिंग प्रेस बंद करावा लागला. त्यानंतर आठ-दहा वर्षांत साप्ताहिक व प्रकाशन या दोन्ही भावंडांची एकूण परिस्थितीही झपाट्याने खालावत गेली. १९९७-९८ मध्ये भारतीय स्वातंत्र्याचे सुवर्णमहोत्सवी वर्ष आले आणि साधनाचेही! तेव्हा एका बाजूला देशात आर्थिक व राजकीय आघाडीवर नवे वारे जोराने वाहत होते. त्याचे परिणाम सर्वच क्षेत्रांवर होऊ लागले होते. आणि साधना साप्ताहिक सुरू झाले तेव्हा वयाच्या पंचविशीत असलेली पिढी पंचाहत्तरीत आली होती. त्यामुळे, 'साधनाचे प्रयोजन संपले, आता साप्ताहिक बंद करावे' असा मतप्रवाह तयार होऊ लागला. अर्थातच, 'नव्या दमाच्या नव्या लोकांकडे साप्ताहिकाची धुरा सोपवावी' असाही एक मतप्रवाह होता. दुसऱ्या प्रवाहाची सरशी झाली आणि नरेंद्र दाभोलकर व जयदेव डोळे या दोघांकडे संपादकपद आले. मात्र, सहा महिन्यांत जयदेव बाहेर पडले. आणि मग डॉ. दाभोलकरांनी अनेक लहान-थोरांच्या साहाय्याने, पुढील दहा वर्षे समोर ठेवून साप्ताहिकाची सर्वांगीण वाढ व्हावी यासाठी विविध आघाड्यांवर प्रयत्न चालू ठेवले. तेव्हा साधना प्रकाशन जास्तच डबघाईला आले होते. जवळपास दीडशे पुस्तकांच्या प्रत्येकी तीनशे ते आठशे प्रती गोडाउनमध्ये पडून होत्या. आधीच्या वीस-पंचवीस वर्षांत प्रकाशित झालेली ती पुस्तके होती. त्यातील काही पुस्तके साधनाशी संबंधित लेखक-हितचिंतक यांच्या ओळखीमुळे, आग्रहामुळे काढलेली होती. ती पुस्तके चांगलीच होती, पण त्यांचे प्रमोशन झालेले नव्हते. सर्वच पुस्तकांच्या किमती खूपच कमी होत्या. आणि प्रत्येक पुस्तकाच्या इतक्या कमी प्रतीची विक्री होत होती की, त्याच गतीने विक्री चालू ठेवून ते गोडाउन रिकामे करायला पुढची दहा-वीस वर्षे लागली असती. शिवाय, त्या पुस्तकांच्या विक्रीतून प्रकाशन विभागातील दोन-तीन कर्मचाऱ्यांचे वार्षिक






वेतन निघेल इतकेही उत्पन्न मिळत नव्हते. बाराशे चौरस फूट जागा अडकून पडली होती ती वेगळीच.


एकूण परिस्थितीचा अंदाज आल्यावर आणि अन्य काही उपाय नाहीत हे स्पष्ट झाल्यावर, डॉ. दाभोलकरांनी २००४ मध्ये साधना प्रकाशनाची सर्व पुस्तके गोडाउनमधून बाहेर काढायचे ठरवले, ५० किंवा ६० तर सोडाच, ७५ टक्के सवलतीनेही ती पुस्तके एकगठ्ठा खरेदी करायला कोणी वितरक तयार नव्हते. अखेर सोलापूरचा एक वितरक ८५ टक्के सवलतीने घ्यायला तयार झाला. मग अगदी थोड्या प्रती शिल्लक ठेवून उर्वरित सर्व प्रती विकून टाकल्या. त्यानंतर, साधना प्रकाशनाची पुस्तकनिर्मिती अघोषित पद्धतीने स्थगित केली गेली. मात्र, प्रकाशनाच्या त्या जागेवर साधना मीडिया सेंटर हे भव्य ग्रंथदालन उभारले. तिथे मराठीतील शंभराहून अधिक प्रकाशकांची (एकूण तीन ते चार हजार टायटल्स) पुस्तके विक्रीसाठी ठेवण्यात आली. कल्पना अशी होती की, एकदा सुसज्ज ग्रंथ दालनाची उभारणी केली की, या ग्रंथविक्री केंद्राला पुढे नियमित अशी गुंतवणूक फारशी करावी लागणार नाही आणि अन्य प्रकाशकांच्या पुस्तक विक्रीतून १५ ते २० टक्के मार्जिन मिळत राहील. पुढील दोन-तीन वर्षांत मीडिया सेंटर भरभराटीला येईल, त्यातून मिळणारा नफा साप्ताहिकाला वापरता येईल. आणि मग यथावकाश थोडीच, पण चांगली पुस्तके प्रकाशित करण्यासाठी आघाडी उघडता येईल. असे ते नियोजन होते. म्हणजे प्रिंटिंग प्रेस या भावंडाचा मृत्यू १९९० दरम्यान झाला, पण साप्ताहिक व प्रकाशन यांना २००४ मध्ये मीडिया सेंटर हे नवे भावंड मिळाले. अर्थातच, तिन्हींचा वावर एकाच परिसरात आणि परस्परांना पूरक!

२००७च्या दरम्यान साधना साप्ताहिकाला हीरक-महोत्सवाचे वेध लागले. डॉ. दाभोलकर साधनाचे संपादक होऊन दहा वर्षे होत आली. साप्ताहिकाने कात टाकली होती.








साधनाची आर्थिक स्थिती सुधारत होती, साप्ताहिकाच्या वर्गणीदार वाचकांचा पाया विस्तारत होता, जाहिराती व देणग्या मिळवणे तुलनेने सोपे झाले होते. आणि तंत्रज्ञानातील बदलामुळे निर्माण होणारी अनुकूलता समोर दिसत होती. या सर्व कारणांमुळे, साधना प्रकाशनाचे पुनरुज्जीवन करावे असा विचार डॉ. दाभोलकरांच्या मनात प्रबळ होत चालला होता. पण त्याला आणखी एक मोठे कारण होते. ते म्हणजे, त्याच दरम्यान माझा साधना साप्ताहिकात प्रवेश झाला होता. मी जरी डिसेंबर २००६पासून साधनात युवा संपादक म्हणून पूर्ण वेळ काम करू लागलो होतो तरी, त्याच्या तीन वर्षे आधीपासून स्तंभलेखक, युवा अतिथी संपादक, संपादक मंडळातील सदस्य या नात्यांनी बराच जास्त रुळलो होतो. त्या तीन वर्षांत, साप्ताहिकातील साठ वर्षांतील निवडक लेखनाचा ग्रंथसंच तयार करण्याच्या प्रकल्पात आणि साधना साप्ताहिकाची समग्र वेबसाईट तयार करण्याच्या प्रक्रियेत मी मध्यवर्ती होतो. त्यामुळे, डॉ. दाभोलकरांनी विश्वस्त मंडळात ठराव करून ऑगस्ट २००८ मध्येच माझी निवड साप्ताहिकाचा संपादक म्हणून केली होती. मात्र त्या ठरावाला मीच स्थगिती आणली होती. 'मला आणखी दीड वर्षे युवा संपादक, नंतर तीन ते पाच वर्षे कार्यकारी संपादक याच लेबलखाली वावरू द्यावे आणि मग संपादक हे लेबल लावावे', असे मी सांगितले होते, आणि याबाबत ठाम राहिलो होतो. मात्र ऑगस्ट २०१३ मध्ये डॉ. दाभोलकरांची हत्या झाली. त्यामुळे, मी ठरवले होते त्याच्या दीड वर्षे आधी संपादकपद स्वीकारले.


थोडक्यात काय, तर आजपासून वीस वर्षांपूर्वी मी साधनात प्रवेश केला. तेव्हापासून साधना साप्ताहिकाप्रमाणेच साधना प्रकाशनाचे कामही चढत्या क्रमाने पाहतो आहे, करतो आहे.


अर्थात, साधनात माझा प्रवेश २००४ मध्ये झाला तेव्हा माझ्याकडे संपादकीय कामाचा अनुभव जवळपास नव्हता. मात्र, त्यासाठी आवश्यक पूर्वतयारी खूपच जास्त झालेली होती. कारण आधीची सात-आठ वर्षे मी पुण्यातील सामाजिक-सांस्कृतिक वर्तुळांत बराच जास्त वावरलो होतो. पत्रकारिता व साहित्य क्षेत्र चांगलेच परिचयाचे झाले होते. ग्रंथ व्यवहारातील वाचक, लेखक, मुद्रक, प्रकाशक, विक्रेते या साखळीचा पुरेसा अंदाज आलेला होता. माझे वाचन प्रचंड म्हणावे असे होते, त्याची व्याप्ती व खोली त्या वयाच्या मानाने खूपच जास्त होती. आणि तोपर्यंत मी लेखन खूप कमी केले असले तरी, त्यासाठीची आवश्यक तयारी मोठीच झालेली होती. शिवाय, वैचारिक बाबतीत स्पष्टता आलेली होती. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे माझा स्वतःचा असा एक (सम्यक सकारात्मक) दृष्टीकोन आकाराला आलेला होता; माझ्याकडची सर्वांत मूल्यवान गोष्ट हीच आहे, असे म्हणण्याइतपत मजल मी मारलेली होती. अशा पूर्वतयारीमुळे साधनाचे व्यासपीठ मिळाल्यावर आणि डॉ. दाभोलकरांशी उत्तम वेव्हलेंथ जुळल्यावर, माझ्या मनातील कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी मोठाच वाव निर्माण झाला.

त्यामुळे, २००७ मध्ये साधना साप्ताहिकाचा युवा संपादक म्हणून पूर्ण वेळ काम करायला लागल्यावर, मी विशेष लक्ष केंद्रित केले ते लेखमाला व विशेषांक यावर. विशिष्ट थीम मध्यवर्ती ठेवून तात्कालिकतेच्या पलीकडे जाणाऱ्या लेखमाला व विशेषांक एकामागोमाग काढू लागलो. पारंपरिक चौकटीबाहेरचे, पण परंपरेला वृद्धिंगत करणारे असे ते अंक होते. अर्थातच गंभीर व वैचारिक, पण लालित्यपूर्ण आणि कमालीचे वाचनीय असे त्यांचे स्वरूप असायचे. साहजिकच, निवडक लेखमाला व निवडक विशेषांक यांना पुस्तकरूप देणे सर्व दृष्टीने सोयीचे होऊ लागले. साप्ताहिकातील मजकूर (टाइप करून) तयार आहे, त्याचे संपादन मी त्या-त्या वेळी केले आहे, त्या लेखनाची बलस्थाने व मर्यादा मला माहीत आहेत, त्याचा वाचक वर्गही माहीत आहे आणि त्या लेखनाला पुस्तकरूप देताना काय व्हॅल्यू डिशन करावी याबाबतचे माझे मानस स्पष्ट आहे, अशी ती स्थिती होती. शिवाय, पुस्तकांच्या जाहिराती करण्यासाठी साप्ताहिक हाताशी आहे आणि प्रकाशन समारंभ व अन्य प्रमोशनल उपक्रम राबवण्यासाठी पूर्ण मोकळीक आहे, असा तो माहोल होता. त्यामुळे, २००७ ते १३ या












काळात साधना साप्ताहिकातील लेखनाची जवळपास ५० पुस्तके प्रकाशित केली. मात्र, त्याच काळात साधना प्रकाशनामार्फत थेट बाहेरून आलेल्या मजकुराची, म्हणजे चालून आलेल्या तयार संहितांची पुस्तके प्रकाशित करण्याचा विचारही डॉ. दाभोलकर करत होते. त्यासाठी विविध प्रकाशकांचे मॉडेल सम जून घेत होते. त्या सर्व प्रक्रियेत मला बरोबर घेऊन जात होते. तेव्हा आम्ही 'राजहंस', 'मेहता', 'पद्मगंधा', 'मनोविकास', 'डायमंड' इत्यादी प्रकाशकांशी संवाद केला होता. कारण प्रकाशन वाढवण्यासाठी साधनाकडे आवश्यक जागा, भांडवल, गुडविल, प्रमोशनसाठी हाताशी साप्ताहिक, नामवंत लेखक, इत्यादी अनुकूलता होती. मात्र त्या अन्य पुस्तकांचे संपादन, त्यांची निर्मिती यासाठी मी वेळ देऊ शकणार नव्हतो. म्हणून ती जबाबदारी अन्य व्यक्तीकडे देण्याचे प्रयोग केले जात होते. पूर्ण वेळ संपादक व स्वतंत्र टीम नेमता येणे कोणत्याही दृष्टीने परवडणारे नव्हते (कारण वितरणाची यंत्रणा सक्षम करता येत नव्हती). त्यामुळे बाहेरच्या लोकांकडे पुस्तकाची निवड करणे, संपादन करणे असे काम सोपवण्याचे प्रयत्न होत होते. मात्र तशा प्रयत्नांना यश मिळत नव्हते. त्यातून तयार झालेली दहा-बारा पुस्तके चालली नव्हती. ते साहजिक होते, कारण साप्ताहिकातील मजकुरातून पुस्तके तयार करणे व त्यांचे वितरण हे काम कमी वेळेत, कमी श्रमात व कमी खर्चात होत होते. तसे कोणतेच फायदे बाहेरून थेट संहिता आणून काढलेल्या पुस्तकांना नव्हते.


परिणामी, त्या काळात बाहेरून आलेल्या संहिता घेऊन थेट काढलेली दोनच पुस्तके ('माझी काटेमुंढरीची शाळा' आणि 'आई') यशस्वी झाली. अर्थातच, ते कामही अन्य कोणाकडून करून न घेता आम्हीच केले होते. आणि त्याचेही कारण, त्या दोन्ही पुस्तकांचे आशय-विषय खास साधनाचे म्हणावे असे होते. याउलट, साप्ताहिकात प्रसिद्ध झालेल्या मजकुरातून अगदी सुरुवातीला काढलेली पाच पुस्तके पुढील वाटचालीसाठी दिशादर्शक ठरली. 'झपाटलेपण ते जाणतेपण' ही विविध क्षेत्रांतील आयडॉल्सची लेखमाला, 'नोकरशाहीचे रंग' ही ज्ञानेश्वर मुळेंची लेखमाला आणि 'तत्त्वप्रणाली व अंमलबजावणी', 'भारतातील प्रादेशिक पक्ष', 'भारताचे शेजारी' हे तीन विशेषांक. या पाचही पुस्तकांना सर्वच आघाड्यांवर उत्तम प्रतिसाद मिळाला. मग देवेंद्र गावंडे यांची 'नक्षलवादाचे आव्हान', सुरेश द्वादशीवार यांची 'मन्वंतर' व 'तारांगण', नामदेव माळी यांची 'शाळाभेट' इत्यादी लेखमालांची पुस्तके विशेष गाजली. आणि मग पुढील सात वर्षांत लेखमाला व विशेषांक यातून साधारणतः पन्नास पुस्तके आकाराला आली. चांगली चर्चिली गेली आणि विक्रीही उत्तम झाली. त्यातला आणखी एक विशेष हा होता की, साप्ताहिकातून तयार झालेल्या आणि वाचकांना व संपादकांना विशेष आवडलेल्या मजकुराची पुस्तके येतात तेव्हा, त्या पुस्तकांवर केवळ संपादकाचेच नाही तर साप्ताहिकाच्या सर्वच सहकाऱ्यांचे विशेष प्रेम असते. साहजिकच त्या पुस्तकांचे प्रमोशन अधिक चांगले होत राहते आणि वाचक वर्गाकडूनही ती अधिक उचलली जातात.

२०१३ च्या ऑगस्टमध्ये डॉ.दाभोलकरांची हत्या झाली. त्यामुळे साप्ताहिक आणि प्रकाशन या दोन्हींचे व्यवस्थापन, वितरण व अर्थकारण यांची अंतिम जबाबदारी माझ्यावर येऊन पडली. साधनाचे विश्वस्त मंडळ पूर्णतः पाठीशी होते आणि कार्यालयीन सहकारी कार्यवाहीसाठी तत्पर होते. पण निर्णयप्रक्रिया माझ्यावर अवलंबून असणे साहजिक होते. मात्र, इतर अनेक आघाड्यांवर काम चालू असूनही, या काळात साधना प्रकाशनाची पुस्तके अधिक प्रमाणात येऊ लागली. त्याला अंतर्गत व बाह्य या दोन्ही स्तरांवरील अनुकूलता कारणीभूत ठरली. त्यामुळे अलीकडच्या अकरा वर्षांत दरवर्षी पंधरा ते वीस या प्रमाणात पुस्तके येत राहिली, म्हणजे एकूण दीडशे पुस्तके आली. त्यातील एकतृतीयांश पुस्तके लेखमाला व विशेषांक यांची आहेत, एकतृतीयांश पुस्तके दीर्घकाळ आउट ऑफ प्रिंट राहिलेल्या (प्रामुख्याने साधना प्रकाशनाच्या) पुस्तकांच्या नव्या आवृत्त्या आहेत, आणि उर्वरित एकतृतीयांश पुस्तके मात्र पूर्णतः नवी आहेत, त्यात काही अनुवादित पुस्तकेही आहेत. या अकरा वर्षांत तिन्ही प्रकारची पुस्तके




काढण्याचे निर्णय व कार्यवाहीसाठीचा समन्वय ही जबाबदारी मी घेतली. मात्र, फक्त साप्ताहिकात प्रसिद्ध झालेल्या लेखनातून येणाऱ्या पुस्तकांचे संपादन स्वतःकडे ठेवले. जुन्या पुस्तकांच्या नव्या आवृत्त्या व पूर्णतः नवी पुस्तके यांच्या संहितांवर संस्करण करण्याचे काम आमचे सहकारी किंवा बाहेरच्या लोकांकडून करून घेतले.


या अकरा वर्षांत महात्मा गांधी यांच्यावरील, साने गुरुजींची व त्यांच्यावरील आणि सुरेश द्वादशीवार यांनी लिहिलेली पुस्तके प्रत्येकी डझनभर होती. मधु लिमये, हमीद दलवाई, गोविंद तळवलकर, नरेंद्र दाभोलकर यांची प्रत्येकी अर्धा डझन पुस्तके आली. न्यायमूर्ती रानडे, लोकमान्य टिळक, विनोबा भावे यांची मोठी व विशेष महत्त्वाची पुस्तके आणली. मिलिंद बोकील, अतुल देऊळगावकर, विनय हर्डीकर इत्यादी लेखकांची महत्त्वाची पुस्तके आली. शिक्षण या विषयावरील, आदिवासींच्या संदर्भात थोडी पुस्तके आणली. मुलाखती, भाषणे व अनुवाद यांतून आकाराला आलेली पुस्तकेही येत राहिली (या तिन्ही प्रकारच्या कामासाठी स्वतंत्र लेखनापेक्षा जास्त मोबदला दिला जातो). युवा वर्गाला समोर ठेवून काढलेली डझनभर छोटी पुस्तके आहेत. आणि आगळीवेगळी किंवा एकमेवाद्वितीय म्हणावी अशी पुस्तकेही बरीच आहेत. उदाहरणार्थ, 'तीन मुलांचे चार दिवस', 'पंचवीस वर्षांतील दलितांचे स्वातंत्र्य', 'कहाणी माहिती अधिकाराची', 'चिनी महासत्तेचा उदय', 'पक्षी उन्हाचा', 'इकेबाना' इत्यादी. त्यामुळे साधनाकडे सध्या जवळपास अडीचशे पुस्तके विक्रीसाठी उपलब्ध आहेत.


या अकरा वर्षांतील पुस्तके प्रकाशित करताना साधना प्रकाशनाची ध्येयधोरणे व कार्यवाही यांची दिशा कशी राहिली, यासंदर्भात विशेष महत्त्वाचे मुद्दे आता अधोरेखित करतो.


१. डॉ. दाभोलकरांना २००४ मध्ये साधना प्रकाशनाचा स्टॉक बाहेर काढण्यासाठी जे काही करावे लागले होते, त्याचे विस्मरण मी कधीच होऊ दिले नाही. म्हणजे साधनाच्या पुस्तकांचा स्टॉक नियंत्रित करण्यावर सर्वाधिक लक्ष केंद्रित केले. मागील पाच-सहा वर्षांत प्रिंट ऑन डिमांड या सुविधेमुळे ते काम बरेच सोपे झाले. उदाहरणार्थ, साधना प्रकाशनाच्या पुस्तकांचा स्टॉक मागील पाच वर्षे ३० ते ३५ हजार प्रती या दरम्यान दिसत राहिला. आणि वर्षभरात विक्री होणाऱ्या प्रतींची संख्या साधारणतः तेवढीच असते. याचा अर्थ, साधना प्रकाशन कार्यालयात आलेल्या कोणालाही दिसतो तो संपूर्ण स्टॉक वर्षभरात संपलेला असतो आणि तेवढाच स्टॉक तिथे नव्याने आलेला दिसतो. स्टॉकच्या संदर्भात ही रॅशनल म्हणावी अशी स्थिती आहे. त्यामुळे अतिरिक्त पैसे अडकून पडणे, जागा अडकून पडणे यापासून आम्ही पूर्णतः दूर राहतो आहोत. कारण, अतिरिक्त स्टॉक गोडाउनमध्ये असतो तेव्हा (बाहेर जात नाही तोपर्यंत) ती रद्दी असते. त्यामुळे, पुस्तके खराब होणे आणि अतिरिक्त सवलतीत वाचकांच्या माथी मारावी लागणे असे प्रकारही साधनाकडून होत नाहीत.

२. दुसरा महत्त्वाचा निर्णय व कार्यवाही म्हणजे, प्रत्येक पुस्तकाच्या छापून आलेल्या प्रती, विक्री झालेल्या प्रती, भेट दिलेल्या प्रती आणि शिल्लक प्रती यांचे काटेकोर हिशोब मिळत राहतील अशी व्यवस्था लावली. त्या प्रक्रियेत वेळ गेला, पण जे काम झाले ते उत्तम मार्गी लागले. त्यामुळे सर्व जमाखर्चाचे हिशोब अचूक मिळतात. वार्षिक ताळेबंदात तूट असो वा नसो; चित्रकार, मुखपृष्ठकार, प्रूफे तपासणारे, कॉपी-एडिटिंग करणारे आणि अर्थातच कागद व प्रिंटिंग प्रेस या सर्वांची बिले (त्यांच्याकडून काम झाल्यावर) एक आठवड्याच्या आत दिलीच पाहिजेत, असा नियमच केला आहे. आणि त्याचे काटेकोर पालन (क्वचित काही अपवाद वगळता) होत आले आहे. सर्व लेखकांना पुस्तकांची रॉयल्टी व स्टेटमेंट दरवर्षी एप्रिल महिन्यात दिली जाते (साधनाच्या आजी-माजी संपादकांच्या पुस्तकांवर रॉयल्टी दिली जात नाही आणि काही लेखकांनी त्यांची रॉयल्टी साधना विकास निधीमध्ये जमा करण्यास सांगितले आहे). त्यांना हिशोब पाहायचे असतील तर सर्व यंत्रणा खुली आहे, असे कळवले जाते. एक-दोन अपवाद वगळता कोणत्याही लेखकांनी आतापर्यंत शंकाही उपस्थित



केलेल्या नाहीत.

३. पुस्तकांची निर्मिती करताना कागद, छपाई, बाइंडिंग या सर्वांचा दर्जा निर्विवाद उत्तम राखला जातो, त्यात कसलाही भेदभाव केला जात नाही. काही मोठी पुस्तके हार्ड बाउंड केली जातात एवढाच काय तो फरक. पुस्तकांचा सर्व निर्मिती खर्च साधना प्रकाशनाकडूनच केला जातो. कोणत्याही लेखकाकडून एकही पैसा त्यासाठी घेतला जात नाही, किंवा 'अमुक इतक्या प्रती तुम्ही किंवा तुमच्या वतीने इतरांनी खरेदी कराव्यात' असे वाक्य उच्चारले जात नाही. (एक-दोन लेखकांनी स्वतः चित्रकार शोधून त्यांना हवी तशी अतिरिक्त चित्रे काढून घेतली आणि त्यांचा मोबदला परस्पर दिला, हाच काय तो अपवाद.) पुस्तक प्रकाशन समारंभ साधनाला करावेसे वाटले, तेव्हा त्याचा सर्व खर्च साधनानेच केला. काही लेखकांनी आपापल्या हौसेने आपापल्या गावात प्रकाशन समारंभ घडवून आणले, अर्थातच त्याचा खर्च त्यांनी स्वतः केला. दर आठवड्याला एक तरी असा प्रस्ताव चालून येतो की, 'आमचे पुस्तक काढा, साधनाला आम्ही देणगी देतो.' त्यातील वाईट तर सोडाच, चांगल्या पुस्तकांचेही प्रस्ताव स्वीकारले नाहीत. साधनाशी संबंधित काही जुनेजाणते लेखक होते, त्यांची पुस्तके दर्जाच्या दृष्टीने साधारण आणि आर्थिक दृष्टीने नुकसानकारक होती, तरीही ती साधनाच्या खर्चाने काढली. मात्र अशी पुस्तके आठ-दहापेक्षा जास्त नाहीत.

४. पुस्तकांचे प्रमोशन करण्याची एक पद्धत बसवली आहे. साधना साप्ताहिकात प्रत्येक नव्या पुस्तकाची एक-दोन वेळा जाहिरात केली जाते. नंतर अधूनमधून येत राहते. ललित मासिकाव्यतिरिक्त अन्यत्र जाहिरात देणे परवडत नाही व उपयुक्त ठरत नाही. सोशल मीडियात जाहिरात चालू राहते. पुस्तकातील काही भाग साधनात किंवा अन्यत्र वापरले जातात. सर्व पुस्तकांचे ई-बुक तयार करून किंडलवर उपलब्ध करून दिले जातात. निवडक पुस्तके ऑडिओ बुक स्वरूपात तयार करून स्टोरीटेलवर उपलब्ध करून दिली जातात. पूर्वी फ्लिपकार्ट आणि आता अमेझॉनवर सर्व छापील पुस्तके विक्रीसाठी ठेवली जातात. साधना प्रकाशन, साधना साप्ताहिक व कर्तव्य साधना या तिन्ही वेबसाईटवर जाहिरात केली जाते. महाराष्ट्रातील चाळीस-पन्नास स्टॉलवर काही पुस्तके विक्रीसाठी उपलब्ध असतात. (मात्र ही बाजू साधनाच्या दृष्टीने पूर्वी आणि आताही कमजोरच राहिली आहे.) वृत्तपत्रे, लेखक, साधनाच्या कार्यालयात येणारे लहान-थोर लोक आणि साधनाच्या कार्यक्रमांना येणारे पाहुणे यांना पुस्तके भेट देण्याचे प्रकार सातत्याने चालू असतात. अन्य प्रकाशकांच्या तुलनेत हे प्रमाण जास्त आहे. सर्व प्रकारे मिळून प्रत्येक पुस्तकाच्या २५ ते ७५ या दरम्यान भेट प्रती जातात. तत्त्व आणि व्यवहार या दोन्ही दृष्टीने हे धोरण पूर्णतः बरोबर आहे, अशी माझी धारणा सुरुवातीपासून राहिली आहे. जास्त शिल्लक प्रती आहेत म्हणून ती पुस्तके किंवा न खपणारी पुस्तके भेट देणे हा प्रकार सर्रास चालतो, तसा प्रकार अजिबात करायचा नाही, हा दंडकच साधना कार्यालयाला घालून दिला आहे. एवढेच नाही तर, भेट पुस्तके कोणालाही स्वतःहून द्यायची असतील तर त्या-त्या व्यक्तीची आवड-निवड पाहून द्यावीत, शक्यतो विचारून द्यावीत आणि शक्य असेल तर त्यांनाच निवडायला सांगावीत, अशी पद्धती बसवली आहे. अशा एकूण भेट प्रतींचे आकडे वर्षभरात हजारापेक्षा जास्त निघतात. पण यातून पसरणारे गुडविल, पुस्तकाला मिळणारी प्रसिद्धी, लेखक-वाचक-हितचिंतक यांच्याशी तयार होणारे नातेसंबंध या सर्वांचा विचार करता हा सौदा प्रकाशकांसाठी खूपच स्वस्तातला आहे, असेच मला वाटत आले आहे.

५. साधना प्रकाशनाने लेखकांशी लेखी करार (थोडे अपवाद वगळता) केलेले नाहीत. त्याचे कारण लेखकच फारसे इच्छुक नाहीत असे दिसून आले. तरीही आम्ही तयार केलेले करारपत्र लेखकांच्या बाजूने झुकवलेले आहे. सर्व लेखकांना सांगून ठेवले आहे, दुसरी-तिसरी व पुढील कोणतीही आवृत्ती अन्य प्रकाशकांकडून काढायची असेल तर साधनाकडून तत्काळ संमती मिळेल. मात्र, गेल्या दशकभरात एकाही लेखकाने तसे केलेले नाही. साधनाच्या बहुतांश लेखकांशी माझे व्यक्तिगत संबंध तर जिव्हाळ्याचे राहिलेच, पण मी असो वा नसो साधनाच्या कार्यालयीन सहकाऱ्यांकडून त्यांना प्रेमाची व आदराची वागणूक सतत मिळत राहिली. पुस्तके भेट देणे असो, हिशोब सांगणे असो किंवा त्यांच्या सूचनांची अंमलबजावणी करणे असो, हे सर्व माझ्या परस्परही आमचे सहकारी उत्तम प्रकारे पार पाडतात (एखाद-दुसरा अपवाद घडलाही आहे).

६. साधना प्रकाशनाची पुस्तके आम्ही फक्त राज्य सरकारच्या पुरस्कारांना स्वतःहून पाठवतो. अन्य पुरस्कारांना पाठवण्यासाठी त्या लेखकांनी किंवा अन्य हितचिंतकांनी किंवा त्या-त्या संस्थांनी सुचवले असेल, तरच पाठवली जातात. मात्र, विश्वासार्ह नसलेल्या संस्थांच्या पुरस्कारासाठी कोणी पुस्तके मागितली तरी पाठवली जात नाहीत. शासनाच्या ग्रंथखरेदी योजनेचे जाहिरात निवेदन आले असेल तर, त्यातील नियमांना अधीन राहून पुस्तके पाठवली जातात. मात्र, त्यासाठी पाठपुरावा किंवा अन्य प्रयत्न बिलकूल केले जात नाहीत. विविध विद्यापीठांमध्ये अभ्यासक्रमासाठी पुस्तके निवडली जातात. त्यासाठी आम्ही कोणतेही प्रयत्न करत नाहीत. मात्र तरीही पुरस्कार, ग्रंथखरेदी व अभ्यासक्रम या तिन्ही प्रकारांसाठी अधूनमधून साधना प्रकाशनाची पुस्तके निवडली गेली आहेत. बहुतांश वेळा गुणवत्तेच्या आधारावर, काही वेळा तिथे साधनाचे चाहते / हितचिंतक कोणी असतील म्हणूनही. पण त्यांचा शोध घेतला जात नाही, कळले तरी आभाराचा मेसेज

पाठवला जात नाही. त्यात कसलाही उद्धटपणा नसून, दोन्ही बाजूंची प्रतिष्ठा जपण्याचा तो भाग आहे.

७. या दशकात केवळ दोन-तीन वेळा अन्य संस्थांच्या सहयोगाने साधनाने पुस्तके प्रकाशित केली. उदाहरणार्थ, गांधींविषयी या ग्रंथाचे तीन खंड, मधु लिमये यांचे तीन ग्रंथ. अशा वेळी निर्मितीपूर्व खर्च त्या-त्या संस्थांनी केला, उर्वरित सर्व खर्च साधनाने केला, मात्र त्या संस्थांना पुस्तकरूपाने त्यांच्या खर्चाचा काही वाटा दिला. दोन-चार वेळा असे घडले की, साधनाच्या पुस्तकांना काही हितचिंतकांनी व्यक्तिगत देणग्या दिल्या. उदाहरणार्थ, न्यायमूर्ती रानडे यांचे तीन इंग्रजी ग्रंथ मराठीत अनुवाद करण्यासाठीचा खर्च एका देणगीतून मिळाला. मात्र उर्वरित सर्व खर्च साधनानेच केला. काही व्यक्तींनी किंवा संस्थांनी विशिष्ट पुस्तकांच्या शे-दोनशे किंवा पाचशे प्रती खरेदी केल्या. दोन वेळा पाच-पाच हजार प्रती खरेदी केल्या गेल्या. मात्र, असे प्रकार दहा वर्षांतून फार तर दहा वेळा घडले असतील. या संपूर्ण व्यवहारांमध्ये किमती वाढवणे, अतिरिक्त कमिशन देणे, असे प्रकार तर केले गेले नाहीतच; उलट अशा प्रतींची विक्री भरपूर सवलतीत म्हणजे निर्मिती खर्चावर केवळ १५ ते २० टक्के मार्जिन ठेवून केली गेली.

८. काही मोठ्या लेखकांची अशी काही पुस्तके चालत आली होती, जी साधना प्रकाशनाकडून काढली तर कमी विक्री होईल, कमी आवृत्त्या निघतील, मात्र अन्य प्रकाशकांनी काढली तर जास्त आवृत्त्या निघतील असे वाटले. तेव्हा त्या लेखकांना तशी स्पष्ट कल्पना दिली आणि अन्य दोन-तीन प्रकाशकांचे (बलस्थाने व मर्यादा सांगून) पर्यायही सुचवले. त्यातील बहुतेकांनी अन्य प्रकाशकांकडून पुस्तके काढली आणि ती चांगली चालली. काही वेळा काही लेखक असेही आले की, त्यांचे ते पुस्तक तातडीने काढले तर दोन-चार हजार प्रतींची ऑर्डर लगेच मिळणार होती. मात्र, साधना प्रकाशनाकडून ते पुस्तके काढावे या दर्जाचे नाही म्हणून किंवा संपादकीय संस्करण न करता ते काढावे लागेल म्हणून, तशा प्रस्तावाला नकारच दिले. अर्थातच, वैचारिक बाबतीत भारतीय संविधानाला सुसंगत भूमिका नसलेली लहान-मोठ्या लेखकांची पुस्तके छापायला स्पष्ट नकार देणे हे ओघानेच आले.

९. साधना साप्ताहिकाची यंत्रणा पुस्तकांचे संपादन व निर्मिती करून देत आली आणि विक्री व्यवस्था साधना मीडिया सेंटरमार्फत राबवली गेली आहे. पुस्तकांची जाहिरात प्रामुख्याने साधना साप्ताहिकातून झाली. म्हणजे साप्ताहिक व मीडिया सेंटरने दिलेल्या योगदानामुळेच साधना प्रकाशन चालू शकले, हे खरे आहे. आणि त्या दोहोंच्या मदतीशिवाय प्रकाशन चालवायचे ठरवले, तर त्याचे अर्थकारण जुळवणे आजही शक्य नाही. मात्र साधना प्रकाशनाची पुस्तके, त्या पुस्तकांचे लेखक व वाचक, नामवंत लोकांना बोलावून घडवून आणलेले प्रकाशन समारंभ या सर्वांचा उपयोग साप्ताहिक व मीडिया सेंटर यांना होत आला आहे. त्यामुळे साधना प्रकाशन परजीवी आहे, असेही म्हणता येणार नाही. साधना प्रकाशनाच्या आकर्षक सूचीचा खूपच उपयोग होतो. ती बघणाऱ्या कोणालाही प्रकाशन संस्थेच्या एकूण दर्जाविषयी वेगळे काहीही सांगण्याची गरज पडत नाही.

१०. मागील पाच वर्षांत साधनाने अतिव्याप्त, पण सुलभ व जलद असा डिजिटल विभाग आकाराला आणला आहे. साप्ताहिकाचे ७५ वर्षांचे आर्काइव्ह आहे, त्यावर सर्व लेखमाला व विशेषांकही आहेत. त्यासोबत कर्तव्य साधना हे डिजिटल पोर्टल, साधना प्रकाशनाची सर्व पुस्तके ई-बुक स्वरूपात आणि काही पुस्तके ऑडिओ बुक स्वरूपात, याशिवाय काही पुस्तकांवर व लेखकांवर व्हिडिओ इतके सर्व डिजिटल विभागात येते. साप्ताहिक, कर्तव्य व प्रकाशन यांच्या तीन स्वतंत्र वेबसाईट्स आहेत, त्या परस्परांना जोडलेल्या आहेत. मात्र, डिजिटल माध्यमातून अद्याप सस्टेनेबल रेव्हेन्यू मॉडेल आकाराला आलेले नाही (अन्यत्र ज्या थोड्या लोकांना तो मिळतो त्यांनाही एकूण खर्चाच्या तुलनेत अत्यल्प असतो). त्यामुळे साधना डिजिटलचा बहुतांश खर्च व्यक्तिगत देणग्या आणि दोन-तीन संस्थांनी दिलेल्या ग्रँटमधून झाला आहे.

तर, असे आहे 'पुस्तक प्रकाशनाचे साधना मॉडेल'. हे आदर्श नाही, अनेकांना व्यवहार्य वाटणार नाही हे तर उघडच आहे. पण असेच घडत आले आहे. त्याला मिळालेले यश संमिश्र आहे. साधनाला असलेली अनुकूलता पाहता, साधना प्रकाशनाची कामगिरी अधिक देदीप्यमान व्हायला हवी होती, असे सारखे वाटत राहते. इतर प्रकाशकांना अन्य अनेक प्रकारच्या संधी असतील, तरी साधना प्रकाशनासारखी अनुकूलता नसते हेही खरेच आहे. हा विचार करता, मराठीत आज किमान वीस तरी प्रकाशक असे आहेत, ज्यांनी (याच वीस वर्षांत) उपलब्ध चौकटीत व प्राप्त परिस्थितीत छोट्या-मोठ्या तडजोडी करीत साधनापेक्षा कितीतरी जास्त व चांगले काम केले आहे. त्यामुळे, साधना प्रकाशनाचे मॉडेल दाखवून कोणत्याही प्रकाशनाला कमी लेखणे किंवा काही सल्ला देणे मला तरी योग्य वाटत नाही. मात्र प्रत्येक प्रकाशनाला स्वतःच्या अशा काही मर्यादा असतात, तशी स्वतःची अशी काही बलस्थानेही असतात हेही खरे. त्यामुळे, प्रत्येक प्रकाशनासमोर आव्हाने अनेक असतात, पण त्या तुलनेत संधी जास्त असतात अशीच माझी धारणा आहे. ती संधी साधण्यासाठी आव्हाने पेलवण्याची तयारी आहे का, एवढाच काय तो प्रश्न असतो!

**- विनोद शिरसाठ**
editor.sadhana2023@gmail.com

# वारशाची वाटचाल वेगळ्या वाटेवरून



**रोहन चंपानेरकर**

*एका व्यवसायात दोन पिढ्यांनी (वडील आणि मुलगा) एकत्रितपणे काम करण्याचा विषय अनेकदा येतो. दोन पिढ्या एकत्र काम करत असल्यामुळे वाचकांमधल्याही किमान दोन पिढ्यांचे कल आपोआपच समजतात. वडलांकडे असलेल्या अनुभवाचा मी कायम आदर ठेवत आलो आहे आणि माझा उत्साह ते समजून घेत आले आहेत. मी जे प्रकल्प करायचे म्हटले, त्यात त्यांनी कधीही आडकाठी आणली नाही, उलट नेहमीच प्रोत्साहन दिलं. मुळात आमच्या दोघांची पिढी वेगळी असली, तरी विचार एकच आहे हा मुद्दा महत्त्वाचा आहे.*

**कॉर्पोरेट** क्षेत्रातली नोकरी सोडून २००९ साली मी रोहन प्रकाशन या माझ्याच नावाने सुरू झालेल्या व्यवसायात आलो, तेव्हा काही गोष्टी मनात पक्क्या होत्या. घरची गादी चालवल्यासारखा हा व्यवसाय करायचा नव्हता. मी इलेक्ट्रॉनिक्स इंजिनीअरिंगचं शिक्षण घेतलं होतं. शिक्षण पूर्ण केल्यानंतर पाच वर्षं नोकरी करायची आणि नंतर स्वत:चं काहीतरी करायचं हे ठरवलेलं होतं. मग ते स्वत:चं म्हणजे एखादी स्टार्टअप असो किंवा प्रकाशन व्यवसाय असो; नोकरी करायची नाही यावर मी ठाम होतो. घरच्यांचा मी जे काही करेन त्याला पाठिंबा होता. 'रोहन प्रकाशन'मध्ये काम सुरू करायचं निश्चित झालं, तेव्हा मी स्वत:साठी काही भूमिका निश्चित केल्या होत्या. त्यातली पहिली होती विद्यार्थ्याची. मला हा व्यवसाय शिकायचा होता, त्यासाठी विद्यार्थ्याच्या भूमिकेत जावं लागणार होतं. दुसरी भूमिका म्हणजे माझ्याकडे दुसऱ्या क्षेत्राचं जे शिक्षण आहे, त्याचा उपयोग व्यवसायाच्या उत्कर्षाची गती वाढवण्यासाठी करून घेण्याची, थोडक्यात संप्रेरकाची (कॅटलिस्ट). मला नवीन विचार आणि नवीन प्रकल्प घेऊन या व्यवसायात प्रवेश करायचा होता.

अर्थात मी रोहन प्रकाशनामध्ये नवीन असलो, तरी नवीन प्रयोग, नवीन प्रकल्प हे काही 'रोहन'साठी नवीन नव्हते. ते इथे नित्याचेच होते, म्हणजे त्यापूर्वीच्या पंचवीसेक वर्षांपासून घडतच होतं.

पुस्तक प्रकाशनाचा व्यवसाय आमच्या कुटुंबात सर्वांत प्रथम सुरू केला तो माझ्या आजोबांनी, मनोहर चंपानेरकर यांनी. ते शिक्षक होते, गणित-इंग्रजी या विषयांवरची दीडेकशे पुस्तकं त्यांनी लिहिलेली होती. एकंदर पुस्तकं, वाचन यांबद्दल आमच्या घरात जिव्हाळा होता. त्यात आजोबांचं वर्तुळ बरंच मोठं होतं. अनेक लेखक, साहित्यिकांशी त्यांची मैत्री होती. जीवनदीप, नवनीत या पाठ्यपुस्तकांचं प्रकाशन करणाऱ्या संस्थांमध्ये त्यांनी संपादनाचं काम केलं होतं. माझे वडील प्रदीप यांनी जे जे स्कूल ऑफ आर्ट्स येथून प्रिंटिंग टेक्नॉलॉजीचं शिक्षण घेतलं व स्वत:चा प्रेस सुरू केला. १९८२ साली दोघांनी विचारपूर्वक रोहन प्रकाशन सुरू केलं. मी तेव्हा लहान होतो. त्यामुळे याचंच नाव प्रकाशनसंस्थेला द्यावं असं त्यांना वाटलं. रोहन प्रकाशनाचा पाया घातला गेला तो अशा रितीने.

१९८३ मध्ये रोहन प्रकाशनातर्फे जगावेगळी माणसं हे पहिलं पुस्तक प्रकाशित झालं. तो व्यक्तिचित्रणांचा संग्रह होता. त्या काळात तो एक वेगळाच प्रयोग होता. या पुस्तकाला वाचकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला.

हौसेतून सुरू झालेलं हे प्रकाशन आजोबा आणि

वडिलांच्या प्रयत्नांमुळे अल्पावधीतच बहरत गेलं आणि विस्तारत गेलं. या काळात 'रोहन'ने आणलेल्या महत्त्वाच्या पुस्तकांपैकी एक म्हणजे अभिनेत्री जयश्री गडकर यांचं आत्मचरित्र- अशी मी जयश्री!

आजोबांच्या पुस्तकांच्या कल्पना अभिनव होत्या. उपयुक्त पुस्तकं त्या काळात मोठ्या प्रमाणात प्रकाशित होत होती पण 'रोहन'च्या पुस्तकांमध्ये वेगळेपण होतं. उदाहरणार्थ, पाककृतींच्या पुस्तकांचे मोठाले खंड त्यापूर्वीही होते पण एखाद्या विशिष्ट प्रकारच्या खाद्यपदार्थांच्या पाककृती देणारी छोटी, हाताळण्यास सोपी पुस्तकं / 'रोहन'ने प्रकाशित केली. मग ते चिंगलान असो किंवा 'फ्रिज, मिक्सर, ओव्हन'. 'फ्रिज, मिक्सर, ओव्हन' हे पुस्तक तर प्रचंड गाजलं.

१९९१ मध्ये आम्ही मुंबईहून पुण्याला आलो. १९९२ मध्ये आजोबा निवर्तले. त्यानंतर १९९४ मध्ये आम्ही पुण्यात कार्यालय थाटले. शिवाय मुंबईतलं ऑफिस चालू ठेवले. दरम्यानच्या काळात यू आर अंडर अरेस्ट हे पोलिस अधिकारी पी. एल. मोकाशी यांचं अनुभवकथन, आय ॲम इनोसण्ट हे नानावटी खून खटल्यावरचं पुस्तक ही पुस्तकं गाजत होती.


१९९७ साली माझ्या वडिलांनी एक वेगळं पुस्तक आणायचं ठरवलं. माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या सी. पी. श्रीवास्तव लिखित मूळ इंग्रजी चरित्राचा अनुवाद 'रोहन'ने प्रकाशित केला. ज्येष्ठ पत्रकार अशोक जैन यांनी हा अनुवाद केला होता. मुळात लालबहादूर शास्त्रींचं चरित्र सध्याच्या (म्हणजे तेव्हाच्या) काळात कोण वाचणार, असा प्रश्न त्यांना अनेकांनी विचारला होता पण दरवेळी नफ्यातोट्याचा विचार न करता पुस्तकं प्रकाशित केली पाहिजेत यावर वडलांचाही विश्वास होता. त्यामुळे त्यांनी ते पुस्तक आणलं. ते खूप नावाजलं गेलं. त्यानंतर २००३ साली शास्त्रीजींच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त २२५ रुपये किमतीचं हे पुस्तक केवळ १०० रुपयांत उपलब्ध करून देण्याचा अभिनव प्रयोग रोहन प्रकाशनाने केला. मुळात ते शास्त्रीजींचं जन्मशताब्दीवर्ष आहे हे अनेकांना त्यानिमित्ताने कळलं. पुस्तकाच्या दर्जाबाबत अजिबात तडजोड न करता मुद्रक, वितरक, विक्रेते या सगळ्यांच्या सहकार्याने त्यांनी ही किंमत कमी केली होती. हे पुस्तक खरेदी करण्यासाठी अक्षरश: रांगा लागत होत्या. या जनआवृत्तीच्या १५ आवृत्ती एका वर्षातच संपली.


विसाव्या शतकाअखेर हाती घेतलेल्या आणि २००४ साली पूर्णत्वास आलेल्या एका प्रकल्पाने रोहनला चांगले नाव मिळवून दिले. हजार वर्षांतल्या लक्षणीय व्यक्तींबद्दल माहिती देणारा ग्रंथ रोहन प्रकाशनातर्फे चार खंडांमध्ये प्रकाशित करण्यात आला. 'यांनी घडवले सहस्त्रक' या शीर्षकाखाली आलेल्या या पुस्तकांनाही तुफान प्रतिसाद मिळाला. त्यासाठी संपादकीय मंडळ नेमून सखोल संशोधन करण्यात आलं होतं. या प्रयोगाबाबत किंचित साशंकता असल्याने त्यासाठी बँकेकडून वेगळं कर्ज वडलांनी मंजूर करून घेतलं होतं. एखाद्या पुस्तकाच्या प्रकल्पासाठी प्रकाशकाने स्वतंत्र कर्ज घेण्याची पद्धतही प्रचलित नव्हतीच. अजूनही पुस्तकाच्या ऋणनिर्देशामध्ये याचा उल्लेख आहे. अर्थात पुस्तकाची विक्री जोरदार झाल्यामुळे दीड वर्षातच संशोधनाचा खर्च भरून निघाला. नंतर या पुस्तकांचीही जनआवृत्ती निम्म्या किमतीत विक्रीसाठी उपलब्ध करून दिली. तशा २० आवृत्ती काढाव्या लागल्या.


१९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या इतिहासाची नोंद करणारं पुस्तक मराठीत नाही असं वडलांच्या लक्षात आलं. त्यातूनच 'असा घडला भारत'ची संकल्पना आली. त्यासाठीही संपादकीय मंडळ नेमण्यात आलं. कोणत्याही प्रकारचं मतप्रदर्शन टाळून तथ्यात्मक पद्धतीने १९४७ ते २०१२ या काळातल्या सगळ्या घडामोडींची नोंद करणारं हे पुस्तकही खूप गाजलं. त्याच्या सात आवृत्ती प्रकाशित झाल्या.

यांनी घडवले सहस्त्रक आणि असा घडला भारत ही मिलिंद चंपानेरकर आणि सुहास कुलकर्णी संपादित पुस्तकं हे मराठीतले महत्त्वाचे संदर्भग्रंथ आहेत.

मी या सगळ्या घडामोडी बघत होतोच. कॉर्पोरेट क्षेत्रात नोकरी करत असतानाही मी संध्याकाळचा वेळ, शनिवार-रविवार 'रोहन प्रकाशन'च्या ऑफिसमध्ये येत







होतो. 'क्रॉसवर्ड' सोबतचा एक करार बराच काळ अडकून पडला होता. मी पुढाकार घेऊन तो मार्गी लावला होता. ९ जून २००९ या दिवशी मी अधिकृतपणे 'रोहन प्रकाशन'मध्ये जॉइन झालो पण या क्षेत्राचा अभ्यास मी आधीपासूनच करत होतो. त्या काळात मधल्या वयोगटाच्या मुलांसाठी मराठीत वाचण्यासाठी काहीच नाही हे माझ्या लक्षात आलं. बालसाहित्य होतं आणि नंतर एकदम मोठ्यांची पुस्तकं. कुमार, किशोर वयोगटात वाचनाच्या आवडीचा पाया खरं तर घातला जातो. या वयोगटातल्या मुलांना सकस, रोचक वाचायला मिळालं नाही, तर ती वाचनापासून तुटत जातात, असं मला वाटलं. त्यात पुन्हा दृक्‌श्राव्य माध्यमांचं आकर्षण तर असतंच. उद्याचा वाचक घडवण्यासाठी या वयातल्या मुलांना वाचायला काहीतरी उत्तम दिलं पाहिजे अशी इच्छा त्यातून निर्माण झाली. या वयातल्या मुलांना रहस्यकथा, शोधकथा यांचं आकर्षण असतं. माझ्या डोळ्यापुढे सत्यजित रे यांचा 'फेलुदा' उभा राहिला. ॲडव्हेंचर्स ऑफ फेलुदा या इंग्रजी पुस्तकाचा मराठीत अनुवाद करून घेतला तर? वडिलांनी मला पूर्ण स्वातंत्र्य दिलं. मी कामाला लागलो. पुस्तकाच्या अनुवादासाठी हक्क मिळवले. शास्त्रीजींच्या चरित्राचा अनुवाद करणारे अशोक जैन यांच्याशी अनुवादासाठी संपर्क केला. ते त्यावेळी पक्षाघाताने आजारी होते पण तरीही त्यांनी उत्साह दाखवला. लेखनिक नेमून अनुवादाचं काम करण्याची तयारी दाखवली. फेलूदा मराठीत आणण्याच्या कल्पनेबद्दल माझं कौतुक केलं. त्यामुळे माझा उत्साह आणखीनच वाढला. 'फेलुदा'चे बाराच्या बारा भाग मराठीत आणायचं ठरलं. या पुस्तकासाठी नेहमीच्या गोष्टींना फाटा देऊन नवीन काहीतरी करण्याचं ठरवलं होतंच. मराठी अनुवादाचं मुखपृष्ठही दिल्लीतल्या एका प्रसिद्ध चित्रकारांकडून काढून घेतलं. फेलुदाची एक प्रतिमा वाचकांच्या मनावर ठसण्यास त्यामुळे खूप मदत झाली. फेलुदाच्या मराठी अनुवादाला वाचकांनी तुफान प्रतिसाद दिला.


त्यानंतर बांग्ला भाषेतले लेखक शरदिंदु बंधोपाध्याय यांचं ब्योमकेश बक्षी मराठी आणलं. मुलांसाठी रस्किन बॉण्ड यांच्या कथांचे अनुवाद आणले. शिवाय 'बबडू बँकेत' हे मुलांना बँकेच्या व्यवहारांची माहिती करून देणारं पुस्तक, एमबीए आणि वयवर्षं सोळा हे मुलांना गप्पांच्या माध्यमातून एमबीए कोर्सबद्दल माहिती देणारं पुस्तक अशी पुस्तकं 'रोहन'ने सातत्याने प्रकाशित केली. सायना नेहवाल, अर्जुन वाजपेयी यांच्या अनुभवांवर आधारित प्रेरणादायी पुस्तकं प्रकाशित केली. माजी राष्ट्रपती आणि प्रसिद्ध वैज्ञानिक एपीजे अब्दुल कलाम यांच्या 'रिइग्नायटेड' या पुस्तकाच्या अनुवादाचे हक्क मी घेतले. या पुस्तकात सात विज्ञानशाखांची फार सुंदर माहिती आहे.


या पुस्तकांच्या प्रकाशन प्रक्रियेत अनेक गोष्टी लक्षात येत होत्या. पुस्तकाचं संपादन हा या प्रक्रियेतला अत्यंत महत्त्वाचा भाग असतो. हे संपादन केवळ मजकुराचं नसतं, तर पुस्तकाचं मुखपृष्ठ, कागदाची निवड, अक्षरांचा पॉइंट साइझ-फॉण्ट, पुस्तकातली चित्रं या सगळ्याच बाबींवर काम करावं लागतं. त्याबाबतीत अत्यंत चोखंदळ राहावं लागतं, जागरूक राहावं लागतं. निर्मितीमूल्यांशी कोणतीही तडजोड करून चालत नाही. वाचकाने कोणतीही पुस्तकं वाचली पाहिजेत याचाही विचार करावा लागतो आणि वाचकाला काय हवं आहे याचाही विचार करावा लागतो. पुस्तक वाचकांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न करावे लागतात. सिनेमाच्या भाषेत सांगायचं तर दिग्दर्शकाची आणि निर्मात्याची अशा दोन्ही भूमिका प्रकाशकाला पार पाडाव्या लागतात. आजोबांना, वडिलांना संपादनाची समज होतीच. त्यात वडलांनी प्रिंटिंग टेक्नॉलॉजीचं शिक्षण घेतल्यामुळे त्यांना ले-आउटची समजही उत्तम आहे. तरीही या सगळ्या बाबींचा विचार करण्यासाठी, यावर चर्चा करण्यासाठी आपली एक टीम असावी असा विचार आमच्या मनात घोळत होता. त्यातूनच २०१२ मध्ये आम्ही संपादकांची टीम बांधायला सुरुवात केली. २०१६ पर्यंत ही टीम आमच्या मनात होती तशी आकाराला आली. आज 'रोहन प्रकाशन'मध्ये चार इन-हाउस संपादक आहेत. मराठीतल्या कोणत्याही प्रकाशनसंस्थेत कदाचित अशी टीम नसेल.

योगाचार्य बीकेएस अय्यंगार यांनी मूळ मराठीत लिहिलेलं



आरोग्ययोग हे पुस्तक 'रोहन'ने प्रकाशित केलं होतं. त्याचे अनेक भाषांमध्ये अनुवाद झाले. इंग्रजी, स्पॅनिश, फ्रेंच, हिंदी, मल्याळम, तमीळ अशा अनेक देशी-परदेशी भाषांमध्ये या पुस्तकाचे अनुवाद झाले आणि त्यांच्या अनेक आवृत्ती खपल्या.

शिवाय अन्य भारतीय भाषांतलं दरवर्षी किमान एक तरी पुस्तक मराठीत आणण्याचाही निर्णय आम्ही घेतला. 'रोहन आंतरभारती'खाली आम्ही आर. के. नारायण, बाणी बसू, मानव कौल यांची पुस्तकं आणली आहेत.

पीआरसीआय अर्थात पब्लिक रिलेशन्स कौन्सिल ऑफ इंडिया या संस्थेतर्फे दिला जाणारा पब्लिशर ऑफ द इयर हा पुरस्कार 'रोहन प्रकाशन'ला २०१४ मध्ये मिळाला. त्यामुळे आमचा उत्साह खूपच वाढला. ही संस्था देशभरात दौरे काढून प्रकाशनसंस्थांची माहिती घेते. संपूर्ण देशातून एका मराठी भाषेतल्या प्रकाशनाला हा पुरस्कार मिळणं ही खूपच मोठी गोष्ट आहे.


२०१६ मध्ये संपादनासाठी खंदी टीम तयार झाल्यानंतर आम्ही एक मोठा निर्णय घेतला, तो म्हणजे फिक्शनल साहित्याच्या प्रकाशनाचा. तोपर्यंत रोहन प्रकाशनाने उपयुक्त पुस्तकं, चरित्रं-आत्मचरित्रं, ऐतिहासिक पुस्तकं, आरोग्याशी संबंधित पुस्तकं प्रकाशित केली होती. मात्र, आता कथा-कादंबऱ्यांचंही प्रकाशन करण्याचा निर्णय आम्ही घेतला. खरं तर फिक्शनल साहित्य प्रकाशित करण्यात आर्थिक जोखीम मोठी असते पण प्रत्येक गोष्टीत नफ्यातोट्याचा विचार करायचा नाही हे तत्त्व पाळत आम्ही फिक्शन प्रकाशित करणं सुरू केलं.

इंग्रजीत प्रकाशन संस्थांमध्ये वेगवेगळ्या साहित्य-प्रकारांसाठी ज्याप्रमाणे इम्प्रिंट्स असतात, त्या धर्तीवर मराठीत 'मुद्रा' आणण्याचंही आम्ही ठरवलं. त्यानुसार रोहन आंतरभारती, रोहन व्यक्तिरंग, रोहन समाजरंग, रोहन आरोग्य अशा मुद्रा तयार झाल्या. त्यात रोहन मोहर या मुद्रेखाली आम्ही फिक्शन प्रकाशित करायला लागलो. रोहन मोहर आता खरोखर बहरला आहे असं म्हणायला हरकत नाही. गेल्या नऊ वर्षांत आम्ही ७०-८० साहित्यकृती प्रकाशित केल्या आहेत. वेगवेगळ्या लेखकांची पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवली आहेत. वाचकांचाही या पुस्तकांना उत्तम प्रतिसाद आहे. समीर गायकवाडांचं खुलुस नावाचं पुस्तक आम्ही प्रकाशित केलं. त्याला अनेक पुरस्कार मिळाले.गौहर नावाचं त्यांचं आणखी एक पुस्तक नुकतंच आलं आहे. थ्रिलर कॅटेगरीमध्ये श्रीकांत बोजेवार यांच्या अगस्ती इन अ‍ॅक्शन सीरिजला उत्तम प्रतिसाद आहे.


काही पुस्तकं सामाजिक बांधिलकी म्हणून प्रकाशित करायची हे तत्त्वही आम्ही पाळत आलो आहे. डॉ. तरु जिंदाल यांनी बिहारमधल्या विलक्षण अनुभवांवर एक पुस्तक लिहिलं होतं. ते 'रोहन'तर्फे प्रकाशित करावं अशी त्यांची इच्छा होती. आम्ही काही इंग्रजी पुस्तकं प्रकाशित केलीही आहेत पण त्यांचं पुस्तक जास्तीतजास्त लोकांपर्यंत पोहोचावं या उद्देशाने त्यांना अधिक व्याप्ती असलेल्या इंग्रजी प्रकाशकांचा संपर्क आम्ही दिला. या पुस्तकाचा मराठी अनुवाद 'हां यह मुमकिन है' नावाने आम्ही प्रकाशित केला.


एका व्यवसायात दोन पिढ्यांनी (वडील आणि मुलगा) एकत्रितपणे काम करण्याचा विषयही अनेकदा येतो. दोन पिढ्या एकत्र काम करत असल्यामुळे वाचकांमधल्याही किमान दोन पिढ्यांचे कल आपोआपच समजतात. वडिलांकडे असलेल्या अनुभवाचा मी कायम आदर ठेवत आलो आहे आणि माझा उत्साह ते समजून घेत आले आहेत. मी जे प्रकल्प करायचे म्हटले, त्यात त्यांनी कधीही आडकाठी आणली नाही, उलट नेहमीच प्रोत्साहन दिलं. मुळात आमच्या दोघांची पिढी वेगळी असली, तरी विचार एकच आहे हा मुद्दा महत्त्वाचा आहे. त्यामुळे दोन पिढ्या एका वेळी, एका ठिकाणी काम करत असल्याचा फायदाच जास्त जाणवतो.

२०१६ सालानंतर एकंदर प्रकाशन व्यवसायापुढे आणि अर्थातच आमच्यापुढेही अनेक आव्हानं उभी राहिली. नोटाबंदीनंतर काही काळ पुस्तकविक्रीला एकदम खीळ बसली. प्रदर्शनं वगैरे तर बंदच झाली. त्यापाठोपाठ जीएसटी आला. जीएसटीच्या रचनेनुसार प्रकाशकाद्वारे खरेदी केल्या जाणाऱ्या प्रत्येक गोष्टीवर जीएसटी भरावा लागतो पण विक्रीच्या वेळेस पुस्तकांवर मात्र जीएसटी लागत नाही. त्यामुळे आर्थिक गणितं बिघडून गेली.










त्यानंतर कोविड साथीमध्ये तर सगळं बंदच पडलं होतं. अर्थात या काळातही आम्ही उमेद कायम ठेवली. आमच्या टीमनेही आम्हाला खूप साथ दिली. कोविड साथीच्या काळात आम्ही 'लव्ह इन द टाइम ऑफ करोना' या आठ कथांचा संग्रह आणला. साथीच्या काळातल्या प्रेमाच्या या गोष्टींना वाचकांचा खूप प्रतिसाद मिळाला. त्यानंतर कोविडच्या काळात लोकांना उपयुक्त ठरतील अशी चार पुस्तकंही आम्ही आणली. कोरोनासोबत जगताना हे त्यातलं पहिलं पुस्तक. याशिवाय कोविड साथीसंदर्भात प्रतिकारशक्ती, मानसिक आरोग्य, पालकत्व या विषयांवरची पुस्तकं आणली. लॉकडाउनमुळे लोक घरात अडकले असताना 'गपशप दिलसे' या नावाने फेसबुक लाइव्हद्वारे कार्यक्रम सुरू केले. कोविड साथीपूर्वी रोहन प्रकाशनाचे साहित्य मैफल त्रैमासिक सुरू झाले होते. त्याअनुषंगाने घेतलेले सहा कार्यक्रमही खूप गाजले.

मराठी पुस्तकांना काय भवितव्य आहे? भविष्यात लोक वाचतील का? असे अनेक प्रश्न विचारले जातात. हे प्रश्न तर आहेतच. मात्र, त्यातून मार्ग काढणं आवश्यक आहे. पुस्तकांच्या प्रकाशनाबरोबरच त्यांच्या मार्केटिंगलाही तेवढंच, किंबहुना जास्त, महत्त्व देणं गरजेचं आहे. पुस्तक वाचकांपर्यंत पोहोचवण्यासाठी नवनवीन कल्पना लढवणं आवश्यक आहे. एक उदाहरण द्यायचं झालं तर जयप्रकाश प्रधान यांचं ऑफबिट भटकंती हे पुस्तक रोहन प्रकाशनाने आणलं. ते वाचकांपर्यंत पोहोचवण्यासाठी आणखीही काही करणं आवश्यक आहे असं वाटलं. योगायोगाने माझी पत्नी नम्रता पर्यटन व्यवसायात असल्यामुळे तिच्या सहयोगाने आम्ही या पुस्तकासंदर्भात स्लाइड शो दाखवणारा, माहिती देणारा कार्यक्रम २०१५ मध्ये घेतला. त्याला प्रचंड प्रतिसाद मिळाला. पुढे या पुस्तकाचे तीन भाग आले. थेट पर्यटनाशी हे पुस्तक जोडून घेतल्यामुळे ते जास्त वाचकांपर्यंत पोहोचलं. दुसरं उदाहरण म्हणजे, स्मार्टपणे वापरा अष्टपैलू स्मार्टफोन हे आमचं पुस्तक. आता स्मार्टफोन प्रत्येकाकडे असतो पण तो वापरावा कसा हे ज्येष्ठ नागरिकांना कळत नाही. त्याचे धडे देणारं पुस्तक सुश्रुत कुलकर्णी यांनी लिहिलं. त्याच्या सहा महिन्यांत सहा आवृत्ती खपल्या. त्याच्याशी निगडित कार्यशाळा घेण्याची मागणी ज्येष्ठ नागरिकांकडून येत होती. पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवण्यासाठी असे प्रयोग करण्यावाचून गत्यंतर नाही. पुस्तकं 'रीडर-फ्रेण्डली' करणं हा याच प्रयत्नांचा भाग आहे.




स्मार्टफोन कसा वापरावा याबद्दलच्या पुस्तकाला प्रचंड प्रतिसाद मिळाला असला, तरी हाच स्मार्टफोन पुस्तकांचा शत्रू झाला आहे हा मुद्दाही आहेच. लोकांचे तासच्या तास स्मार्टफोनमध्ये जात असल्याने वाचनासाठी फारसा वेळ उरत नाही. शिवाय मराठी भाषक लोकांमध्ये इंग्रजी वाचनाचं प्रमाणही वाढतं आहे. निमशहरी भागांमध्ये मराठी वाचणारे लोक जास्त आहेत, तर तिथे पुस्तकांची उपलब्धताच कमी आहे. या सगळ्यातून लोकांना वाचनाकडे आकर्षित करून घेण्याचे प्रयोग सातत्याने झाले पाहिजेत. आम्ही पुस्तकांबद्दल माहिती देण्यासाठी सोशल मीडियाचा उपयोग करून घेतो, वेबसाइट अपडेटेड ठेवतो, वेबसाइटवर प्रत्येक पुस्तकाबद्दल सांगणारे व्हिडिओ अपलोड करतो. मैफल एक्सक्लुजिव्ह नावाचा प्रयोग आम्ही आमच्या वेबसाइटवरून केला आहे. यामध्ये दर आठवड्याला आम्ही कथा, लेख किंवा त्याचे भाग अपलोड करतो. लोकांना स्मार्टफोनद्वारेही ते वाचता येतात. हा पूर्णपणे डिजिटल प्रयोग आहे.

वाचनसंस्कृती जोपासण्यासाठी, तरुणांना वाचनाकडे आकर्षित करून घेण्यासाठी सर्व प्रकाशकांनी एकत्र येऊन सहयोगाने यावर काम केलं पाहिजे. 'यातून काही घडेल का' असा विचार करण्यापेक्षा 'करून तर बघू' असा दृष्टिकोन ठेवला पाहिजे. हा काळाचा प्रवाह आहे, त्यातून मार्ग काढला पाहिजे. चांगल्या गोष्टीही घडत आहेतच. गेल्या दोनेक वर्षात प्रदर्शनं भरायला लागली आहेत, त्यांना उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

आतापर्यंतचा प्रवास बघता... अनेक आव्हाने पुढे दिसतात. स्मार्टफोन, इंटरनेट, ओटीटी, इंग्रजीचा प्रभाव... आणि येऊ घातलेलं एआयचं वादळ. पण मला असं कायमच वाटतं की आपण 'या सगळ्यांवर मात करावी' हा विचारच चुकीचा आहे. काळानुरूप बदल करत राहणं हेच गरजेचं. नवीन माध्यमं साहित्यनिर्मितीसाठी व साहित्य प्रसारासाठी कशी वापरता येतील हे महत्त्वाचं आहे.

रोहनचा प्रवास विस्ताराने सांगण्याचा हेतू हाच की नवी सुरुवात कधीही करता येते, नवनवीन बदल गरजेचे असतात आणि नवी आव्हाने आहेत, म्हणूनच नवनिर्मिती होते.

हा प्रवास वाचकांसाठी अविरत सुरू राहील हा आशावाद कायम!

**(शब्दांकन : सायली परांजपे)**

**– रोहन चंपानेरकर**

rohanprakashan@gmail.com

# मुलांसाठी पुस्तके... करू आनंदे!



मिलिंद परांजपे

*लहान मुलांना आणि पालकांनाही आवडतील अशी पुस्तके प्रकाशित करणाऱ्या ज्योत्स्ना प्रकाशनाची जिद्दी वाटचाल कौतुकास्पद आहे. एका छोट्याशा शब्दांत मावलेली, पण उच्चारायला अवघड अशी जोडाक्षरे असलेली ही ज्योत्स्ना... जेमतेम कानामात्रांची ओळख होत असलेल्या बालकांना आणि कुमारांना मात्र त्यांच्याच भाषेत संवाद साधणारी, सोपी, हवीहवीशी पुस्तके प्रकाशित करीत त्यांची अभिरुची जोपासत राहिली आहे.*

**ल.** गो. परांजपे यांनी १९५० साली ज्योत्स्ना प्रकाशनची स्थापना केली. त्याआधी त्यांनी बऱ्याच वेगवेगळ्या ठिकाणी नोकऱ्या केल्या, पण कुठेही त्यांचे मन रमले नाही. त्यांच्या शेवटच्या दोन नोकऱ्या होत्या पॉप्युलर व ढवळे या प्रकाशन संस्थांत. तिथे त्यांना आपली दिशा उमजली व त्यांनी बालवाययाची पुस्तके प्रकाशित करून प्रकाशन सुरू केले.

त्यांनी मुलांच्या पुस्तकांसाठी त्या काळात प्रचलित असलेल्या १४ पॉईंट व १६ पॉईंट अशा फॉन्टऐवजी २८ व ३२ अशा टू लाईन फॉन्टचा वापर करायचे ठरवले. हेडिंगसाठी वापरला जाणारा हा फॉन्ट प्रेसमध्ये पुस्तक करण्यासाठी पुरेशा प्रमाणात उपलब्ध नव्हता. प्रेसने खास ज्योत्स्ना प्रकाशनसाठी तो मागवून घेतला आणि मोठ्या टाईपची ही कल्पना लेखक, प्रकाशक व वाचक अशा सर्वांनीच उचलून धरली. ज्योत्स्ना प्रकाशनचे दुसरे वैशिष्ट्य होते बहुरंगी आकर्षक मुखपृष्ठ. सध्याच्या भाषेत बोलायचे तर ज्योत्स्नाचे हे दोन यूएसपी ठरले आणि बालवावाङ्मयात त्याचे स्वत:चे स्थान निर्माण झाले.

परांजपे यांनी स्वतःही पुस्तके लिहिली. पारंपरिक प्राणीकथा आत्मकथन, रोजनिशी अशा सूत्रात गुंफून त्या आकर्षक केल्या. त्याचप्रमाणे बालवीर बेडूकराव, एका गाढवाची गोष्ट अशा स्वतःच्या कल्पनेतल्या गोष्टीही लिहिल्या. बालपणीचे गरुड पक्ष्यासंबंधीचे काही अनुभव जोडून 'पक्षिराज गरुड' हे पुस्तक लिहिले. 'संत ज्ञानेश्वर' हे त्यांनी लिहिलेले पुस्तक मुलांसाठीच नव्हे, तर मोठ्यांसाठीही वाचनीय झाले आहे.

गोष्टी, गाणी, चरित्र याबरोबरच त्यांनी पूर्व प्राथमिक व प्राथमिक शाळांना उपयोगी ठरतील अशी 'जोडाक्षर वाचन', 'आई मला शिकव', 'शिक रे अ आ इ', 'रंगीत अक्षर ओळख' अशी काही पुस्तके तयार करवून घेतली. या पुस्तकांना प्राथमिक शाळांकडून चांगली मागणी आली.

सोप्या गोष्टी, रामकथा यासारखी काही पुस्तकेही शाळेत लावली जात असत.

जोडाक्षरविरहीत पुस्तके हीसुद्धा ज्योत्स्नाची खासियत होती.

या काळात इतर मान्यवर प्रकाशन संस्थाही इतर पुस्तकांसोबत काही मुलांची पुस्तके प्रकाशित करत असत. ज्योत्स्नाने मात्र मुलांच्या पुस्तकांनाच प्राधान्य देत काही प्रमाणात इतर पुस्तके प्रकाशित केली. यामुळेच ज्योत्स्ना प्रकाशन म्हणजे बालवायय असे समीकरण तयार झाले आणि ते आजतागायत कायम राहिले.

१९७० पर्यंत ज्योत्स्नाने प्र. ग. सहस्रबुद्धे, राजा मंगळवेढेकर, भा. म. वैद्य, तु. ता. सावंत, माधुरी भिडे,

शशिकांत कदम, वामन देशपांडे अशा अनेक लेखकांची सुमारे २०० पेक्षा जास्त पुस्तके प्रकाशित केली. यातल्या काही पुस्तकांना राज्य सरकारचे पुरस्कारही मिळाले आहेत.

१९७० साली ल. गो. परांजपे यांना मोतीबिंदू झाला. त्याकाळात हे ऑपरेशन आजच्या इतके साधे सोपे नव्हते आणि दुर्दैवाने त्यात त्यांचा एक डोळा निकामी झाला. दुसऱ्या डोळ्यातही मोतीबिंदू होताच. त्याचे ऑपरेशन करण्याचा त्यांना धीर होईना. साहजिकच ज्योत्स्ना प्रकाशनच्या प्रगतीला खीळ बसली. मात्र ढवळे, कोठावळे, बॉम्बे बुक डेपोचे संचालक कुमठा यांनी केलेल्या सहकार्यामुळे संस्था सुरू राहिली.

१९८४ साली मी ज्योत्स्ना प्रकाशनमध्ये सहभागी झालो आणि १९८७ साली माझा भाऊ विकासही या व्यवसायात आला.

आम्ही प्रथम मुद्रणाच्या पारंपरिक छपाई तंत्राऐवजी ऑफसेट पद्धतीचा अवलंब करायला सुरुवात केली. नव्या तंत्रामुळे, पुस्तके अधिक सुबक, आकर्षक झाली.

चित्रं हा मुलांच्या पुस्तकाचा आत्मा असतो. लेटर प्रेस पद्धतीत चित्रांचे ब्लॉक करावे लागत व छपाई करताना ते मजकुराशेजारी लावले जात. ऑफसेट पद्धतीत चित्रं व मजकूर एकजीव होऊ शकतात. त्यामुळे पुस्तकं अधिक सुबक दिसू लागली.



पुढच्या ४-५ वर्षात नव्याने जम बसवल्यानंतर १९८९साली आम्ही पुणे येथे ज्योत्स्ना प्रकाशनच्या नव्या शाखेची सुरुवात केली आणि ज्योत्स्ना प्रकाशनच्या बालवाङ्मयातील नवीन प्रयोगांना पुन्हा सुरुवात झाली.

सुदैवाने या कामात आम्हाला चांगली माणसं भेटत गेली. पहिलीच भेट झाली ती पुंडलीक वझे यांच्याशी. तो कॉलेजमध्ये शिकत असतानाच चित्रांचे काम मिळवण्यासाठी काकांकडे आला. असे बरेच विद्यार्थी येत असत आणि काम दिल्यावर वेळेवर करून देत नसत किंवा तोंडच दाखवत नसत. यावेळीही काकांना हाच अनुभव आला. चार महिने वझे गायब.

काकांनी (वडिलांना आम्ही काका म्हणत असू) र. स. कंटकांकडून चित्राचे काम करून घेतले.


पुस्तक तयारही झाले. आणि एक दिवस वझे हजर, चित्रे घेऊन. तो या दरम्यान आजारी होता. काकांचा त्याने सांगितलेल्या सबबीवर फारसा विश्वास बसला नाही. त्यांनी त्याला तयार झालेले पुस्तक दाखवले. कंटकांचे चित्र साहजिकच त्याच्या चित्रापेक्षा चांगले होते. तुझं काम खूप सुधारायला हवं असंही त्यांनी त्याला सांगितलं. मग वझे दर दोनचार महिन्यांनी काकांना आपले काम दाखवायला येत राहिला. त्याचा हा गुण लक्षात घेण्यासारखा होता.


याच दरम्यान मीही व्यवसायात आलो होतो. आमची दोघांची चांगली ओळख झाली. लवकरच आम्ही त्याच्याकडून काम करून घेतले. पहिले पुस्तक होते राजीव तांबे यांचे गुलाबी सई. (तांबेंचेही ते पहिलेच पुस्तक).


वझे जेजेमधून डिग्री घेऊन पुस्तकांच्या जगात प्रवेश करायला उत्सुक होता. मीही सुरुवात करत होतो, व्यवसाय समजून घेत होतो. आम्ही दोघेही समवयस्क. आमचं बरं जमत असे. तेव्हा फोर्ट परिसरात रस्त्यावर परदेशी पुस्तकं मिळत असत. या बाजारात हिंडताना परदेशातील रंगीत पुस्तके पाहून मन हरखून जात असे आणि भारतीय पुस्तकांची गरिबी खूप सलत असे.

मुलांची पुस्तके म्हणजे फक्त गोष्टी आणि गाण्यांची पुस्तके नव्हेत. त्यात अनेक प्रकारची पुस्तके येतात.

त्यावेळी मुलांसाठी चित्रकलेवरचे मेमरी ड्रॉइंग हे एकमेव मराठी पुस्तक पाहण्यात होते. ते चांगले होते, पण त्यावेळच्या परवडण्याजोग्या



उपलब्ध तंत्रानुसार त्याची छपाई केलेली होती. त्यातील चित्रे लाईन पद्धतीची होती. मूल चित्र काढते पेन्सिलीने.


परदेशातील पेन्सिलच्या चित्रांची पुस्तके फार सुंदर असत. ही पुस्तकं चित्र काढायला उद्युक्त करत, प्रेरणा देत. पण त्यांच्या किमती परवडण्याजोग्या नसत आणि मुख्य म्हणजे त्यातले विषय आपल्या मातीतले नसत. त्यामुळे असं काहीतरी पुस्तक करावं असं आम्हाला वाटू लागलं आणि यातून 'चित्रे काढा' मालिकेचा जन्म झाला.

याच विषयावर मी इतर मोठ्या चित्रकारांशीही तेव्हा बोलत होतो. १९८९ साली श्याम जोशी यांची 'रंगवारंगवी' व 'रंगून जा' ही दोन पुस्तके प्रकाशित करून ज्योत्स्नाने चित्रकलेच्या क्षेत्रात प्रवेश केला.

त्या चित्रांतून व्यक्त होणारा मिष्किलपणा, खेळकरपणा मुलांना आवडला नसता तरच आश्चर्य होतं. त्या पुस्तकांना उत्तम प्रतिसाद मिळाला. मिळालेल्या यशामागच्या कारणांचा विचार करताना काही गोष्टी सहज लक्षात येतात, पण काही गोष्टी नकळत खूप परिणाम करत असतात. श्याम जोशींच्या चित्रात नकळत परिणाम करणारं एक वैशिष्ट्य आहे ते म्हणजे अँगल ऑफ व्हिजन. त्यांच्यातला चित्रकार मुलांसाठी चित्र काढताना दृष्याकडे मोठ्या माणसासारखं जमिनीपासून पाच-साडेपाच फुटांवरून पाहत नाही तर मुलाच्या अँगलने म्हणजे जमिनीपासून अडीच-तीन फुटांवरून पाहतो.

असं चित्र मुलाला चटकन आणि नकळत जास्त भावतं. आपलं वाटतं.

याच्या मागोमाग वझेंची पुस्तके प्रकाशित झाली. त्यांची तयारी आधीच सुरू झालेली होती. या पुस्तकांसाठी मौज प्रेसबरोबर चर्चा करून आम्ही वेगळा आकार निवडला. रुंदी साडेआठ इंच आणि उंची सव्वासात इंच. पारंपरिक उभ्या आकारातल्या पुस्तकात चित्रांना वाव मिळत नाही आणि हे पुस्तक तर चित्रकलेवरचंच होतं. पेन्सिलच्या चित्रांचं प्रोसेसिंग हेसुद्धा आव्हान होतं. अशी चित्रं छापण्याचे फारसे प्रयोग मराठीत झाले नव्हते. या मालिकेत चित्रे काढा प्राण्यांची, पक्ष्यांची, वाहनांची आणि माणसांची अशी चार पुस्तके प्रकाशित झाली. हा प्रयोग खूपच यशस्वी ठरला. पहिली आवृत्ती चार-पाच महिन्यांत संपली. लवकरच या पुस्तकांची आम्ही इंग्रजी आवृत्ती प्रकाशित केली. त्याला देशभरातून प्रतिसाद मिळाला.






पुस्तके लोकांना आवडली असली तरी वझे आणि मी दोघेही त्यावर फारसे समाधानी नव्हतो. कारण आमच्यापुढे आदर्श होते ते परदेशातील. पण पुस्तकांच्या एका वेगळ्या दालनात आमचा जम बसला हे नक्की.


या प्रयोगानंतर १९९२च्या सुमारास पुण्यातील एका पुस्तकांच्या दुकानात माधव खरे यांचा परिचय झाला. त्यांचे 'विमानांच्या विश्वात' हे पुस्तक प्रकाशित झाले होते. त्याला राज्य सरकारचा पुरस्कारही मिळाला होता. ते मूळ विमानांची कागदाची मॉडेल करत असत. दिसायला हुबेहूब आणि ती उडवताही येत. विमानाचे आकर्षण सर्वांनाच असते. मुलांना तर असतेच. पण उडवण्याजोगी विमाने सर्वांना करता येत नाहीत. विमान करण्यासाठी हस्तकला चांगली अवगत असावी लागते आणि ते उडवण्यासाठी थोडी एरोडायनामिक्सची माहिती असावी लागते. आम्ही हा विषय पुस्तकरूपाने मुलांसमोर न्यायचा असे ठरवले. विमानाचे सर्व आकार कार्डबोर्डवर छापून, पंच करून पुस्तकात द्यायचे, म्हणजे मुलांचे काम सोपे होईल. हस्तकलेची फारशी आवड नसलेल्या मुलालाही ते जमलं पाहिजे असं आमचं उद्दिष्ट होतं. विमानाचे मॉडेल उडवण्यासाठी आवश्यक तेवढी शास्त्रीय माहितीही पुस्तकात द्यायची होती.

भारतीय एअरफोर्समधील मिग २१, जग्वार, मिराज २०००, सी हॅरीअर आणि दोन काल्पनिक अशी ६ विमाने आम्ही निवडली.

हा पुस्तकातला अभिनव प्रयोग होता.



या पुस्तकाला मुलांचा प्रतिसाद तर मिळालाच पण दिल्लीच्या NCERT चा पुरस्कारही मिळाला आणि विशेष म्हणजे यासाठी आम्ही कोणतीही प्रवेशिका भरली नव्हती.

पुस्तकांचे हे प्रयोग सुरू असताना मुलांसाठी गोष्टी, गाणी, बालकादंबऱ्या ही पुस्तके प्रकाशित होत होतीच. १९९८ पर्यंत आम्ही शान्ता शेळके, इंदिरा संत, कुसुमाग्रज, कल्याण इनामदार, स. गं. मालशे, राजा मंगळवेढेकर अशी अनेकांची पुस्तके प्रकाशित केली.


या नंतरचा पुढचा मुख्य टप्पा होता तो 'वाचू आनंदे'चा.

आपला समाज साहित्याशी जवळीक साधून आहे. संगीत, नाटक, चित्रपट या सर्व कलांवर तो प्रेम करतो परंतु चित्रकलेशी तो जमवून घेत नाही. विशेषतः समकालीन चित्रकलेची त्याला काहीच माहिती नाही ही गोष्ट माधुरी पुरंदरे यांना खटकत होती. यावर उपाय म्हणून साहित्याचे बोट धरून समाजाला चित्रकलेकडे वळवण्याची कल्पना त्यांना सुचली.

मराठी साहित्यातील उत्तम कथा, कविता, कादंबरीतले अंश, ललित लेख यांच्या सोबत साहित्याच्या रसास्वादाचा आनंद द्विगुणित करतील अशी नामवंत चित्रकारांची चित्रे लेखासोबत छापण्याची त्यांची कल्पना अनन्यसाधारण होती. त्यांनी ही कल्पना राज्य मराठी विकास संस्थेच्या संचालिका श्रीमती सरोजिनी वैद्य यांच्यासमोर मांडली. त्यांना कल्पना आवडलीच, पण त्यात सहभागी होताना या पुस्तकांच्या व्यावसायिक निर्मितीची जबाबदारी त्यांनी ज्योत्स्ना प्रकाशनवर सोपवली. आम च्यासाठी हा एक पुरस्कारच होता. ही निर्मिती आव्हानात्मक पण अनुभव समृद्ध करणारी होती.

माधुरी पुरंदरे यांनी यासाठी प्रचंड मेहनत घेतली होती. (आणि आम्हालाही घ्यायला लावली.)

या कामाच्या निमित्ताने त्यांनी चित्रकलेवरची बरीच पुस्तके गोळा केली होती. जवळजवळ वर्षभर ही पुस्तके आमच्याकडे होती. पुढे चित्रकलेच्या मोठ्यांच्या पुस्तकांकडे वळण्यासाठी त्या पुस्तकांनीही मला प्रेरणा दिली.





'वाचू आनंदे'चे काम सुरू असताना त्यांनी त्यांच्या एका जुन्या प्रकल्पाबद्दल माहिती दिली – 'राधाचे घर'. राधा या मुलीचे घरातल्या इतर पाच माणसांशी असलेले नाते त्यांनी चित्रित केले होते. मजकूर थोडासाच. या पुस्तकांचे काम त्यांनी बरेचसे करून ठेवले होते. मला ती कल्पना खूपच आवडली. त्यांची पाच पुस्तकांची कल्पना, त्यात एका पुस्तकाची भर घालून सहा पुस्तकांच्या संचाच्या रूपाने आम्ही प्रकाशित केली. पुस्तकांचा आकार चौकोनी – पाच बाय पाच इंचाचा.


२००९ साली या पुस्तकांप्रमाणे 'यश' या मालिकेतील सहा बाय सहा इंच या आकारातील सहा रंगीत पुस्तकांचा संचही प्रकाशित केला.


२०१५ साली 'राधाचं घर' या पुस्तकांचीही सहा बाय सहा इंच या आकारातली रंगीत आवृत्ती प्रकाशित केली.


राधाच्या नव्या आवृत्तीत मजकुरात काही फरक नव्हता परंतु, सर्व पात्रांचे वेष व तपशील काळानुसार बदललेला होता. त्यांनी मूळ पुस्तकांचे काम केले होते १९९०च्या पूर्वी. २०१५ पर्यंत मुलांचे व त्यांच्या पालकांचे कपडे, मुलांची खेळणी, त्याचे दंगा करण्याचे प्रकार... अशा अनेक गोष्टींत फरक पडलेला होता. लहान मुलांचे पुस्तक कालसुसंगत हवे ही जाण माधुरी पुरंदरे यांच्या सर्व पुस्तकांत दिसते.

ही 'पिक्चर बुक' मालिका होती. सर्वसाधारण पुस्तकांत चित्रे असतात. पण त्यातली गोष्ट समजून घेण्यासाठी शब्द वाचण्याची गरज असते. पिक्चर बुक केवळ चित्रांच्या आधारे वाचता येते. 'राधाचे घर'च्या रूपाने मराठीत पिक्चर बुक ही कल्पना प्रथमच समर्थपणे वापरली गेली. लहान मूल अक्षरओळख नसतानाही ही



पुस्तके सहज वाचू शकते. मुख्य म्हणजे या पुस्तकांना वयोगट नाही. अपेक्षित वयोगटापासून पुढे कोणालाही वाचायला आवडेल, ते पुस्तक चांगले. चांगल्या बालसाहित्याचे हे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. म्हणजे पुस्तकाचा वयोगट पाच ते आठ असा असेल तर साहित्य म्हणून मी ते पुस्तक चांगले म्हणणार नाही. प्रत्येक माणसाच्या मनात एक मूल दडलेले असतेच. त्यालाही ते आवडले पाहिजे. २०-२१ वर्षांच्या तरुणाची प्रेमकविता ७५ वर्षांचा माणूस आवडीने वाचतोच ना! तसेच बालसाहित्याचेही असले पाहिजे.

माधुरी पुरंदरे यांची ही पुस्तके मोठ्यांनाही वाचायला आवडतात. त्यांना त्या पुस्तकांतून मुलांपेक्षा अधिक काहीतरी मिळत असते. पालकांना ही पुस्तके मुलांबरोबरचे नाते घट्ट करायला शिकवतात.

त्यांची लक्षात घेण्यासारखी दुसरी पुस्तके म्हणजे 'सख्खे शेजारी भाग १ व २'. ही सुद्धा लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांसाठी आहेत. या पुस्तकात कोणत्या पात्रासाठी किंवा प्रसंगासाठी शब्दांची योजना करायची आणि कधी ते वर्णन चित्रांतून व्यक्त करायचे याचे त्यांना असणारे भान अगदी अभ्यास करण्यासारखे आहे.

वाचू आनंदे या पुस्तकांनंतर माधुरी पुरंदरे यांचा दुसरा अभ्यासपूर्ण ग्रंथ-संच प्रकाशित केला तो 'लिहावे नेटके'.

'वाचू आनंदे' या पुस्तकांचे त्यांनी संपादन केले होते. 'लिहावे नेटके'मध्ये लेखन व चित्रे सर्व त्यांनीच केले आहे.

या पुस्तकाच्या लेखनासाठी त्या जवळजवळ २ वर्षे काम करत होत्या आणि त्यानंतर आमच्याकडे दोन वर्षे असे चार वर्षे या पुस्तकांचे काम सुरू होते. सुरुवातीला त्यांच्या हस्तलिखिताचे टाइपसेटिंग, प्रूफ रिडिंग बरेच दिवस सुरू होते. नंतर पाने लावण्याचे काम सुरू झाले. या काळात रोज त्या सकाळी १० वाजता आमच्याकडे हजर होत. काही पानं लावत, गरजेनुसार त्यात चित्रांच्या जागा सोडलेल्या असत. त्याचे प्रूफ घेऊन त्या जात. दुसऱ्या दिवशी सकाळी १० वाजता लावलेल्या पानांवरची चित्रे घेऊन हजर होत. मग त्यांचे स्कॅनिंग, ठरलेल्या जागी ती चित्रं लावून पाने फायनल होत. मग पुढच्या पानांना सुरुवात. कामावरची अशी निष्ठा मी कधीच पहिली नाही आणि भविष्यातही कधी कोणाला पाहायला मिळेल असे वाटत नाही.

या पुस्तकांतून त्यांनी मराठीच्या लिखाणाशी संबंधित बरेचसे व्याकरण अत्यंत रंजक करून मुलांसमोर ठेवले आहे.

विशेषण, क्रियापद असे कोणतेही प्रकरण सुरू करताना एक छानसा उतारा त्या देतात. आपण गोष्ट वाचावी तसे तो वाचू लागतो. आणि उतारा संपला की एक टीप येते- 'यात काही शब्द ठळक केले आहेत. ठळक शब्दांत दिली आहेत ती क्रियापदे आहेत...' मग त्यांची थोडी माहिती, पुढे अशाच काही रंजक वाक्यांतून पुन्हा काही उदाहरणे...

कुठे नियमांची जटिलता नाही की क्लिष्टपणा नाही.

मुलांसाठी लिहिलेले हे पुस्तक एका प्रमुख वर्तमानपत्राने आपल्या सर्व वार्ताहरांसाठी खरेदी केले होते, आणि नंतर माधुरी पुरंदरेंना बोलावून ४ दिवसांची एक कार्यशाळाही आयोजित केली होती.


या पुस्तकांची निर्मिती हे सुद्धा एक आव्हानच होते. पण असे काही आव्हान असले तरच काम करण्यात आनंद असतो आणि काम केल्याचे समाधान मिळते. पुस्तकात अनेक ठिकाणी वेगवेगळ्या चित्रमय खुणा वापरल्या आहेत. ती चित्रेही त्यांनीच काढली होती. या चित्रांचा फॉन्ट तयार करावा लागला. असे अनेक प्रश्न निर्माण होत होते आणि आम्ही उत्तरे शोधत होतो.

माधुरी पुरंदरे यांची बरीच पुस्तके आम्ही प्रकाशित केली. ज्योत्स्ना प्रकाशनला मोठं करणाऱ्या नावांमधले हे एक महत्त्वाचे नाव आहे. असे आमच्यासाठी अजून एक महत्त्वाचे नाव म्हणजे चित्रकार मिलिंद मुळीक. पण यांच्याबरोबर केलेले काम हा अजून एका वेगळ्या लेखाचा विषय आहे. त्याविषयी पुढे कधीतरी!

**– मिलिंद परांजपे**

milind@jyotsnaprakashan.com


॥ग्रंथाली॥



**मूल्य १५० रु.**
**सवलतीत १०० रु.**




**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**




**मूल्य ३०० रु.**
**सवलतीत १८० रु.**

# चार आण्याचा प्रकाशक एक रुपयाचा प्रकाशक झालो.....



**अशोक नारायण मुळे**

*सरकारी योजनेचा लाभ सर्व प्रकाशकांना मिळत नाही. तो मिळाला असता तर मराठी प्रकाशन व्यवसायाला सुगीचे दिवस आले असते. काही मोजकी मंडळी याचा लाभ घेऊन ते इतर सर्वांवर अन्याय करतात. राजकारणी, सरकारी अधिकारी आणि हे सर्व मोजके म्होरके सर्व प्रकाशकांवर अन्याय करतात. त्यांचे नुकसान करतात. आतातर मराठी पुस्तकाच्या ३०० प्रतीच आधी छापल्या जातात. या महाराष्ट्रात बारा हजार सार्वजनिक ग्रंथालये असूनही ही प्रकाशन व्यवसायाची शोकांतिका आहे. या सर्व सरकारी खरेदीची श्वेतपत्रिका काढली पाहिजे.*

**माझ्या** घरात साहित्यिक वातावरण नव्हतं.

माझे वडील बॉम्बे डाईंग कामगार होते.

मी विलेपार्ले आणि अंधेरीच्या सीमारेषेवर विलेपार्ले बिस्कीट कंपनीच्या जवळ राहात होतो.

आमच्या पत्र्याच्या चाळीत मराठी, गुजराती, भय्ये आणि मद्रासी लोक शेजारी राहात होते.

आमच्या चाळीत मध्यमवर्गीय कुटुंबे राहात होती. त्यात एक माणुसकीचा झरा होता. आमच्या चाळीचे मालक ठाकूर चरण उपाध्याय हे आमच्या चाळीतच राहात होते. सकाळी उठल्यावर पार्ले बिस्कीट कंपनीच्या भट्टीतून बिस्किटांचा खमंग वास आमच्या वस्तीत सुटायचा. सकाळी चहाबरोबर तुटलेली पार्ले गोड बिस्किटे आणि मोनॅको नाष्ट्याला असायची.

ही तुटलेली बिस्किटे कंपनीच्या विक्री केंद्रात स्वस्तात मिळायची. आणि आमच्या भागातील अनेक मंडळी ती विकत आणायची.

आमचे चौकोनी कुटुंब होते. मी माझा छोटा भाऊ राजन, आई आणि बापू वडील तीन पाळ्यांत बॉम्बे डाईंगमध्ये कामाला जायचे.

आम्ही अंधेरी आणि विलेपार्ले स्टेशनच्या मध्ये राहात होतो. त्यामुळे रेल्वे रुळातून चालत आम्हाला दोन्ही स्टेशनांवर जावे लागायचे. माझी महानगरपालिकेची शाळा बैठ्या चाळीच्या स्वरूपात अंधेरीच्या विजयनगर सोसायटीसमोर गोखले पुलाशेजारी चौथीपर्यंत होती.

पाचवीला मी गरवारे कंपनी हायवेच्या तीन माळ्यांच्या भव्य इमारतीत महानगरपालिका शाळेत जायला लागलो. आजही ती शाळा तेथे आहे.

घरची परिस्थिती बेताचीच असल्याने लहानपणी मी पेपर घरोघरी टाकायला जायचो. मी नववीत असताना अंधेरी पश्चिम येथे के वॉर्ड ऑफिसच्या शेजारी असलेल्या बँक ऑफ बरोडा या इमारतीत पहिल्या मजल्यावर चंद्रकांत धर्माधिकारी यांच्या प्रशस्त अशा जागेत त्यांनी केदार वाचनालय सुरू केले होते. तेथे मदतनीस म्हणून मी कामाला लागलो. आमचे वाचनालय अंधेरी स्टेशनजवळ असल्यामुळे त्याचे अनेक सभासद होते. अभिनेत्री रीमा लागू, अभिनेता विजय कदम, लेखिका सुमती देवस्थळी, नीला पोंक्षे हे आमच्या वाचनालयाचे सभासद होते.

तेथे मला वाचनाची गोडी लागली. प्रथम बाबुराव अर्नाळकर, एस.एम. काशीकर या रहस्यकथाकारांची पुस्तके मी वाचू लागलो.वाचतावाचता मी साहित्याच्या प्रेमातच पडलो. तेथे असलेल्या समृद्ध ग्रंथसंपदेच्या सान्निध्यात असल्यामुळे मला हळूहळू वाचनाची आवड लागली. ती समृद्ध होऊ लागली.

काही वर्षांनंतर वाचनालयाची जबाबदारी माझ्यावर आल्यामुळे साहित्याचे वेगवेगळे प्रकार मला कळू लागले.

त्याच वाचनालयात प्रकाश विश्वासराव, बी.एन. चव्हाण, सुरेश चिखले, हे जिवलग मित्र मिळाले. प्रकाश विश्वासराव आणि बी.एन. चव्हाण हे महानगरपालिकेच्या मलेरिया डिपार्टमेंटमध्ये काम करायचे. ते सकाळी ७ वाजता तेथे यायचे. आणि ११ वाजता मोकळे व्हायचे. बी.एन. चव्हाण हे विनोदी लेखन करायचे.

प्रकाश विश्वासराव त्यावेळी भांडूपला जंगलमंगल रोड येथे राहायचा. बी.एन. चव्हाण मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय नायगाव शेजारील कोहिनूर चाळीत राहायचे. प्रकाश चित्रकार होता. तो अनेक दिवाळी अंक आणि वर्तमापत्रांत चित्रे काढायचा आणि सुरेश चिखले हा अंधेरी पूर्वेला असलेल्या पोलिस चाळीत राहायचा. त्याचे वडील पोलिस होते. तो इंडियन नॅशनल थिएटरमध्ये नोकरी करायचा. 'ती फुलराणी' या नाटकात छोट्या भूमिकाही करायचा.

अंधेरी पश्चिम येथील स्टेशन इराणी हॉटेलात आम्ही रोज संध्याकाळी भेटायचो.

त्यात सतीश काळसेकर, प्रकाश विश्वासराव, दिलीप वेसावकर, भारत तांडेल, सुरेश चिखले, गीतकार गोहर कानपुरी आणि अस्मादिक तेथे रोजच भेटायचो. चहा घेत घेत साहित्यिक गप्पांचा अड्डा रंगायचा. त्यावेळी कधी कधी खिसा गरम असला तर केक आणि ऑम्लेटची ऑर्डर व्हायची. अन्यथा एक कप चहा हमखास घेतला जायचा. आणि तासन्‌तास आम्ही काव्य, चित्रपट, नाटक आणि पुस्तकांवर चर्चा करायचो. तो १९७०चा भारावणारा काळ होता. चित्रपट, नाटक, संगीत आणि साहित्य याचा सुवर्णयोग त्याकाळी होता. सुरेश चिखले याने पोलिस चाळीवर लिहिलेली कादंबरी प्रकाशित करण्यासाठी तो प्रयत्न करत होता. त्यावेळी तो अनेक प्रकाशकांकडे जायचा. त्याच्याकडे पुस्तके प्रकाशित करण्यासाठी पैशांची मागणी व्हायची. मात्र त्याच्याकडे त्यावेळी पैसे नव्हते.

आमच्या या ग्रुपमधील दिलीप वेसावकर या आमच्या इंजिनीयर मित्राला दुबईत नोकरी मिळाली. वर्षानंतर तो आला. आणि त्याने सुरेशला ५००० रुपये दिले आणि ती कादंबरी प्रकाशित कर असा आग्रह धरला. पाहा त्यावेळच्या मैत्रीत कसे आपलेपणाचे बंध होते. साहित्यावर प्रेम होते. दिलीप हे विसरलेला नव्हता.

आमच्या ग्रुपने विचार केला की कुणा प्रकाशकाला हे पैसे न देता आपणच ती प्रकाशित का करू नये? मग मी सुरेश चिखले, प्रकाश विश्वासराव, शिरीष पै यांना भेटलो. आम्ही तिघे त्यावेळी एकत्र असायचो, फिरायचो. शिरीषताईंना विनंती केली की ही कादंबरी आम्हाला प्रकाशित करण्यासाठी आपण मदत करावी.

त्यांनी सांगितले की राजेंद्र पै आणि जयराज साळगावकर यांनी भागीदारीत शिवशक्तीतच नवीन प्रेस सुरू केला आहे. तिथं ती छापावी. मग आम्ही ते हस्तलिखित राजेंद्र पै याच्याकडे आम्ही छापायला दिले. प्रकाश विश्वासराव यांनी त्याचे मुखपृष्ठ केले. त्याने गमभन या शीर्षकातला 'न' उलटा काढला होता. त्यावेळी मॉडर्न आर्टचा काळ होता. सुभाष अवचट यात अग्रेसर होता. अनेक पुस्तकांची मुखपृष्ठे त्यावेळी मॉडर्न आर्ट पद्धतीने यायची. त्यामुळे प्रकाशने हे मुखपृष्ठ मॉडर्न आर्ट पद्धतीने काढले होते. त्याला भाऊ पाध्ये यांचा ब्लर्ब घेतला होता. यथावकाश पुस्तक छापून तयार व्हायला आले. त्यावेळी याचा प्रकाशक कुणी व्हायचा असा प्रश्न निर्माण झाला. त्यावेळी आमच्या ग्रुपने एकमताने ठरवलं की अशोकला आपण प्रकाशक करू. मला हा एक गोड धक्का होता. नियती आणि नशिबाने मला साथ दिली होती. त्यावेळी तोंडी करारात असे ठरले की चार आण्यांची भागीदारी सुरेशची, चार आणे प्रकाशक म्हणून माझी आणि दिलीप वेसावकर याची आठ आण्याची भागीदारी. असा एक रुपया पूर्णचा तोंडी करार मित्रमंडळीत झाला. नंतर यथावकाश सुरेश चिखले याची 'गमभन' ही कादंबरी २६ जानेवारी १९७५ रोजी प्रकाशित झाली. माझा हा प्रकाशनातील पहिलाच अनुभव होता. या सर्व मित्रांच्या सहवासाने आणि पाठिंब्यामुळे जबाबदारी घेऊन ती कादंबरी मी उत्साहात मुंबई आणि पुण्यातील विक्रेत्यांकडे विक्रीला दिली. आणि त्या दरम्यान पहिला मोठा धक्का मला मिळाला. त्यावेळी आणीबाणी जाहीर झाली होती. अशावेळी पुण्याच्या कृष्णराव मराठे यांनी ही कादंबरी अश्लील आहे म्हणून पोलिसात तक्रार केली.

त्यावेळी क्राईम ब्रांचच्या पोलिसांनी मला प्रकाशक, सुरेशला लेखक, मुद्रक म्हणून राजेंद्र पै आणि जयराज साळगावकर यांना अटक केली. माझ्या घरी असलेली पुस्तके पोलिसांनी जप्त केली. यावेळी शिरीष पै आणि जयंत साळगावकर आमच्या मदतीला धावून आले. ते सोबत विधिज्ञ अधिक शिरोडकर यांना घेऊन क्रॉफर्ड मार्केटच्या क्राईम ब्रँच पोलिस ठाण्यात आले. त्याच रात्री आम्हा सर्वांना जामीन मिळाला. त्यावेळी मला आणि सुरेश चिखलेला जामीन द्यायला म्हणून इंडियन नॅशनल थिएटरचे मॅनेजर विनायक आयरे यांना सतीश दुभाषी यांनी पाठवले होते. आमच्या दोघांची सुटका झाली. नंतर अंधेरी कोर्टात ती केस सुरू झाली. पुढेही अधिक शिरोडकर आमची ही केस चालवत होते. दर तारखेला आम्ही कोर्टात हजर व्हायचो. त्यावेळी आमची नावे पुकारली जाताच आम्हीं आरोपीच्या कठड्यात उभे राहायचो. त्यावेळी न्यायमूर्ती म्हणायचे, 'गमभन' म्हणजे 'न' उलटा ना...' त्यावेळी कोर्टात हंशा पिकाचा. प्रकाश विश्वासरावच्या या कल्पकतेमुळे 'न' उलटा न्यायमूर्तींनी कायम लक्षात ठेवला होता. तारीख पे

तारीख पडत होती. वेळ, पैसा यात खर्च होत होता. पुढे ही केस वांद्र्याच्या कोर्टात वर्ग करण्यात आली. आमच्यामागे हे केसचे शुक्लकाष्ट सुरू होते. अशावेळी माझा साखरपुडा झाला. केस सुरूच होती. मी हे सासरच्या मंडळींना सांगितले नव्हते की मला अटक झाली आहे आणि केस सुरू आहे. मात्र नम्रताला याची मी कल्पना दिली होती. ही कसरत करताना माझी दमछाक होत होती. या केसच्यावेळी दुर्गा भागवत, भाऊ पाध्ये, शिरीष पै, सतीष काळसेकर, सतीश दुभाषी, सुनील कर्णिक ही मंडळी आमच्यामागे खंबीरपणे उभी होती. दुर्गा भागवत म्हणत श्लील, अश्लील असे साहित्य मी मानत नाही. चांगले की वाईट साहित्य हेच मी मानते. यथावकाश सरकारला सुबुद्धी सुचली आणि शरद पवारसाहेब गृहमंत्री असताना त्यांनी ही केस मागे घेतली.



या वाटचालीत प्रचंड तणाव घेऊनही पुढे काय करायचे असा विचार आमच्या ग्रुपमध्ये आल्यावर सुरेश चिखले म्हणाला, मला प्रकाशनात इंटरेस्ट नाही. दिलीप वेसावकर म्हणाला मलाही यात पडायचे नाही. मग काय करायचे असा प्रश्न निर्माण झाला. त्यावेळी मला काय बुद्धी झाली. मी म्हणालो, मी हा व्यवसाय चालू ठेवणार. चार आण्याचा प्रकाशक पूर्ण एक रुपयाचा प्रकाशक झालो. मग मी सुरेश चिखले याचा 'गच्च भरलेले आभाळ' हा कवितासंग्रह प्रकाशित करायचे ठरवले.

अशावेळी माझा पुण्यातील इनामदार बंधू प्रकाशनाच्या प्रमोद इनामदार या मित्राची खूप मदत झाली. पुण्यात प्रिंटिंग स्वस्त दरात होते हे मला कळले होते. आणि मला प्रमोद इनामदार यांनी छपाईसाठी खूप मदत केली. त्यावेळी मला प्रिंटिंगमधील टाईप, पुस्तकाची साईज याची कल्पना नव्हती. याचे मुखपृष्ठदेखील प्रकाश विश्वासराव यानेच केले.

सुरेशचा नवीन कवितासंग्रह येतोय हे आम्ही आमचे मास्तर सतीश दुभाषी यांना सांगितले. त्यांनाही आनंद झाला. ते सुरेशवर अतिशय प्रेम करायचे. ते म्हणाले, याचा आपण प्रकाशनसोहळा करू. प्रकाशन सोहळा मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय नायगाव दादर येथे करण्याचं ठरलं. मग मी शिरीषताई पै यांना भेटलो. तुमच्या शुभहस्ते तो प्रकाशित व्हावा ही विनंती केली. त्यांनी होकार दिला. कविवर्य नारायण सुर्वे यांना विनंती केली. सतीश काळसेकर आमच्याबरोबर होताच. त्यांच्या उपस्थितीत हा सोहळा झाला. त्या माझ्या पहिल्यावहिल्या प्रकाशन सोहळ्याचे सूत्रसंचालन सतीश दुभाषी यांनी केले होते.

ते पुस्तके इतके देखणे छापले गेले होते, की शिरीषताईंनी त्या प्रकाशन समारंभात जाहीररित्या कविता आणि पुस्तकाचे कौतुक केले. असा हा माझ्या आयुष्यातील पहिला प्रकाशन-सोहळा संपन्न झाला.

त्यावेळी सर्व वर्तमापत्रांनी त्याला चांगली प्रसिद्धी दिली. आणि मीरा प्रकाशन, प्रकाशक अशोक मुळे असे 'गच्च भरलेले



आभाळ' हे माझे स्वतःचे पुस्तक प्रकाशित झाले.

मीरा प्रकाशनातर्फे मी नाटककार रमेश पवार याचा 'अनुभव' हा कवितासंग्रह, नीला पोंक्षे, शिरीष पै यांचा पहिला 'ध्रुवा' हायकूसंग्रह अशी पुस्तके प्रकाशित केली.

मी त्यावेळी पुस्तकजगतात बऱ्यापैकी रमलो होतो. झपाटलो होतो. मला पुस्तकविक्रीतून पैसे मिळत नव्हते. एक हौस म्हणून ही माझी वाटचाल सुरू होती. मी त्यावेळी अनेक कवितासंग्रह, बालसाहित्य अशी जी हस्तलिखितं यायची, ती मी उत्साहाच्या जोशात प्रकाशित करीत होतो. पण पुस्तकविक्री ही ऑनसेलवर होती. पुस्तकांची विक्री झाली तर त्याचे पैसे विक्रेत्यांकडून मिळायचे. तीन, सहा महिन्यांत हिशोब व्हायचा. उरलेली पुस्तके परत घ्यावी लागायची. त्यावेळी एक हजार पुस्तकांची आवृत्ती काढली जायची.

यावेळी मुंबईत मला हळबे एजन्सीचा श्याम हळबे हा चांगला मित्र तेथे भेटला. प्रार्थना समाज येथे कुलकर्णी हॉटेल होते. तेथे बटाटा भजी फेमस होती आणि रविवारी वांगी भजी तिथं मिळायची. त्या हॉटेलच्या बाहेर दिलीप प्रकाशनाचे दिलीप काळे यांचा गिरगाव बुक स्टॉल होता. त्यांचा माझा-परिचय झाला होता. ते आपल्या दिलीप प्रकाशनातर्फे बाबा कदम,

सुहास शिरवळकर, चिंतामणी लागू, कुसुम अभ्यंकर आदींची पुस्तके प्रकाशित करायचे आणि त्यांच्या पुस्तकांची धडाक्याने विक्री सर्व वाचनालयात आणि पुस्तक विक्रेत्यांकडे व्हायची हे मी पाहात होतो. गिरगावात मॅजेस्टिक आणि बॉम्बे बुक डेपोत आणि दादरला आयडियल बुक डेपोत सतत जायचो आणि पाहायचो की अधिक पुस्तकविक्री ही रहस्यकथा, कथा आणि कादंबरीची होते.

१९७८ साली माझे लग्न झाले आणि मी ठरवले की प्रकाशन व्यवसायात टिकून राहायचे असेल तर थोडे व्यावसायिक व्हायला हवे.

मग १९७९ साली पत्नी नम्रता हिच्या नावावर डिंपल पब्लिकेशनतर्फे कथा, कादंबरी अशी पुस्तके प्रकाशित करायची ठरवली. त्यात बी.एन. चव्हाण, भाऊ पाध्ये, मधु मंगेश कर्णिक, उमाकांत ठोमरे, शिरीष पै, आनंदीबाई विजापुरे, मालती मराठे, विजया काळे, निर्मला देशपांडे, डॉ. सुभाष भेंडे, रमेश पवार, सुरेश चिखले अशा मान्यवर लेखकांचे कथासंग्रह, कादंबरी आणि चरित्रे प्रकाशित करायला मिळाले. तेव्हापासून अनेक मान्यवर साहित्यिक आणि कलावंत मंडळी यांचा स्नेह म ला मिळत गेला. तो वाढत गेला आणि तो आजपर्यंत मिळतोय.

आज त्याचा वटवृक्ष झाला आहे याचा विशेष आनंद आहे. इतके दिग्गज लेखक, कलावंत आणि राजकारणी मंडळी माझी हितचिंतक मित्र झाली.

एकदा मी, भाऊ पाध्ये, सतीश काळसेकर औरंगाबाद येथे चंद्रकांत पाटील यांच्या घरी गेलो असताना साकेत प्रकाशनचे बाबा भांड यांनी भाऊ पाध्ये यांना 'कोसलाबद्दल' हे पुस्तक भेट दिले. त्यावेळी भाऊ पाध्ये म्हणाले की 'वासूनाका'वरदेखील असा ग्रंथ होऊ शकतो. हा दुवा मी पकडला आणि परतीच्या प्रवासात भाऊंना आणि सतीशला सांगितले की असे पुस्तके मी प्रकाशित करायला तयार आहे. आणि नंतर ते पुस्तक लोकराज्यचे नुकतेच निवृत्त संपादक वसंतराव शिरवाडकर यांना संपादन करायला दिले. 'वासूनाका सांगोपांग' हा ग्रंथ अंबेजोगाईच्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात संमेलनाध्यक्ष व्यंकटेश माडगूळकर यांच्या शुभहस्ते १९८३ साली प्रकाशित झाला. तेथून सर्वत्र डिंपल पब्लिकेशनच्या नावाचा गवगवा सुरू झाला. त्यानंतर कविवर्य नारायण सुर्वे यांचे 'सर्व सुर्वे' या पुस्तकाचे संपादन वसंतराव शिरवाडकर यांनीच केले. त्याचे प्रकाशन ज्येष्ठ संपादक माधव गडकरी यांच्या शुभहस्ते १९८५ साली मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, नायगाव दादर येथे झाले. ज्येष्ठ नाटककार विजय तेंडुलकर यांच्या 'साहित्यातून सत्याकडे' या ग्रंथाचे संपादन शिरीष पै, आणि प्रिया तेंडुलकर यांनी केले होते.त्याचे प्रकाशन ज्येष्ठ अभिनेते डॉ. श्रीराम लागू यांच्या शुभहस्ते दीनानाथ मंगेशकर नाट्यगृह, विलेपार्ले येथे १९८८ साली झाले.

हे तीन ग्रंथ डिंपल पब्लिकेशनच्या वाटचालीतील मैलाचा दगड ठरले. सर्व वर्तमानपत्रांनी भरभरून प्रसिद्धी दिली. समीक्षकांनीदेखील त्याची दखल घेतली. त्यामुळेच डिंपल पब्लिकेशनला प्रकाशन व्यवसायातील मुंबई मराठी साहित्य संघाचा १९८९चा 'वि. पु. भागवत प्रकाशन पारितोषिक' पुरस्कार मिळाला. प्रिया तेंडुलकर हिने तिचे पहिले पुस्तके 'ज्याचा त्याचा प्रश्न' आणि नंतर 'पंचतारांकित', जन्मलेल्या प्रत्येकाला', असंही' ही चार पुस्तके लागोपाठ डिंपलला प्रकाशित करायला दिली. तिला लागोपाठ तीन वर्षे महाराष्ट्र राज्य पुरस्कार मिळाला. हा तिचा एक रेकॉर्डच होता. नंतर तिच्या पुस्तकांना महाराष्ट्र साहित्य पुरस्कार मिळाला. दमाणी पुरस्कार मिळाला. मला वाटते हा डिंपल पब्लिकेशनच्या आयुष्यातील टर्निंग पॉईंट होता. नाही; तो झाला. सर्वत्र डिंपल पब्लिकेशनचा बोलबाला सुरू झाला. त्यावेळी हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी हिंदुत्वाचा जोरदार पुरस्कार केला होता. मी त्यावेळी डॉ. रमेश प्रभू यांचे शाखेतील काम शिवसैनिक म्हणून करायचो. मी विद्यार्थी असताना पुस्तकांचा सहवास मिळाला आणि हाफ पँटमधील शिवसैनिक असा शिक्का बसला होता. त्यावेळी मराठी माणसावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा आणि स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याचा सल्ला मराठी माणसांना बाळासाहेबांनी दिला होता. आदरणीय बाळासाहेब ठाकरे यांनी हिंदुत्वाचा जोरदार पुरस्कार केला होता. जोरदार प्रचार केला होता. १९८९मध्ये मला कल्पना सुचली की हिंदुत्ववावरील बाळासाहेबांचे हे विचार पुस्तकरूपाने प्रसिद्ध करावे. ही कल्पना मी माझे जवळचे मित्र शशी भालेकर यांना सांगितली. ती त्यांना आवडली. मग आमचे दुसरे मित्र सामना दैनिकाचे प्रकाशक आणि शिवसेना नेते सुभाष देसाई यांना ही संकल्पना सांगितली. त्यांना ती आवडली. दुसऱ्याच दिवशी त्यांनी आम्हाला मातोश्रीवर बोलावले. बाळासाहेब ठाकरे यांची भेट करून दिली. मी माझी कल्पना त्यांना सांगितली. बाळासाहेबांनाही आवडली. आणि मग हे पुस्तक संकलन करण्यासाठी शशी भालेकर यांना दिले. त्यावेळी बाळासाहेब ठाकरे यांनी मला आणि शशी भालेकर यांना १० ते १२ ही वेळ सतत पंधरा दिवस मातोश्रीवर भेटण्यासाठी दिली होती. त्याला 'हिंदुत्व : सार आणि धार' हे नाव त्यांनीच सुचवले होते. ते पुस्तक त्यांनी आपले वडील प्रबोधनकार ठाकरे यांना अर्पण केले होते. ते पुस्तक मी मौजेत छापायला दिले होते. कमल शेडगे यांनी मुखपृष्ठ केले होते. ते पुस्तक २३ जानेवारी १९९० रोजी बाळासाहेब यांच्या वाढदिवशी बप्पी लहरींच्या संगीतरजनी कार्यक्रमात बाळासाहेब ठाकरे यांच्या शुभहस्ते कामगार कल्याण मंडळ, दादर येथे दिमाखात प्रकाशित केले.

डिंपल पब्लिकेशनतर्फे बहुजन समाजातील नवोदित,

मान्यवर साहित्यिकांची अनेक पुस्तकें प्रकाशित केली. त्यात बंधू माधव, केशव मेश्राम, बाळासाहेब डॉ. नंदा मेश्राम, विठ्ठलदादा उमप, प्रज्ञा पवार, हिरा पवार, राम राव झुंझारे, आनंद म्हसवेकर, आत्माराम वाळींजकर, सुनील जाधव, डॉ. ज्ञानराज गायकवाड, महेंद्र ताजणे, डॉ. युवराज सोनटक्के अनेकांची चांगली पुस्तके प्रकाशित करायला मिळाली. बाळासाहेब ठाकरे, नारायण राणे, डॉ. अमोल कोल्हे, अण्णासाहेब वर्तक, भाऊसाहेब वर्तक, ताराबाई वर्तक, या राजकारणी मंडळींची पुस्तके मला प्रकाशित करता आली. आचार्य अत्रे, शिरीष पै, माधव गडकरी, डॉ. अरुण टिकेकर, मधुकर भावे, आत्माराम सावंत, भारतकुमार राऊत, शिरीष पै, संजय राऊत, आल्हाद गोडबोले, प्रदीप वर्मा या संपादकांची पुस्तकें तशीच नाटककार आणि अशोक समेळ, रमेश पवार, रत्नाकर मतकरी, कमलाकर सारंग, अशोक पाटोळे, कमलाकर सोनटक्के, डॉ. अमोल कोल्हे, अभिनेत्री शांता जोग, विमल घैसास, लालन सारंग, दिब्रिटो, अशोक नायगावकर, किशोर कदम, नलेश पाटील, डॉ. अशोक भाईडकर, अरुण घाडीगावकर, अशा अनेक दिग्गजांची उत्तमोत्तम पुस्तके प्रकाशित करायला मिळाली.

सुनील कर्णिक, डॉ. प्रदीप कर्णिक, प्रा. केशव मेश्राम, डॉ. महेश केळुस्कर आणि विधीज्ञ राजेंद्र पै या माझ्या जिवलग मित्रांनी डिंपल पब्लिकेशनला संपादनासाठी वेळोवेळी मौलिक मदत केली.

डिंपल पब्लिकेशनला या पन्नास वर्षांच्या वाटचालीत पुस्तकप्रकाशन समारंभाचे भाग्य दुसऱ्या पुस्तकापासून लाभले. तो सिलसिला आजपर्यंत अव्याहत आणि जोमदारपणे सुरू आहे हे एक प्रकाशन व्यवसायातील एक आश्चर्य असावे, असे मला वाटते. आणि हा प्रकाशन व्यवसायातील एक नोंद घेण्यासारखा विक्रमदेखील असावा, असे मला वाटते.

आदरणीय बाळासाहेब ठाकरे यांच्या शुभहस्ते दोन पुस्तकांचे प्रकाशन, सर्वश्री आदरणीय महामहीम राष्ट्रपती सौ. प्रतिभाताई पाटील, राज्यपाल डी.वाय. पाटील, राज्यपाल





नेहा सावंत, ज्योती निसळ, बोलक्या बाहुल्याकार रामदास पाध्ये यांची पुस्तके प्रकाशित केलीत. कृष्णाबाई नारायण सुर्वे यांचे नेहा सावंत यांनी शब्दांकन केलेले 'मास्तरांची सावली' हे विशेष गाजलेले पुस्तक आहे. अशोक समेळ यांच्या 'अश्वत्थामा चिरंजीव' या पुस्तकाच्या आठ आवृत्त्या निघाल्या. डॉ. सुनीता चव्हाण यांचे 'भयातून निर्भयाकडे' याच्या जास्त आवृत्त्या निघाल्या आहेत. हा मला मोठा आनंद वाटतो. दुर्गा भागवत, डॉ. विजया राजाध्यक्ष, डॉ. विजया वाड, इंद्रायणी सावकार, ललिता ताम्हणे, मोहिनी वर्दे, प्रा. केशव मेश्राम, चंद्रकांत खोत, डॉ. सुभाष भेंडे, अनंत सामंत, दीपाली केळकर, भीमराव पांचाळे, प्रा. रमेश तेंडुलकर, नितीन तेंडुलकर, नितीन आरेकर, अशोक बागवे, अरुण म्हात्रे, संजय कृष्णाजी पाटील, अशोक चिटणीस, शुभा चिटणीस, फादर फ्रान्सिस भगतसिंह कोश्यारी, मुख्यमंत्री शरद पवार, सुशीलकुमार शिंदे, विलासराव देशमुख, बॅरिस्टर अंतुले, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अध्यक्ष माधवराव भागवत, आमदार हितेंद्र ठाकूर, अभिनेत्री माधुरी दीक्षित हिच्या हस्ते दोन वेळा, अभिनेता नाना पाटेकर, तनुजा, रोहिणी हट्टंगडी, परवीन सुलताना, प्रिया तेंडुलकर, लालन सारंग, रेणुका शहाणे, मृणाल कुलकर्णी, प्रतीक्षा लोणकर, निशिगंधा वाड, डॉ. श्वेता पेंडसे, अभिनेते जितेंद्र, झाकीर हुसेन, सुरेश वाडकर, कमलाकर सारंग, महेश कोठारे, अशोक पाटोळे, अशोक सराफ, अशोक समेळ, गंगाराम गवाणकर, डॉ. गणेश चंदनशिवे, डॉ. गिरीष ओक, डॉ. जब्बार पटेल, मनोज जोशी, रमेश देव आणि भारतरत्न सचिन तेंडुलकर आणि आशा भोसले अशा अनेक दिग्गजांच्या शुभहस्ते डिंपलची पुस्तके समारंभपूर्वक प्रकाशित झाली

आहेत. त्याचे सूत्रसंचालन प्रदीप भिडे, सुधीर गाडगीळ, मंगला खाडिलकर, मधुरा वेलणकर, स्मिता गवाणकर, दीपाली केळकर, अश्विनी भोईर, कुणाल रेगे, अक्षदा विचारे अशा अनेकांनी केले आहे. डिंपल पब्लिकेशनतर्फे सर्वच प्रकारची पुस्तके प्रकाशित केली आहेत. डॉ. नंदा केशव मेश्राम यांचा 'दलित कादंबरी स्वरूप आणि समीक्षा' हा ग्रंथ– ज्याला राज्य पुरस्कार मिळाला. आत्माराम वाळींजकर यांचा 'दलितमुक्ती चळवळ' हा ग्रंथ त्यालाही राज्य पुरस्कार मिळाला. रामदास पाध्ये यांचा 'लहान माझी बाहुली' आणि 'बोलविता धनी' ही दोन पुस्तके, आल्हाद गोडबोले आणि मुकुंद कुळे यांनी संपादन केलेला 'वाडीवस्ती' हा ग्रंथ, ज्येष्ठ अभिनेत्री शांता जोग यांचे पहिले पुस्तके 'रंग आणि ढंग', लालन सारंग यांचे पहिले पुस्तक 'जगले जशी' हे पुस्तक आणि डॉ. अमोल कोल्हे यांचे पहिले पुस्तक 'शिवगंध' आम्हीच प्रसिद्ध केली.

डिंपल पब्लिकेशनतर्फे इंग्रजी, बंगाली 'पुष्पांजली' हे रंगीत पुस्तक राज्यपाल डी. वाय. पाटील यांच्या पत्नी पुष्पलता डी. पाटील यांच्या पुस्तकाचे प्रकाशन त्रिपुराचे मुख्यमंत्री माणिक सरकार यांच्या शुभहस्ते झाले आहे.

हिंदी पुस्तकांचीही निर्मिती केली आहे. या सुवर्ण–महोत्सवी वाटचालीत ऑगस्ट महिन्यात सलग चार रविवारी पुस्तके समारंभपूर्वक प्रकाशित झाली आहेत. वसईत १९९६ साली भाऊ पाध्ये यांच्या पहिल्या महिन्याच्या स्मृतिदिनी 'साहित्य जल्लोष' हा कार्यक्रम डिंपल पब्लिकेशनतर्फे आणि विद्यावर्धिनीतर्फे सुरू केला. त्याला यंदा २६ वर्षे होत आहेत. यात उद्घाटक म्हणून त्या, त्या वर्षाचे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आणि अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष आले आहेत. आता हा कार्यक्रम वसई–विरार शहर महानगर पालिकेतर्फे दरवर्षी वसईत होतो. वसईत प्रथमच संपादक संमेलन आयोजित केले. त्याचे उद्घाटक ज्येष्ठ संपादक डॉ. अरुण टिकेकर होते.

डिंपलची पुस्तके चांद्यापासून बांद्यापर्यंत जावीत म्हणून विक्रम प्रकाशनचे ज्ञानेश्वर मुळे, नवभारत प्रकाशन संस्थाचे प्रभाकर देसाई आणि डिंपल पब्लिकेशनतर्फे दहा दिवसांची मोहीम केली. पुस्तके टेंपोत घेऊन शाळा, कॉलेज, वाचनालय यांना भेट देत पुस्तकांच्या विक्रीसाठी प्रयत्न केले आहेत.

महेश केळुसकर, राजन खान, पंकज कुरूलकर, सुमेध वडावाला आणि अनंत सामंत यांच्या पाच कादंबऱ्या डिंपल पब्लिकेशनतर्फे प्रकाशित केल्या होत्या. तेव्हा अनंत सामंत त्यावेळी आमच्याबरोबर येऊ शकले नाहीत. पण इतर चौघा लेखकांना बरोबर घेऊन कोकण, गोवा, बेळगाव, कोल्हापूर असा पाच दिवसांचा त्यांच्या मुलाखतींचा कार्यक्रम आयोजित करून सोबत त्यांची पुस्तके घेऊन दौरा केला आहे. त्या दौऱ्याचे मीडिया पार्टनर 'तरुण भारत' होते. पुस्तके छापणे कठीण नाही, ती विकणे कठीण आहे.

वाचकांपर्यंत पुस्तके गेली पाहिजेत याची जाणीव मला होती, पण एक खंतही आहे. पुस्तके खरेदीच्या अनेक योजना त्यात राजा राममोहन रॉय, प्रौढ शिक्षण योजना, बाल जवाहर योजना, विद्या प्राधिकरण, खासदार आणि आमदार फंड कामगार कल्याण मंडळ, आदिवासी आश्रमशाळा, सर्व जिल्हा परिषद, महानगरपालिका यांच्यातर्फे कोट्यवधींची पुस्तके खरेदी दरवर्षी होत असे, त्याचा लाभ मिळत नाही. सरकारी अधिकारी आणि मोजक्या विक्रेते आणि प्रकाशकांची अभद्र युती येथे काम करते. ८० ते ९० टक्क्यांनी ही खरेदी होत असते. त्याचा लाभ आमच्यासारख्या प्रकाशकांना मिळत नाही. यासाठी मी अनेकदा आवाज उठवला आहे. या अन्यायाविरुद्ध लढलो आहे. यात मला माधव गडकरी, निखिल वागळे, कुमार केतकर, डॉ. अरुण टिकेकर, गिरीश कुबेर, अशोक पानवलकर, संजय राऊत, भाऊ जोशी, आल्हाद गोडबोले अशा दिग्गजांनी माझी ही वेदना वर्तमापत्राद्वारे फ्रंट पेजवर देऊन मला मदत केली आहे. माझा आवाज आणि अन्यायाविरुद्ध लढण्यास मला बळ दिले आहे. याचा कृज्ञतापूर्वक उल्लेख केला पाहिजे. या सरकारी योजनेचा लाभ सर्व प्रकाशकांना मिळत नाही. तो मिळाला असता तर मराठी प्रकाशन व्यवसायाला सुगीचे दिवस आले असते. काही मोजकी मंडळी याचा लाभ घेऊन ते इतर सर्वांवर अन्याय करतात याची जराही शरम वाटत नाही याचे दुःख होते. राजकारणी, सरकारी अधिकारी आणि हे सर्व मोजके म्होरके सर्व प्रकाशकांवर अन्याय करतात. त्यांचे नुकसान करतात. आता तर मराठी पुस्तकांच्या ३०० प्रतीच फक्त छापल्या जातात. या महाराष्ट्रात बारा हजार सार्वजनिक ग्रंथालये असूनही ही प्रकाशन व्यवसायाची शोकांतिका आहे. या सर्व सरकारी खरेदीची श्वेतपत्रिका काढली पाहिजे म्हणजे हा सर्व भ्रष्टाचार लोकांना कळेल. मी ३४ वर्षे सांताक्रूझ पश्चिमेला असलेल्या डॉ. किशोर नायमपल्ली यांच्या पॅथोलॉजी लॅबमध्ये ९ ते ४ या वेळात काम करून प्रकाशन व्यवसायही सांभाळला आहे. पूर्ण वेळ प्रकाशनात उदरनिर्वाह होऊ शकत नाही याची मला जाणीव होती. काही अपवाद असू शकतात. या प्रकाशन व्यवसायात माझी पत्नी नम्रताची खूप मोठी मदत मला झाली आहे. आम्ही वसईला राहायचो. पुस्तके वसईत असायची. अशावेळी पुणे, कोल्हापूर, अमरावती, मुंबईहून ऑर्डर आलेल्या पुस्तकांचे गठ्ठे मुंबईला तिने ट्रेनमधून आणले आहेत. मुंबईतील गिरगाव पुणे मोटर ट्रान्सपोर्ट, मस्जिद बंदर येथे असणारे विविध राज्यांचे ट्रान्सपोर्ट येथे ती गठ्ठे घेऊन गेली आहे. सर्व पत्रव्यवहार ती सांभाळत आहे. त्यामुळे मी नोकरी आणि प्रकाशन ही कसरत करू शकलो.

सन २००० साली गिरगावात डिंपल पब्लिकेशनसाठी ऑफिस आणि पुस्तकविक्रीची जागा आम्ही घेतली.






एका गिरणी कामगाराच्या मुलाचा हा प्रवास खूपच कष्टाचा पण प्रेरणा देणारा आहे. पुस्तकांच्या गावातील पन्नास वर्षांची भटकंती मोठी आनंद देणारी आहे. एक हजाराहून अधिक पुस्तके आजपर्यंत डिंपलने प्रकाशित केली आहेत. पन्नास वर्षांच्या पदार्पण कार्यक्रम २८ जानेवारी २०२४ रोजी वसईत झाला. त्यासाठी सर्वश्री गंगाराम गवाणकर, अशोक समेळ, संजीवनी समेळ, श्री. आणि सौ. संग्राम समेळ, विधिज्ञ राजेंद्र पै, डॉ. प्रदीप कर्णिक, अशोक चिटणीस, तन्वी हर्बलच्या मेधा मेहेंदळे, अशोक बागवे, अरुण म्हात्रे, आमदार हितेंद्र ठाकूर, संदेश जाधव, डॉ. अशोक भाईडकर, अविनाश कोल्हे यांसह अनेक मान्यवर, हितचिंतक पुणे, ठाणे, मुंबई येथून आले होते. त्यावेळी १८ पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. आता या प्रकाशन व्यवसायात माझा मुलगा कौतुक ही धुरा सांभाळत आहे, पुढे नेत आहे, याचे समाधान आहे.

हा आनंद आणि प्रेरणा देणारा क्षण माझ्या आयुष्यात आला आहे. आणि मला पैशांपेक्षा अनेक मान्यवर साहित्यिक, कलावंत, राजकारणी हे माझे हितचिंतक मित्र मिळाले. पैशांपेक्षा मोठे मित्रांचे प्रेम मला मिळाले, हे मी माझे भाग्य समजतो.


**– अशोक नारायण मुळे**
dimplepublication@gmail.com

॥ग्रंथाली॥

## सुवर्णकण भाग २

**प्रमुख संपादक – डॉ. विजया वाड**


**सह संपादक – शिल्पा जितेंद्र खेर, मनिषा कदम**




**मूल्य ३०० रुपये । सवलतीत १८० रुपये**

## घटनात्मक मूल्यांचा विकास व ऱ्हास

**बी. जी. वाघ**




**मूल्य ४०० रुपये । सवलतीत २५० रुपये**

# तत्पूर्वीचा मृत्युलेख



**राम जगताप**

*‘अक्षरनामा’ने गेल्या नऊ वर्षांत मराठी ऑनलाईन पत्रकारितेत दमदार म्हणावी अशी कामगिरी केली नसेल, पण त्या दृष्टीनं आटापिटा मात्र भरपूर केला, अगदी शेवटपर्यंत केला, हे तरी निदान नाकारलं जाऊ नये. महाराष्ट्राला जिवंत माणसाची किंमत नसते. पण तोच माणूस एकदा का मेला की, त्याच्या सामान्य कर्तृत्वाची आरती अशी काही गायली जाते की, तो मरणानंतर ‘लार्जर दॅन लाईफ’ होऊन जातो. ‘अक्षरनामा’च्या बाबतीत तसं काही होण्याची सुतराम शक्यता नाही, ते तसं चांगलंच म्हणायचं!*

**विशेष सूचना :** एके काळी मराठी वर्तमानपत्रांचे संपादक समाजजीवनात उल्लेखनीय कर्तृत्व असलेली एखादी वयस्कर व्यक्ती आजारी पडली की, तिचा मृत्युलेख लिहून तयार ठेवत. त्यामुळे ऐनवेळची धावाधाव, गडबड आणि गोंधळ यांवर मात करता यायची. ‘अक्षरनामा’ हे पोर्टल तसं फार काही नामांकित नव्हतं. सुरुवातीला त्याने थोडीफार चमक दाखवली खरी, पण नंतर त्याचा आलेख सातत्यानं खालावतच गेला. त्याच्या अपमृत्यूची बातमीही मराठीतल्या कुठल्या वर्तमानपत्रात प्रकाशित व्हायची सुतराम शक्यता नाही. मग त्यावर मृत्युलेख वा लेख कुठून येणार! त्यामुळे हा मृत्युलेख ‘शब्द रुची’च्या या शेवटच्या अंकात प्रकाशित केला जात आहे.

‘अक्षरनामा’च्या शोचनीय अपमृत्यूची वार्ता जेव्हाकेव्हा तुमच्यापर्यंत पोहचेल, तेव्हाच तुम्ही हा लेख वाचावा. आणि जमल्यास फेसबुकवर श्रद्धांजलीपर चार शब्द लिहावेत, व्हॉटसॲपवर ‘RIP’ असं लिहून तो मेसेज एखाद्या ग्रूपवर टाकावा, आणि सहज शक्य असेल, तर एखाद्या मित्राजवळ ‘अरेरे, वाईट झालं.’ असा सुस्कारा टाकावा.

नुकतंच अक्षरनामा हे मराठीतलं पहिलवहिलं फीचर्स पोर्टल बंद पडलं. गेल्या काही दिवसांपासून या पोर्टलवर कुठलाही लेख अपलोड झाला नव्हता. शंका आल्याने संबंधितांकडे चौकशी केली, तेव्हा कळलं की, गेल्या आठवड्यात या पोर्टलचा शोचनीयरित्या अपमृत्यू झाला आहे. अर्थात त्याची बातमी मराठीतल्या कुठल्याही वर्तमानपत्राच्या सांदीकोपऱ्यातही आली नाही आणि मराठी वृत्तवाहिन्यांच्या चलत तालिके(स्क्रोल पट्टी)वरही झळकली नाही. ‘न्यूज’ हल्ली ‘ब्रेकिंग’ असल्याशिवाय तिचा गाजावाजा होत नाही. आणि त्यातही राजकीय घटना – भले मग त्या गावगप्पा असोत की मर्तिक वार्ता – असल्याशिवाय कुठल्याही बातमीला ‘वजन’ही येत नाही. यातलं काहीच ‘अक्षरनामा’कडे नसल्यामुळे असं घडलं असावं. पण समजा या पोर्टलच्या कर्त्याधर्त्यांनी या अपमृत्यूची वार्ता मराठी वर्तमानपत्रं व मराठी वृत्तवाहिन्यांना कळवली असती, तरी तिला प्रसिद्धी मिळाली असतीच, याचीही अजिबात म्हणजे अजिबातच खात्री नाही. आणि असंही गृहित धरलं की, या पोर्टलच्या कर्त्याधर्त्यांनी अगदी प्रतीकात्मक स्वरूपाची अंत्ययात्रा काढली असती आणि नंतर एखाद्या आडबाजूच्या छोट्याशा सभागृहात एखादी शोकसभा ठेवली असती, तरी त्यातही पाच-दहा सहानुभूतीदारांपलीकडे (तेवढं भाग्य तर कुणाही सामान्य माणसाच्या वाट्याला येतंच!) फारसं कुणी सहभागी झालं नसतं. ज्याची समाजाच्या लेखी अशी किंमत आहे, त्याची प्रसारमाध्यमांच्या लेखी तरी काय किंमत असणार!

२४ ऑक्टोबर २०१६ रोजी ‘अक्षरनामा’ हे पोर्टल सुरू झालं.

अक्षरनामा मराठी ऑनलाईन फिचर्स

२०२६ रोजी त्याला १० वर्षं पूर्ण झाली असती. पण तेवढंही भाग्य त्याच्या नशिबात नव्हतं. एक पोर्टल बंद पडलं, यात मोठंसं ते काय! याच्या आधी काय पोर्टल बंद पडली नाहीत? मोठा गाजावाजा करत धूमधडाक्यात सुरू झालेली अनेक मराठी पोर्टल्स गेल्या काही वर्षांत बंद पडली आहेत. तीही अगदी एक-दीड वर्षांतच. त्यांची ना मराठी वर्तमानपत्रांनी दखल घेतली, ना मराठी वृत्तवाहिन्यांनी घेतली, ना सोशल मीडियाने. 'अक्षरनामा' त्यांच्यापेक्षा जरा अधिक काळ टिकून राहिलं इतकंच.

कधीकाळी मुंबईतून 'प्रभात' नावाचं एक दैनिक प्रकाशित होत असे. या दैनिकाची ओळख म्हणजे त्याचे संपादक श्री. शं. नवरे यांचे मृत्युलेख. सामाजिक जीवनातील एखाद्या व्यक्तीचं निधन झालं की, त्यावर 'प्रभात'मध्ये जो मृत्युलेख येई, त्याची मुंबईकर वाचक अगदी आतुरतेनं वाट पाहत असत म्हणे!

नवरे यांच्या या मृत्युलेखाचे चाहते साक्षात डॉ. बाबासाहेब आंबेडकरसुद्धा होते. ते एकदा 'प्रभात'च्या कचेरीत जाऊन नवरे यांना म्हणाले, 'तुम्ही माझ्यावर जो मृत्युलेख लिहिणार आहात, तो मला वाचायचा आहे. मला लिहून दाखवा.': अशी या दैनिकाची आणि त्याच्या संपादकाची ख्याती होती! तत्कालीन महाराष्ट्रात, खरं तर मुंबईत आचार्य अत्रे यांच्यानंतर उत्तम मृत्युलेख लिहिणारे संपादक म्हणून नवरे यांना ओळखलं जात होतं. त्यामुळे ते साहजिकच होतं, असंच म्हणावं लागेल.

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर मोठ्या उद्योगपतींची दैनिकं सुरू झाली. त्यांनी पैशाच्या जोरावर सगळ्या गोष्टी मॅनेज करायला सुरुवात केली, तेव्हा 'प्रभात'सारख्या ध्येयवादी पण छोट्याशा दैनिकांचा अपमृत्यू घडून आला. तिथपासूनच म राठीतल्या ध्येयवादी पत्रकारितेवर व्यावसायिक पत्रकारितेनं मात करायला सुरुवात झाली. मराठीतल्या ध्येयवादी पत्रकारितेला कधीही व्यावसायिक होता आलं नाही आणि व्यावसायिक पत्रकारितेनं कधीही ध्येयवादी होण्याची जोखीम घेतली नाही, ही मराठी पत्रकारितेची शोकांतिका आहे की, एकंदर महाराष्ट्राची माहीत नाही, पण ही गोष्ट खरी आहे की, तेव्हापासून ज्यांनी ज्यांनी केवळ ध्येयवादाच्या जोरावर वाटचाल करण्याचा प्रयत्न केला, त्यांना त्यांना अल्पावधीतच आपला अपमृत्यु ओढवून घ्यावा लागला.

गोविंदाग्रजांनी 'महाराष्ट्र गीता'त म्हणूनच ठेवलंय की,

'राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा।
नाजुक देशा, कोमल देशा, फुलांच्याहि देशा।।'

राकट, कणखर दगडांपुढे नाजूक, कोमल फुलांचा काय पाड लागणार! परिणामी त्यांची स्थिती 'क्षणोक्षणी पडे, उठे, परि बळे, उडे बापडी। चुके पथहि, येउनी स्तिमित दृष्टीला झापडी' अशी ना. वा. टिळकांनी सांगितल्याप्रमाणे होऊन बसते. 'अक्षरनामा'चंही गेल्या चार-पाच वर्षांत नेमकं हेच झालं होतं. 'मराठीतलं पहिलवहिलं फीचर्स पोर्टल' अशी शेखी मिरवत हे पोर्टल सुरू झालं, तेव्हा त्याचं महाराष्ट्रात तसं चांगल्या प्रकारे स्वागत झालं होतं. महाराष्ट्राबाहेरील आणि भारताबाहेरील जाणत्या मराठीजनांनीही त्याची वाखाणणी केली होती. वर्तमानपत्रांत सहसा दिसणार नाहीत, असे ताज्या घटना-घडामोडींवरील मोठमोठे लेख आणि नामवंतांसह नवोदित लेखकांचा मोठा ताफा, अशी या पोर्टलने पहिल्या दिवसांपासून आपली ओळख बनवली होती. दैनिकांसारखं रोज प्रकाशित होणारं, पण बातम्यांऐवजी केवळ दीर्घ स्वरूपाचे लेख प्रकाशित करणारं हे पोर्टल अल्पावधीतच जाणकारांच्या कुतूहलाचा आणि चर्चेचा विषय बनलं. दिवसेंदिवस तुपकट, लोणचट आणि पांचट होत गेलेल्या मराठी वर्तमानपत्रांना कंटाळलेल्यांना 'अक्षरनामा'च्या निमित्तानं एक नवा दिलासा मिळाला. ज्या जबाबदार, नेक आणि अभ्यासू लेखकांना वर्तमानपत्रांच्या ७००-८०० शब्दांच्या मर्यादेमुळे मनासारखं लिहिता येत नव्हतं, त्यांच्यासाठी 'अक्षरनामा' हे हक्काचं व्यासपीठ म्हणून काम करू लागलं. कारण या पोर्टलवर तीन-हजार शब्दांचे लेख सहजपणे प्रकाशित केले जात होते. त्यामुळे ज्या विषयांची वर्तमानपत्रांतून फारशी सखोल चर्चा होत नाही आणि जे लोक जाचक नियम-अटींमुळे वर्तमानपत्रांत लिहीत नाहीत, असे विषय आणि लेखक या पोर्टलवर रोजच्या रोज दिसू लागले.

वांझोटी राजकीय पतंगबाजी, वाजीकरण (कामुकता), गॉसिप्स, हिंसा, जातिभेद, तुच्छता, अपलाप, असत्य अशा कुठल्याही हुकमी 'क्लिकबेट'अस्त्राचा आधार न घेता आणि बातम्यांच्या नावाखाली नुसता माहितीचा डेटा भसाभसा न ओतता, प्रत्येक विषयाकडे निष्पक्ष आणि निर्भीडपणे पाहत त्यावर चर्चा-मंथन करणं, हे धाडस तसं सोशल मीडियाच्या तालावर जगणाऱ्या आणि माहिती-तंत्रज्ञानाच्या कह्यात गेलेल्या समाजात मूर्खपणाचंच होतं. पदरच्या भाकऱ्या खाऊन, खरं तर उपाशीपोटी राहून समाजसेवा करण्याचे भिकारपणाचे धंदे असंच 'अक्षरनामा'च्या पत्रकारितेचं वर्णन कुणीही केलं असतं. पण या पोर्टलच्या कर्त्याधर्त्यांना त्याची जराही पर्वा नसावी किंवा 'विकलं जातं, तेच पिकवावं' असा व्यवहारी विचार त्यांना करता येत नसावा. नपेक्षा आपल्याच हातांनी आपल्याच पायावर धोंडा पाडून घेण्याचा असला आत्मघातकी उद्योग कोण करणार!

पण दारिद्र्याला ऐश्वर्य आणि अव्यवहारीपणाला ध्येयवाद समजणारी एक छोटीशी जमात अजूनही महाराष्ट्रात शिल्लक आहे म्हणतात! तिचे अवशेष कधी कधी कुठे कुठे दुर्मीळ स्वरूपात पाहायला मिळतात. 'अक्षरनामा' हा त्या जमातीतल्या अवशेषीरूपी उरलेल्यांचाच एक छोटासा आविष्कार. अशांचा आशावाद मोठा बुलंद असतो. अतिशय विपरित परिस्थितीतही ते 'मरणाची तमा कुणाला?' अशा मिजाशीत जगण्याचा प्रयत्न

करतात. त्यात चार-दहा जणांनी त्यांच्या या बहादुरीला दाद द्यायचा अवकाश, मग तर ते प्रवाहाविरुद्ध पोहण्यालाच 'सामाजिक सिद्धान्त' मानायला लागतात. तुटपुंजं भांडवल आणि मनुष्यबळापासून तंत्रबळापर्यंत सगळ्याचीच वानवा असली की, माणसं अलगदपणे 'तात्त्विक' आणि 'आध्यात्मिक' अशा दोन्ही डगरीवर पाय ठेवतात. 'अक्षरनामा'च्या कर्त्याधर्त्यांनी तोच मार्ग चोखाळणं पसंत केलं.

खरं तर तोवर इंग्रजीत 'स्क्रोल', 'द वायर', 'न्यूज लाँड्री' अशी काही पोर्टल्स सुरू झाली होती, या 'न्यूज-फीचर्स' पद्धतीच्या पोर्टल्सचा सेटअपही मोठा आहे. त्यात त्यांचं इंग्रजी-हिंदी माध्यम असल्यामुळे ती राष्ट्रीय पातळीवर सहजपणे पोहचत होती, आणि म्हणून दखलपात्रही ठरत होती. यातलं काहीच नसलेल्या मराठीसारख्या प्रादेशिक भाषेतल्या पोर्टलला असं काही करता येणं शक्यच नव्हतं. त्यात ऑनलाईन बातम्यांच्या भडिमारात 'घटना' (Fact), 'वास्तव' (Reality) आणि 'सत्य' (Truth) यांची इतक्या मोठ्या प्रमाणावर सरमिसळ केली जात होती की, कुठल्याही बातमीतलं 'वास्तव' आणि 'सत्य' समजून घेण्यासाठी वाचकांना अवसरच दिला जात नव्हता. जोडीला इतिहासाचे मतलबी गोडवे, खोट्या अस्मितांचा बागुलबुवा, जात-धर्माचा अतिरेकी अभिमान आणि परधर्माविषयी द्वेष-तिरस्कार निर्माण करून स्वत:च्या जात-धर्माचं श्रेष्ठत्व अधोरेखित करण्याची अहमहमिका लागलेली. या भस्मासुराचा सामना इंग्रजी पोर्टल्सना करता येत नव्हता, तिथं मराठीसारख्या एका प्रादेशिक भाषेतल्या पोर्टलचा काय पाड लागणार?

तरीही 'अक्षरनामा'ने एक 'तारतम्यपूर्ण दृष्टीकोन' घेत ऑनलाईन पत्रकारिता करायला सुरुवात केली. ऑनलाईन ८००-९०० शब्दांपेक्षा मोठे लेख वाचले जात नाहीत, असा काही सुज्ञांनी वेगवेगळ्या प्रकारे सल्ला देऊनही त्याकडे कानाडोळा करत तीन-हजार शब्दांपर्यंतचे लेख प्रकाशित करायला सुरुवात केली. त्यासाठी नामांकित ते नवोदित अशा सर्व प्रकारच्या लेखकांनी लेखनसहकार्य द्यायलाही सुरुवात केली. मराठी लेखक हा तसाही पृथ्वीतलावरचा सर्वांत आत्मसंतुष्ट प्राणी. त्याने कितीही कष्ट घेऊन, वेळ देऊन लेखन केलं, तरी त्याचा योग्य मोबदला तो सहसा स्वत:हून मागायला जात नाही. प्रकाशक-संपादक जो मोबदला देतील, त्यातच तो समाधान मानतो. अनेकांना तर आपल्या लेखनाला प्रसिद्धी मिळाली, यातच इतिकर्तव्यता वाटते. 'अक्षरनामा' तर जन्मापासूनच गरीबबापडं. त्यामुळे लिहिणाऱ्या प्रत्येकाला प्रतीकात्मक मोबदला देणंही त्याला शक्य नव्हतं. त्यामुळे त्याने नियमित लिहिणाऱ्या आणि ज्यांना खूपच गरज आहे, अशाच लेखकांना थोडाफार मोबदला देण्याचं ठरवलं. तरीही या पोर्टलसाठी लेखन करण्याला सहसा कुठल्याही लेखकाने नकार दिला नाही. उलट बहुतेकांनी आनंदाने लेखन करणं पसंत केलं. काही लेखक तर इतके सज्जन की, त्यांनी स्वत:हूनच मोबदला नको, तुम्ही चांगलं काम करताय, त्यात आमचाही सहभाग म्हणून आम्ही लेखन करू, असं सांगितलं. ज्या निवडक लेखकांना 'अक्षरनामा'ने मोबदला दिला, त्यातल्या बहुतेकांनी त्याचा कधी हिशोबही जुळवून पाहिला नाही. उशिराबद्दल किंवा काही वेळा राहून गेलेल्या मानधनाबद्दलही कधी विचारणा केली नाही. काहींनी तर त्यांना दिलेला मोबदलाही परत केला.

मराठी लेखकांच्या या उदारमनस्कतेमुळे 'अक्षरनामा'चा प्रपंच दिमाखात सुरू झाला खरा, पण वाचकांनी मात्र याची कधी कदर केली नाही. आपण जे लेखन वाचतो, त्याचं मूल्य आपण दिलं पाहिजे. कारण त्यासाठी लेखक, प्रकाशक, संपादक यांना बरीच मेहनत करावी लागते. त्याचा मेहनताना न देता, फुकटात त्याचा लाभ घेणं गैर आहे, असा विचार त्यांनी स्वत:हून करायला हवा होता. पण दुर्दैवानं तसं काही फारसं होऊ शकलं नाही. त्यात 'ऑनलाईन ते फुकट' अशी गुगलपासून अनेक देशी-विदेशी पोर्टल्सनी सवय लावल्यामुळे आपण वाचतो, त्यासाठी कुणीतरी बरीच मेहनत करतंय, याची खबरबात वाचकांच्या काना-मनापर्यंत पोहचत नव्हती. त्या दृष्टीने 'अक्षरनामा'ने कोरोनाकाळानंतर जाणीवपूर्वक प्रयत्न केले, पण त्याला कधीच फारसा प्रतिसाद मिळाला नाही. शेकड्यातले पाव टक्का वाचकही वर्गणी भरत नसत. पण शेकड्यातले किमान साठ टक्के तरी लेखक मोबदल्याचा विचार न करता 'अक्षरनामा'साठी लेखन करत.

'अक्षरनामा' सुरू झालं आणि नोटबंदी जाहीर झाली. त्यानंतर केंद्र सरकारपुरस्कृत जीएसटीचा गोंधळ सुरू झाला. त्यात विद्यमान केंद्र सरकारचा हडेलहप्पीचा कारभार. त्यामुळे सबंध देशातलंच समाजजीवन कष्टप्रद होत गेलं. त्यात २०२० साली करोना उपटला आणि अरिष्टांचं दुष्टचक्र सुरू झालं. या जागतिक महामारीनं सबंध जगाची नाकेबंदी केली. कित्येकांच्या नोकऱ्या गेल्या, उद्योगधंदे बंद पडले, रोजगार गेले. भारतात तर 'आर्थिक आणीबाणी'च सुरू झाली. परिणामी 'अक्षरनामा' ज्या मोजक्या लेखकांना मानधन देत होतं, तेही दुरापास्त होऊन बसलं. आता काही खरं नाही. आता आपल्याला गाशा गुंडाळावा लागेल, या निर्णयाला येऊन संपादकांनी आपल्या लेखकांना आणि नव्याने लिहिण्याची इच्छा व्यक्त करणाऱ्यांना प्रामाणिकपणे सांगायला सुरुवात केली की, आता आम्हाला कुणालाही मानधन देणं शक्य नाही. आता निदान काही मोती गळतील अशी अटकळ होती, पण झालं उलटंच. बहुतेकांनी ते सकारात्मक पद्धतीनं घेऊन मानधनाशिवाय लेखनसहकार्य करायला सुरुवात केली. कुणी म्हणेल की, यांत केवळ हौसेनवसेगवशे लेखक असणार, तर तसं अजिबात नाही. 'अक्षरनामा'चे बहुतेक लेखक हे तसे प्रतिष्ठित आहेत.

खरं तर कोरोनाकाळ हा 'अक्षरनामा'च्या अवतारसमाप्तीचा सांगावा होता. पण लेखक आणि काही हितचिंतक यांच्या पाठबळामुळे रडतखडत का होईना हा गाडा चालू

राहिला. प्रायोगिक प्रयोगांचं एक नामी वैशिष्ट्य असतं. त्यांना जनाधार मिळत नाही. आर्थिक पाठबळही मिळत नाही, पण कौतुक मात्र हमखास त्यांच्या वाट्याला येतं. 'अक्षरनामा'च्या २०१७ सालच्या, म्हणजे दुसऱ्याच दिवाळी अंकाला मसापचा उत्कृष्ट ऑनलाईन दिवाळी अंकाचा पुरस्कार मिळाला. त्यापाठोपाठ नागपूरच्या 'अरविंदबाबू देशमुख प्रतिष्ठान'चा उत्कृष्ट ऑनलाईन मीडियाचा पुरस्कारही जाहीर झाला. २०२२ साली तर कमालच झाली. महाराष्ट्र फाउंडेशन या नामांकित संस्थेनं ऑनलाईन पत्रकारितेसाठी तब्बल लाखभर रुपयांचा विशेष पुरस्कार देऊन गौरव केला. पहिल्या पाच-सहा वर्षांत असे तीन पुरस्कार मिळाल्यामुळे 'अक्षरनामा'ची थोडीफार चर्चा झाली. त्याची आधीपेक्षा विशेषत्वाने दखल घेतली जाऊ लागली. प्रकाशक-संपादकांचाही उत्साह वाढला. पण जशा गोड शब्दांच्या भाकरी होत नाहीत, तशा पुरस्कारांच्याही होत नाहीत. पुरस्कारांमुळे काम करण्याचं बळ मिळतं, पण बळ लावून काम करण्यासाठी पोटही भरलेलं असावं लागतं.

अर्धपोटीही काम करता येतं, नाही असं नाही, पण पैशाचं सोंग मात्र आणता येत नाही. शहाण्याने कोर्टाची पायरी चढू नये, असं बुजुर्गांनी सांगून ठेवलंय. ते स्वत: हा नियम पाळतही. पण हल्ली शहाण्यांना जेरीला आणण्यासाठी, त्यांची 'बोलती' बंद करण्यासाठी कोर्टात खेचलं जातं. या नवसिद्धान्ताचा आधार घेत 'सनातन प्रभात' या संस्थेनं 'अक्षरनामा'वर अब्रूनुकसानीचे दोन दावे गोव्याच्या न्यायालयात ठोकले, तेही काही कोटी रुपयांचे. ज्येष्ठ पत्रकार निखिल वागळे आणि तरुण पत्रकार अलका धुपकर यांनी ते लेख लिहिले होते. ते त्यांच्या म्हणण्यावर ठाम होते. त्यांची खटल्याला सामोरं जाण्याची तयारी होती, 'अक्षरनामा'च्या संपादकांचीही होती. पण पैशाचे सोंग कुठून आणणार? शेवटी या लेखकांनीच ॲड. अभय नेवगी हे वकील मिळवून दिले. त्यांनी हे दोन्ही दावे विनामूल्य चालवले. त्यामुळे 'अक्षरनामा' तरलं. फोंड्याच्या न्यायालयातून मुंबई उच्च न्यायालयापर्यंत हे दावे पोहचले होते. नेवगी 'अक्षरनामा'च्या बाजूने उभे राहिले नसते, तर यापूर्वीच त्यावर 'हरे राम!' म्हणण्याची पाळी आली असती. बाकी धमक्या, निंदानालस्ती, ट्रोलिंग यांचा तर पत्रकारांना बहुतेकांना सदासर्वकाळ सामना करावाच लागतो. कर्णाच्या कवचकुंडलाप्रमाणे दैवदेणगी म्हणून या प्रकारांचा स्वीकार करावा लागतो. तो या पोर्टललाही करावा लागला, यात तसं विशेष काही मानायचं कारण नाही.

'अक्षरनामा'ची सर्वांत मोठी कमाई ही होती की, ते वाचणारे वाचक तसे भरपूर होते आणि सर्वांत मोठी नामुष्कीची गोष्ट ही होती की, त्यातले पाच टक्के वाचकही नियमितपणे वर्गणी भरत नव्हते. कुठल्याही काळात निष्पक्ष आणि निर्भीड पत्रकारिता केवळ आणि केवळ वाचकांच्या आर्थिक पाठबळावरच यशस्वी होते, होत आलीय. पण नेमक्या त्याच आघाडीवर कमालीची उदासीनता असेल, तर मग काय करायचं? किती काळ विनंत्या, आवाहनं करत राहायचं? विनंत्या, आवाहनं यांना धूप घालणारा समाज आता महाराष्ट्रात उरलाय तरी कुठे? अर्थात हेही तितकंच खरं की, प्रवाहाविरुद्ध पोहणाऱ्यांची लढाई हे नेहमीच 'डेव्हिड अँड गोलिएथ'सारखी विषम पातळीवरचीच असते. पण काही लोकांचा कणा इतका ताठ असतो की, तो अगतिक होतो, शोचनीय होतो; आणि एके दिवशी मोडूनही पडतो, पण कुठल्याही परिस्थितीत वाकत नाही.

अपत्यांना जन्म देणं, हा 'नैसर्गिक शरीरधर्म' असतो आणि त्या अपत्यांचं लालनपालन, संगोपन करणं, हे पालकांचं 'कर्तव्य' असतं. हे कर्तव्य ते जेव्हा यथास्थितपणे पार पाडतात, तेव्हा त्यांचा 'आदर' करावा आणि ते जेव्हा त्यात कुचराई करतात, तेव्हा त्यांचा तितक्याच स्पष्टपणे 'उद्धार'ही करावा, हा साधा 'कॉमनसेन्स' आपण पाळतो का? उलट 'नऊ महिने पोटात वागवलं, खाऊपिऊ घातलं' या नैसर्गिक गोष्टींचंही भांडवल करत तर्कहीन महिमामंडन करतो. अशी सरधोपट गोळाबेरीज हे ज्या समाजाचं अंगभूत वैशिष्ट्य असतं, त्या समाजात सत्त्वशील आणि कर्तव्यनिष्ठ लोकांची गणनाही 'बाजारबुणग्यां'तच केली जाणं; त्यांच्याही नशिबी उपेक्षा, अवहेलना येणं, यांत फारसं काही आश्चर्यजनक वा धक्कादायक आहे, असं म्हणता येणार नाही.

'अक्षरनामा'ने गेल्या नऊ वर्षांत मराठी ऑनलाईन पत्रकारितेत दमदार म्हणावी अशी कामगिरी केली नसेल, पण त्या दृष्टीनं आटापिटा मात्र भरपूर केला, अगदी शेवटपर्यंत केला, हे तरी निदान नाकारलं जाऊ नये. हल्ली ज्याची मराठी वर्तमानपत्रं आणि मराठी वृत्तवाहिन्या दखल घेत नाहीत, त्या प्रत्येकाची सोशल मीडिया मोठ्या प्रमाणावर दखल घेतो. त्यावर हळहळ्या-हुळहुळ्या स्वरात मोठे गळे काढून भरभरून लिहिलं जातं. महाराष्ट्राला जिवंत माणसाची किंमत नसते. पण तोच माणूस एकदा का मेला की, मग तो अगदी मौल्यवान, कर्तृत्ववान आणि प्रतिभावान होतो. त्याच्या जाण्यामुळे त्या संबंधित क्षेत्रासह एकंदर महाराष्ट्राचं किती मोठं नुकसान झालं आहे, याविषयी फर्ड्या भाषेत पोस्टच्या पोस्ट पाडल्या जातात! मरणाबरोबर वैर संपतं, या अतिप्रसिद्ध म्हणीमुळे आणि मेलेल्या माणसाबद्दल वाईट बोलायचं नसतं, या सभ्यता-संकेतामुळे त्या व्यक्तीबद्दल अगदी प्रेमानं आणि उमाळ्यानं लिहिलं जातं. त्याच्या सामान्य कर्तृत्वाची आरती अशी काही गायली जाते की, तो मरणानंतर 'लार्जर दॅन लाईफ' होऊन जातो. 'अक्षरनामा'च्या बाबतीत तसं काही होण्याची सुतराम शक्यता नाही, ते तसं चांगलंच म्हणायचं!

**– राम जगताप**
jagtap.ram@gmail.com



# शैक्षणिक प्रक्रियेतील कुटुंबाचे योगदान

डॉ. अंजली पटवर्धन-कुलकर्णी

फेब्रुवारी महिन्यातल्या लेखात आमच्या शाळेत घेतलेल्या 'सुजाण पालकत्व' या विषयावर आयोजित सत्राचा उल्लेख आलेला आहे. ते सत्र सुरू असतानाच शिक्षणप्रक्रियेतील कुटुंबाच्या योगदानाबद्दल विचार मनात घोळत होते. नेमके त्याच सुमारास मुलीला एका नामांकित कंपनीकडून अचानक एक ऑफर आल्याने तिने मेल वाचता क्षणी व्हिडिओ कॉलवर ती बातमी आम्हाला सांगितली. आम्ही बोलत होतो, पण शेजारीच बसलेल्या अकरावीत असलेला आमचा नातू त्याच्या मोबाइलमध्ये गर्क दिसला. एरवी फोन सुरू झाल्याक्षणापासून उत्साहाने बोलणारा तो आज वेगळाच वाटला. त्याचे वडील बाजूलाच होते. ते जरासे रागावूनच त्याला म्हणाले, 'अरे, आजी-आजोबा बोलताहेत ना? तुझा मोबाइल ठेव बरे बाजूला.' त्यावर तो अगदी शांतपणे म्हणाला, 'हो बाबा. मी फक्त त्या कंपनीची माहिती गुगलवर चेक करत होतो. आईने मेल आल्याच्या उत्साहात व्हेरिफाय केले नाही, फेक असेल मेल असे नको न व्हायला, म्हणून.' आम्ही सगळेच क्षणभर स्तब्ध झालो. मी त्याला म्हटले, 'तुला हे कसे सुचले? हा पारखून घेण्याचा गुण कोणाकडून रे घेतलास?' त्यावरही त्याचे उत्तर तयार होते, दुसऱ्या आजीकडून. (म्हणजे त्याची पणजी, माझी आई.) तूच नाही का सांगितले की अगदी एक भाजी जरी आणायची असेल तरी ती पुण्याची अख्खी मडंई फिरून बघितल्याशिवाय खरेदी करत नसे. मीही तर तिच्यासोबत कधी कधी गेलो आहे. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जनुके संक्रमित होतात तसे शहाणपणाही होत असणार.

रामदासस्वामींनी सांगितल्या नुसार जे जे आपणासी ठावे, ते इतरांसी सांगावे, शहाणे करून सोडावे सकळ जन. शिक्षणाचा हेतूच मुळात प्रत्येकामध्ये जीवन जगण्याचे सामर्थ्य निर्माण करणे हे आहे, जे शहाणपणाने मिळवता येते. औपचारिक शिक्षणाची सद्य:स्थिती फारशी उत्साहवर्धक नसल्याचे अनेक अहवाल -असर. कौशल्य तपासणी अहवाल वाचनात येतात, समाजात त्याची सत्यता अनुभवायलाही मिळते. धोक्याची घंटा वाजते आहे त्यावर तत्काळ उपाय करणे गरजेचे आहे. जे जे विषय आपली काळजी वाढवत आहेत- उदाहरणार्थ, घसरत चाललेली समाजाची नीतीमत्ता, सर्वच बाबतीत बोकाळलेला भ्रष्टाचार, मूल्यांचा ऱ्हास, कष्ट न करता यशाची केलेली अपेक्षा, तरुणांची बेकारी आणि घुसमट या सर्वांना मुळातून जबाबदार आहे ती सध्याची स्वत्व गमावलेली, निष्प्रभ झालेली आपली कुटुंबव्यवस्था. भारतीय समाजाला वेगळेपण बहाल करणारी, सामर्थ्य देणारी कुटुंबव्यवस्था कोलमडत चालली आहे.

काही दशकांपूर्वीपर्यंत भारतीय समाजामध्ये असलेली एकत्र कुटुंबपद्धती जाऊन आता विभक्त कुटुंबपद्धतीचा अंगीकार केला गेला. त्याला कारणेही अनेक आहेत, ज्यामध्ये पाश्चात्त्य विचारांचा पगडा, शहरीकरण, औद्योगिकीकरण, व्यक्ती स्वातंत्र्याच्या कल्पना, इत्यादी कारणे प्रामुख्याने सांगता येतील. त्यानंतरच्या जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे कुटुंबातील प्रमुख सदस्य- नवराबायकोच, लाँग डिस्टन्स रिलेशनशिपमध्ये राहू लागले आहेत, कुटुंबातल्या सदस्यांच्या संख्येमध्येही घट होते आहे, एकच मूल अथवा मूल नकोचपर्यंतचा प्रवास कुटुंबाने केला आहे. आता तर एकल पालकत्व, लिव्ह इन, कॉन्ट्राक्ट मॅरेज अशा पद्धतींमुळे कुटुंबसंस्थाच लयाला जाण्याची भीती निर्माण झाली आहे.

कुटुंबांचे विघटीकरण झाल्याने, कुटुंब आतापर्यंत करत असलेल्या कामांचे, जबाबदारीचे व्यापारीकरण झाले आहे. मग घरी मुलांना सांभाळायला, शिकवायला पालकांकडे वेळ नाही म्हणून पाळणाघरे, संस्कारवर्ग, छंदवर्ग ते अभ्यासासाठी ट्युशनचे वर्ग निर्माण झाले. एके काळी ट्युशनला जाणे म्हणजे अभ्यासात कच्चे असल्याची जाहीर वाच्यता करण्यासारखे, कमीपणा आणणारे समजले जायचे. त्याउलट आज मूल कोणत्या क्लासला जातेय यावर त्याची योग्यता ठरवली जाते. क्लासला गेल्याशिवाय पर्यायच उरला नाही अशी आताची

परिस्थिती. या क्लासची वारेमाप फी भरायची तर पालकांना जास्तीच्या कामाचा वेळ घराबाहेर देणे आवश्यक ठरू लागले. खूप ठिकाणी नवराबायको नोकरीला जातांना दिसतात. मग घरच्या गृहिणीला अन्न शिजवायला पुरेसा वेळ नाही म्हणून स्वयंपाकाच्या बाईंची नेमणूक झाली, किंवा सहजच बाहेरचे खाणे, हॉटेलमध्ये जाणे घडू लागले. हॉटेलची संख्या वारेमाप वाढूनही छोटे धाबे, टपऱ्या यांच्यासमोरही गर्दी होऊ लागली. उदरभरण नोहे, जाणिजे यज्ञ कर्म, असे अन्नग्रहणाचे महत्त्व जाणणाऱ्या समाजाताच सकस, आरोग्यदायी जेवणापेक्षा, पोट भरणारे, भूक भागवणारे अन्न खाऊन, प्रकृतीच्या दृष्टीने घातक असलेल्या सवयींचा अंगीकार केला गेला.

घरातली ज्येष्ठ मंडळी एकेकटी तरी राहू लागली, किंवा मग त्यांची रवानगी वृद्धाश्रमांमध्ये होऊ लागली. घरातील लहान मुलांना सर्वार्थाने सांभाळू शकणाऱ्या या व्यक्ती दूर गेल्याने त्यांची जनुके लाभलेल्या मुलांना मात्र त्यांचा हुशारीचा वारसा नाही मिळू शकला. पूर्वी ज्या कुटुंबाच्या जबाबदाऱ्या समजल्या जात होत्या –मूलांचे संगोपन, मूल्यांची जोपासना, चांगल्या सवयींचे रोपण, शिक्षण, सकस आहार, मानसिक पाठबळ, या आणि अशासारख्या अनेक सेवासुविधा घराबाहेर गेल्या व त्या मोल देऊन मिळण्याची नवी व्यवस्था समाजात निर्माण झाली.

कुटुंबाचा पाल्याच्या जडणघडणीत सहभाग ही एक फार गंभीर संकल्पना आहे; पण तिचा विचार पुरेशा गांभीर्याने केलेला दिसत नाही. विद्यार्थ्याच्या शैक्षणिक प्रवासात शाळा, कुटुंब, आणि समाज यांचे एकत्रित योगदान असणे महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्याच्या शैक्षणिक मार्गक्रमणाच्या सुरवातीलाच हा सहयोग घडणे गरजेचे आहे. शिक्षणाला पोषक वातावरण शाळा आणि घर दोन्हीमध्ये असले पाहिजे. कुटुंबाचे योगदान नात्यातील विश्वास, परस्परसंबंधी आदरभाव, आणि सांस्कृतिक भान निर्माण करून तो वाढवण्याकामी उपयुक्त ठरतो.

शाळा आणि कुटुंब हे मुलाच्या शैक्षणिक विकासाचे दोन खांब आहेत, ज्यांनी संयुक्त रितीने ही जबाबदारी पेलली पाहिजे. विद्यार्थ्याच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये दोन्हीच्या स्वतंत्र भूमिका असल्या तरी त्या एकमेकांना पूरक आहेत. मुलांच्या शिक्षणाची सुरुवात ही कुटुंबातूनच होत असते. कौटुंबिक वातावरणात मूल्यशिक्षण, योग्य वर्तनाचे नियम, कुटुंबातल्या सदस्यांशी जुळवून घेण्याचे धडे, सामाजिक कौशल्ये विकसित करण्याचे मार्गदर्शन अशा अनेक बाबी मुले शिकत असतात, जे पुढे शाळेत गेल्यावर पक्के होत असते. पालक, विशेषतः आई ही मुलाची पहिली शिक्षक असते असे मानले जाते. पालकांवर घरातले, कुटुंबातले वातावरण सौहार्दपूर्ण राखण्याची जबाबदारी असते की ज्यामुळे मुलाला सुरक्षित वाटेल, आत्मविश्वास वाढेल, कुतूहल जागृत होऊन शिकण्याची, प्रश्न विचारण्याची ऊर्मी टिकून राहील.कुटुंबामध्ये मुलांचा वैचारिक विकास, संकल्पनांची सुस्पष्टता, भावनिक आधार मिळतो. कुटुंबातून घातला गेलेला शिक्षणाचा पाया मजबूत असेल तरच त्यावर शाळा–महाविद्यालये बांधणार असलेली शिक्षणाची इमारत टिकू शकेल. म्हणूनच, शाळा आणि कुटुंब एकत्र येणे महत्त्वाचे आहे. यामुळे विद्यार्थ्यांना आश्वासक वातावरण, वाढीव प्रेरणा, सर्वांगीण विकासाच्या संधी, शैक्षणिक प्रगती याची खातरी निर्माण होऊन त्यांच्यातील वर्तन समस्या कमी होऊ शकतात.

परस्परसहयोगातून शैक्षणिक वातावरण हे अधिक समृद्ध आणि उत्पादक बनवता येईल.आपल्या शैक्षणिक प्रगतीचे मोल कुटुंब आणि शाळा दोघांनाही आहे हे विद्यार्थ्याच्या लक्षात आले की त्यांना अधिक हुरूप येतो. ज्या मुलांना शैक्षणिक प्रवासात कुटुंबाचा भक्कम आधार मिळतो त्यांची प्रगती जास्त चांगली होण्याची शक्यता असते असे अभ्यासातून सिद्ध झाले आहे. 'हार्वर्ड फॅमिली रिसर्च प्रोजेक्ट'तर्फे झालेल्या अभ्यासातून कुटुंबाचे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत योगदान किती महत्त्वाचे असते ते लक्षात आले. हा अभ्यास काही वर्ष सुरू होता. त्यात असे लक्षात आले की ज्या पालकांचे पाल्याच्या अभ्यासाकडे पूर्ण लक्ष असते, सहभाग असतो, ते मुलांसोबत वाचन करतात, गृहपाठात मदत करतात, शिक्षकांच्या संपर्कात राहतात, त्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक कामगिरी सरस होते. त्या विद्यार्थ्यांची प्रगती चांगल्या रितीने झालेली दिसते. त्यांची शाळेतील उपस्थिती चांगली असते व त्यांची सामाजिक कौशल्येही विकसित झालेली असतात. अशाच 'नॅशनल ड्रोपआऊट प्रीव्हेंशन सेंटर'तर्फे करण्यात आलेल्या दुसऱ्या अभ्यासातून असे लक्षात आले की आर्थिकदृष्ट्या दुर्बल समाजातील मुले पालकांच्या शालेय उपक्रमात सहभागी होण्याने त्यांच्या शाळा सोडण्याच्या प्रमाणात लक्षणीय घट होते. तसेच, युनिसेफच्या एका पाहणीत असे निष्पन्न झाले की ज्या कुटुंबाचा विद्यार्थ्यांच्या अभ्यासात गोष्टी सांगून, संवादातून सहभाग असेल त्या विद्यार्थ्यांची भाषा आणि गणिती कौशल्ये इतर मुलांच्या तुलनेत जास्त विकसित झालेली असतात.

शाळा आणि कुटुंब यांच्यातील संवाद सुनिश्चित करण्यासाठी ज्या बाबी करता येतील त्या अशा आहेत–

१) सहजसंवाद : पालकांनी शिक्षक आणि आपला पाल्य दोघांशीही मोकळा संवाद साधला पाहिजे. शाळेच्या पालक–शिक्षकसभांना नियमित हजर राहून वेळोवेळी शाळेतल्या कामकाजासंबंधी प्रतिक्रिया नोंदवल्या पाहिजेत. आता तर महाविद्यालयांमध्येही पालकांशी संवाद साधण्याकडे शिक्षकांचा कल वाढला आहे. आमच्या महाविद्यालयात संक्रांतीच्या हळदीकुंकवाचे निमित्त साधून आम्ही विद्यार्थ्यांच्या मातांना कॉलेज बघायला येण्याचे आमंत्रण देत असतो. बहुतेकदा आई शाळेत जाते पण कॉलेजला जायला बुजते असे लक्षात आल्याने हा उपक्रम राबवला. त्यातून लक्षात आले की आई,

वडिलांना महाविद्यालयाने आमंत्रित केले त्यामुळे विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाशी असलेले भावनिक नाते जास्त धृढ होते.

२) सक्रीय सहभाग : पालकांनी शालेय उपक्रमात सहभागी होऊन परस्परसहकार्य केले पाहिजे. अनेक शाळा पालकदिन, आजीआजोबा संमेलने आयोजित करतात. त्यात आवर्जून सहभागी झाले पाहिजे. काही वेळा, गरज असेल तेव्हा वर्गांमध्ये शिकवण्यासाठी, परीक्षा काळात पर्यवेक्षणासाठी स्वतःहून तयारी दाखवणे, किंवा शाळेतल्या दैनंदिन कामकाजामध्ये सहभागी होणे.

३) अभ्यासात घरी हातभार लावणे : पाल्याच्या शिक्षणात सहभागी होऊन, गृहपाठात मदत करायला हवी. अभ्यासाला पोषक वातावरण निर्माण केले तरी खूप मोठी मदत होऊ शकते. पाल्यालाही विश्वास वाटतो की तो करत असलेल्या कामाबद्दल घरच्यांना गांभीर्य आणि महत्त्व वाटते. विद्यार्थी यामुळे अभ्यासाकडे जास्त लक्ष देईल.

४) सहभागाचे वातावरण तयार करणे : शाळा, शाळेतील शिक्षक यांच्यासोबत संवाद आणि सहकार्याचे वातावरण निर्माण करणे शक्य आहे कारण शिक्षक व पालक दोघांच्याही केंद्रस्थानी विद्यार्थ्याच्या शैक्षणिक प्रगतीचा हेतूच असतो.

५) अपेक्षा स्पष्टपणे मांडा : शाळेतील शिक्षकांशी संवाद साधताना स्पष्टपणे सांगता आले पाहजे की तुमच्या पाल्याच्या बाबतीत शिक्षणाकडून तुमच्या नेमक्या अपेक्षा काय आहेत. दोघांनाही एकाच ध्येयाप्रती प्रवास आणि प्रयास करणे महत्त्वाचे आहे.

मात्र कुटुंबाचा सहभाग शिक्षणात नसेल तर पुढीलपैकी परिणाम दिसू शकतात.

१) प्रेरणेचा अभाव : विद्यार्थ्यांना शाळा आणि कुटुंब यांची अपेक्षा, ध्येय हे वेगवेगळे आहेत असे वाटले तर त्यांना सतत अभ्यास करण्याची प्रेरणा मिळणारच नाही.

२) वर्तनसमस्या : कुटुंबाचे दुर्लक्ष, कमकुवत आधार यातून विद्यार्थी शाळेमध्ये गैरवर्तन करतात. त्यांच्यात वर्तनाच्या समस्या निर्माण होऊ शकतात.

३) सामाजिक अलगीकरण : पालकांचा सहभाग नसेल तर विध्यार्थ्यांना एकाकी वाटून त्यांच्या अभ्यास आणि वर्तनावर नकारार्थी परिणाम होऊ होतो.

४) शैक्षणिक गुणवत्तेचा ऱ्हास : अभ्यासातून सिद्ध झाले आहे की पालकांच्या शिक्षणातल्या सहभागामुळे मुलांच्या शैक्षणिक मूल्यमापनात सुधारणा होते. कुटुंब आणि शाळा यांच्यातील रचनात्मक भागीदारीतून विद्यार्थ्याचा विकास होण्यास हातभार लागतो.

पालकांनी काय केल्यास मुलांची शैक्षणिक प्रगती सुनिश्चित करता येईल ते जाणून घेऊया.

१) तुमचे आणि मुलांचे अभ्यासाचे वेळापत्रक तयार करून त्याचे पालन करा. जमत असेल तर अभ्यासात मार्गदर्शन करा..

२) शालेय बैठकांना हजर रहा, सक्रिय सहभाग नोंदवा, विविध उपक्रमांमध्ये सामील व्हा.

३) घरात भरपूर पुस्तके आणा, स्वतः वाचा, म्हणजे मुले अपोआप अनुकरण करतील आणि वाचायला प्रेरित होतील. तसेच गोष्टी सांगणे, गाणी म्हणणे, कोडी घालणे, एखाद्या मुद्द्यावर, घटनेवर चर्चा करणे यामुळेही मुलांच्या वैचारिकतेला चालना मिळेल. कोव्हिड १९च्या साथीनंतर विद्यार्थ्यांच्या अभ्यासाची घडी विस्कटली आहे, त्यांचा एका जागी बसण्याचा, लक्षपूर्वक कृती करण्याचा, अटेन्शन स्पॅन कमी झाल्याच्या तक्रारी वाढल्या आहेतच. त्यावर मात करायची असेल तर शाळेइतकेच घरातही त्यांच्याकडे लक्ष द्यायला हवे आहे.

४) टीव्ही, मोबाइलपासून सुटका नाही हे खरे असले तरी, मोबाइलचा वापर शैक्षणिक कारणासाठी कसा करायचा याचे मार्गदर्शन मुलांना द्या व त्यांना तसा वापर करण्यास प्रेरित करा.

५) मुलांशी संवाद साधून त्यांच्या भावना, त्यांची मते, प्रतिक्रिया जाणून घ्या. त्यांना मोकळेपणाने व्यक्त होण्यास मदत करा.

६) मुलांमध्ये असलेले उपजत कुतूहल योग्य पद्धतीने जोपासा. लहान बाळाला वाटीत खाऊ दिला तर खाऊ खाण्याआधी बाळाने ती वाटी उलटी करण्याची शक्यताच जास्त. असे करणाऱ्या बाळाला हमखास रागे भरले जाते, व त्याने शिस्तीने खावे याचा पालकांचा आटापिटा चाललेला असतो. पण मुळात बाळाने वाटीच्या न दिसणाऱ्या पृष्ठभागात काय आहे या कुतूहलाने ती वाटी उलटी केली आहे ते लक्षात घेतलेच जात नाही. असेच बाळाचे कुतूहल मारले जाते आणि मग प्रश्न विचारण्याची सवय न लागता फक्त ऐकण्याची सवय लागते. मग प्रश्न न विचारताच मोठे होऊन हे बाळ महान संशोधक बनण्याची शक्यता कितपत उरते बरे?

७) मुलांसमोर स्वतःची सकारात्मक प्रतिमा निर्माण करा. मुले नेहमीच पालकांचे अनुकरण करत असतात. नव्या गोष्टी शिकण्याला प्राधान्य द्या. वेळोवेळी आपले वर्तन तपासा. आपल्या बोलण्यावागण्यातून मुलावर होणारे संस्कार फार महत्त्वाचे आहेत.

८) मुलांना समजतील, कळतील अशा पद्धतीने शिक्षणाचे ध्येय, उद्दिष्ट, तुमच्या अपेक्षा, त्यांच्यातील गुणदोष, त्यांचे भवितव्य या संबंधी विचार स्पष्टपणे मांडा व त्यांना त्यावर व्यक्त होण्याची संधी द्या.

अमेरिकेमध्ये, 'पॉवर माय लर्निंग' नावाच्या एका एनजीओने २०१७मध्ये एक 'फॅमिली प्लेलिस्ट' नावाचा शिक्षक, विद्यार्थी आणि पालक, यांना जोडणारा एक अनोखा उपक्रम हाती घेतला. मुलांना देण्यात येणाऱ्या गृहपाठातील

अभ्यास, खेळ, प्रश्न, सर्व शंभर वेगवेगळ्या भाषांमध्ये अनुवादित करून त्याचे ॲप पालकांच्या मोबाइलमध्ये डाउनलोड करून दिले. अभ्यास करताना सहसा आईवडील मुलांना मार्गदर्शन करतात. या उपक्रमामध्ये पाल्य आपल्या आईवडिलांना ते काय काय शिकले हे समजावून देतात. पालकांनी ते काय शिकले याबद्दल ॲपद्वारे शिक्षकांना फीडबॅक द्यायचा आहे. पालकांनी नोंदवलेल्या प्रतिसादात हे स्पष्ट झाले की त्यांना त्यांचा पाल्य करत असलेला अभ्यास, गृहपाठ खूप चांगल्या प्रकारे कळला व त्यामुळे शिक्षक, विद्यार्थी आणि पालक यांच्यातील बंध दृढ व्हायला मदतच झाली.

एकूण काय तर मुलांचे शिक्षण ही केवळ शाळा आणि विद्यार्थी यांच्यातील बाब नसून पालक, विद्यार्थी, आणि शिक्षक असा त्रिकोण आहे. या त्रिकुटाने मनावर घेतले तर परस्परसहयोगाने शिक्षणाचे भवितव्य निश्चितच उज्ज्वल आहे.

शैक्षणिक जगतातील प्रश्न सोडवण्यासाठी आधी कुटुंबव्यवस्था भक्कम होणे गरजेचे आहे हा विचार कदाचित खूप भाबडा वाटण्याची शक्यता आहे, परंतु विचार करू जाता इतर कोणत्याही सुधारणांपेक्षा प्रत्येक व्यक्तीकडे ही एकमेव सुधारणा करण्याची क्षमता आहे हे लक्षात येईल. आपल्या पातळीपासून सुधारणांना सुरुवात केली तर सामाजिक बदल घडवून आणणे शक्य होईल. 'चॅरिटी (ॲन्ड चेंज) बिगिन्स ॲट होम!'

*******

'शिक्षणविचार' या लेखमालेतला हा शेवटचा, निरोपाचा लेख.


जानेवारी २०२४पासून मार्च २०२५पर्यंत पंधरा वेगवेगळ्या दृष्टिकोनांतून शिक्षणप्रक्रियेबद्धल वाचकांसमोर विचार मांडण्याची संधी दिली त्याबद्धल ग्रंथालीचे मन:पूर्वक आभार. औपचारिक शिक्षणापासून, अनौपचारिक शिक्षणापर्यंत, मूल्यमापनापासून मूल्यवर्धनापर्यंत, शाळा, कुटुंब, विद्यार्थी आणि शिक्षण यांच्या परस्पर साहचर्यातून शैक्षणिक विकासाची निश्चिती, अशा अनेक पैलूंचा विचार केला. कृत्रिम बुद्धिमत्ता, कौशल्यविकास, येणाऱ्या पिढ्यांच्या समोर असलेली भविष्यातील आव्हाने, तसेच आजच्या शैक्षणिक वास्तवाचा धांडोळा घेतला. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०, याद्वारे, भारतीय शिक्षण व्यवस्थेत होत असलेले बदल समजून घेण्याचाही प्रयत्न केला. 'शिक्षणविचार' लेखमालेतून या पैलूंचा विचार वाचकांसमोर मांडता आला त्याबद्दल मन:पूर्वक आभार.

**– डॉ. अंजली पटवर्धन–कुलकर्णी**
anjali.ptwrdhn@gmail.com

ग्रंथाली

# वैधव्याची समस्या आणि मुक्तीची दिशा


## डॉ. संभाजी खराट




**मूल्य ३०० रुपये । सवलतीत १८० रुपये**

# वासुदेवायन

## विवेक मिरगणे




**मूल्य ४०० रुपये । सवलतीत २५० रुपये**



# मन्नू भंडारी एक निडर लेखणी

संजीवनी खेर




मन्नू भंडारी

हिंदीतील एक नीडर लेखिका मन्नू भंडारी हिचे नाव आणि तिचे धैर्य नावाजण्याजोगे आहे. कथा-कादंबरी जोवर केवळ काल्पनिक आहे तोवर ठीक. जी फक्त वाचकालाच विविध भावनांचा प्रत्यय देऊ शकते, पण त्यातील भावना ह्या व्यक्तिगत जीवनातून बाहेर पडलेल्या असतात तेव्हा लेखनकर्त्याला त्याचा मनस्वी त्रास होत असतो. तसेच काहीसे मन्नू भंडारी हिच्याबाबत होऊ लागले जेव्हा तिला तिच्या वैवाहिक जीवनात पतीकडून प्रतारणा वाट्याला येऊ लागली. त्याचे प्रतिबिंब साहजिकच तिच्या लेखनातही पडू लागले.

तिचा जन्म ३ एप्रिल १९३१चा. एका सधन मारवाडी, सुशिक्षित कुटुंबात झाला, मध्यप्रदेशांतील भानपुरात. दोन भाऊ, दोन बहिणी आणि सर्वात धाकटी महेंद्रकुमारी - घरी तिला मन्नू म्हणत. तेच नाव तिने लेखनासाठी घेतले. भानपुरात तिचं बालपण गेलं. कथा, कादंबऱ्या, निबंध, राजकारणावर टीकात्मक लेख तिने लिहिले. स्त्रीला समाजाकडून, कुटुंबाकडून दुय्यमतेचे प्रशिक्षण दिले जाते. भोवतालही तसाच असतो. त्यामुळे तिचे संपूर्णपणे घरातील पुरुषांवर अवलंबून असणे; हे पिढ्यान्‌पिढ्या सुरू असल्याने तो एक सामाजिक नियमच होऊन गेला आहे. आजची स्त्री ही कितीही शिकली-सवरली, कमावती झाली तरी समाजमनावर पुरुषसत्ताक संस्कारांचा पगडा जराही कमी झालेला नाही. स्त्रीच्या भावनांचा तिच्या महत्त्वाकांक्षेचा विचार फारसा होत नाही. त्यामुळे आधुनिकतेने स्त्री बदलली, विचार करू लागली, जबाबदाऱ्या पेलू लागली तरी त्याचा योग्य तो दर्जा नि मान मिळतोच असे नाही. ती दुय्यमच राहिली आहे. अपवादात्मक स्त्रियांना मानसन्मान मिळतो. तिने घर संभाळणे महत्त्वाचे ठरते. ह्यात तिची किती कुतरओढ होते यांची कल्पना कामावरून घरी आलेल्या पुरुषांच्या हातात गरम चहा जोवर पडतो, त्यांना हा भोगवटा कळतच नाही! पण असे नाही, पण बायकादेखील हे सारे सहन करतात कारण निदान या तडजोडीत घराबाहेर तर पडता येते ना! हा दिलासा असतो. मी हे सारे ठाऊक असलेलेच परत का लिहितेय? कारण हे सारे मन्नू भंडारीच्या लेखनात प्रतिबिंबित झालेले आहे. तिने यातील बरेचसे भोगलेलं आहे. आजची स्त्रीदेखीलही कमीअधिक प्रमाणात सोसत आहे. म्हणून हे परत परत लिहावे लागते. आज शहरातील स्थिती बदलत आहे. तरी ते खालपर्यंत झिरपायाला वेळ लागेल, हे साहजिकच आहे. अनेक पिढ्यांची सोयीस्कर व्यवस्था बदलणं अवघड आहे.

मन्नू भंडारीच्या लेखनात स्त्रीच्या मोकळेपणाने जगण्याचा स्वर जरा चढाच लागला आहे. याचे प्रमुख कारण घराचे वातावरण. वडिलांनी मुलामुलींना समाजकारण आणि

राजकारणात सहभाग घ्यायला प्रोत्साहन दिले असल्याने तिचा सर्वत्र वावर मोकळेपणाने होत होता. केवळ घरगुती समस्यांचा नव्हे तर आणीबाणी, त्यानंतरचे जनता सरकार, बेलची हत्याकांड असो, तिचे लेखन त्यावर आसूड ओढत होते. केवळ स्त्रियांवरील अन्यायाविरुद्धच नव्हे तर समाजातील कुरीतींवर ती जोरदार प्रहार करत होती. स्त्री-पुरुष नाते असो वा त्या नात्यातील दरीचा मुलांवर होणार परिणाम, ती हळुवारपणे मांडत होती. राजकीय परिस्थिती आजही अन्यायाचा साथ देताना दिसते तेव्हा सामान्य नागरिकांचे मन विद्ध होते. स्वातंत्र्यानंतरही दलित कुटुंबांना जाळून मारणारे लोक परोलवर सुटतात. एवढेच नव्हे तर निवडणूक लढवतात, जिंकूनही येतात. यामागे जे भीषण राजकारण चालते त्याचा वेध तिने 'महाभोज'मध्ये घेतला आहे. सत्तापिपासूंची लालसा किंचितही कमी झालेली दिसत नाही, उलट अनेकदा दोन सत्ताधाऱ्यांत निवड करणेही अशक्य असते. दोन्हीकडे तीच नीच वागणूक, गरिबांची फसवणूक, आपले कोण वाकडे करू शकणार? हे निर्ढावलेपण सतत दिसत असते. त्याविरुद्ध लेखनातून व्यक्त व्हायला तिने कधीमागे पुढे पाहिले नाही.




तिच्या 'आपका बंटी'मधील, आईवडील यांच्यातील भांडणामुळे भांबावलेल्या छोट्या बंटीची मानसिक कुतरओढ आजही अस्वस्थ करते. छोट्याला साहजिकच घरातील तणाव जाणवत असतो. पण पालकांवरील बालसुलभ विश्वासातून तो खरे तर निर्धास्त असतो. ते विभक्त होण्याचे ठरवतात आणि वस्तूंची करावी तशी मुलाचीहि विभागणी होऊ लागते तेव्हा त्याची अवस्था केविलवाणी होते. एवढ्यावरच त्याच्या मनाची मोडतोड थांबत नाही तर आई दुसरा विवाह करायचे ठरवते तेव्हा तो पार कोलमडून जातो. इथवर कथानक तसे पाहिले तर सरळसोट आहे. बंटीची व्यथा वाचकांसमोर मांडणे हाच लेखिकेचा उद्देश नाही. तर स्त्री म्हणून तिने आपले सुख पुनर्विवाहात शोधणे वाचकालाही बेचैन करते. स्त्रीला आपले सुख शोधायचा हक्क नाही का? हेच पुरुषाने केले तर ते स्वाभाविक मानले जाते. त्यावर काही मत द्यावे असेही कुणाला वाटत नाही. तेच स्त्रीने केले तर ती स्वार्थी ठरते. मुलांच्या भविष्याचा विचारही न करता वागणारी ठरते! ती आई आहे म्हणून तिचे स्त्री असणेही संपवू शकणे समाजाला गरजेचे वाटते? तिला स्व सुखाचा, आनंदाने जगण्याचा हक्क तिचे आईपण हिरावून घेतो? बंटीच्या भविष्याच्या विचार करून तिने एकाकी राहणेच समाजाला कसे योग्य वाटते. हे लेखिकेला त्या कादंबरीवर आलेल्या प्रतिक्रिया वाचून जाणवत गेले. समाज बदलला आहे असे आपण म्हणतो, परंतु स्त्रीकडून मात्र त्यागाचीच अपेक्षा समाज करत असतो.

स्त्रीच्या आत्मसन्मानची आधुनिक प्रगतिवादी समजले जाणारे लोकदेखील फारशी बूज राखताना दिसत नाहीत. यांचा अनुभव तिने 'स्वामी' या चित्रपटाची पटकथा लिहिताना आला. शरदचंद्रांच्या कथेवरून ही पटकथा लिहिली होती. पण पुढे त्यांनी स्वतंत्रपणे त्या कथाबीजावर कादंबरीलेखन केले. मिनी या कथा नायिकेला त्यात शेवटी तिचा पती घरी न्यायला आलेला दाखवला आहे. परंतु तिने त्याच्या पाया पडलेले दाखवण्याची गरज नाही हे आज आपण तो सिनेमा यूट्यूबवर पाहत असताना प्रेक्षक म्हणून जाणवते. कदाचित काळ बदलला म्हणून असेल, स्त्रीला स्व-भान आलेले असल्याने असेल, पण पतीपत्नी एकमेकांच्या बाहुपाशात असलेले असा शेवट अधिक परिणामकारक ठरला असता.

हिंदीतील ती एक महत्त्वाची लेखिका मानली जाते. तिच्या कादंबरी आणि कथालेखनात महत्त्वाच्या कृती आहेत. 'एक प्लेट सैलाब', 'महाभोज', 'मै हार गयी यही सच है', 'त्रिशंकू', 'आपका बंटी' महत्त्वाच्या रचना आहेत. तिने अनेक दूरदर्शन मालिकांचे आणि चित्रपटांचे लेखनही केले आहे. 'एक कहानी यह भी' या नावाने तिचे आत्मपर लेखनही प्रसिद्ध आहे. 'रजनीगंधा', 'जीना यहा', 'स्वामी' तसेच 'रजनी' ह्या मालिकेचे लेखनही तिचेच आहे. महाभोजचे नाट्यरूपांतर झाले होते 'बिना दीवारों का घर' साहित्य अकादमीच्या पुरस्कारासह अनेक पुरस्कार तिला मिळाले आहेत. 'महाभोज'साठी उत्तर प्रदेश सन्मान. भारतीय भाषा परिषद, कलाकुंज सन्मान, महाराष्ट्र हिंदी साहित्य, हिंदी अकादमी दिल्लीशिवाय बिर्ला फाउंडेशनचा व्यास सन्मान 'एका कहाणी ये भी'ला मिळाला.

तिच्या कथा फक्त मध्यमवर्गाचेच जीवन टिपतात असे नाही तर ज्यांचे सारे जीवनच तडजोडी करण्यात जाते अशांच्या जीवनातील संघर्षही लेखिका समर्थपणे आणि संवेदनशीलतेने टिपते. तिच्या 'मजबूर' या कादंबरीत हे प्रकर्षाने दिसते. अम्मा ही त्यातील प्रमुख व्यक्तिरेखा. मायेने भरलेली, अपार कष्ट करून आपल्या मुलाबाळांना आनंदी आणि सुखात ठेवायचा प्रयत्न करणारी. प्रत्यक्षात ती कुणालाच खुश करू शकत नाही. तिला स्वत:ला समाधान असते की तिच्या ताकदीनुसार ती सारे काही करतेय. पण दैव म्हणा, परिस्थिती म्हणा, तिला साथ देत नाही. नको त्या तडजोडी तिला कराव्या लागतात. तिच्या मनाविरुद्ध कामे करावी लागतात. परिस्थितीवश ती मजबूर

असते. ते सारे वातावरण लेखिकेने अत्यंत प्रभावीपणे मांडले आहे.

तिने जोमाने लिहायला सुरुवात केली तो काळ 'नयी दुनिया' ह्या नवकथेच्या फोफावण्याचा होता. १९५०चा काळ होता. हिंदी साहित्यजगतात खूप प्रगतिशील वातावरण निर्माण होत होते. कमलेश्वर, राजेंद्र यादव, निर्मल वर्मा, भीष्म सहानी असे लोक अनेक नवनवे प्रयोग करत होते. समाजातील अनेक परंपरावादी विचारांना ही मंडळी प्रश्न विचारत होती. याचा प्रभाव मन्नू भंडारींवरही पडला. पुरुषांचा अहंगंड प्रत्येक स्त्रीला तिच्या आयुष्यात सोसावा लागत होताच. कितीही प्रगतिशील विचार असल्याचा गर्व बाळगणाऱ्या पुरुषांतही हा मीपणा असतोच. त्यात स्त्रीला दुय्यम समजण्याची वृत्ती मुळात पुरुषांत असतेच. पुरुषप्रधान समाजव्यवस्था त्यात होणारी स्त्रीची कोंडी लेखिकेला खटकत होती. त्यावर ती लिखाण करत होतीच. अगदी सुशिक्षित स्त्रीलादेखील कोंडल्यागत वाटत होते. औद्योगिकीकरणाने जुना समाजाचा ढाचा बदलत होता. बाहेरच्या जगाची आव्हाने तिला साद घालत होती, पण पत्नी, आई आणि सून म्हणून येणाऱ्या कामाचा बोजाही तिने बिनतक्रार संभाळावा अशी अपेक्षा होती. यात स्त्रीची जी तडफड होत होती ती त्या कथांतून बाहेर पडत होतीच. साहजिकच ह्याचा ताण नवीन स्त्रीला सोसवत नव्हता.

लेखिकाही सारे केवळ पाहत नव्हती तर भोगतही होती. पती राजेंद्र यांच्याशी त्यांचे खटके उडू लागले ते त्यांच्या व्यभिचारी वागण्यामुळे. एकीकडे स्त्रीस्वातंत्र्याबद्दल आस्था दाखवायची आणि दुसरीकडे आपले स्वैर वागणे पत्नीने चालवून, समजून घ्यावे अशी अपेक्षा करायची असा दुहेरी मापदंड जेव्हा अनेक समजुती घालून कायम राहिला, तेव्हा तिने त्यांना घरी येण्यापासून बंदी घातली. त्यांना घरात प्रवेशच नाकारला. कदाचित साहित्यजगतातील ही अशी पहिलीच घटना असेल की जिथे पत्नीने पतीला घराबाहेर काढलेय. तिच्या मनात पुरुषप्रधानव्यवस्थेने पुरुषांच्या व्यभिचाराला दिलेली खुली सूट, आणि त्यामुळे घरच्या चार भिंतीत सारी कर्तव्य पार पाडत जगणारी स्त्री. हा विरोधाभास अत्यंत अन्याय कारक होता नि आहे. त्याचे प्रतिबिंब तिच्या लेखनात जोमदारपणे पडलेले दिसते. हेच तिच्या लेखनाच्या लोकप्रियतेचे कारण आहे. वाचकांना त्यात समाजाचे प्रतिबिंब निखळपणे दिसते, मनाला स्पर्श करते.

विरोधाचा ध्वज ती सहजपणे उंचावते. शाळा-कॉलेजात असतानाही तिने अन्यायाविरुद्ध स्वत:च्या नफानुकसानीचा विचार न करता आवाज उठवला होता. केवळ शाब्दिक विरोध व्यक्त न करता ती अन्याय करणाऱ्याच्या विरोधात बाहेर पडली होती. समर्पण करणारीच स्त्री समाजाला नि कुटुंबाला हवी असते. ती कणाकणाने झिजत राहिली तरी तिची पर्वा नसते. लोकलज्जेसाठी, पोटासाठी घरीदारी ती सदोदित कष्टत असते. तिच्या सुखदु:खाची कहाणी लेखिका अनेकानेक साहित्यकृतीत व्यक्त करत असते.


जीवनात पुरुषाने दोन स्त्रियांवर प्रेम केले तर ते समाज, कुटुंबीय सहज सहन करतात पण स्त्रीला तसे वाटले तर ते क्षम्य ठरत नाही. 'यही सच है' ही अशीच पण निरागस कहाणी आहे. एका तरुणीला दोन भिन्न स्वभावाच्या तरुणांबद्दल वाटणारे स्वाभाविक आकर्षण, दोघांतील एकाला जीवनसाथी म्हणून निवडण्याची द्विधा आपल्यालाही विचारात पाडते. दीपा ही निशिथच्या वागण्याने कॉलेज जीवनापासून प्रभावित आहे. परंतु तो फारसा तिची काळजी घेत नसतो. घरच्यांना तो फारसा आवडत नसतो. संजय तिला द्वंद्वातून मोकळे करतो. ती निशिथला कलकत्त्याला भेटते. तो तिला मदत करतो ती संजयबद्दल त्याला सांगू पाहते, पण राहून जाते. घरी कानपूरला परत येते, मनात निशिथचेच विचार येतात. पण एक दिवस संजय अचानक हातात निशिगंधाची फुले घेऊन तिला भेटायला येतो. त्या क्षणाला तिला वाटते हाच तो क्षण आहे, ज्याची मला प्रतीक्षा होती. वाचकांना रजनीगंधा सिनेमाची आठवण झाली असेल. तिच्याच कथेवरून हा चित्रपट तयार झाला होता आणि खूप लोकप्रियदेखील झाला होता.

मन्नू भंडारीचे लेखन निखळ स्त्रीवादी आहे, पण त्यातील स्त्री स्वत:बरोबरच आपल्या लोकांचाही विचार करते. समाजात जे बदल झाले तर समाज सुखी होईल याचे निर्देशन तिचे लेखन करते.

**– संजीवनी खेर**

sanjeevanikher@gmail.com


ग्रंथाली




**मूल्य २५० रुपये**

**सवलतीत १५० रुपये**

# साहित्याग्रणींच्या साहित्याचा हृद्य जागर

## मेधा आलकरी

उन्हाची काहिली अवकाळी वाढली असताना रोज संध्याकाळी चारच्या सुमारास झुळझुळ वारं वाहायला लागावं आणि पावसाच्या गार शिंतोड्यांनी आपण नखशिखांत भिजून जावं, ताजतवानं व्हावं तसं माझं झालं. २७-२८ फेब्रुवारी आणि १ मार्च या तीन दिवसांत ग्रंथाली आणि एनसीपीए, शासनाच्या भाषा मराठी विभाग, राज्य मराठी विकास संस्था आणि बृहनमुंबई महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने दीनानाथ नाट्यगृहात 'जन्मशताब्दी स्मृतिजागर' हा नितांत सुंदर कार्यक्रम मी भान विसरून पाहिला. जुन्या डायरीची पानं उघडावीत आणि ओठांवर किंचित स्मित झळकलेलं असताना त्या रम्य आठवणींमध्ये रमून जावं, तशी मी त्या गतकाळात अगदी अलगद शिरले.

मराठी भाषादिनाच्या शुभमुहूर्तावर आरंभ झालेल्या या कार्यक्रमात एकोणीसशे चाळीस-पन्नासच्या दशकात आपल्या साहित्याची अमीट मोहोर उमटवून गेलेल्या, तीन महान विभूतींच्या साहित्यकृतींचा स्मृतिजागर साजरा झाला. नाटककार-समीक्षक विद्याधर पुंडलीक, 'ठणठणपाळकार' जयवंत दळवी आणि नवकथेचे उद्गाते- अर्थतज्ज्ञ गंगाधर गाडगीळ या दिग्गजांच्या जन्मशताब्दीवर्षात त्यांच्या कलाकृतींचा आस्वाद साहित्यप्रेमी मनमुराद लुटत होते. कथावाचन, नाट्यवाचन, त्यांच्या सहवासातील व्यक्तींशी जाहीर गप्पा, त्यांनी सांगितलेले किस्से, त्यांचे विनोदी अंग दाखवणारे उतारे आणि त्यांच्या सहचारिणींच्या आत्मचरित्रातील काही अंशाचं अभिवाचन अशा बहुरंगी कार्यक्रमातून हे थोर साहित्यकार उलगडत गेले.

पहिला दिवस समर्पित होता विद्याधर पुंडलीक यांना. त्यांच्या लेखिका कन्या, मौजच्या संपादक मोनिका गजेंद्रगडकर, त्यांचे पती अभिजित गजेंद्रगडकर यांच्यासह जातीनं हजर होत्या. संहिता त्यांच्याच सिद्धहस्त लेखणीतून उतरली होती. त्यात आपल्या सौंदर्यलक्ष्यी 'अण्णां'बद्दलचा अभिमान ठायी ठायी जाणवत होता. लेकीचं प्रेम आणि माधुर्य त्यात प्रकटलं होतं. कार्यक्रमाची सुरुवात पुंडलीकांच्या साहित्याचा आढावा घेणाऱ्या एका चित्रफितीनं झाली आणि त्यानंतर विद्याधर पुंडलीक यांच्या व्यक्तित्व आणि साहित्याची झलक दाखवणारी एक पुस्तिका प्रकाशित झाली. त्या पुस्तिकेचं संपादन ग्रंथालीच्या विश्वस्त डॉ. लतिका भानुशाली यांनी केलं आहे.

पोपटी चौकट, टेकडीवरचं पीस, माळ, देवचाफा अशा कथासंग्रहांतून प्रकाशित झालेल्या विद्याधर पुंडलीक यांच्या कथा आपण वाचतो; तेव्हा आपल्याला जाणवतं की पन्नास वर्षांनंतर त्या तितक्याच टवटवीत आहेत. आजही त्या आपल्याला मोहवून टाकतात. समीक्षक पुष्पा भावे म्हणतात, पुंडलिकाच्या कथेत अभिजात संयत असं सौंदर्य आहे. प्रीतीचा अवखळ खेळ मांडणारी 'पोपटी चौकट' ही पुंडलीकांची उत्फुल्ल आणि मनाला प्रसन्न करणारी एक गोड कथा. माझी खूप आवडती. तिचं सुरेख अभिवाचन प्रसिद्ध अभिनेते अभिजित खांडकेकर आणि अभिनेत्री गौतमी देशपांडे यांनी अप्रतिम सादर केलं. जीवनविषयक तत्त्वज्ञान गंभीरपणे आपल्या प्रेयसीला ऐकवणारा प्रियकर आणि त्याच्या गंभीरपणाला छेद देत प्रीतीचा अर्थ शोधणारी त्याची अल्लड प्रेयसी या दोघांनी प्रेक्षकांपुढे हुबेहूब उभी केली.

अभिनयातून सादर होणारा हा हुबेहूबपणा शब्दांच्या माध्यमातून साकार झालेला पाहता आला तो त्यांच्या व्यक्तिचित्रलेखनातून. 'आवडलेली माणसं' या त्यांच्या नावाजलेल्या व्यक्तिचित्रसंग्रहातील त्यांच्या आईवर, मनुताई पुंडलिकांवर लिहिलेल्या 'आवडलेलं पहिलं माणूस' या समर्पक शीर्षकाच्या लेखाचं अभिवाचन चंद्रकांत काळे यांनी इतक्या सहजतेनं केलं की वाटत होतं जणू पुंडलीक स्वतः आपल्यासमोर बसून ताईंचं चित्र रेखाटत आहेत.

आवडलेल्या माणसांसारखंच त्यांना भावलेल्या लहान-मोठ्या पाश्चात्त्य साहित्यकृतींवरही त्यांनी आस्वादपर समीक्षा लिहिली. त्याला त्यांनी नाव दिलं 'शाश्वताचे रंग!' त्यांची शीर्षकं किती समर्पक असतात त्याचा हा आणखी एक नमुना. लॉरेल अँड हार्डीनं आपल्या सगळ्यांना निरलस आनंद दिला आहे. त्या जोडगोळीचं 'जाड्या आणि रड्या- दोन अभिजात चक्रम' हे पुंडलिकांनी केलेलं नामकरणही चपखल! त्याचं अतिशय मनमोहक अभिवाचन प्राजक्त देशमुख यांनी सादर केलं; तेव्हा प्रेक्षक त्या श्वेतधवल काळात जाऊन खुदुखुदू हसत होते.

त्या श्वेतधवल काळातील 'साथसंगत' कथन करणारी आपली आई, रागिणी पुंडलीक यांच्या शब्दांत 'दाखवण्याचा' कार्यक्रम आणि साखरपुड्यानंतर पर्वतीवर 'फिरायला' जाण्याचा प्रसंग, तिथे पुंडलिकांनी त्यांना ऐकवलेला उमरखय्याम, याचं खुमासदार वर्णन त्यांच्या कन्या मोनिका गजेंद्रगडकर यांनी सादर केलं; तेव्हा प्रेक्षकांनी जोरदार टाळ्यांनी त्याला प्रतिसाद दिला.

सहस्रदलांच्या कमळासारखं व्यक्तिमत्त्व असलेल्या विद्याधर पुंडलीकाच्या लिखाणाचा आवाका आणि वैविध्य बघितलं की थक्क व्हायला होतं. महाभारतातील व्यक्तिरेखांचं, त्यातील सूडाचं, दुःखाचं आणि मृत्यूचंही त्यांना कायम आकर्षण वाटत आलं. त्याचं प्रतिबिंब त्यांच्या 'चक्र' या एकांकिकेत

पाहायला मिळतं. द्रौपदीच्या मनातील ठसठसती जखम, सूडभावना नि स्त्रीचं मातृत्व या आदिम भावनांचं अद्‌भुत दर्शन प्रमोद पवार यांनी दिग्दर्शित केलेल्या 'चक्र'मधील एका प्रवेशातून अनुभवायला मिळालं.

दुसऱ्या दिवशी जयवंत दळवींच्या साहित्याची मेजवानी होती. आदल्या दिवशीच्या कार्यक्रमाचं भारावलेपण अजून कायम होतं, तशातच ठणठणपाळकारांनी मनाचे दरवाजे ठोठावले. याही कार्यक्रमाची सुरुवात दळवींच्या साहित्यावर प्रकाशझोत टाकणाऱ्या चित्रफितीनं झाली. बारा कादंबऱ्या, सोळा कथासंग्रह, दहा विनोदी लेखसंग्रह आणि सतरा नाटकं इतकी भरगच्च लेखनसंपदा असलेल्या दळवींच्या मखमली बटव्यातून आज कोणती रत्नं निघणार याची मनात उत्सुकता होती. जयवंत दळवी म्हटलं की मला आठवतो तो विक्रम गोखले यांनी जिवंत केलेला बॅरिस्टर! पडदा पडायच्या आधी, आपल्या भावासारखा 'दत्त दत्त' म्हणत झुलत्या खुर्चीवर बसत डोलणारा, बॅरिस्टर! मात्र हा बॅरिस्टर दळवींना नक्की कुठे सापडला याची कहाणी ऐकल्यावर कथाबीजापासून वटवृक्ष कसा तयार होतो त्याचा अंदाज आला. प्राजक्त देशमुख या गुणी कलाकारानं त्यांच्या काही 'नटमंडळीं'ना बोलतं केलं. सुहास जोशी यांची राधाक्का आणि प्रदीप वेलणकरांचा भाऊराव ही पात्र तेव्हाही दस्तुरखुद्द बॅरिस्टरइतकीच मनात रेंगाळली होती. सुहासताईंच्या रुपेरी केसांची महिरप आणि प्रदीप वेलणकरांची रुपेरी झुलपं कॅलेंडरची पानं उलटत, मागे मागे जात काळीभोर झाली. नवपरिणीत जोडप्याचा संवाद आजही तितक्याच लाडिकपणानं त्यांनी सादर केला. दळवींच्या अनेक आठवणींना त्यांनी आपल्या गप्पांमधून उजाळा दिला. विजयाबाईंच्या 'झिम्मा' या आत्मचरित्रात, दळवींच्या 'अंधाराच्या पारंब्या' या कादंबरीतून 'बॅरिस्टर' नाटक उभं करताना दिग्दर्शक म्हणून काय काय तयारी केली, त्या भूमिकांसाठी त्या त्या पात्रांची निवड का आणि कशी केली याचं मनोज्ञ वर्णन आलंय. शैलेश दातार यांनी बॅरिस्टरच्या पुनरागमनात बॅरिस्टरची भूमिका तितक्याच समर्थपणे साकारली आहे. त्यांनी झिम्माचं अभिवाचन केलं.

वामन केंद्रे या आणखी एका दमदार दिग्दर्शकानं दळवींचं 'नातीगोती' हे नाटक दिग्दर्शित केलेलं सर्वांना आठवत असेलच. मतिमंद मुलाच्या आईवडिलांचं भावविश्व उलगडणारं, मन व्याकूळ करणारं दळवींचं हे एक प्रभावी नाटक. प्रेमाची नाती किती विलक्षण असतात हे दाखवणाऱ्या एका प्रवेशाचं स्वाती चिटणीस आणि प्राजक्त देशमुख यांनी केलेलं अभिवाचन मन हेलावून गेलं. नातीगोतीमधील बच्चूची अतुल परचुरे यांनी केलेली भूमिका तर अजरामर झाली. त्यांची आठवण न येती तरच नवल!

नात्यांबद्दल, स्त्री-पुरुष संबंधांबद्दल विविध अंगानी लिहिणाऱ्या दळवींचं 'ठणठणपाळ' हे सांस्कृतिक टोप्या उडवणारं ललितमधील सदर त्यांच्या नाटकांइतकंच वाचकांच्या पसंतीस उतरलं, विलक्षण गाजलं. ठणठणपाळ बनी नावाच्या मुलीला मुंबईतील एक साहित्यिक सफर घडवताहेत अशी कल्पना करून त्यांनी साहित्यिकांच्या लकबी, सवयी आणि लिखाणावर मारलेल्या शालजोड्या, आणि केलेल्या कोपरखळ्या या कलाकारांच्या तोंडून ऐकताना हसून हसून पुरेवाट होत होती.

साहित्यिक सफरीबरोबरच दळवींच्या अमेरिकन वारीची सफर सुहास जोशी यांनी घडवून आणली ती त्यांच्या प्रवासवर्णनातील 'अमेरिकन म्हाताऱ्या' हा लेख वाचून. दळवींची अचूक निरीक्षणं आणि लेखनाची अनोखी शैली याचा प्रत्यय पदोपदी येत राहिला.

अलाणे-फलाणे यांच्यातील पत्रव्यवहार ही ठणठणपाळ सारखीच फिरक्या घेणारी पत्रं. त्यांचं वाचन प्रदीप वेलणकर आणि शैलेश दातार यांनी केलं.

मात्र दळवींच्या कथा, त्यातली विविध क्षेत्रांतली पात्रं, त्यांचे नातेसंबंध, त्यातल्या विसंगती याचं अचूक दर्शन घडवतात. 'अतृप्त' ही कथा प्राजक्त देशमुख आणि स्वाती चिटणीस यांनी, त्यातील सगळे कंगोरे दाखवत इतक्या प्रभावीपणे वाचली की मन सुन्न होऊन गेलं. त्यातला दिगप्पा मनात रेंगाळत राहिला.

या कार्यक्रमाचा शेवट करताना संहिताकार राजीव नाईक यांच्या शब्दात प्राजक्तनं प्रेक्षकांना विचार करायला लावणारे काही प्रश्न विचारले. उदाहरणार्थ, दळवींनी आज कशावर आणि काय लिहिलं असतं? बुद्धीवरचा ताबा सुटलेल्या आणि नैतिकतेचा ताल सोडलेल्या कुठल्या वेडसर माणसांबद्दल त्यांनी आज लिहिलं असतं? आज ठणठणपाळानं गरीब बिचाऱ्या साहित्यिकांवर लिहिलं असतं की उन्मत्त सत्ताधाऱ्यांवर?

दळवींच्या मोठ्या हसऱ्या तस्वीरीकडे पाहत मी एकाही प्रश्नाचं उत्तर न शोधता हॉल बाहेर पडले.

या त्रिजन्मशताब्दी सोहळ्याच्या समारोपाच्या दिवशी गंगाधर गाडगीळ यांच्या साहित्यविश्वात प्रेक्षक प्रवेश करणार होते. डॉ लतिका भानुशाली यांनी संपादित केलेल्या त्यांच्या जीवनावरील पुस्तिकेचं प्रकाशन झाल्यावर त्यांच्या चतुरस्त्र लेखनाविष्काराचा पट उलगडून दाखवणारी चित्रफीत सुरू झाली. या चित्रफिती बघताना जाणवलं, की स्वभाव, कौटुंबिक परिस्थिती अशा भौतिक गोष्टींबाबत भिन्नता असली तरी त्यांनी मायमराठीची सेवा किती मनोभावे केली आहे आणि पुढील पिढीसाठी कितीतरी मोठं संचित मागे ठेवून ते गेले आहेत.

गंगाधर गाडगीळ यांना नवकथेचे उद्गाते म्हटलं जातं. सांगण्यापेक्षा कितीतरी अधिक सुचवतात अशा नवकथांचं वारं वाहू लागलं ते १९४०चं दशक, नव्या जाणिवांचं, चळवळीचं होतं. गाडगीळ अर्थतज्ज्ञही होते. त्या विषयावरील पाठ्यपुस्तकंही त्यांनी लिहिली. 'दुर्दम्य' हे टिळकांचं चरित्र

आणि इतर संशोधनपर वैचारिक लेखनही त्यांनी केलं. परंतु कार्यक्रमाची सुरुवात मात्र झाली त्यांच्या लेखणीतून उतरलेल्या एका खुसखुशीत नाटिकेपासून. शीर्षकच मजेशीर होतं– 'तरुणी आणि रहस्य'. ख्यातनाम अभिनेते पुष्कर श्रोत्री, ऐश्वर्या नारकर, अनिता दाते आणि प्राजक्त देशमुख यांनी ही नाटिका सादर केली. कथालेखन हा गाडगीळांच्या मूळ पिंड! विविध अंगांनी फुलणाऱ्या त्यांच्या कथेत गंभीर विश्लेषण आहे, विनोद, उपहास आहे, वाचकांचं स्वप्नरंजन आहे आणि अर्थगर्भ चिंतनही! अभिरुची मासिकाच्या कथास्पर्धेत पारितोषिकास प्राप्त ठरलेल्या 'कडू आणि गोड़' या कथेचं अभिवाचन रजनी वेलणकर आणि मधुरा वेलणकर साटम या मायलेकीच्या जोडीनं इतकं प्रभावी केलं की तो सर्व काळ प्रेक्षकांसमोर उभा ठाकला.

गाडगीळांच्या लोकमान्य टिळकांच्या जीवनावरील 'दुर्दम्य' या कादंबरीनं इतिहास रचला. त्या अनुभवांबद्दल सांगणारा पुस्तकाच्या प्रस्तावनेतील एक उतारा प्रमोद पवार यांनी आपल्या दमदार आवाजात वाचून दाखवला. असं संशोधनपर लेखन करणाऱ्या गाडगीळांची मनोभूमी काय होती ते त्यायोगे कळून आलं आणि संस्कारक्षम वयात वाचलेली ही कादंबरी पुन्हा वाचायची ओढ मनाला लागली.

नवउन्मेषी वातावरणात नवकथाकारांचा प्रवास जवळून पाहिलेले नवप्रकाशक पॉप्युलर प्रकाशनाचे, नव्वदी पार केलेले रामदास भटकळ तिन्ही दिवस कार्यक्रमास उपस्थित होते. गाडगीळांशी त्यांचा खास घरोबा. या बहुश्रुत, व्यासंगी, 'तरुणा'ने स्टेजवरून एकेक किस्सा सांगायला सुरुवात केली आणि त्यांच्या स्मरणशक्तीला दाद द्यावीशी वाटली. अमेरिकेहून आलेले गंगाधर गाडगीळ यांचे चिरंजीव अभिजित गाडगीळ यांनी आपल्या वडिलांच्या काही आठवणी जाग्या केल्या. गाडगीळांच्या सुकन्या कल्पना गुटमन यांनीही दृक्श्राव्य माध्यमातून प्रेक्षकांशी संवाद साधला.

सर्जनशील साहित्यिक सहसा समीक्षेच्या वाटेल जात नाहीत. मात्र गाडगीळ हे सव्यसाची साहित्यिक होते. 'साहित्याचे मानदंड' या त्यांच्या पुस्तकातून मराठी साहित्याचं अभिजात लेणं म्हणून मान्यता पावलेल्या लक्ष्मीबाई टिळकांच्या 'स्मृतिचित्रे'चं महत्त्व ऐश्वर्या नारकर यांनी सादर केलं.

कार्यक्रमाच्या शेवटाला पुन्हा ठणठणपाळकार दळवी अवतरले. दळवींनी गाडगीळांची उडवलेली खिल्ली पुष्कर श्रोत्री यांनी वाचून दाखिवली आणि लक्षात आलं की नाटककार म्हणून प्रसिद्ध असलेले दळवी आणि कथाकार म्हणून ख्याती असलेले गाडगीळ या दोघांमध्ये खट्याळपणा हा एक समान दुवा आहे. पुंडलिकाच्या पत्नी रागिणी यांच्या 'साथसंगत'प्रमाणेच वासंती गाडगीळ यांनी 'रांगोळीचे ठिपके' हे आत्मचरित्र लिहिलं. तो 'तलावातल्या चांदण्यांचा' काळ आणि त्यांचे परस्परसंबंध खुमासदारपणे उलगडून दाखवणाऱ्या पानांचं अभिवाचन करताना रजनी वेलणकर जणू वासंती गाडगीळ झाल्या. कार्यक्रमाची सांगता एका हृद्य वळणावर झाली.

आपल्या सुवर्णमहोत्सवी वर्षात असे अनेक दर्जेदार कार्यक्रम देऊन ग्रंथालीनं प्रेक्षकांना साहित्य आणि कलेच्या सुवर्णयुगात नेऊन आणलं. काळाच्या पडद्याआड गेलेल्या अभिजात साहित्याचा स्मृतिजागर घडवला. जन्मशताब्दीचं औचित्य साधून मोबाइलच्या आभासी विश्वात गुंतून पडलेल्या नव्या आणि जुन्याही पिढीला दोन–अडीच तासांची साहित्यिक मेजवानी दिली. फार वर्षांपूर्वी वाचलेलं हे वाङ्मय पुन्हा वाचण्याची इच्छा मनात निर्माण केली.

या कार्यक्रमात सहभागी झालेले कलाकार ग्रंथालीसाठी आणि या अभिजात साहित्य निर्माण केलेल्या त्रिमूर्तींच्या प्रेमापोटी उत्स्फूर्त आले. अनिता दाते नाशिकहून आली होती. आपल्या अत्यंत व्यग्र दिनक्रमातून तिनं एक दिवस तालमीसाठीही काढला होता. कार्यक्रम आटोपल्यावर लगेच नाशिकला रवाना झाली. गौतमीसुद्धा अभिवाचन झाल्यावर त्याच रात्री आठच्या गाडीनं नागपूरला गेली. मधुराचा साडेसातला दादरला मधुरवचा प्रयोग होता. 'कडू आणि गोड' या कथेचं अभिवाचन करून मग ती पार्ल्याहून दादरला गेली. या सगळ्यांना सबबी सांगून या कार्यक्रमात सहभागी होणं टाळता आलं असतं. परंतु चांगलं, दर्जेदार असं काहीतरी करायला मिळतंय म्हणून ते सहभागी झाले. मला या कलाकारांची निष्ठा भावली.

पॉप्युलर, मौज आणि मॅजेस्टिक प्रकाशनांचंही सहकार्य लाभलं. एनसीपीएचे श्रीहर्ष फेणे, डॉ. सुजाता जाधव, चित्रफितींचे लेखन–दिग्दर्शन करणारे राजीव जोशी आणि एकूणच तिन्ही दिवसांच्या संयोजनात गुंतलेले अरुण जोशी आणि या साऱ्या निर्मितीत महत्त्वाचा रोल निभावणारे सुदेश हिंगलासपूरकर यांचे श्रम निश्चितच कौतुकास्पद ठरले.

ग्रंथालीचे संस्थापक सदस्य, ज्येष्ठ पत्रकार–संपादक आणि या त्रिशताब्दी सोहळ्याचे आधारस्तंभ कुमार केतकर यांनी कार्यक्रमाच्या आरंभी केलेल्या प्रास्ताविकात ग्रंथालीच्या पन्नास वर्षांच्या कारकिर्दीचा एक धावता आढावा घेतला. 'कारवाँ' कसा वाढत गेला हे सांगताना ते म्हणाले, वाचकांच्या आणि सुसंस्कृत व्यक्तींच्या प्रेमापोटी ग्रंथालीचा हा वटवृक्ष रुजला आणि वाढला. ग्रंथाली ही एक सामाजिक आणि सांस्कृतिक चळवळ आहे. त्यात विविध चळवळींचा आविष्कार साहित्यातून आणि वेगवेगळ्या कार्यक्रमांतून होत होता. या कार्यक्रमाचं जे प्रयोजन त्यांनी विशद करून सांगितलं होतं ते अगदी शंभर टक्के यशस्वी झालं असं म्हटलं तर वावगं ठरू नये इतका हा सोहळा नेत्रदीपक झाला.

**– मेधा आलकरी**
travelkarimedha@gmail.com

# फॅण्टसी कवितासंग्रहाचे प्रकाशन




अश्विनी भोईर, मिलिंद शंभरकर, अॅड. जयंत साळवे, सिद्धांत आडे, संगीता आडे, संजीव जयस्वाल, प्रवीण दवणे, राजेश राजगडकर आणि सुदेश हिंगलासपूरकर

ग्रंथाली प्रकाशित, संगीता राजगडकर-आडे लिखित 'फॅण्टसी' या कवितासंग्रहाचा प्रकाशन सोहळा महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन क्लब, बीकेसी, बांद्रा येथे १४ फेब्रुवारी रोजी पार पडला. या प्रकाशनसोहळ्याला प्रमुख अतिथी संजीव जयस्वाल आयएएस अधिकारी, उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी म्हाडा यांच्या खुमासदार भाषणाने रंगत आणली. त्यांनी कवितेतील मर्म व जगणे याचे उत्कृष्ट विवेचन करून रसिकांना मुग्ध केले. तत्पूर्वी ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी प्रास्ताविक केले. मराठी सिनेगीतकार, प्रसिद्ध कवी प्रवीण दवणे यांच्या तरल व काव्यमय भाषणाने प्रकाशित होणाऱ्या संग्रहातील कवितांचा परामर्श घेतला. या कार्यक्रमानिमित्त भाष्यकार म्हणून अॅड. जयंत साळवे यांनी, हा कवितासंग्रह स्त्रीमुक्ती, तिच्या वेदना, सद्य:परिस्थिती, लोकांचे जगणे, वर्तमान राजकीय व सामाजिक घडण कशी उसवत आहे आदीबद्दल विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष राजेश राजगडकर यांनी कविता व कवयित्री यासंदर्भात मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले, वेदनेतून कविता जन्माला येते. तिचे मूळच ते आहे. जगासमोर स्त्री व वर्तमान याबद्दल मत व्यक्त करायला धाडस लागते, ते कवयित्री संगीता यांनी दाखवले हे महत्त्वाचे. संगीता राजगडकर-आडे या नवोदित कवयित्री आहेत, तरी त्यांच्या कविता बघता नवखेपण कुठेही जाणवत नाही. प्रगल्भ विषय, खोल आशय, प्रस्थापित व्यवस्थेबद्दल आक्रोश आणि मनातील द्वंद याचा सुरेख संगम त्यांनी कवितांमधून साधला आहे. स्त्रीचे जगणे व तिचे स्त्रीपण जपणे ह्यावर नेमके भाष्य करण्यात त्या यशस्वी ठरल्या आहेत, असे म्हणायला हरकत नाही. कवितासंग्रहाचे शीर्षक 'फॅण्टसी' असे असले तरी कविता आयुष्याचा व समाजजीवनाचा आरसा आहे.

या कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन अश्विनी भोईर यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या शिवकुमार आडे यांनी आभार व्यक्त केले.


॥ग्रंथाली॥




**मूल्य १५० रुपये**
**सवलतीत १०० रुपये**

# ‘पेरिप्लस ऑफ हिंदुस्थान’ खंड १ व खंड २ पुस्तकांचे प्रकाशन



**सुदेश हिंगलासपूरकर, सुनंदा भोसेकर, उज्ज्वला पाटील-धर, कुमार केतकर, निळू दामले, विद्याधर अमृते, अरुण जोशी, आल्हाद गोडबोले आणि राणी दुर्वे**


लिटररी क्लब, एशियाटिक सोसायटी, मुंबई आणि ग्रंथाली यांच्या संयुक्त विद्यमाने सुनंदा भोसेकर लिखित ‘पेरिप्लस आफ हिंदुस्थान (हिंदुस्थानची प्रदक्षिणा)’ या पुस्तकाच्या दोन खंडांचा प्रकाशन समारंभ, २५ फेब्रुवारी २०२५ रोजी एशियाटिक सोसायटीच्या दरबार हॉलमध्ये संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्षपद लेखक, ज्येष्ठ पत्रकार व माजी खासदार कुमार केतकर यांनी भूषवले तर वक्ते म्हणून भूगोलाचे अभ्यासक प्रा. विद्याधर अमृते, शिडाच्या नौकेतून समुद्रसफर करत पृथ्वी प्रदक्षिणा करणाऱ्या पहिल्या भारतीय महिला उज्ज्वला पाटील-धर व फिरस्ते शोधपत्रकार निळू दामले यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन ललित लेखिका राणी दुर्वे यांनी केले.

लिटररी क्लब, एशियाटिक सोसायटी, मुंबई यांच्यावतीने आलेल्या सर्व लोकांचे स्वागत लिटररी क्लबच्या अध्यक्ष मीनल क्षीरसागर यांनी केले. ग्रंथालीतर्फे लोकांचे स्वागत करताना ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी सुनंदा भोसेकर लिखित पेरिप्लस ऑफ हिंदुस्थान या ग्रंथालीच्या निर्मितीविषयी आनंद व्यक्त केला. ग्रंथालीला यंदा पन्नास वर्ष पूर्ण होत असल्यामुळे वर्षभर झालेल्या कार्यक्रमांविषयी तसेच आगामी कार्यक्रमांविषयी त्यांनी थोडक्यात माहिती दिली. लेखिका सुनंदा भोसेकर यांनी मनोगत व्यक्त करताना पुस्तक तयार करण्याबाबतचा त्यांचा विचार आणि पुस्तकाच्या विषयाचे महत्व थोडक्यात विषद केले. भुगोलाचे ज्येष्ठ अभ्यासक विद्याधर अमृते यांनी भूगोल या विषयाचे तसेच नकाशांचे असणारे महत्व व त्याविषयी शासकीय पातळीवर असणारी अनास्था याविषयीची त्यांची तळमळ बोलून दाखवली. उज्ज्वला पाटील-धर यांनी त्यांना समुद्रसफरीच्या रोचक आठवणी सांगून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. निळू दामले त्यांनी वेगवेगळ्या देशांची सफर करताना येणारे अनुभव सांगितले व सुनंदा भोसेकर यांचे सदर पुस्तक एक संदर्भ ग्रंथ म्हणून उपयुक्त ठरेल असे सांगितले. अधयक्षीय भाषणात कुमार केतकर पुस्तकाविषयी बोलताना म्हणाले की सखोल संशोधन व मेहनत करून हा दस्ताऐवज मराठी लोकांच्या हाती देण्याचे मोठेच काम सुनंदा भोसेकर यांनी केले आहे. असे प्रवाशांचे एकत्रित पुस्तक इंग्रजीतही नसेल असे मत त्यांनी व्यक्त केले. ते म्हणाले की इतिहास वाचता वाचता साहसकथा वाचत आहोत आणि साहसकथा वाचता वाचता इतिहास वाचत आहोत असे वाटेल.


या पुस्तकाला संपादकीय सहाय्य ज्येष्ठ पत्रकार आल्हाद गोडबोले यांचे लाभले आहे तर मुखपृष्ठ व आतील चित्रांची सुंदर निर्मिती अन्वर हुसेन यांनी आहे. प्रदीप म्हापसेकर यांनी पुस्तकाची मांडणी केली आहे व नकाशांचे सहाय्य उन्मेश काळे यांनी केले आहे.

हर्षद भोसेकर यांनी भोसेकर कुटुंबीयांकडून तर एशियाटिकतर्फे ज्येष्ठ लेखिका संजीवनी खेर यांनी आभारप्रदर्शन केले.


ग्रंथाली




**दोन खंडांची**
**मूल्य १५०० रु.**
**सवलतीत ८०० रु.**
**टपालखर्च**
**१०० रु. वेगळा**



# ‘माझ्या काल-शराचा प्रवास’ पुस्तकाचे प्रकाशन



श्रीनिवास शारंगपाणी, विजयराज बोधनकर, डॉ. संयुक्ता कुलकर्णी, ललिता कुलकर्णी, डॉ. संगीता गोडबोले, पद्मश्री डॉ. प्रमोद काळे, डॉ. सुरेश नाईक, डॉ. एन.एम. अशोक, डॉ. रंजन गुप्ता, डॉ. व्ही.बी. शेवरे, डॉ. राजेंद्र गोडबोले, अरविंद कोलगे आणि सुदेश हिंग्लासपूरकर

‘डॉ. पी. व्ही. कुलकर्णी यांनी अहमदाबाद येथील फिजिकल रिसर्च लॅबोरेटरी येथे भारतातील पहिल्या अवरक्त किरण खगोलशास्त्र या क्षेत्रात मोठे योगदान दिले आहे. माऊंटअबूवरील गुरूशिखरावर वेधशाळा बांधून टेलिस्कोपचीही निर्मिती केली आहे. डॉ. कुलकर्णी आपल्या कामाप्रती शिस्तप्रिय आणि जिद्दी शास्त्रज्ञ म्हणून प्रसिद्ध होते. त्यांच्या ‘ॲरो ऑफ (माय) टाइम’ या इंग्रजी आत्मचरित्राचा डॉ. संगीता गोडबोले यांनी केलेला भावानुवाद मनाची पकड घेणारा असून डॉ. कुलकर्णी यांचे व्यक्तिचित्रण आणि कार्य या पुस्तकातून आपल्या समोर येते,’ असे प्रतिपादन अहमदाबाद येथील स्पेस ॲप्लिकेशन सेंटर आणि तिरुवनंतपूरम येथील विक्रम साराभाई स्पेस सेंटरचे माजी संचालक पद्मश्री डॉ. प्रमोद काळे यांनी केले.

खगोलभौतिकशास्त्रज्ञ डॉ. पी. व्ही. कुलकर्णी लिखित ‘ॲरो ऑफ (माय) टाइम’ या मूळ इंग्रजी आत्मचरित्राचा ‘माझ्या काल-शराचा प्रवास’ या डॉ. संगीता गोडबोले यांनी भावानुवाद केलेल्या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ ७ मार्च रोजी आयोजित करण्यात आला होता. पुस्तकाचे प्रकाशन पद्मश्री डॉ. काळे यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. पुण्याच्या भांडारकर ओरिअन्टल रिसर्च इन्स्टिटट्यूट, श्री. नवलमल फिरोदिया ऑडिटोरिअम, लॉ कॉलेज रोड येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ललिता कुलकर्णी, पी.आर. एल. अहमदाबादमधील निवृत्त वैज्ञानिक डॉ. एन. एम. अशोक, आयुकातील डॉ. रंजन गुप्ता, ग्रंथालीचे सुदेश हिंगलासपूकर प्रमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

माऊंट अबू येथील टेलिस्कोपच्या बांधणीच्या काळात डॉ. पी. व्ही. कुलकर्णी यांच्याशी अनेकदा संवाद घडल्याचे डॉ. प्रमोद काळे यांनी सांगितले.

डॉ. संगीता गोडबोले पुस्तकाविषयी बोलताना म्हणाल्या, डॉ. पी. व्ही. कुलकर्णी यांचे इंग्रजीतील आत्मचरित्राचे हस्तलिखित माझ्या वाचनात आल्यानंतर एखाद्या व्यक्तीचा जीवनप्रवास कशापद्धतीने मार्गदर्शक ठरू शकतो याची जाणीव झाली. डॉ. कुलकर्णी यांच्यातील संशोधकवृत्ती, ध्येय साध्य करण्यासाठी घेतलेले कष्ट, अथक परिश्रम आणि ध्यास हे माझ्या मनाला भिडले. यातून पुढील पिढीला संशोधनक्षेत्रात येण्याची जिद्द निर्माण व्हावी या विचाराने या पुस्तकाचा मराठी भाषेत भावानुवाद केला आहे. या पुस्तकाच्या निर्मितीत अनेक दिग्गज शास्त्रज्ञ-संशोधकांची मोलाची मदत झाली आहे.

ललिता कुलकर्णी म्हणाल्या, हे पुस्तक एका असाधारण बुद्धिमान व्यक्तीचे आत्मचरित्र आहे. डॉ. पी. व्ही. कुलकर्णी यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे दर्शन या पुस्तकातून घडते. डॉ. संगीता गोडबोले यांनी स्वत:चा व्यवसाय, संसार, छंद सांभाळून अथक प्रयत्नातून उत्तम भावानुवाद केला आहे.

डॉ. एन. एम. अशोक म्हणाले, डॉ. पी. व्ही. कुलकर्णी हे माझे गुरू होते. नाईट एअर ग्लो या क्षेत्रातील संशोधनात त्यांचे योगदान मोठे आहे. एक गुरू म्हणून त्यांना आपल्या शिष्याने गुरूपेक्षाही मोठे व्हावे अशी इच्छा होती.

डॉ. रंजन गुप्ता म्हणाले, डॉ. पी. व्ही. कुलकर्णी यांनी आम्ही गुरुजी या नावे संबोधत असू. त्यांच्याकडून मला अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या. हा प्रवास आनंददायी होता. सुरेश हिंगलासपूरकर यांनी मनोगत व्यक्त केले.

डॉ. व्ही. बी. शेवरे (निवृत्त वैज्ञानिक, पी.आर.एल. अहमदाबाद), डॉ. सुरेश नाईक (निवृत्त गटसंचालक, इस्रो), अरविंद कोलगे (निवृत्त अभियंता, एएसएसी, अहमदाबाद) यांची विशेष उपस्थिती होती. सूत्रसंचालन डॉ. संयुक्ता कुलकर्णी यांनी केले तर आभार मधुवंती कुलकर्णी यांनी मानले.

●

# ‘सुवर्णकण’ पुस्तकाचे प्रकाशन




**मनीषा कदम, शिल्पा खेर, डॉ. मीना शेंडकर, डॉ. राजन गवस, दशरथ पारेकर, सुदेश हिंगलासपूरकर आणि समीर देशपांडे**

‘यशवंतराव चव्हाण यांच्यानंतर म्हणजेच १०८० नंतर शिक्षणाचे भ्रष्टाचारीकरण झाले. वरिष्ठ महाविद्यालयातील भरतीचा दर ६० लाखांवर तर माध्यमिक शाळांचा दर ३५ लाखांवर गेला. यातून नेमलेला शिक्षक प्रामाणिकपणाचे काय धडे देणार आणि त्याने झोकून देऊन अध्यापन करावे अशी अपेक्षा तरी कशी करणार,’ असा सवाल ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांनी उपस्थित केला.

डॉ. विजया वाड संपादित ‘सुवर्णकण भाग २’ या ग्रंथालीच्या पुस्तकाच्या प्रकाशन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी जिल्हापरिषदेच्या प्राथमिक शिक्षणाधिकारी डॉ. मीना शेंडकर, ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर, समीर देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. गवस म्हणाले, ‘आपली शिक्षणपद्धती माणूस किंवा नागरिक तयार करत नाही ही वस्तुस्थिती आहे. केवळ यंत्रे तयार करण्याचे काम सध्या सुरू आहे. कौशल्याधारित शिक्षण देण्याआधी माणूस घडवण्याची गरज आहे. शिक्षण सल्लागारांचा मेंदू नेमका कोठे असतो हा मला पडलेला प्रश्न आहे. किमान पंतोजी पद्धतीच्या शिक्षणामध्ये त्या मुलाचा सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केले जायचे. परंतु १९८० पर्यंत म्हणजे यशवंतराव चव्हाण होते तोपर्यंत हे चित्र होते. नंतर या क्षेत्रात भ्रष्टाचाराला सुरुवात झाली. पहिलीपासून इंग्रजी या निर्णयामुळे धड मराठीही नाही आणि इंग्रजीही येत नाही अशी स्थिती असून बारावीत गेल्यानंतर विद्यार्थ्यांच्या दुभंगल्या व्यक्तित्वाचे दोष कळायला लागतात.’ यावेळी त्यांनी भाग्यश्री फाऊंडेशनच्या रोजनिशीलेखन उपक्रमाचे कौतुक केले.

डॉ. मीना शेंडकर म्हणाल्या, आईवडिलांपेक्षाही शिक्षकांना अधिक महत्त्व असे मी मानते. कारण रयत शिक्षण संस्थेने आमच्या परिसरात सर्वेक्षण केले नसते आणि आम्ही शाळेत न जाणाऱ्या मुलींना शाळेत प्रवेश घ्यायला लावला नसता तर आज मी शिक्षणाधिकारी म्हणून येथे दिसलेही नसते. पुस्तकाच्या सहसंपादिका भाग्यश्री फाऊंडेशनच्या शिल्पा खेर म्हणाल्या, आपल्याकडे गुरुशिष्य परंपरा रुजली आहे. परंतु बदलत्या परिस्थितीत या परंपरेचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठीच या पुस्तकाची निर्मिती करण्यात आली. ग्रंथालीचे विश्वस्त हिंगलासपूरकर यांनी प्रकाशनाच्या विविध उपक्रमांची माहिती देऊन कोल्हापुरातही कार्यक्रम घेण्याची इच्छा व्यक्त केली. ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर यांनी मराठी शाळा आणि मराठी भाषा यांच्या भवितव्यावर यावेळी बोट ठेवले. पत्रकार समीर देशपांडे म्हणाले, काही गैरवर्तन करणाऱ्या शिक्षकांमुळे समाजाचा शिक्षकांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला असून अजूनही मनापासून योगदान देणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण अधिक आहे.

यावेळी मनीषा कदम, डॉ. बी. एम. हिर्डेकर, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. जी. पी. माळी, डॉ. अलोक जत्राटकर, डॉ. कल्पना मेहता, अनुराधा मेहता, जयश्री जाधव, राम देशपांडे, रवींद्र जोशी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. यावेळी या पुस्कातील लेखकांचा सत्कार करण्यात आला. तसेच निशिगंधा वाड फाऊंडेशनतर्फे रोजनिशी लिहणाऱ्या विद्यार्थिनींना बक्षिसे देण्यात आली. जयश्री देसाई यांनी सूत्रसंचालन केले.

●

# ‘नानी पालखीवाला’ पुस्तकाचे प्रकाशन



**सौरभ सोहोनी, लेखक विजय गोखले, संजीव ब्रह्मे, न्यायमूर्ती अजेय गडकरी, डॉ. शीतला गावंड आणि सुदेश हिंगलासपूरकर**

‘नानी पालखीवाला ह्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंचे दर्शन घडवणारे हे पुस्तक लहानथोर सर्वांनी वाचायला हवे असे उद्गार मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अजेय गडकरी ह्यांनी काढले. विजय गोखले लिखित ‘नानी पालखीवाला – एक सहृदयी, सुसंस्कृत वकील’ ह्या ग्रंथाली प्रकाशित पुस्तकाच्या प्रकाशन प्रसंगी ते बोलत होते. ह्याप्रसंगी ठाणे येथील नामवंत सनदी लेखापाल संजीव ब्रह्मे आणि स्वामी विवेकानंद विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शितला गावंड हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. ब्रह्मे व डॉ. गावंड ह्यांनी पालखीवाला ह्यांचे शैक्षणिक कर्तृत्व, वकिली कसब, त्यांची अंदाजपत्रकावरील भाषणे, त्यांचा दानशूरपणा ह्याविषयी माहिती दिली. ग्रंथालीचे सुदेश हिंगलासपूरकर ह्यांनी ग्रंथालीच्या पन्नास वर्षांच्या कारकिर्दीचा आढावा घेऊन आगामी काळातील कार्यक्रमांची माहीती दिली व डोंबिवलीकर नागरिकांनी त्यात सहभागी व्हावे असे आवाहन केले.

कार्यक्रमाला डोंबिवलीतील ज्येष्ठ वकील श्रीकांत गडकरी, ज्येष्ठ समाजसेवक व डोंबिवलीच्या वाटचालीचे साक्षीदार श्रीकांत पावगी, ज्येष्ठ समाजसेवक भालचंद्र लोहकरे, डॉ. ललिता नामजोशी, शशिकांत भाटे, मानसी मडके, डॉ. पेटकर, डॉ. निखिल सातभाई, रोटरी क्लबचे शैलेश गुप्ते, पर्यावरण प्रेमी वर्षा शिखरे, संतसाहित्याच्या लेखिका रजनी परचुरे, ज्येष्ठ विचारवंत श्रीकांत कुलकर्णी, आर्किटेक्ट भिंगारडे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.


‘नानी पालखीवाला – एक सहृदयी सुसंस्कृत वकील’ ह्या पुस्तकाचे प्रकाशन ८ फेब्रुवारी २०२५ रोजी ब्राह्मण सभा, डोंबिवली पूर्व येथे करण्यात आले.

स्वामी विवेकानंद विधी महाविद्यालय डोंबिवलीच्या प्राचार्या डॉ. शीतला गावंड, विख्यात सनदी लेखापाल संजीव ब्रह्मे, ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर हे प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होते. नानी पालखीवाला ह्यांची कौटुंबिक पार्श्वभूमी, त्यांचा वाचनाचा छंद, देशासाठी त्यांनी केलेली वकिली, टाटा समूहातील त्यांचे कार्य, त्यांचे जीवनविषयक तत्त्वज्ञान, त्यांची सुसंस्कृतता व आध्यात्मिक वृत्ती, त्यांचा दानशूरपणा व त्यांची ग्रंथसंपदा ह्यांची माहिती देणारे हे चरित्रात्मक पुस्तक आहे.

कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन सौरभ सोहोनी ह्यांनी केले.

●

॥ग्रंथाली॥




**मूल्य २०० रुपये**
**सवलतीत १२० रुपये**




# ग्रंथपरिचय



डॉ. निर्मोही फडके
९९२०१ ४६७११

## गोष्ट मेंढा गावाची

**मिलिंद बोकील**




गोष्टी माणसांच्या असतात. गोष्टी प्राण्यांच्या असतात. गोष्टी देवादिकांच्या असतात. गोष्टी पुराणांच्या, युद्धांच्या, राजा–महाराजांच्या असतात, पण एखाद्या गावाची गोष्ट फार कमी वेळा लिहिली जाते.

साधना प्रकाशनानं प्रकाशित केलेलं एक पुस्तक आपल्याला एका गावाची गोष्ट सांगतं. 'गोष्ट मेंढा गावाची'. ज्येष्ठ साहित्यिक मिलिंद बोकील लिखित ह्या पुस्तकाचा विषय, आशय, धाटणी, मांडणी इ. वेगळं आहे.

भारतीय उपखंडाचा साधारण २२ ते २४% भूभाग वनांनी व्यापलेला आहे, असं २०२१ साली केलेल्या एका अधिकृत सर्वेक्षणात नमूद केलं आहे. ही आहे भारतातल्या वनसंपदेची आजची मोजमापं. मात्र जेव्हा अनेक शतकांपूर्वी ह्या उपखंडाचा जास्तीत जास्त भूभाग हा वनांनी व्यापलेला होता, तेव्हा त्या वनांतल्या

नैसर्गिक घटकांवरच उदरनिर्वाह करणाऱ्या आदिवासींच्या नैसर्गिक जगण्याला एक अंतर्गत लय होती. ताल होता. प्रगती किंवा विकासाच्या चौखूर उधळलेल्या वारूनं ह्या वनसंपदेचा आणि पर्यायानं ह्या वनपुत्रांचा ऱ्हास करायला सुरुवात केली.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर वाढत जाणाऱ्या शहरीकरणानं अनेक अकराळविकराळ प्रश्नांना, नव्हे समस्यांना जन्माला घातलं. त्यामध्ये मुख्य समस्या होती आणि आहे ती जंगलतोडीची आणि आदिवासींच्या मुळांना उखडण्याची. मात्र ह्या पुस्तकात आपल्यासमोर एका अशा गावाची कथा साकारत जाते, जी वाचल्यावर आपल्या डोळ्यांवर आपणच बांधून घेतलेली तथाकथित आधुनिक किंवा ग्लोबल विचारांची झापडं गळून पडली नाहीत, तरच नवल.

महाराष्ट्रातल्या गडचिरोली जिल्ह्यापासून पूर्वेला असलेल्या मेंढा आणि त्याच्या शेजारी असलेल्या लेखा ह्या गावांच्या संघर्षाची ही कथा केवळ वाचनीय नाही, तर चिंतनीयही आहे. गोंड माडिया जमातीचे इथले आदिवासी. बांबू, तेंदूपानं, मोहाची फुलं आणि असंख्य औषधी वनस्पतींनी संपन्न असलेलं इथलं पानझडीचं वन. 'जैवविविधता कायदा २००२' अन्वये इथल्या आदिवासींनी आपलं 'जैवविविधता रजिस्टर' बनवलं आहे. प्रत्यक्ष मिळणाऱ्या वनोपज गोष्टी आणि जंगलातल्या कामांतून मिळणारी मजुरी ही इथल्या आदिवासींच्या आर्थिक उत्पन्नाची साधनं आहेत. गावाभोवतीचं जंगल हे ह्या आदिवासींसाठी जीवनसर्वस्व आहे आणि त्या जंगलावरील आपला अधिकार राखून ठेवण्यासाठी ह्या आदिवासींनी सरकारलाही कशी झुंज दिली, हे मुळातूनच वाचण्यासारखं आहे. तीच आहे, 'गोष्ट मेंढा गावाची'.

'निस्तार हक्क', 'देवाजी तोफा ह्या नेतृत्वाचा जन्म', 'भूदान चळवळ', 'आमच्या गावात आम्हीच सरकार' ही चळवळ, सत्याग्रह, 'जंगल बचाव, मानव बचाव' आंदोलन, बांबू तस्करीविरोधात जागृती, डॉ. बंग दाम्पत्याचं मौलिक कार्य, लोकबिरादरी प्रकल्पाचं योगदान, दारुबंदीसाठी स्त्रियांचा सहभाग, गोटूल ह्या गोंड समाजाच्या पारंपरिक रचनेबद्दल त्या समाजानं दिलेला लढा, गावकऱ्यांनी स्वतःच्या हिमतीवर आखलेलं वन व्यवस्थापन, जंगल संरक्षण आणि संवर्धनासाठी घेतलेले कष्ट... अशा अनेकानेक उपकथानकांनी ह्या गोष्टीला इतकं सशक्त बनवलं आहे की, वाचतावाचता अशा प्रत्येक वळणावर आपण थक्क होतो.

'सर्वसहमती'चं आधुनिक आणि व्यवहारात कठीण वाटणारं लोकशाही तत्त्व आपल्या गावात राबवणाऱ्या ह्या आदिवासी गावकऱ्यांचं कौतुक वाटतं आणि आश्चर्यही. आज वैश्विक पातळीवर तंत्रज्ञानानं समृद्ध असणाऱ्या अल्ट्रा मॉडर्न सोसायटीमध्ये हे मूल्य औषधालाही सापडत नाही. इथे लेखकांनी लिहिलेलं एक वाक्य अतिशय महत्त्वाचं आहे, ते असं, 'सर्वसहमती' ही करून पाहण्याची गोष्ट आहे.'

मेंढा ह्या गावातील आदिवासी, जे तिथे स्थायिक झालेले आहेत, त्यांनी स्वातंत्र्योत्तर काळात आपल्याच सरकारविरोधात हटवादी लढा न देता जगण्यातलं सौहार्द सत्तेशी जोडलं हे अभूतपूर्व अशासाठी आहे की, त्यांनी 'सत्ता' हा विषय आपल्या जडणघडणीत केंद्रस्थानी ठेवला. इतर आदर्श गावांप्रमाणे त्यांनी केवळ वरवरच्या सुंदर संकल्पना मांडून गाव सुशोभित केलं नाही. प्रत्येक प्रश्नाचा त्यांनी कळत नकळतपणे 'सर्वसहमती तत्त्वा'वर विचार केला, हे आजच्या स्वार्थी समाजकारणात अनोखं आहे.

मेंढा गावाबद्दलची ही गोष्ट ज्येष्ठ साहित्यिक मिलिंद बोकील ह्यांच्या प्रवाही निवेदनातून आपल्यापर्यंत पोहोचते. ती ऐकीव नाही. त्या निवेदनाला त्यांच्या प्रत्यक्ष निरीक्षणांची, अनुभवांची जोड आहे. आपल्याच राज्यातल्या एका टोकाला असलेल्या, वनसंपत्तीनं समृद्ध अशा भूमीला तिथल्या वनपुत्रांनी जिवाच्या करारानं कसं जपलं आहे, हे ह्या गोष्टीतून समजून घेणं, हे एक वाचक म्हणून आपलं कर्तव्य आहे. आपल्याला विचारप्रवृत्त करणाऱ्या ह्या लेखकांच्या शब्दांनी ह्या प्रस्तुत लेखाला विराम...

'तंत्रज्ञानाने प्रगती झालेली असली तरी मानवी जीवन स्वस्थ आणि सुरक्षित नाही; समुदायात जगताना निरामय, आनंदी, निर्भय जीवनाचा प्रत्यय येत नाही. मात्र या गोष्टींची तहान माणसाला कायमच आहे आणि म्हणून अशा उदाहरणांचा मानवी मन सदैव वेध घेत असते. मेंढा हे असले एक उदाहरण आहे.'


**गोष्ट मेंढा गावाची**
लेखक – मिलिंद बोकील
मूल्य – ₹३००/–
साधना प्रकाशन

## ग्रंथपान



**चांगदेव काळे**
**९८६९२०७४०३**

**वाट रेशमी..**
**प्रवीण दवणे**



### गीते आठवणींची आठवणीसह

'ज्या गाण्याने खऱ्या अर्थाने चित्रपटगीत-लेखनाचे दरवाजे उघडले गेले ते हे गाणे! खरे तर असे गावरान गाणे माझ्यासारखा मराठी प्राध्यापक लिहू शकेल का, याबद्दल महेश कोठारे यांना थोडी शंका असावी. कारण अजून त्यांची आणि माझी भेट झालेली नव्हती. अजूनही अनिल मोहिले यांच्या घरातील ती दुपार कालच्या ताजेपणाने माझ्या डोळ्यासमोर येते. सर्व श्रेय अनिल मोहिले यांनाच आहे. त्यांचा आणि माझाही हा पहिलाच चित्रपट. त्यांनाही 'धुमधडाका'सारखे प्रचंड व्यावसायिक यश मिळालेल्या निर्माता-दिग्दर्शकासाठी माझे नाव सुचवावेसे वाटले, हेही नवलच!'

प्रवीण दवणे यांचा खरा परिचय आहे तो प्राध्यापक प्रवीण दवणे आणि कवी प्रवीण दवणे. मग त्यात भर पडली ती गीतकार प्रवीण दवणे यांची. यातील कवी म्हणून त्यांनी स्वतःच्या कवीपणाविषयी अनुभवावर आधारित असे अनुभवगीत न लिहिता इतर अनेक मान्यवर कवींच्या काव्याविषयी मनापासून लिहिलेले आहे. त्यांचे स्वतःचे म्हणून असे जवळजवळ दीडशेहून अधिक ग्रंथ प्रकाशित आहेत. साहित्यातील जवळजवळ सर्व प्रकारच्या साहित्यप्रकारात इतके विपुल लेखन करूनही गेली चाळीस वर्षे ते गीतलेखन करत आहेत. गीतकार हा कवी असतो की नाही, किंवा कवी हा गीतकार असतो की नाही, असा वादाचा विषय जिथे गळून पडावा ते अपवादाचे स्थान म्हणजे प्राध्यापक प्रवीण दवणे.

चित्रपटलेखनात भावगीतापासून विरहगीतापर्यंत, अंगाई, पोवाडा, लावणी असे अनेक टप्पे येतात. द्वंद्वगीत, कोरस, त्यात पुन्हा शहरी-ग्रामीण हा भेद आहेच. या सगळ्यांना सामोरे जाताना जातिवंत कवीला कस लावताना स्वतःला पुन्हा पुन्हा किती पारखून घ्यावे लागते हे तो कवीच जाणे. लिहिली कविता किंवा गीत आणि दिले संगीतकाराच्या हातात, की झाला मोकळा, इतका हा सरळसोपा मार्ग नाही. मी लिहिलेले आहे हेच अंतिम असा मिजासखोरपणा तिथे उपयोगाचा नाही. कथावस्तू, तिचे स्वरूप; गीतासाठी असलेली पार्श्वभूमी, प्रसंग अथवा वास्तव; चित्रपटदिग्दर्शक व्यक्त करील ती अपेक्षा, या सगळ्यांना न्याय द्यावा लागतो. सगळ्यात कठीण प्रकार आहे तो संगीतकाराने दिलेल्या संगीताच्या लयीचा शब्दात रूपांतर करण्याचा प्रवास. संगीतकार चाल बांधणार आणि त्यावर गीत लिहायचे त्याच्या मीटरमध्ये, तेही चित्रपटात ज्यांच्यावर हे गाणे चित्रित केले जाणार आहे त्या व्यक्तिरेखांचा, त्यात भूमिका साकार करणाऱ्या कलावंतांचा विचारही समोर ठेवावा लागतो. अशा तारेवरच्या कसरतीला सामोरे जाणे वाटते तितके सोपे नाही. त्यातून समोर प्रथितयश कलावंत, संगीतकार आणि दिग्दर्शक असतील तर त्या सगळ्यांना न्याय देण्याची भूमिका ही गीतकाराला घ्यावी लागते. आपल्यातला कवी जिवंत ठेवून प्रेक्षकांना आकलन होईल अशा सोप्या शब्दांत व्यक्त होणे, ही किमया अनुभवी, मुरलेला आणि शब्द-काव्यांच्या जातकुळीत रमलेला प्रतिभासंपन्न कवीच करू शकतो. ते शिवधनुष्य प्राध्यापक प्रवीण दवणे यांनी लीलया पेललेले आहे. त्या गीतांची काही उदाहरणे अनुभवासह आपल्यासमोर ठेवलेली आहेत.

सचिन पिळगावकर, महेश कोठारे, यांच्यासारख्या दिग्गज कलावंत आणि दिग्दर्शकांच्या सोबत गीतलेखनाची कामगिरी दवणे यांनी सशक्तपणे पार पाडलेली आहे. अनिल मोहिते, अशोक पत्की, राम कदम यांच्यासारख्या थोर प्रसिद्ध संगीतकारांच्या सोबत त्यांनी दिलेल्या चालींच्या बरहुकूम गीतलेखन सशक्तपणे केलेले आहे. या प्रवासात अनेक संगीतकार, दिग्दर्शक यांच्यासोबत काम करण्याची संधी दवणे यांना मिळाली. या सगळ्यांनी त्यांच्या कामाबाबत कौतुकाची शाबासकी दिलेली आहे.

लता मंगेशकर, आशा भोसले, सुरेश वाडकर, महादेवन यासारख्या प्रथितयश स्वरांनी दवणे यांच्या गीतांना आपल्या कंठाशी एकरूप करून घेतलेले आहे. असे भाग्य लाभलेले अनुभवांचे संचित आपल्याला 'वाट रेशमी' या ग्रंथातून भेटीस आलेले आहे.

'गीतलेखन करीत असताना प्रत्येक गीतासोबत गीतकार नव्याने जन्म घेत असतो.'

'चित्रपट गीतरचना म्हणजे उस्फूर्ततेचा लेखणीने केलेला अभिनय म्हणता येईल', 'प्रेमगीत म्हणजे चित्रपटाचे हृदय असते, या हृदयाने रसिकांची हृदये काबीज करायची असतात', असे दवणे म्हणतात त्याचा प्रत्यय हे लेखन वाचत असताना येतो.

रसिक वाचक आणि या क्षेत्रात येऊ पाहणाऱ्या गीतकारांसाठी मार्गदर्शक ठरावे असे हे लेखन आहे. याची दोन भागांत विभागणी केलेली आहे. पहिल्या भागात काव्यात्मकता जपलेली गाणी आहेत. गाण्यापूर्वी प्रसंग व काही घटना आहेत. त्यातून रचनेची प्रक्रिया समजून येते. या भागाला 'जगणेच गाणे असावे!' असे शीर्षक आहे. चित्रपटातील गीतलेखन करताना अंगभूत काव्यात्मकता असावी लागते, त्याच्या जोडीला अनेक कारणांमुळे तंत्राचा आधार घ्यावा लागतो. याला कवीने जपायचे भान असेदेखील म्हणता येईल. हा दुसरा भाग असून याचे शीर्षक आहे 'चिंब भिजलेले.' या दोन्ही भागांतून गीतकाराची कुशल प्रतिभा जशी लक्षात येते, तशीच दिग्दर्शक आणि संगीतकार यांच्या दूरदृष्टीचाही प्रत्यय येतो.

या ग्रंथाला सुप्रसिद्ध संगीतकार अशोक पत्की यांचे अनुभवसंपन्न अशी प्रस्तावना आहे. त्यांनी दवणे यांच्या पाठीवर दिलेली कौतुकाची थाप, ही दवणे यांना मिळालेल्या अनेक पुरस्कारांची आणि अनेकांनी केलेल्या कौतुकांची शोभा वाढवणारी आहे.


हेमंत जोशी यांनी साकारलेले मुखपृष्ठ शीर्षकाइतकेच आशयसंपन्न आहे.

**मूल्य ३५० रुपये । सवलतीत २१० रुपये**

# ग्रंथपान

## क्षण... सोनेरी... रुपेरी आणि... काटेरी

**आनंद इंदिरा-श्रीधर सांडू**



**मागे वळून पाहताना**

'ज्या कोणी आपल्या भावना, मनातला आशय प्रथम ताडपत्रावर/कागदावर उतरवला, त्याने खरोखरीच माणसाच्या भावजीवनाला अवकाश दिले! आपण कागदावर जे लेखणीने लिहितो ते असतात मनात हुंकारलेले फक्त काही शब्द! काही कौतुकाचे – आनंदाचे, तर काही धीर देणारे, सांत्वन करणारे! हे सगळे शब्द मनापासून लिहिलेले असतात आणि म्हणून तर जाणवत राहते की आपल्या शब्दसाधनेने आपण खूप जणांशी, एका अदृश्य; पण अतूट अशा 'नात्यापलीकडच्या धाग्यांनी 'जोडले गेलोय!'

आयुष्याच्या वाटेवरून प्रवास करताना आपल्या मागे आपल्या अस्तित्वाच्या पाऊलखुणा वाट जपून ठेवत असते. ही वाट कधी खूप आनंदाच्या शिखराकडे घेऊन जाते, तर कधी पाय रक्तबंबाळ करणाऱ्या खाईकडे. कधी चालण्याची इच्छाच मारून टाकते. तरीही आपण चालत राहतो अव्याहतपणे. पुढे कधीतरी असा एक क्षण येतो की ज्या वेळेस मागे वळून पाहावे असे वाटते. त्यावेळेस आपल्याच पावलांच्या खुणा आपल्याला खुणावताना दिसू लागतात. या खुणा काही स्पष्ट काही धूसर तर काही खूप खोलवर दडलेल्या असूनही त्यांचे अस्तित्व दाखवत राहतात. या सगळ्यांना आपण आनंद, दुःख, समाधान, यश, कर्तृत्व अशा मोजमापाच्या पट्टीतून पाहतो. यावेळी अनेक भावभावनांचा कल्लोळ सोबत असतोच, तसाच कर्तृत्वाच्या अनेक क्षणांचे एक मोहोळ दिसू लागते. त्यांना आपण अक्षरांच्या मोहोळात साठवले तर एक सुंदर असा मधाचा गर साकारतो. त्यांच्या व्यावसायिक भाषेत 'नफा नुकसानीचे अनुमान म्हणजे ताळेबंद!' अगदी तसाच ठेवा आनंद सांडू यांनी आपल्या हाती दिलेला आहे. त्याचे नाव आहे 'क्षण सोनेरी रुपेरी आणि काटेरी.'

सांडू ब्रदर्स हे नाव ऐकताच आपण आपल्या परिचयाच्या जिव्हाळ्याच्या औषधी कंपनीकडे पटकन वळतो. त्याच घराण्यातील आनंद सांडू हे सांडू ब्रदर्सची यशस्वी गाथा आपल्यासमोर ठेवतात, तशी त्यांच्या कर्तृत्वाची गाथादेखील आपल्यासमोर ठेवतात. आनंद सांडू हे खरे तर साहित्यिक. त्यात काव्याचा भाग खूप मोठा आहे. त्यामुळे त्यांच्या उद्योगसमूहात जितके ब्रँड यशस्वी म्हणून आपल्या परिचयाचे आहेत तितकेच यशस्वी साहित्यिक, कवी, गायक अशा कलावंतांचाही गोतावळा त्यांच्याभोवती असून ते त्यात एकरूप झालेले आहेत, असे दिसून येते. अशोक नायगावकर, अरुण म्हात्रे, सतीश सोळंकूरकर यांच्या सोबतच व.पु. काळे, गिरिजा कीर, पंडित जितेंद्र अभिषेकी, कुमारगंधर्व, भीमसेन जोशी, अशा थोर मान्यवरांच्या मांदियाळीतील आनंद सांडू हे एक वेगळे रसायन आहे, याचा परिचय या पुस्तकातून होतो

आनंद सांडू वैयक्तिक आयुष्यात सीए म्हणजेच चार्टर्ड अकाउंटंट आहेत. स्वतःच्या उद्योगाशी ते जोडलेले आहेत त्याचप्रमाणे बँक, शाळा यांच्याशी त्यांचे कार्यक्षेत्र जोडलेले आहे. कविसंमेलने, साहित्य संमेलने, गायनमैफिली, रसिक मंडळ यातून ते जसे कवी व रसिक म्हणून वावरतात तसे एक मुलाखतकार, व्याख्याता, म्हणूनही ते लीलया सहभागी झालेले आहेत. या सगळ्यातून त्यांचा प्रचंड व्यासंग, आवड आणि प्रतिभासंपन्न समूहात राहण्याची रुची दिसून येते. त्यामुळे त्यांच्याकडे असलेल्या अनुभवाचा प्रचंड खजिना अगदी मोजक्या शब्दांत आणि नेमकेच अनुभव अशा स्वरूपात ते आपल्यासमोर मोकळा करतात.

'दत्तात्रेय कृष्ण सांडू प्रतिष्ठान' स्थापन करून त्यांनी आपले सामाजिक दायित्व सिद्ध केलेले आहे. विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा, त्यांच्या कलेचा सन्मान झाला पाहिजे हा ध्यास आणि त्याच जोडीला सामाजिक भान म्हणून मदतीचा हात पुढे करणे हा उदात्त हेतू प्रत्यक्षात साकार केलेला आहे. ते आपल्या सोबतच्या मान्यवरांच्या विषयी जितक्या सहजपणे लिहितात त्याच पद्धतीने आपल्या कुटुंबातील व्यक्तींचा कर्तृत्व सिद्ध करणारा परिचय करून देतात. त्यात स्तुतीचा भाग वगळून इतरांना मार्गदर्शक ठरावा असा नेमकाच कर्तृत्वाचा भाग उलगडतात. त्यांची लेखनाची शैली प्रसन्न आहे. वक्ता म्हणून सहजपणे संवाद साधावा त्याप्रमाणे. इतर कवींच्या काव्याविषयी भरभरून बोलतात. मात्र स्वतःच्या कविता त्याच दर्जाच्या असूनदेखील त्यांच्याविषयी असणारे कौतुक ते अगदी विनम्रपणे बाजूला ठेवतात. हा विशेष वेगळाच!

स्वतःच्या आयुष्याकडे तटस्थपणे पहात जो ताळेबंद त्यांनी मांडलेला आहे तो एका व्यावसायिकापेक्षा एका रसिक साहित्यिकाचा आहे, असेच वाटत राहते. प्रत्येक प्रकरणाला स्वतंत्र शीर्षक दिलेले आहे. त्यात आलेली पत्रे, पाठवलेली पत्रे, काही अनुभव, काही कविता, तसेच काही हस्तलिखित स्वरूपाची कामगिरी आपल्यासमोर ठेवलेली आहे. या सगळ्या आठवणींना ते 'क्षण' असे नाव देतात; परंतु त्या खूप मोठा आशय सोबत घेऊन आलेल्या आहेत. 'जिथे कधीच 'उतराई' होता येत नाही ती असते आपली आई! आणि ज्यांच्या आधाराने आपल्या व्यक्तिमत्त्वाचा 'गाभा' बनतो ते असतात आपले बाबा!', 'आठवणी श्रावणातल्या पावसासारख्या असतात. ऊनपाऊस असायचाच, आपण जपायची ती पालवी!','माणसं वाचता यायला हवीत, पुस्तकासारखी. कविता कुठून येते? आसपास तर असते आणि आपल्या सोनेरी क्षणी कागदावर उतरते!'

आनंद सांडू यांची 'जे तुला स्मरले अचानक', 'आजीच्या हातात दुधाची साय', 'शब्दफुले ही अंतरीची', 'सांजसावल्या', 'आज बांधून गाठोडे दुःख खुंटीला टांगले' ही पुस्तके प्रकाशित आहेत. त्यासाठी त्यांना अनेक मानाचे साहित्यपुरस्कार प्राप्त झालेले आहेत.

आशयसंपन्न मुखपृष्ठ सतीश भावसार यांनी साकारलेले आहे.

**मूल्य २५० रुपये । सवलतीत १५० रुपये**

# ग्रंथपान

**आरोग्याचे डोही**

**डॉ. उज्ज्वला दळवी**




**आरोग्य असे जपा**

'सकाळी उठल्यावर झोप येत असेल तर ठरावीक वेळेस उठून बाहेर सूर्यप्रकाशात एक फेरफटका मारून यावं. आपल्या शरीराचं स्वतःचं अंतर्गत घड्याळ असतं; पण ते २४ तासांचं नसून २५ तासांचं असतं. म्हणून रोज बाहेरच्या प्रकाशावरून त्याच्यातली वेळ रिसेट करावी लागते. त्यानं दिनचक्र सुरळीत चालू राहतं.'

निरोगी आरोग्य हा उत्तम दागिना आहे, असे म्हटले जाते; परंतु अलीकडच्या एकूण धकाधकीच्या जीवनात आणि बदललेल्या जीवनशैली व आहारशैलीमुळे आरोग्याची हेळसांड होत असल्याचे दिसून येते. वास्तविक आरोग्य निरोगी राहावे यासाठी फार काही करावे लागते अशातला भाग नाही. परंतु तिकडे दुर्लक्ष होते आणि मग अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. व्यायामाचे महत्त्व तर सगळेच सांगतात; परंतु व्यायाम म्हणजे काय, त्याचे प्रकार कसे आहेत आणि ते कितपत करायला हवेत, हेच आपल्याला कळत नाही. खरे तर खूप लहान लहान गोष्टी आहेत. त्यांचा साकल्याने विचार केला तर, त्यानुसार आपण त्यांना नीट समजून घेतले तर, आपण निरोगी दीर्घायुष्य जगू शकतो हे सांगण्यासाठी कुणी असण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. ती निकड लक्षात घेऊन डॉक्टर उज्ज्वला दळवी यांनी 'आरोग्याचे डोही' हा ग्रंथ आपल्या हाती दिलेला आहे.

या ग्रंथात एकूण ५२ लेखांचा समावेश आहे. या लेखांइतक्याच संख्येने विषय हाताळले आहेत. लहान लहान वाटणारे विषय, काही खूप बाऊ करावा असे विषय. परंतु त्यांचे नीट आकलन झाले तर एक वेगळेच समाधान आपल्यासमोर उभे राहते. जेवणात तंतुमय, यांना आपण फायबर म्हणतो, असे घटक असतील कसा उपयोग होतो. ज्वारी, बाजरी, मका, नाचणी, गहू यांचे प्रमाण कसे असावे, पैकी गव्हाचे प्रमाण एकूण वापरामध्ये अधिक आहे, ते का आहे? त्यामध्ये असलेला 'ग्लुटेन' हा घटक कसा उपयुक्त आहे, त्यामुळे पचनक्रियेसाठी व एकूण आरोग्यासाठी त्याचा कसा उपयोग होतो हे आपल्याला 'कानफाट्या गहू' या लेखांमधून लक्षात येते.

शरीरात जीवनसत्त्वांची कमतरता असेल तर त्यातून निर्माण होणारे आजार हे आपणास परिचित आहेत. तरीही आपण त्याकडे दुर्लक्ष करतो. आहारात जीवनसत्त्वाचे प्रमाण दररोज किती असायला हवे, हे प्रमाण लक्षात आले तर अनेक समस्यांना सामोरे जाण्याची वेळ येणार नाही, हे आपल्याला 'अती सर्वत्र वर्ज्यते' या लेखातून वाचायला मिळते. तीच गोष्ट पालेभाज्यांच्या विषयी. भाज्या ताज्या ठेवण्यासाठी आपल्या ज्या कल्पना आहेत त्यांना थोडेसे सुधारून घेतले तर खूप उपयुक्त ठरू शकतात. त्यासाठी 'ताजी ताजी भाजी' हा लेख वाचावा.

गोड म्हटले की तोंडाला पाणी सुटणे स्वाभाविक आहे, परंतु गोड म्हणजे साखरच हा जो समज आहे तो थोडासा दूर व्हायला हवा. आज उपलब्ध असलेल्या आणि बाजारात विकल्या जाणाऱ्या अनेक पदार्थांमध्ये साखरेऐवजी सॅकरिन, ॲस्पार्टेम, सायक्लॅमेट, स्युक्रालोज ऊर्फ स्प्लेंडा, स्टेव्हिया, थाउमॅटीन व सॉर्बिटॉल यासारखे अनेक घटकांचा समावेश केलेला असतो हे आपल्या लक्षातही येत नाही. साखरेबाबत जागरूक असणाऱ्या उपासकांसाठी हा 'साऽऽखरेऽऽहूनी गोऽऽड' अभंगासारखा नक्कीच जिव्हाळ्याचा वाटू शकेल.

केसांबाबतची जागरूकता आणि सतत होणारा त्याविषयीच्या जाहिरातींचा अतिरेक यांचा समन्वय साधताना अनेकांची तारांबळ उडते. खरे तर या केसांच्या मुळांपर्यंतचे वास्तव काय आहे हे समजून घेण्याची खरी गरज आहे. ती समजून घेतली तर अनेक समस्या समस्या वाटणार नाहीत. यासाठी यासाठी 'केस गेले सुट्टीवर' हा लेख जरूर वाचावा.

खरे तर प्रत्येकाच्या संग्रही असावा असा हा बटवा आहे. प्रत्येक लेखातून दिलेली माहिती ही संशोधनावर आधारित आहे. त्यासाठी अनेक संदर्भांचा त्यात समावेश आहे. विज्ञान, पर्यावरण, आपल्या भोवतीचे वातावरण, परिस्थिती या सगळ्यांचा सम्यक विचार घेऊनच हे लेखन झालेले आहे. साध्या साध्या उदाहरणांमधून, सहज घडणाऱ्या संवादातून त्यांचे महत्त्व नेमकेपणाने पटवून देण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. तिथे आपण वेगळे काहीतरी सांगतो आहोत हे स्पष्टच आहे; परंतु त्यात एक ममत्वाचा भाग आहे, कुटुंबाची काळजी घेताना घरातील वडीलधारी मंडळी समजावून सांगतात त्याप्रमाणे. वैज्ञानिक शब्दांना पर्यायी शब्द जोडून शक्य तितके सोपे करून सांगण्याचा प्रयत्न तरच स्तुत्य म्हणायला हवा. हे लेख यापूर्वी नियतकालिकांमधून नियमितपणे प्रकाशित झालेले आहेत. त्यावेळी आपण त्यांचा आनंद घेतलेला आहेच परंतु आताही ते एकत्रित स्वरूपात वाचत असताना तोच आनंद मिळतो. नियमितपणे आनंदात आपल्याला चिंब राहायचे असेल तर निरोगी राहणे आवश्यक आहे. अर्थात त्यासाठी 'आरोग्याचे डोही' हा ग्रंथ नक्कीच उपयुक्त ठरू शकतो.

डॉ. बाळ कोंडके यांनी या ग्रंथासाठी अतिशय सुंदर प्रस्तावना दिलेली आहे.

डॉक्टर उज्ज्वला दळवी या उच्चविद्याविभूषित आहेत. हिंदुजा, केईएम, डी.वाय. पाटील येथे त्यांना वैद्यकशास्त्र अध्यापनाचा अनुभव आहे. याशिवाय 'सोन्याच्या धुराचे ठसके', 'जेनेटिक्स कशाशी खातात' ही त्यांची पुस्तके प्रकाशित आहेत.


सतीश भावसार यांनी अतिशय सुंदर मुखपृष्ठ साकारलेले आहे.

**मूल्य ४५० रुपये । सवलतीत २७० रुपये**

# ग्रंथपान

**एकदा आपणच व्हावे मोर**

**मोहन काळे**




**गंमत जंमत आणि वास्तव**

फुलपाखरांच्या पंखावर सजले मोरपंखी रंग
फुलंही बघतात वेडी चोरून त्यांचे अंग!

कवी मोहन काळे एक नवा बालकवितांचा संग्रह घेऊन आलेले आहेत. त्याचे नाव आहे 'एकदा आपणच व्हावे मोर'. या शीर्षकातूनच त्यांची भूमिका स्पष्ट होते. आपणच इतरांना उपदेश करत असताना स्वतःही त्यामध्ये आपला समावेश असावा. केवळ लोका सांगे ब्रह्मज्ञान नको, ही त्यांची भूमिका.

वास्तविक बालकविता म्हटले की त्यात गंमतजंमत ही आलीच. बालकांना हसतखेळत मौजमजा करायला लावणे आणि हसताहसता थोडेसे बाळकडूही पाजणे आवश्यक असते. हा संस्काराचा भाग म्हणायला हवा. असा संस्कार सहजपणे रुजवता आला बीसारखा, तर त्याचा वृक्ष व्हायला वेळ लागणार नाही आणि हीच वेळ आहे जिथे या बालकांना त्यांचे मनोरंजन करत योग्य त्या टप्प्यावर आणू उभे करणे. 'सूर्य आणि चंद्र' या कवितेत लय आहेत, ताल आहे. सहज गुणगुणता येईल किंवा गाता येईल अशी ही कविता; परंतु तिच्यामध्ये वास्तव दाखवलेले आहे, ते जंगलतोडीचे. यावर उपाय काय, तर किमान प्रत्येकाने तीन झाडे लावायला हवीत. तरच आपल्याला चंद्र, तारे आणि सूर्य यांच्या आनंदात सहभागी होता येईल. तीच गोष्ट 'बीचे झाले रोप'ची. येथेदेखील एका बीपासून रोप तयार होते. ही सवय आनंद तर देतेच, त्यासोबतच एक निर्मितीचा संस्कारही रुजवते.

'मधमाशी' हे एक उत्तम उदाहरण आहे. जी मधाचा थेंब थेंब गोळा करून मधाचे पोळे तयार करते. हे एका मधमाशीचे काम नसून ती एक सांघिक जबाबदारी आहे. अशा तऱ्हेने त्या एकोप्याने एकत्र राहून काम करतात. असा एकोपा असेल तर उत्तम काम तर पार पडेलच, त्याचवेळी आपणास कुणापुढे झुकावे लागणार नाही, हेही त्यातून स्पष्ट होते.

पुस्तकाचे शीर्षक असलेल्या कवितेतील मोर हा सगळ्यांचाच आवडता पक्षी. या पक्ष्याच्या रंग रूपाचे, पिसाऱ्याचे वर्णन करत असतानाच त्याचे ढगाशी जोडले गेलेले नाते आणि त्यातून पडणारा पाऊस हा परस्परसंबंध दोन घटकांचा नसून दोघांमध्ये असलेल्या नात्यांचा आहे, हे मोहन काळे बालमनावर रुजवू पाहतात. त्याच्याच जोडीला पिसांसाठी मोरांचा निर्दयपणे होत असलेला छळ थांबायला हवा, याकडेही ते निर्देश करतात.

गण्या आणि मन्या असे आहेत जुने दोस्त
वॉकमन लावून कानाला फिरतात झुलत मस्त!

यातून आजचे चित्र ते स्पष्ट करतात.

मोहन काळे कवितेमध्ये वेगवेगळे प्रयोगदेखील करतात. जसे की आई-बाबांनी लहान होऊन पुन्हा शाळेत जाणे, भातुकलीचा खेळ खेळणे. चंद्र सूर्य आणि पृथ्वीवर येणे आणि त्यांना कुत्र्याने जंगलात घेऊन फिरणे. चंद्राला फुलपाखरांचे पंख लावून लपाछपी खेळण्याचा मोह होणे. स्वप्नात परीच्या सोबत जगभर भयमुक्त फेरी मारणे.

ये ग झाडावरून खाली चिऊताई
तुझ्याविना मला बघ करमत नाही

यासारखी हळुवार ओळ बालकाच्या एकटेपणाच्या आणि चिवचिवणाऱ्या आवाजाकडे आकर्षित होणाऱ्या बालमनाचा वेध घेते.

समजा मी गेलो वाहत नदीत थेंब होऊन
ओळखतील का मला बुडबुडे छोटे पाहून

बालमनातील स्वप्नाळू कल्पनेचे सुंदर चित्र ते सहजपणे आपल्यासमोर रेखाटतात.

मोहन काळे यांनी भारत सरकारच्या अणुऊर्जा विभागाच्या भाभा अनुसंशोधन केंद्रातील प्रशासन विभागात उत्तम सेवा बजावलेली आहे. त्यासाठी त्यांना मेरिटोरिअस सर्व्हिस आणि ग्रुप अचीव्हमेंट ॲवार्ड या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलेले आहे. तसेच, मोहन काळे हे सुप्रसिद्ध कवी आहेत. त्यांचे आतापर्यंत पाच कवितासंग्रह प्रकाशित झालेले आहेत. त्यासाठी त्यांना महाराष्ट्र साहित्य परिषद पुरस्कारासह अनेक मान्यवर असे पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये आणि कवी संमेलनामध्ये त्यांचा सहभाग असतो. त्यांच्या काव्यलेखनात एक सहजपणा आहे; तसेच कवितालेखनात आवश्यक असणाऱ्या व्याकरणीय संस्कारांनी त्यांची कविता तितक्याच सहजपणे सजलेली दिसून येते. त्यामुळेच या कविता वाचत असताना मनात आपोआप गीतलयीची रुंजी घालू लागतात.

सुप्रसिद्ध कवी अरुण म्हात्रे आणि संदेश ढगे यांनी या कवितासंग्रहाचे आणि मोहन काळे यांच्या काव्य लेखनाचे मनापासून कौतुक केलेले आहे. तसेच, त्यातील नेमक्या जागा अधोरेखित केलेल्या आहेत.

या काव्यसंग्रहाची उत्तम निर्मिती ग्रंथालीने केलेली आहे. त्यासाठी प्रत्येक कवितेला साजेशी अशी चित्रांची जोड दिलेली आहे. ही चित्रांची आणि मुखपृष्ठ सजवण्याची किमया खूप सुंदर आहे. ही किमया सुप्रसिद्ध चित्रकार पुंडलिक वझे यांची आहे.

**मूल्य १५० रुपये । सवलतीत १०० रुपये**

## 'जन्मशताब्दी स्मृतिजागर' क्षणचित्रे



जयवंत दळवी
साहित्यवाचन
'बॅरिस्टर' – सुहास जोशी
प्रदीप वेलणकर
स्वाती चिटणीस




'ठणठणपाळ'
शैलेश दातार,
स्वाती चिटणीस,
प्राजक्त देशमुख,
सुहास जोशी आणि
प्रदीप वेलणकर




'जयवंत दळवी – व्यक्तित्व आणि साहित्य' पुस्तिकेचे प्रकाशन



'रहस्य आणि तरुणी' – अभिवाचन –
प्राजक्त देशमुख, अनिता दाते, ऐश्वर्या नारकर आणि पुष्कर श्रोत्री



'कडू आणि गोड' – अभिवाचन –
रजनी वेलणकर आणि मधुरा वेलणकर–साटम



'दुर्दम्य'मधील उतारा वाचताना
प्रमोद पवार




'गंगाधर गाडगीळ – व्यक्तित्व आणि साहित्य' पुस्तिकेचे प्रकाशन

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.

Postal Registration No. MCW/310/2022-2024
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.